# अहिनकुल

(कादंबरी)

अनिल सहस्रबुद्धे

प्रकाशक

**अहिनकुल**
**AAHUNKUL (NOVEL)**
**डॉ. अनिल सहस्रबुद्धे**

**© सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे**
'आई', समर्थनगर, श्रीरामचौक,
पाईपलाईन रोड, अहमदनगर ४१४००३
दूरध्वनी : (०२४१) २४२४१६७

प्रथम आवृत्ती एप्रिल १९८६
प्रकाशक-
अनंत दाशरथे
परिमल प्रकाशन,
खडकेश्वर, औरंगाबाद-४३१ ००१

द्वितीय आवृत्ती २०१८

मुद्रक

टाईपसेटींग
कुलकर्णी टाईपसेटर्स, अहमदनगर
मो. ९८५०२३२८९०

मुखपृष्ठ

किंमत



# ऋणनिर्देश

**(प्रथम आवृत्तीकरिता)**

डॉ. गंगाधर मोरजे, डॉ. भीमराव कुलकर्णी. डॉ. प्रभाकर मांडे, डॉ. सरोजिनी बाबर, पूजनीय हरिभाऊ फडके यांच्या आशीर्वादाने आणि विशेषतः डॉ. गंगाधर मोरजे यांच्या मार्गदर्शनाखाली मी लोकसाहित्याचा अभ्यासक झालो आणि 'चाळीसगाव डांगाण' परिसरातील लोकसाहित्य आणि बोली भाषा यावर आधारलेला 'चाळीसगाव डांगाण परिसर : सांस्कृतिक, वाङ्मयीन व भाषिक अभ्यास' हा प्रबंध अवतरला.

चाळीसगाव डांगाण परिसराचा असा अभ्यास करताना मी परिसरातील आदिवासींमध्ये रमून गेलो. याचवेळी गोविंद खाडे (गोविंद खारी) या झुंजार किल्लेदार, महालकरी, जहागिरदाराने हिंदवी स्वराज्यासाठी दिलेल्या लढ्याने माझे लक्ष वेधून घेतले. मन भारावले. स्वाभिमानाने भरून गेले. आदिवासी मागासलेले असे ज्यांना आम्ही म्हणतो त्यांनी दिलेला हा लढा पाहून गहिवरून आले. याविषयी स्वतंत्र काही लिहावे असे मनी आले. मिळतील तेवढे पुरावे, मिळतील तेवढ्या आख्यायिका, मिळतील तेवढ्या नोंदी मिळविल्या. माझे मित्र श्री. मदन (अण्णा) चोरघडे यांच्याशी मी बोललो, तरुण वयात कर्तव्यबुद्धीने आणि समर्पितपणे कार्य करणारे ते एक कार्यकर्ते. त्यांनी गोविंद खाड्यांवर ऐतिहासिक कादंबरी लिहिण्याचा आग्रह धरला. मीही सरसावलो आणि 'अहिनकुल' अवतरली.

मी साहित्य क्षेत्रात नवखा. प्रसिद्धी कशी करावी सुचेना. आदरणीय श्री. ग. वा. बेहेरे यांना लिहिले. त्यांनी हस्तलिखित मागविले, वाचले आणि त्यांच्या 'कादंबरी' या मासिकात जून व जुलै १९८२ मध्ये 'अहिनकुल' ही माझी पहिली ऐतिहासिक कादंबरी प्रसिद्ध झाली.

पण पुस्तकरूपाने प्रसिद्ध व्हावी ही आस मनी होती. मी 'परिमल प्रकाशना'चे प्रकाशक आदरणीय श्री. अनंत दाशरथे यांच्याशी पत्रव्यवहार केला. तोपर्यंत माझी 'डांगाणी'

ही दुसरी कादंबरी (सामाजिक-आदिवासींच्या जीवनावरील-कादंबरी) लिहून झाली होती. आदरणीय श्री. अनंत दाशरथे यांनी माझी दोन्ही कादंबऱ्यांची हस्तलिखिते मागविली, वाचली आणि दोन्ही कादंबऱ्या पुस्तकरुपाने प्रसिद्ध करण्याची जबाबदारी स्वीकारली. खरे तर मी साहित्यक्षेत्रात अगदी नवीन. कोणतेही अनुदान न घेतलेला. त्यात आदरणीय श्री. अनंत दाशरथे यांच्याशी ओळखदेखही नाही. त्यात अकोलेसारख्या खेड्यात 'मॉडर्न हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स' मधला एक फाटका मास्तर! हे सारे असूनही आदरणीय श्री. अनंत दाशरथे यांनी जानेवारी १९८५ मध्ये माझी दुसरी कादंबरी 'डांगाणी' प्रथमतः प्रसिद्ध केलीसुद्धा. आणि आता 'अहिनकुल' ते प्रसिद्ध करीत आहेत.

सौ. उषा सहस्रबुद्धे (माझी पत्नी), ती.सौ. आनंदीबाई सहस्रबुद्धे (माझी माता) या माझ्या हस्तलिखितांच्या पहिल्या वाचक! त्यांनी हिरवा कंदील दाखविल्याखेरीज मी लेखन कुठेच पाठवित नाही. त्यांनी मला सतत प्रोत्साहन दिले आहे. याबरोबरच ती.स्व.सौ. मोरजेबाई यांनी माझ्यातील ललित साहित्यिकाला सतत आशीर्वाद दिला.

या सर्व सुहृद महामनांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे.

**– अनिल सहस्रबुद्धे**

●●●



**प्रथम आवृत्तीची समर्पण पत्रिका**

**श्रेष्ठ स्वातंत्र्यसैनिक, सामाजिक कार्यकर्ते,**
**'हिंद सेवा मंडळ' अहमदनगर या आमच्या संस्थेतील**
**सर्व कर्मचाऱ्यांचे पालक व संस्थेचे ऑनररी जनरल सेक्रेटरी –**
**पूजनीय श्री. त्र्यं. वि. तथा नानासाहेब निसळ**

**व**

**माझ्यावर राष्ट्रीय संस्कार करणारे,**
**राष्ट्रासाठी समर्पित जीवन जगणारे व जगलेले महामना –**
**पूजनीय दामुअण्णा दाते**
**व**
**पू.कै. तात्या (भार्गवराम) बापट**
**यांना अर्पण !**

# कादंबरी वाचनाअगोदर थोडेसे...

पीएच.डी. पदवी परीक्षेसाठी – ‘चाळीसगाव डांगाण : सांस्कृतिक वाङ्मयीन आणि भाषिक अभ्यास’ – असा विषय. या निमित्ताने डांगाणच्या इतिहासाचे परिशीलन झाले. साधने अगदीच तुटपुंजी. गोविंद खारी (खाडे?) अन् रामजी भांगरे यांचा रोमांचकारी इतिहास वाचनात आला तेव्हापासून या विषयी काही लिहिण्याची मनिषा. मनिषा प्रबळ झाली. जुळवाजुळव झाली आणि कादंबरी झाली. ऐतिहासिक कादंबरी. आदिवासींनी केलेल्या स्वातंत्र्य संग्रामाची.

– ऐतिहासिक कादंबरी, ऐतिहासिक सत्याबरोबरच ऐतिहासिक व्यक्तींच्या अंतस्थापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करते. तसा प्रयत्न येथे आहे.

– उपलब्ध ऐतिहासिक माहिती – सत्य आणि कल्पना यांचा कलात्मक आविष्कार म्हणजे ऐतिहासिक कादंबरी.

– त्या दृष्टीने येथे उपलब्ध इतिहास असा –

– १७८९ पर्यंत तुकोजी होळकरांच्यावतीने जावजी कोळी याने राजूर सुभ्याचा, साठ गावांचा कारभार जबाबदारीने पाहिला. तो स्वतःच्या अनुयायांकडूनच मारला गेला.

– त्यानंतर त्याचा मुलगा हिरजी नाईक हा सुभेदार झाला.

– हिरजीच्या कारकिर्दीत १७९८ मध्ये गोविंदजी, मनाजी अन् वाळोजी यांनी बंड केले. त्यांना अनुयायी भरपूर मिळाले होते. गोविंदजी पकडला गेला. मनाजी पळून गेला व पुढे मरून गेला. वाळोजीने मात्र मोठी फौज जमवून कोकणात स्वारी केली. हिरजीने अखेर त्याला पकडले. पुढे त्याचा पुतण्या रामजी भांगरे याने बंड केले. तो बंडखोर म्हणून प्रसिद्ध होता. त्याचे शौर्य पाहून त्याला सरकारने पोलिस अधिकारी म्हणून नेमले. त्याने इंग्रजांना खूप मदत केली. हे बंडखोर लोक दरोडेही पाडत असत.

– पुणे ब्रिटिशांच्या ताब्यात गेल्यानंतर बाजीराव जुन्नर भागातून पळ काढीत ओतूर, ब्राह्मणवाडा या मार्गे लिंगदेवपर्यंत आला. त्याचा पाठलाग करीत जनरल स्मिथ

शिरुरपर्यंत पोहोचला. तेथून तो थेट थुगाव (सुगाव) पर्यंत आला. ही बातमी समजताच बाजीराव कोतुळमार्गे राजूर परिसरात अवघड गडांच्या आश्रयाला गेला. या दऱ्याखोऱ्यात जनरल स्मिथ येणार नाही असे त्यास वाटत होते, पण अखेर जनरल स्मिथने त्याला तेथून पिटाळले.

– त्याच सुमारास होळकरांचाही इंग्रजांकडून पराभव झाला. त्यांच्या अधिपत्याखालील डांगाण भागातील किल्ले कॅप्टन सीकसने सर केले.

– यावेळी गोविंदराव खारी (खाडे?) हा रतनगडचा प्रमुख सेनाधिकारी होता. त्याला छोटी जहागिरीही मिळाली होती. त्याला हे अधिकार पेशव्यांकडून मिळाले होते. त्याच्या अधिकारावर कॅप्टन सीकसमुळे गदा आली होती. पेशव्यांचा पराभव झाला तरी तो पेशव्यांशी एकनिष्ठ होता. त्याने त्यांच्या पराभवानंतर इंग्रजांनी देऊ केलेल्या नोकरीवर लाथ मारली. आणखी बारा किल्लेदारांची अशीच अवस्था झाली होती. हे सारेच लोक रामजी भांगरेला मिळाले.

– रामजी भांगरे पोलिस जमादार झाल्यानंतर तो वर्षातून एकदा 'भेट' नावाचा प्रकार घडवून आणीत असे. इंग्रज सरकारने हे 'भेट' प्रकरण बंद करण्याचा हुकूम दिला. रामजीने राजीनामा दिला. तो नामंजूर करून त्याला सहा महिन्यांची रजा दिली. पगार वाढविला नाही. तो नेहमीच्या सवयीप्रमाणे बंड करून उठला. त्याच्यासारखीच गत झालेले पोलिस अधिकारी त्याला येऊन मिळाले.

– एकूण रामजी भांगरे अन् त्यांचे साथीदार, गोविंदराव खाडे अन् त्यांचे साथीदार आणि जातभाई डोंगरात एकत्र आले. पाचशेवर बंदुकधाऱ्यांची फौज जमा झाली आणि त्यांनी विशेषतः कोकण भागात अन् त्याचबरोबर नासिक, पुणे भागातही दरोडेखोरी अन् बंडखोरी सुरू केली.

– कॅप्टन माकिनटोश या अधिकाऱ्यावर हे बंड दडपून टाकण्याची जबाबदारी आली. तो सह्याद्रीच्या रांगात आला. त्याला काहीच शोध घेता येईना. देशपांडे, कुलकर्णी, देशमुख आदींनी त्याला या बंडखोरांमागे न जाण्याचा सल्ला दिला. कॅप्टनला तो तात्पुरता पटला. तरी गुप्तरितीने बंडखोरांचा माग काढण्याचा त्याचा प्रयत्न चालूच होता. फंदफितुरीचा त्याला चांगलाच उपयोग झाला होता. त्याला बंडखोरांची नांवे मिळाली. तरी बरेच दिवस त्याला काही करता येईना. अखेर कंटाळून त्याने भिवंडी, मालेगाव, अहमदनगर व पुणे येथून सैन्यपथके पुढे-पुढे सरकवित आणून बंडखोरांना रानांत त्यांच्या ठाण्यावर पूर्ण कोंडीत पकडले. गोविंद खाडे, रामजी भांगरे अन् त्यांचे काही अनुयायी सापडले. रामा किरवा नावाचा त्यांचा एक शूर साथीदार दक्षिणेत अहमदनगर जिल्ह्यात भिल्लांच्या टोळीस मिळाला. त्यांनी बंड चालूच ठेवले. कॅप्टन माकिनटोशने या म्होरक्यांना अहमदनगरच्या जेलमध्ये ठेवले.

– हा सारा प्रकार १८१८ नंतर १८२० ते १८३५-३७ च्या दरम्यान घडला.

– पहिले स्वातंत्र्य बंड असे याचे वर्णन करता येईल. कादंबरीतील काल्पनिक भाग असा –

– वरील इतिहासात उल्लेखिलेल्या व्यक्तीखेरीज अन्य सर्व पात्रे काल्पनिक आहेत. अन्य प्रसंगही काल्पनिक आहेत. त्यांचा त्या त्या भागातील गावातील कोणाही जिवंत वा मृत व्यक्तीशी संबंध नाही.

– पाटील, देशमुख व देशपांडे यांची नावे पूर्ण सत्य असली तरी कादंबरीतील त्यांचा संबंध काल्पनिक आहे. तीच गोष्ट पुराणिकबुवा धर्माधिकारी यांचे विषयी.

●●●

हा रतनगडाचा कल्याण दरवाजा
जव्हार, कल्याण, कोकण यांशी येथून संपर्क



# एक

आकाशात अनंत चांदण्या. लिकलिकणाऱ्या. चंद्र राजा. चांदण, स्वच्छ-शीतल. पण चंद्राला मोठं खळं. स्वार दौडत होता. पांढऱ्याशुभ्र, उंच्यापुऱ्या, लांबरुंद, उमद्या जनावराची रेशमी आयाळ दोडीच्या ठेक्यावर उडतांना पिठूर चांदण्यात चमकत होती. जॅकीचे पाय जमिनीला ठरत नव्हते. चौखुर उधळणाऱ्या त्या जनावरांवर तसाच उमदा तरुण मांड ठोकून बसला होता. वेगवान घोड्यावरही तो ताठ मानेनेच बसला होता. त्याच्या तांबूस गोऱ्यापान देहावर चंदेरी छटा आली होती. देह चमकत होता. चेहरा मात्र उंचेल्या हॅटच्या पुढे आलेल्या शेडने अर्धवट झाकला होता. घोड्याचे लगाम सैल सोडलेले होते. घोड्यांच्या गतीबरोबर फक्त रिकिबीत अडकविलेल्या पायांचीच हालचाल होत होती. पायाच्या हालचालीवरून त्याला पोहचण्याची किती घाई आहे हे लक्षात येत होते. असे घोडेस्वार अहमदनगरच्या पूर्वेला त्या मार्गाने रोजच दौडत असत. पण केवळ ऐटदार सैनिकी पोशाखातील, ऐटदार जवान आणि जॅकीची चौखूर दौड यावरूनच तो स्विफ्ट आहे हे कोणाच्याही लक्षात येत असे. स्विफ्ट नावाप्रमाणेच सदैव घाईतच असे. तो आठ-दहा दिवसांनी कधीतरी त्या मार्गात दिसे, परंतु जॅकीच्या टापांचा आवाज ऐकला की छावणीपर्यंतच्या प्रत्येक दगडाला देखील सावधानता येत असे. मग दुसऱ्या दिवशी धावपळ पाहावयास मिळे.

अहमदनगरच्या पूर्वेकडे इंग्रज गोऱ्यासाहेबाची छावणी होती. चांगली दोन-अडीच मैल दूर. जेमतेम दोन बकऱ्या जाऊ शकतील अशी वाट होती. दुतर्फा जवळजवळ मैलभर झाडी होती. त्या झाडीच्या पलिकडे मात्र काहीच नव्हते. पुढे अगदी टेकडीपर्यंत सपाट पांढरट रस्ता. तिकडच्या बाजूला शिपायांखेरीज सहसा कोणीच जात नसे. मधून-मधून व्यापाऱ्यांची ये-जा चाललेली दिसे. क्वचित कोणी प्रतिष्ठित व्यक्ती बग्गीतून तिकडे इतमामाने जाताना दिसे. एरवी त्या रस्त्याला घोड्यांच्या टापांचे आवाज तेवढे परिचयाचे होते. घोड्यांच्या धावण्याने रस्ता चांगलाच मळला होता. स्विफ्ट त्याच मार्गावरून दौडत होता. कोठे वळण, चढ-उतार काहीच नव्हते. त्यामुळे जॅकी देखील सुसाट पळत होता.

चंदेरी सागराला चिरून धावणाऱ्या वाटेवरून थंडगार वाऱ्याला न जुमानता पिठूर शांततेचा भंग आपल्या टपटपणाऱ्या खुरांनी करीत जॅकी लाडक्या स्वाराला त्या छावणीकडे घेऊन जात होता.

छावणीचे पांढरेशुभ्र तंबू चांदण्यात मिसळून गेले होते. चौकात रेखीवपणे पसरलेल्या तंबूच्या मधोमध एक इमारत. भुरकट काळी. चिऱ्यांची. उंच रेखली, चुने गच्चीची. आपले अस्तित्व, आपल्या दोन किलकिल्या डोळ्यांनी सिद्ध करीत होती. हळूहळू डोळे मोठे-मोठे होत होते. त्या पाषाणातून दोन खिडक्यांच्या वाटे केरोसिनच्या दिव्यांचे मंद प्रकाशकिरण पाझरत होते. मुक्तपणे पसरलेल्या विभोर चांदण्याला जणू ते वाकुल्या दाखवित होते. चौकीच्या प्रवेशद्वाराशी जॅकी येताच जॅकीचा लगाम खेचला गेला. जॅकीला याची पूर्वकल्पना होतीच. नकळत पुढचे दोन्ही खूर आपल्या छातीजवळ आखडून मागल्या वेगवान पायांना जॅकीने थांबण्याची आज्ञा दिली. आपली मान रूबाबात डावीकडे वळवित पाठीवरून उडी मारून पाठ थोपटणाऱ्या मालकाकडे कौतुकाने पाहिले. पहाऱ्यावरच्या शिपायांनी सॅल्यूट ठोकला. त्यांच्या सॅल्यूटचा स्वीकार करून मंदपणे हसत स्विफ्टने जॅकीसह छावणीत प्रवेश केला. जॅकीला नेहमीच्या जागे उभे करून, त्याला आपल्या हाताने तोबरा देऊन स्विफ्ट मुख्य इमारतीकडे वळला.

गेले पाच तास त्या इमारतीत जणू श्‍वास कोंडून धरल्यासारखे झाले होते. रात्रीचे अकरा वाजून गेले होते तरी पेटर, रोनॉल्ड, पीट वा अन्य कोणालाही तेथून हलता आले नव्हते. स्विफ्टला पाहताच त्यांनी एकदम सुटकेचे निःश्‍वास सोडले.

इमारतीच्या आत एक चांगले औरसचौरस टेबल होते. त्या टेबलाच्या मागे एक भव्य खुर्ची होती. टेबलाच्या पुढ्यात मोजक्याच तीन खुर्च्या ठेवल्या होत्या. टेबलावर नकाशा दिसत होता. कसल्याशा खडूने निरनिराळे मार्ग त्या नकाशात उमटले होते. डोंगर, दऱ्या, पाण्याच्या जागा, गावे, मंदिरे अशा कितीतरी महत्त्वाच्या वाटणाऱ्या गोष्टी तेथे दिसत होत्या. सबंध टेबलावर पसरलेल्या पांढऱ्याशुभ्र नकाशावर केरोसिनच्या दिव्यांच्या प्रकाशाने पिवळसर छटा आली होती. त्यावरच कसलेसे कागद अस्ताव्यस्त विखुरले होते. पाठीमागच्या खुर्चीत एक उंच, गोरीपान सोनेरी केसांची आकृती बसून त्या नकाशात आपल्या किलकिल्या डोळ्यांनी निरखून पाहत होती. नजर जेव्हा वर होई तेव्हा निळे डोळेही तांबेरून जात. मूठ टेबलावर आपटीत ती, हिरव्यागर्द सेनानी पोशाखातील आकृती सहा फूट होत असे. मग खुर्चीवरून बाजूला होऊन, लांब लांब टांगा टाकीत दारापर्यंत फेऱ्या सुरू होत. दोन बाजूला लहान टेबलाआड खुर्चीवर बसलेल्या युनिफॉर्ममधील पीट आणि पेटरना ताडकन उठावे लागे. दोघांच्याही तोंडातून ''यस सर!'' असा दक्षध्वनी उमटे. उत्तर मिळत नसे. कधी मागे हात आवळून तर कधी डाव्या पंजाच्या पाची बोटांच्या टोकावर उजव्या पंजाची टोके टेकून फेऱ्यांचा वेग विचारमग्न होत असे. कमरेचा पट्टा खिशाखांद्यावरील फितीच्या साक्षीने मंद प्रकाशात आपली जरब सिद्ध करी. पुन्हा आपल्या खुर्चीवर डावीकडून अंग झोकत, खणातील चिरूट तांबड्या ओठात ठेवून पेटविला जाई आणि चिरूटाचा जोरदार कश



मारून डाव्या हातात चिरूट जातांना तोंडातून बाहेर पडणाऱ्या धुरापाठोपाठ शब्द निघत- ''नो ऽ नो ऽ इट ओन्ट डु!'' पिसाट नागाने केलेला तो फुत्कार वाटे. ज्वालामुखीतून बाहेर पडणारा तो लाव्हा वाटे. चिरूटाचे चार कश झाल्यावर चिरूट बाजूला होई आणि कॅप्टन माकिनटोश पुन्हा उसळून उठे. पुन्हा फेऱ्या सुरू होत. दरवाजाजवळ थांबून दूरवर नजर टाकीत, डाव्या डोळ्याची एक भिवई वक्र करून, कपाळावर आठ्यांचे जाळे पसरून, कॅप्टनच्या तोंडून चिंतेचा शब्द निघे- ''ओ ऽ पीट, इटइज सो लेट तू खम हीम टू!'' मग कॅप्टन, काळू शिपायास म्हणे- ''खाळू ज्या टो स्विफ्ट येटो खा ते बघा'' इतकावेळ उगाच चिंताक्रांत चेहेरा करून बसलेला काळू छावणीच्या प्रवेशद्वारापर्यंत उगाच फटका मारून येई आणि येऊन सॅल्यूट ठोकून गंभीरपणे म्हणे- ''नाही.'' त्यावर किलकिले डोळे करून पाहणारा कॅप्टन पुन्हा आपल्या खुर्चीकडे वळे. असेच नाट्य गेले पाच तास चालू होते.

स्विफ्ट आला तेव्हा कॅप्टन अशाच फेऱ्या मारीत होता. स्विफ्टला पाहताच इतकावेळ स्विफ्टची उतावीळपणे वाट पाहणारा कॅप्टन एकदम गंभीर झाला. स्विफ्टने आत येताच कडक सॅल्यूट ठोकला. आणि तो बोलू लागणार तोच, कॅप्टनचा लांबुळक्या बोटांचा विस्तीर्ण पंजा त्याच्या पुढ्यात आला. डोळे विस्फारले गेले. ओठातून ''शू ऽऽ'' उमटले. स्विफ्टने आपणास थांबावयास सांगितले आहे हे ओळखले. कॅप्टनने खुर्चीत बसावयाची खूण करताच तो खुर्चीत बसला. कॅप्टननेही आपल्या आसनावर बसकण मारली. कॅप्टनने पुन्हा एकदा चिरूट पेटवले. कॅप्टनला एवढा थंडपणा आता कसा आला हे काळूच्या ध्यानी येईना. कॅप्टनने एक-दोन कश घेऊन स्विफ्टकडे पाहिले. ''यस, हॅव यू डन द होल?'' त्याने विचारले. ''यस सर,'' स्विफ्ट उत्तरला. ''टो राजुरचा ट्रिंबक देशपांडा काय बोलला?'' कॅप्टनने विचारले. ''ही हॅज गिव्ह धिस्.'' आपल्या जवळचा एक लखोटा कॅप्टनच्या हाती देत स्विफ्ट म्हणाला, ''हॅव यू सीन इदे देशमुख?'' ''यस् सर, ही मेट मी ॲट राजूर,'' ''ऑल द थींग्ज टू?'' कॅप्टनने जोर देत पुढे विचारले. स्विफ्टने केवळ होकारार्थी मान हलविली. सहा फूट उंचीचा किडकिडीत लालबुंद कॅप्टन एकदम उसळला. चिरेबंदी दालनात त्याचे शब्द घुमले, ''धिस ओन्ट डू! स्विफ्ट, धिस ओन्ट डू!'', ''वुई हॅव टू लीव्ह इमिजिएट.'' त्याच्या निश्‍चयाने पीट आणि पेटर दोघेही भान हरपून त्याच्याकडे पाहत होते. ''आता पुढील हुकूम काय सुटतात?'' ते विचार करीत होते. काळू गंभीर होऊन ताठ झाला. साहेबाबरोबरच त्याच्याही डोक्यात शीर उडत होती.

* * *

पुणे परिसरातील मावळ भागाच्या सरहद्दीवर; ठाणे जिल्ह्याच्या परिसरात व जव्हार संस्थानच्या एका बाजूला मुरबाड तालुक्याच्या सरहद्दीवर आणि नासिक जिल्ह्याच्या त्र्यंबक प्रांताच्या सरहद्दीवर राजूरचा सुभा, साठ गावांचा. खरे म्हटले तर प्रवरेच्या खोऱ्यातील लागून चाळीस गावेच. पण जोडीला दक्षिणेकडे मूळणेर आणि उत्तरेकडे अढळा म्हाळुंगीचा

नेहेर. या भागात या संपूर्ण परिसरात सह्याद्रीची, कळसुबाई, रतनगड, हरिश्चंद्र, अळंगा–कुळंगा, बितानगड, पाचपट्टा, अजुबा आदी उंच–उंच शिखरे उघडी–वाघडी. शिखरांच्या पश्चिम बाजूला ठाण्याकडे काळेभोर कापीव कडे. रतनगड, हरिश्चंद्रगड, कोंबडकिल्ला, पावरकिल्ला, आळंगा–कुळंगा, पट्टाकिल्ला (विश्रामगड) असे किल्ले आणि सर्वत्र लहानमोठ्या शिखरांवर शे–पाचशे जनावर राहील अशा प्रचंड गडदी. या भागात कोळ्यांची सलग गावेच्या गावे. तशी भीमाशंकरपासून त्र्यंबकेश्वरापर्यंत महादेवकोळ्यांचीच सलग गावे आहेत. जव्हार स्टेटचे राज्यही महादेवकोळ्यांचेच. हा राजूर सुभा तुळोजी होळकरांच्या ताब्यात होता. पेशव्यांनी किल्ल्या–किल्ल्यांवर सेनाधिकारी नेमले होते. हा सारा परिसर आता गोऱ्या लोकांच्या हाती आला होता.

बाजीराव पेशवे इंग्रजांच्या हाती लागू नये म्हणून पुण्याहून जुन्नरमार्गे ब्राह्मणवाडे, कोतुळ, एवढेच नव्हे तर लिंगदेव गावाजवळ येऊन पोहोचले होते. जनरल स्मिथ आपल्या शिपायांच्या फौजेसह बाजीराव पेशव्यांचा पाठलाग करीत निघाला होता. संगमनेरमार्गे तो थेट थुगावपर्यंत येऊन पोहोचला. ही बातमी पेशव्यांना कळताच पेशवे हरिश्चंद्रगडाच्या दिशेने पळाले होते. सह्याद्रीच्या डोंगरदऱ्यांत जनरल स्मिथ येणार नाही असे त्यांना वाटत होते परंतु जनरल स्मिथ पोहचला. साता समुद्रापलिकडून अधिराज्य स्थापन करण्यास आलेला गोरा अधिकारी होता तो. तो थांबतो थोडाच! त्याने आपल्या सैन्याच्या मदतीने दरी–दरी, डोंगर–डोंगर पोखरून काढले अन् पेशव्यांना बाहेर काढलेच. आणि अखेर पेशवाईचा अखेरचा वारस गोऱ्या साहेबाच्या हातात सापडून पेशवाईचा अस्त झाला होता. त्याच्या या कारवाईने डोंगर थरारले होते. कोळी बिथरले होते. ज्या डोंगरांच्या ढाली करून श्री शिवछत्रपतींनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली होती, त्याच कडेकपारींनी आता मराठेशाहीचा अस्त आपल्याच कुशीत घडविला होता. परदेशातून येऊन भारतातील लोकांना गुलाम करणाऱ्या, इतिहासाची पुनरावृत्ती होत होती. वैभवशाली स्वतंत्र हिंदू साम्राज्याचे स्वप्न अवघ्या दोनशे वर्षातच भंग पावत होते. महत्प्रयासाने पडलेल्या या स्वप्नाची होळी पाहत होती, ही महादेवाचीच उंच शिखरे!

त्याचवेळी जनरल स्मिथच्या बरोबरीने कॅप्टन सीकस तुळोजी होळकरांच्या ताब्यातील व पेशव्यांच्या हुकमतीतील एकेक किल्ला घेत–घेत निघाला होता. पेशवाईचा अस्त होत असतांना कॅप्टन सीकसने हरिश्चंद्रगड, रतनगड व अन्य किल्ले ताब्यात घेतले होते. किल्ल्यावरच्या सेनाधिकाऱ्यांना जरब बसविली होती, लुटले होते, पिटाळून लावले होते. आपला अंमल बसविण्यासाठी वंशपरंपरागत कोणतेच हक्क सुखासुखी मिळत नाहीत म्हणून सतत बंडखोरी करून बंडखोर म्हणून गाजलेला, हुशार, लढवय्या असा जवान रामजी भांगरे यास पोलिस जमादार म्हणून नेमले होते. हिरजी नाईक सुभेदार शरण आलाच होता. रामजी भांगरे जमादार, पाटील गावगन्ना व राजूरचे कुलकर्णी यांचेवर कारभाराची नीट सूत्रे सोपविली होती. पेशव्यांनी व होळकरांनी दिलेले सर्व अधिकार काढून घेतले होते तरी काही वतने मुद्दाम चालूच होती. रतनगडमहाली गोविंद खाडे नावाचा कोळी सेनाधिकारी



होता. त्यांच्यासह आणखी बारा सेनाधिकारी व किल्ल्यांचे अधिकारी यांचे अधिकार काढून घेतले होते. ज्यांना शक्य आहे व जे प्रामाणिकपणाने मायबाप सरकारची सेवा करतील अशा सर्वांना नोकऱ्या देऊन स्वसैन्यात शिपाई बनवून इनामे दिली होती. सारा परिसर आता बिनबोभाट ब्रिटिशांच्या ताब्यात आला होता. ही सारी व्यवस्था होऊन उणीपुरी दहा वर्षे होतात न होतात तोच एकेक भयंकर बातम्या गोऱ्या साहेबाच्या कानी येऊ लागल्या होत्या. सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात कोळी लोक स्वतंत्र राज्य करू लागले होते. त्यांनी टोळ्या करून सबंध परिसरात दरोडे, दहशत, लुटालूट या मार्गाने धुमाकूळ घातला होता. परंतु गोऱ्या साहेबाला रामजीकडून मिळणाऱ्या बातम्या, कुलकर्णीकडून मिळणाऱ्या बातम्या चोख होत्या. पण गोरे अधिकारी आतल्या बातम्या काढीत होते आणि म्हणूनच कॅप्टन माकिनटोशवर ह्या सर्व कारवाया हाणून पाडण्याची जबाबदारी सरकारने दिली होती.

कॅप्टन माकिनटोशने आपला तळ अहमदनगर येथे दिला होता. हाती आलेल्या सगळ्या बातम्या खऱ्याच आहेत ना, याची तो शहानिशा करीत होता. रोज वेगळे प्रकार त्याच्या कानावर येत होते आणि आपली जबाबदारी वाढल्याची जाणीव तीव्र होत होती. तो हळूहळू योजना करू लागला होता. त्याने परिसराचा नकाशा मिळविला होता. सुमारे हजार शिपायांची फौज बरोबर घेतली होती. सर्व शिपाई पारखून घेतले होते. स्विफ्ट हा त्याचा अगदी विश्वासू असा हेर होता. कॅप्टन माकिनटोशवर फार मोठी जबाबदारी असल्याने त्यास सारखीच धावपळ करावी लागे. हातात घेतलेले काम पूर्ण होईपर्यंत त्याला जेवणखाण, झोप कसलीच पर्वा नसे. म्हणूनच चार जिल्ह्यांच्या सरहद्दीवरच्या या कोळ्यांना शांत करण्यासाठी त्यांना पकडून त्यांचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी त्यास खास अधिकार देऊन नेमले होते. त्याला केव्हाही कितीही अधिक सैन्य मागण्याचा अधिकार होता. सर्व गोऱ्या अधिकाऱ्यांमध्ये तो अत्यंत चिवट म्हणून त्याची ख्याती होती. पण आता त्याला खुद्द सह्याद्रीलाच तोंड देण्याची वेळ आली होती. जो सह्याद्री स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठीच निर्माण झाला होता त्याच्याशी लढत देण्याची वेळ आली होती.

प्रथम काम स्वीकारताना दरोडेखोरांना पकडण्याचे अगदीच मामुली काम आपणावर कॅप्टन सीकस व जनरल स्मिथने का सोपवावे हे खुद्द कॅप्टनच्या लक्षात आले नव्हते. पण एकेक माहिती गोळा होत असतांना आपल्या कामाचे महत्त्व सामान्य नाही हे आता त्याच्या लक्षात आले होते. आज स्विफ्टने आणलेला लखोटा पाहता त्याची खात्रीच पटली होती आणि त्याच्या तळपायाची आग मस्तकाला भिडली होती. तो संतापाने थरथरत होता. कोळ्यांनी सर्व जगावर सत्ता गाजवू पाहणाऱ्या इंग्रजांविरुद्ध बंड पुकारावे, ही कल्पनाच त्याच्या सुबुद्ध मेंदूला अत्यंत अपमानास्पद वाटत होती. ज्या सत्तेचे रवी तेज सर्व पृथ्वीवर पसरले आहे, त्या सत्तेला यःकश्चित कोळ्यांच्या टोळ्यांनी आव्हान द्यावे ही गोष्ट त्याच्या कल्पनेला ग्रहण लावणारी होती. सरड्याने कुंपणापलिकडे धाव घेण्याची भाषा करावी, शामभटाने ऐरावत झुलवण्याची भाषा करावी, भिक्षाधिशाने लक्षाधिशाचा आव आणावा, पृथ्वीने समुद्राला आपल्या उदरात गडप करण्याची मनिषा बाळगावी असे जणू त्यास वाटत

होते. हे सारे भाव काळू आपल्या साहेबाच्या चेहऱ्यावर पाहात होता.

कॅप्टनने आवश्यक अधिकाऱ्यांना बोलावले आणि मग आपली योजना समजावून सांगताना रात्र केव्हा संपून गेली ते कॅप्टनच्या लक्षातच आले नाही. पीट आणि पेटर यांनी आज रात्र जागवली जाणार हे भाकित केलेच होते. चांगल्या तीन तासांच्या मसलतीनंतर सर्व योजना पूर्ण झाली. दोनच दिवसात येथून कूच करावयाचे ठरले. कॅप्टन दुसऱ्या दिवशी फादर डिसुजांची भेट घेणार होता. हे सगळे झाल्यावर कॅप्टनने अधिकाऱ्यांना जायला सांगितले. आता त्याने काळूसकट सर्वांना आपल्या टेबलाभोवती जमावयास सांगितले. काळूच्या लगेच लक्षात आले. त्याला आता नित्य परिचयाचे झाले होते. त्याने खुर्च्या सारख्या करून पाण्याचे जग भरून आणून ठेवले. टेबलावरील नकाशा आणि इतर कागदपत्रे नीट कॅप्टनच्या संकेतानुसार ठेवून दिली. पितळी चशक टेबलावर मांडले गेले. मद्याची सुरई कपाटातून बाहेर आली. आता कॅप्टन खुशीत होता. त्याने स्विफ्टला आपल्या जवळ बसविले होते. आपल्या हाताने मद्याचे चशक भरून त्याने ते सर्वांना दिले आणि कॅप्टन एका मागोमाग मद्याचे चषक रिचवत राहिला. प्रत्येक चषकानंतर डोळे किलकिले करून तो शून्यात पाही. त्याचे बोलके डोळे पुढची योजना जणू त्याच्याजवळ सादर करीत. मद्य यथेच्छ प्राशन करून झाल्यावर त्याने सर्वांचा निरोप घेतला व आतल्या बाजूला आपल्या बेडकडे त्याच्या लांब टांगा जाऊ लागल्या. काळू पुढे झाला. काळू त्याचा विश्वासू माणूस होता. शिवाय त्यास मराठी लिहिता-वाचता येत नव्हते आणि इंग्रजीचा तर प्रश्नच नव्हता. तो अगदीच सरळमार्गी होता. 'ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी' या मताचा. त्याने पुढे होऊन कॅप्टनचे बेड ठाकठीक केले. कॅप्टनने अंग झोकून दिले. त्याच्या डोळ्यासमोर अद्याप बंडखोरांना संपविण्याचे प्लॅनच चालू होते. 'रास्कल' तो छताकडे पाहत म्हणाला. विचारांच्या तंद्रीत आपला अंगावरील सेनानी पोषाख न उतरताच कॅप्टन झोपी गेला. मग काळूने आपली पथारी टाकली. स्विफ्ट आपल्या तंबूकडे जाताना उगाचच घोड्याजवळ गेला. घोड्याला थाप मारून तो आपल्या तंबूत शिरला. घोड्याने उद्याच्या रपेटीची सूचना जाणली. उद्याचा सूर्य कॅप्टनच्या योजना अंमलात आणण्यासाठी, बंड मोडून काढण्यासाठी उगवणार होता.

* * *

सकाळपासून छावणीत नुसती धांदल उडाली होती. पीट आणि पेटर आपला गणवेश परिधान करून केव्हाच तयार होऊन बाहेर पडले होते. त्यांच्या प्रत्येक ऑर्डरबरोबर शिपायांची नुसती धावपळ होत होती. आतापर्यंत वीस-पंचवीस राहुट्या गुंडाळल्या गेल्या होत्या. भराभर गज उपसले जात होते. ताडपत्र्या काठ्यांसह व्यवस्थित गुंडाळल्या जात होत्या. त्यांचे क्रमशः ढीग होत होते. काही शिपाई राहुट्यातील सामान भराभर काढीत होते. तर काही सामानाची बांधाबांध करीत होते. दुसरीकडे बग्या, बैलगाड्या वंगविल्या जात होत्या. त्या ठाकठीक आहेत की नाहीत याची तपासणी चालू होती. एकेक गाडी धुऱ्या लावून उभी केली जात होती. उभी झालेली गाडी सामानाने भरली जात होती. छावणीच्या शस्त्रागारातही अशीच धांदल उडाली होती. प्रत्येक शस्त्र स्वच्छ केले जात होते. दारूगोळा तपासून पाहिला जात होता. काडतुसे पट्ट्यांमध्ये भरली जात होती. काडतुसांच्या पेट्या भरल्या जात होत्या. जास्तीच्या बंदुका सज्ज होत होत्या. तलवारींच्या म्यानासह व्यवस्थित गठ्ठे केले जात होते. लाठ्या बांधल्या जात होत्या. भाले एकत्र केले जात होते. अन्य कित्येक लहान हत्यारे पेट्यांतून व्यवस्थित भरली जात होती. त्याचवेळी तयार झालेले पेटारे बैलगाड्यातून चढविले जात होते. तंबूच्या घड्या बैलगाड्यात चढविल्या जात होत्या. पीट आणि पेटर जातीने प्रत्येक गोष्टीत लक्ष घालीत होते. ऑर्डर्स सोडीत होते. कपडे, वेडींग्ज, तंबू, हत्यारे, दोर, पिंजरे, एक ना अनेक गोष्टी गाड्यांत चढविण्यात सारे शिपाई मग्न होते. चढवितांना जोर लावताना तोंडातून बाहेर पडणारे आवाज शिव्या या व्यतिरिक्त कोणी काहीच बोलत नव्हते. छावणीचे मेसचे काम पाहणारे शिपाई फारच गडबडले होते. भांडी, धान्य आदी सर्वच गोष्टी त्यांना गोळा करून न्यायच्या होत्या. आजचे लंच तेथेच होणार होते. पल्ला जवळजवळ साठसत्तर मैलांचा गाठावयाचा होता. बग्या, बैलगाड्या, घोडेस्वार आणि अन्य शिपाई यांच्या गतीने चालायला अवधी लागणार होता. मुक्काम होणार होते. तीन दिवसांचा प्रवास करतांना बाहेर कोठे कोठे तळ पडणार होते, त्या दृष्टीने व्यवस्था करायची होती.

कॅप्टन माकिनटोशला गैरशिस्त अजिबात खपत नसे. रात्री पिऊन झोपला असला तरी सकाळी सहालाच उठून त्याने आपले सकाळचे शेव्हींग, स्नान वगैरे सर्व कार्यक्रम उरकले होते. सकाळचा नाश्ता घेऊन तो लवकरच बाहेरचे काम आटोपले की नाही हे पाहण्यासाठी येणार होता. त्याचा हुकूम म्हणजे बंदुकीचे अचूक लक्ष्य असे. पीट आणि पेटर हे त्याचे नजिकचे अधिकारी अत्यंत विश्वासातले व कार्यकुशल होते. त्यांच्यावरच त्याची भिस्त होती. कॅप्टनचा हुकूम आहे असे समजताच सारे शिपाई खडबडून कामास लागले होते. कोणी कामात चुकारपणा करीत नव्हता. कॅप्टन बाहेर आला. आपल्या पदवेशाचा क ऽऽ र कर्र ऽऽ असा जरब बसवणारा आवाज करीत तो बैलगाड्यांच्या बाजूला आला. तेथे पीट देखरेख करीत होता. कॅप्टनला पाहताच पीटने सॅल्यूट ठोकला. सारे शिपाई एकदम खाडकन ताठ झाले. मानवंदना स्वीकारून कॅप्टनच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. त्याच्या डोळ्यात चमक दिसली. आपला हात मुखाकडे नेत अंगठा हनुवटीला आणि तर्जनी डोक्यावर हळूवारपणे आपटीत त्याच्या तोंडातून शब्द बाहेर आले ''ओ के ओ के गो ऑन'' दुसऱ्या बाजूला वळत तो म्हणाला, ''घुड घुड! दॅटस् लाईक घुड सोल्जर्स'' तो वळताच गाड्यांजवळच्या शिपायांनी सुटकेचा निःश्वास सोडला आणि दुप्पट वेगाने ते कामाला लागले. कॅप्टन मेसच्या बाजूला आपली रुबाबदार पावले दमदारपणे टाकीत चालला होता. तिकडे जाताच मेसचे शिपाई गोंधळून गेले. कॅप्टन सहसा या बाजूला येत नसे आणि आला तर आपले काही तरी चुकले असणार म्हणून अपराधी नजरेने

सॅल्यूट ठोकून सारे उभे राहात. पण आज कॅप्टनचा मोहरा काही वेगळाच वाटला. त्याने सॅल्यूट स्वीकारून भोलाराम आणि शिवराम यांना जवळ बोलावले. कॅप्टनच्या चेहऱ्यावरचे स्मित पाहून भीती कमी झाली असली तरी धाकधूक मनात होती. भीतभीतच ते कॅप्टनजवळ गेले. कॅप्टनने आपले दमदार पंजे त्या बुटक्यांच्या भरगच्च खांद्यावर ठेवले. त्या दडपणाने क्षणकाल त्यांची पोटे थरारली. कॅप्टनने एकवार त्यांच्याकडे पाहून विचारले, ''भोला, शिवा शगळा भरून झाला? खाई पायजा अशेल टो येटेच घेऊन जा, आफल्याला खाई खमी न्हाई पडला पाजेल हा.'' भोला आणि शिवाने एकमेकांकडे पाहत एकदमच उत्तर दिले, ''यस सर!'' ''शाब्बास, शाब्बास! सगळे खूश व्हायला पाजेल आला ध्येनात?'' भोला अन् शिवाने पुन्हा उत्तर दिले, ''यस सर! ''मिस्टर पेटरला शांगून घ्या.'' पुन्हा ''यस सर!'' भोला आणि शिवाला एवढेच शब्द येत होते. कॅप्टन तेथून पुन्हा ''ओखे, ओखे!'' म्हणत शस्त्रागाराकडे वळला. तेथे पेटर व रोनॉल्ड स्वतः जातीने लक्ष देत होते. कॅप्टनला पाहताच त्यांच्या पायांचा धप्प आवाज झाला. उजवे हात पालथे होऊन कपाळाशी गेले. सारे लोक ताठ, स्तब्ध उभे राहिले. कॅप्टनला शस्त्रांच्या बाबतीत तर अजिबात निष्काळजीपणा खपत नसे. गोड बोलणे अन् उपयुक्त हत्यारे यांच्या बळावर आपण जग जिंकू असे त्याचे मत होते. आणि ते तो नेहमी खरेही करून दाखवित असे. त्याच्यावर सोपविलेले कोणतेही काम अद्याप अयशस्वी झालेच नव्हते. त्याने पेटरला विश्वासात घेऊन विचारले, ''ऑल ओखे?'' ''यस सर!'' पेटरने उत्तर दिले. झटकन रोनॉल्डकडे पाहात कॅप्टनने जाणीव करून दिली. ''मि. रोनॉल्ड यू आर बाऊंड टू धिस?'' ''यस सर!'' रोनॉल्ड अतिशय अदबीने म्हणाला, ''ऑल ओखे सर, एव्हरी थींग इज रेडी!'' त्याने पुस्ती जोडली. कॅप्टन मनोमन खूष झाला. मग त्याचा मोर्चा आपल्या बग्गीकडे वळला. त्याच्या बग्गीजवळ काळू तयारच होता. काळूने अदबीने सॅल्यूट ठोकला. कॅप्टनला बग्गीत बसावयास सांगितले. कॅप्टन बग्गीत चटकन बसत म्हणाला, ''फादर डिसूजा'' एवढ्या शब्दांबरोबर बग्गी दौडू लागली.

कॅप्टन नेहमीच महत्त्वाच्या वेळी फादर डिसुजांचा सल्ला घेत असे. आता कॅप्टनला वन्य जमातींशी सामना करावयाचा होता. फादर डिसुजाने वन्य जमातीत कलकत्त्याजवळ जवळ-जवळ बारा वर्षे घालविली होती. आता त्यांची योजना इकडे महाराष्ट्रात केली होती. फादर डिसूजा अतिशय मुत्सद्दी माणूस. परमेश्वराकडे जाण्याच्या मार्गाबरोबरच राजकारण आणि समाजकारणाचे मार्गही त्याचे चांगलेच पाठ होते. फादर डिसूजा क्वचितच कॅप्टनच्या छावणीवर येत असत. बहुधा कॅप्टनच त्यांच्याकडे जात असे. त्या दोघात झालेले बोलणे खुद्द पीट आणि पेटर यांनाही समजत नसे.

बग्गी डोळ्यासमोरून जाईपर्यंत रोनॉल्ड व पेटर त्या बग्गीकडे सूचक नजरेने पाहत होते. कॅप्टन आता फादर डिसुजांकडे चालले आहेत हे त्यांच्या लगेच लक्षात आले होते. रात्री ठरल्या योजनेप्रमाणे प्रत्येक गोष्ट सहजगत्या घडत होती. सूर्य वरवर सरकत होता. रोनॉल्डने सहज म्हणून पेटरला विचारले, ''हॅज मि. स्विफ्ट गॉन पूना?'' पीटरने क्षणभर



चमकून त्याच्याकडे पाहिले आणि म्हणाला, ''यस, इट वॉज अल्सो डिसायडेड यस्टरडे नाईट.''

स्विफ्ट सूर्योदयाच्या आतच पुन्हा तयार होऊन पुण्याच्या मार्गास लागला होता. जनरल स्मिथ आणि कॅप्टन सीकस यांना झालेल्या सर्व घटनांचा रिपोर्ट सांगण्याची जबाबदारी स्विफ्टवर सोपविण्यात आली होती. त्याचबरोबर आणखी सैन्याची तुकडी पुण्याहून सरळसरळ संगमनेरच्या भागाकडे रवाना व्हावी अशी त्याची योजना होती. किमान अधिक पाचशे शिपाई कॅप्टन माकिनटोशला आवश्यक वाटत होते. पाचशे शिपायांची तुकडी येऊन मिळणं ही गोष्ट तितकीशी साधी नव्हती. नुसत्या निरोपाने काम होण्यासारखे नव्हते म्हणूनच कॅप्टनने ते खास पत्र स्विफ्टबरोबर दिले होते. रात्री उशीरा पोहोचलेला स्विफ्ट फटफटताच पुण्याकडे पसारही झाला होता. हे सर्वांच्या लक्षात आल्याने मोहिमेचे महत्त्व सर्वांच्या लक्षात आले होते. कामाचा वेग वाढला होता.

मध्यातील ती दगडी इमारत आता पूर्ण मोकळी झाली. भोवतालचा तंबूचा वेढा आता बैलगाड्यांमधून पुढच्या मुक्कामाची वाट पाहत होता. अबोल झाला होता. स्वयंपाक्यांनी झुणकाभाकरीवरच भागविले होते. सोबत मिरचीचा खर्डा तोंडाला चव आणीत होता. सर्व शिपाई तयार होऊन आपापले अन्न घेऊन खायला बसले होते. पत्रावळींवर झुणका आणि जोडीला दोन-दोन भाकरी असा बेत जमला होता. जेवणात आज कोणाचे फारसे लक्ष नव्हतेच. स्वयंपाक्यांनी भाकऱ्यांच्या चळती तयार ठेवल्या होत्या. प्रवासाची तयारी पूर्ण केली होती. तासाभरात जेवणं होऊन झणझणले तोंड पुशीत स्वार आपल्या घोड्यांकडे सरसावले. आपापली हत्यारे खांद्याला, कमरेला लटकवून निघण्याच्या हुकमाची वाट पाहू लागले. टोळ्या ठरलेल्या असल्यामुळे टोळीचे नायक आपल्या टोळ्यांच्या पुढे सज्ज होते. पावखलक, बैलगाड्या आणि तांगे यांच्या आसपास आपापल्या टोळ्यांत उभे राहिले. एक हजार शिपायांच्या पाच तुकड्या केल्या होत्या. प्रत्येक तुकडीत वीस-वीसच्या पाच-पाच टोळ्या होत्या. प्रत्येक तुकडीचे नायक स्वतंत्र होते. प्रवासाची दिशा ठरलेली होती. सर्वांनी संगमनेरला पोहोचायचे होते. तेथून कोठे तळ द्यावयाचा ते ठरणार होते. मुक्कामाच्या जागाही ठरलेल्या होत्या. पीट आणि पेटरने पुन्हा एकदा सर्व रेडी असल्याची खात्री करून घेतली. आता कॅप्टन आले की सारे निघणार हे ठरलेलेच होते.

काळूने बग्गी बऱ्याच वेगाने दौडत आणली. कॅप्टनला यावयास मुळातच वेळ झाला होता. बग्गी नजिक येऊन थांबताच कॅप्टनने ताडकन बग्गीतून खाली उडी मारली. तेव्हढ्याच गतीने तो पीटजवळ आला. ''रेडी?'' कॅप्टनने प्रश्न विचारला. पीटने ''यस सर!'' एव्हढे म्हणताच कॅप्टनने ऑर्डर सोडली ''क्वीक'' आणि पीटरने बिगुल वाजविण्यास इशारा दिला. सर्व तुकड्यांच्या पुढ्यात असलेल्या बँड पथकातील बिगुलधारकाने बिगुल वाजविताच बग्यांवर लावलेले ध्वज फरारले. घोडी फुरफुरली. बैलांनी मानांना हिसके दिले आणि पलटण हलली. पीट व पेटर स्वतंत्र उमद्या घोड्यांवर स्वार झाले होते. कॅप्टन आपल्या बग्गीतून त्यांच्या मागोमाग चालू लागला होता. त्याच्या नजरेत समाधान दिसत

होते. बग्गीत त्याची दुर्बिण लटकत होती.

कालपर्यंत गजबजलेली छावणी आता ओसाड सपाट माळाला सोडून दुसरा माळ गाठण्यासाठी मजल करावयास निघाली होती. रोवलेले दगड, दारूच्या बाटल्या, जनावरांनी खाऊन राहिलेले चघळ, चुलीतील राख यांच्या फेरात उभी असलेली ती भव्य इमारत. काळीभुरकी. तटस्थपणे जाणाऱ्या कॅप्टनकडे पाहत होती. रस्ता मागे टाकीत कॅप्टन पुढे-पुढे जात होता. इंचा-इंचावर मग्रूरपणे आपले साम्राज्य वसविणारा गोरा साहेब ताठ्यानं, दर्पोद्दामपणे साम्राज्यविस्तारासाठी चालत होता. इंच-इंच पुढे पुढे. काळूच त्याची बग्गी पुढे पुढे नेत होता. पीट, पेटर साथ देत होते. भारतमातेच्या पायात अडकल्या जाणाऱ्या बेड्या अधिकाधिक आवळल्या जात होत्या. हळूहळू सेना दृष्टीआड होत होती. संगमनेरकडे-

•••



# दोन

जटायुतीर्थावरचं शिवलिंग, छोटसं रेखीव. श्रीरामचंद्रांच्या सान्निध्यात प्रसन्नपणे ओसंडून वाहणाऱ्या तीर्थास पाहणारं. तीर्थ-हिरवंगार. साऱ्या निसर्गाला आपल्यात सामावून, प्रलयंकर महादेवाला अन् माकडांच्या सैन्यसहाय्यानेही आपल्या सामर्थ्यानं राक्षसांना संपविणाऱ्या रामचंद्रांना वंदन करणारं. तीर्थाच्या पाण्यात शिवभक्तांची बिंब उठू लागली. किर्र ऽ झाडीतून एकदम प्रकट होणारा एकेक घोडा आपल्याबरोबर एकेक स्वार आणित होता. भक्कम झुडपांच्या बुंध्याला लगाम अडकविला जात होता. पाठीवर थाप उमटत होती. खांद्यावरून आलेल्या घोंगडीवरून करकचून बांधलेलं उपरणं सरकविलं जात होतं. खांद्याला अडकविलेली बंदुक सारखी होत होती. डोक्यावरच्या फेट्यावरून हनुवटीला बांधलेल्या फेट्याचा सोगा वर बांधला जात होता. त्याखालून कुळकुळीत दाढ्या बाहेर येत होत्या. तरवरून माजलेल्या रानासारख्या. एक, दोन, तीन, वीस, सत्तावीस एकापाठोपाठ एक पटापट जमा झाले. सारे गप्प, कोणी बोलत नव्हतं. खाली उतरताच तीर्थाची ओंजळ भरली जात होती. शिवलिंगावर भक्तिभावानं प्रसन्न मनानं रीती होत होती. प्रत्येकजण पिंडीवर डोकं ठेवून मनोभावे वंदन करीत होता. डोळे भरून येत होते. छाती फुगून येत होती. पावित्र्यातच पुन्हा घोड्याजवळ येऊन उभा होत होता. एकवार सभोवार नजर टाकून रामा किरवा गंभीर झाला. ''कारं गड्या, गोइंदराव कसं आलं न्हाईत;'' त्याच्या या उद्गाराबरोबरच दोन-तीन जणांच्या तोंडून एकदम शब्द उमटले, ''हू ऽऽ याला तं पाजिल व्हंत!'' पुन्हा कोणी बोलले नाही. सर्वांचे कान टवकारले होते. गोविंदराव खाडेंच्या आगमनाकडं.

तसं पाहिलं तर जटायुतीर्थांवर ह्या दिवसात कोणी असं आडवारी तरी फिरकत नाही. गेले दोन महिने संततधार पावसानं उभं डांगाण न्हाऊन निघालं होतं. जणु कळसुबाईच्या रूपानं उंचावलेल्या शिवलिंगाला अभिषेक चालला होता. एक एक धार केवढी तरी मोठी. मुसळधार. डांगाणातील बोडके डोंगर सहस्र धारांनी स्नान करीत होते. उतारावरून पाणी खळखळत वाहत भयंकर धबधबे निर्माण करीत सुसाट. धावडा, बोहवा, सौंद, आंबळ,

आळींद, मोयेन, हिरडा, चांदान, जांभूळ, कावीत, मोह, निंब, खैर, महारूक, सोंदड, धामण, आंबा, अर्जुनसादडा, वरस, उंबर, पिंगळ, साग, साल, बोर, भुस्कुट, पिंपर, पाथीर, पांगारा, करप, अेहळा, तांबट, बिबवा, सिंद, आसिंद गोळी, रगतरूहेडा, चिल्हार अेहकळ, बेल, शेवरी, सिसव, तिवस, लोखंडी, पांढरी, धामटी, धावडी, कुंभ, रिठा, वेळू, कुढूल, रामफळ, सिताफळ, पळस, वावळा, किलकिला, निमोणी, बोरधोट, बोंडार, खरमाट, भोगाड, मोदळा, कारवा, पोगारी, डीनी, कळलाई, हिवर, एक ना अनेक लहान-मोठ्या पिसाटासारख्या वाढलेल्या झाडांच्या गर्द रानातून झेपावत निघे. रानाच्या खाली उतरणीला, खोबणीला बांध घालून वाहाळावाहळांतून भातखाचरात आदळत असे. खाचरांना डोंगरकड्यांना मोठ्या झाडांना तरवडा, टणटणी, लांडगा, मोगला, एरंड, डांगया, अंबाय, निवडुंग, करवंद, चिकणी, चिल्लर, हेनकळ, खरमट, सुफली, घायपती, कोरफड, सागरगोटा, आंभळ, रूई, दवणा, अरती अशी कितीतरी झुडपे फेर धरून वाऱ्या पावसावर खळखळणाऱ्या पाण्याच्या नादावर रानतृत्य भर पावसात करीत असत. झाडाझुडपातून त्यांच्याशी लगट करणाऱ्या रानदेवता वेली. कवली, करटुली तांबोळी, कडुकंद, हळींदा, हमीद, मैका गौमेटी, कावळी, बाभूळी, भोवरा, कुसर इत्यादी रानक्रीडा करीत. पाण्याशी स्पर्धा करणारे हिरवेरानही तरारून उठे. नाना प्रकारची गवते, गवतभाज्या यांनी रान झाकून जाई. वाहत्या पाण्याला झाकून टाके. दाट-दाट काळ्या मळभांच्या चांदोब्याखाली असे अंधारे जंगल, चिंब जंगल, वाहते जंगल, पशुपक्षी, जनावरे, धप्प. अशावेळी भातखाचरं मात्र बोलकी. गुडघा-गुडघा चिखलात सतत पडत्या पावसाला न जुमानता पळसांच्या पानाचे इरणे घेऊन लंगोटी बहाद्दर लोखंडी जीव भातखाचरात भात रोपांच्या सरींनी पावसाच्या सरींना वेडावतात, आपली अब्रू जुनेराआड करून डुलत्या नथा त्यांच्या बरोबरीने भात लावतात. प्रलयालाही सामोरे जाण्याचे सामर्थ्य असलेली ही माणसं देवांना खाचराखाचरातून उगवत असतात. मग जातात कशाला इकडे तिकडे. प्रत्यक्ष प्रलयंकर, तीर्थांसह खाचरात रानात त्यांना भेटायला येतो.

सरत्या आषाढाबरोबर डांगाणला पंचमीची आठवण येते. पावसाबरोबर चाललेले घनघोर युद्ध संपते आणि मग हरिश्चंद्र, अमृतेश्वर, जटायुतीर्थाची आठवण येते. श्रावणातल्या पौर्णिमेपासून या तीर्थांवरती ये-जा वाढते, पण तीही सोमवारीच. आज जटायुतीर्थावर अन्य कोणी येणं शक्यच नव्हतं. नागपंचमी कालच झाली होती आणि आज तर शनिवारचा दिवस होता. शेतातली कामं जवळपास संपली होती. नेमका असाच दिवस गोविंदरावांनी निश्चित केला होता.

वैशाखात कॅप्टन सीकसच्याच चढाईने गोविंदरावांचा रतनगड पडला होता. पेशव्यांचा नुकताच पराभव झाला होता. धनीच साहेबाच्या हातात सापडल्याने गोविंदराव मनातून चिडले होते. त्यांचा रतनगड त्याला अभेद्य ठेवायचा होता. गडावर पाचशे मर्द कोळ्यांची तुकडी होती. दारूगोळा, बंदुका, काडतुसे पुरेशी वाटत होती. पश्चिमेकडील तोफही जय्यत होती. धान्यही पुरेसे होते. पश्चिम दरवाजाने थेट मुरबाडला जाऊन धान्य



आणता आले असते. बायकामाणसे बारीच्या वाड्यात सुरक्षित होती. पेशव्यांबरोबर पळून आलेले दहापंधरा स्वार त्यांच्या आश्रयाला आले होते. या साऱ्या बळावर जीव गेला तरी आपला गड सर होऊ द्यायचा नाही हे त्यांनी पक्के ठरविले होते. कोळटेंभे, मुतखेला आसपास कॅप्टन सीकसचा तळ होता. जय्यत बंदुकांच्या बळावर व फितुरांच्या सहाय्याने तो लढत होता. गेले पंधरा दिवस गोविंदरावांनी त्याला यश येऊ दिले नव्हते. एव्हढासा एक किल्लेदार आपणास हार जात नाही याचे सीकसला राहून राहून आश्चर्य वाटत होते.

वास्तविक पाहता कोळटेंभ्याचा पावरकिल्ला, हरिश्चंद्रगड हे किल्ले कॅप्टन सीकसने पाहता पाहता सर केले होते. किल्ले घेणे फारसे अवघड नव्हतेच मुळी. प्रत्यक्ष होळकर शरण आले होते. राजूर सुभ्याचा सुभेदार हिरजी नाईक शरण आला होता. आता किल्ल्यांचा फक्त प्रत्यक्ष ताबा घ्यावयाचा होता. किल्ल्यातूनच खरे सामर्थ्य आहे. सारे हिंदवी स्वराज्य किल्ल्यांच्या बळावर त्या शिवाजीने मिळविले होते हे कॅप्टन सीकसला माहीत होते. पेशव्यांनी डोंगराचा आश्रय घेतलेलाही त्याच्या लक्षात होता. रामजी भांगरे नावाच्या बंडखोराला मोक्याची पोलिस जमादाराची जागा देऊन कॅप्टन सीकसने आपलेसे केले होते. शेंडी परिसरच काय पण सारे कोकणही पायवाटांसकट रामजीला माहीत होते. त्याच्या सहाय्याने हा रतनगड सर करणे काही अवघड नाही. वरचा सामादाणा संपल्यावर गडकरी आपोआप किल्ला सोडील हेही त्याला माहीत होतं. पण गोविंदरावांचा निश्चय आणि त्यांच्या तुकडीचे ऐक्य अभेद्य होते. कॅप्टन सीकसने थोडाही प्रयत्न करता ते वरून उभ्या कड्याने दगड लोटीत. पश्चिमेकडील तोफेचा मारा करीत आणि टप्प्यात सापडला तर गोळीचा उपयोग करीत. असे करतांना कॅप्टन सीकसच्या शिपायातही बरेच कोळीच आहेत. रामजीसारखा आपला मित्रही त्याच्या बाजूलाच आहे हे पाहून त्याला वाईट वाटे. कधी कधी आपणही शरण जावे आणि होणारी आपलीच मारामार थांबवावी असे त्यांना वाटे. पण असा विचार मनात येतो ना येतो तोच त्याच्या स्वाभिमानाचा फडा उभारला जाई आणि त्यांचा निश्चय पुन्हा कायम होईल. शिवछत्रपतींनी ज्या विश्वासाने या राज्याच्या रक्षणाची जबाबदारी आपल्यावर टाकली ती टाकायची का? साता समुद्रापलिकडून आलेल्या या गोऱ्या साहेबाचे गुलाम व्हायचे का? असे प्रश्न त्यांच्यापुढे वाकुल्या दाखवीत नृत्य करीत. शरणागतांना कॅप्टन सीकसने दिलेली वागणूक त्यांच्यापुढे येई. कॅप्टन सीकस प्रत्येक किल्लेदाराला, प्रत्येक सेनाधिकाऱ्याला हात बांधून आपणासमोर यावयास सांगे. गुडघे टेकवून बसावयास सांगे. त्याच्या संपत्तीची, बायका-मुलांची चौकशी करे आणि फितूर जातभाई अब्रूची लक्तरेही टांगावयास कमी करीत नसत. हे चित्र उभे राहिले की त्याचे हृदय विदीर्ण होई. डोळे आग ओकू लागत आणि माझा रतनगड मी पडू देणार नाही ही प्रतिज्ञा सहज मुखातून बाहेर पडे.

परंतु अखेर पश्चिमेकडच्या तोफेतच गोविंदजींचे सामर्थ्य आहे हे कॅप्टन सीकसच्या लक्षात आले होते. त्यांनी बरोबर डाव टाकला. डोंगरांना परिचित असणारे डोंगरातले उंदीर गोविंदरावांचे जातभाईच त्याने भरपूर बक्षीस लावून पाठविले आणि अखेर हे जातभाई

फितुरी करण्यात यशस्वी झाले. कंटाळलेल्या चार शिपायांनी तोफ उडवली. तोफ खाली वाहळात गडगडत आली आणि रतनगडही गडगडला. आत्तापर्यंत शौर्याने लढणाऱ्या शिपायांना पळताभुई थोडी झाली. अखेर गोविंदरावांनाही हात बांधून कॅप्टन सीकसपुढे यावे लागले. परंतु कॅप्टन सीकस त्यांना गुडघे टेकायला लावण्याइतका मूर्ख नव्हता. रामजी भांगऱ्यासारखा याचाही आपणास उपयोग होईल हे त्याच्या केव्हाच लक्षात आले होते. त्याने त्यांना जिल्हा पोलिस अधिकाऱ्याची नोकरी देऊ केली. क्षणभर त्यांना दगा देणारे जातभाई चमकले. गोविंदरावांचे मन चलबिचल झाले. पण क्षणभरच. कॅप्टन सीकसच्या डोळ्याला डोळा भिडवून गोविंद खाडे म्हणाले, ''पराण गेला तरी मी गोऱ्याची चाकरी करणार न्हाई,'' ''माझं इमान मी...'' पण पुढचे शब्द बाहेर पडेपर्यंत चाबकाचा सणसणीत फटका त्यांच्या पाठीत पडला होता. त्यांना यथेच्छ चोप देऊन वाहाळत एकाकी बांधल्या हातांनीच टाकण्यात आले आणि कॅप्टन सीकस तेथून निघून गेला.

गेले दोन महिने हे शल्य त्यांच्या हृदयाला डागण्या देत होते. शंभूमहादेव त्यांच्या स्वप्नात येत होते. स्वराज्याचा, शिवराज्याचा मंत्र त्यांच्या कानात सांगत होते. रात्र रात्र दारूच्या घोटाबरोबर ते विचार करीत बसत. त्यांची वीरपत्नी त्यांना साथ देई. अंधाऱ्या रात्री कॅप्टन सीकसला साथ देणारे त्यांचे फितूर जातभाई, व्यापारी, नगरशेठी विक्राळाणे त्यांच्या पिंजारलेल्या डोक्शाभोवती फेर धरून नाचत. ते चवताळून उठे, हातात बंदुक सरसावे – पण त्यांची पत्नी त्यांना शांत करी. राधाबाई त्यांना म्हणे, ''एरीच डोकं गरम नही करूं, दमानं विक्ती विक्तिना दबा धरून काम करावा,'' ''रामाला आन् सीताला असंच दिस आलतं.'' ''अव त्या शिवबानय बी असं दिस काढलं,'' ''आन पाची पांडव आन् त्यांना काय कमी दुक झालं'' हे ऐकलं की त्यांचं हृदय भरून येई. ते मनाशी काही ठरवत, आपल्या तारुण्यात येणाऱ्या किस्नाकडं ते पाही आणि मनाशी काही ठरवत. गेले दोन महिने पडत्या पावसात विक्राळ काळोखाला घोड्याच्या डोळ्यांनी चिरत ते एकेका कोळ्याचे घर गाठत. त्यांच्याशी बोलत. त्याला टोळीसाठी पक्के करी. अशा किती रात्री त्यांनी घालविल्या असतील. लक्ष्या, मघा कोकणात दरोडे घालीत असे. त्यांचा अवघ्या परिसराला हादरा होता. त्याने गोविंदरावांना वचन दिले होते. रामा किरवा त्वेषाने गोविंदरावांच्या बाजूला सरसावला होता आणि हे सारे सह्याद्रीचे कडे आज जटायूतीर्थाजवळ जमले होते. अजून शिखरच आले नव्हते.

वेळ सकाळची असली आणि श्रावण असला तरी सूर्यदेवानं दर्शन दिलं नव्हतं. जवळपास माणसाचं अस्तित्वही जाणवत नव्हतं. पाण्याच्या वाहण्याचा खळखळ आवाज तेव्हढा येत होता. पावसाची सर मात्र अधूनमधून येत होती. वारा थांबला होता. तीर्थातले पाणी शांत होते. सारे स्वारही शांत स्तब्ध उभे होते. जणू महादेवही गोविंदरावांचा कानोसा घेत होते.

दूरवर टेकाडावरून आकृती झेपावताना दिसली. रामा किरवाने निरखून पाहिले. पुन्हा गर्द वनराजीच्या कुशीत आकृती दिसेनाशी झाली. आणि आता घोड्यांच्या टापांचे



आवाज मुरमाडे शेतातूनही दबकेपणाने येऊ लागले. दमदार घोडे दमदारपणेच येत होते. वाटा परिचित असल्याने घोड्याची पकड सैल आहे हे सहज जाणवत होते आणि त्या गर्द झाडीतून तीर्थाजवळ एक धिप्पाड जनावर अन् त्यावरचा एक भव्य स्वार सह्याद्रीच्या कड्याच्या कभिन्न कातळाचा, एकदम प्रगट झाला. धप्प. गोविंदरावांनी उडी मारली. गोविंदरावांनी डोक्याला तांबडे जरीकाठी भरगच्च पागोटे बांधले होते. दाढी वाढली होती. धोतर गुडघ्याखाली होते. कमरेला गच्च खोचलेले होते. गर्दरानासारख्या दाढीमिशा आणि भिवयातून त्यांचे भोकरासारखे मोठे डोळे लकाकत होते. कभिन्न काळा रंग उठून दिसत होता. तांबड्याच रंगाची शाल खांद्यावरून कमरेपर्यंत दिसत होती. कमरेला बांधलेल्या उपरण्यावर काडतुसांचा पट्टा भरगच्च दिसत होता. खांद्याला बंदुक लटकलेली होती तरी कमरेला तलवारही लटकली होती. जंब्या पोटाशी खोचला होता. अंगरख्याच्या बाह्या वर सारल्या होत्या. त्यातून त्यांच्या दंडातील कडे भरदार दंडाला जणू थोपवीत होते. उजव्या मनगटावर सोन्याचे कडे झळाळत होते. घोड्यावरून उडी टाकताच घोड्याला थाप मारली पण ती थाप ''हर हर महा ऽऽ देव!'' च्या आरोळीत विरली. जणू महादेवाच्या जयकाराला प्रतिसाद म्हणून घोडीही खिंकाळली. गोविंदरावांनी सर्वांनी ''राम राम'' घातला. ''राम राम'' झडला तसे सारे स्वार गोविंदरावांभोवती जमा झाले. गोविंदरावांनी एकदा सर्वांवरून मोठ्या अभिमानाने नजर टाकली आणि मग त गहिवरून गेले व म्हणाले, ''माझ्या भावानु ह्या म्हादेवानं आपल्याली इड येण्याची बुद्धी दिली. त्येचं दरिसन घेयाचा आन मंग त्येचा साक्षीना आपल्या उदयेगाला लागु''. गोविंदराव झरकन् तीर्थाकडे वळले. त्यांनी तीर्थात पाय धुतले. डोळ्यांना पाणी लावून तीर्थाला एकदा भाविकपणानं दंडवत घातला आणि मग आपल्या ओंजळीत तीर्थ भरून घेतलं आणि ते त्या महादेवाकडे जावू लागले. गर्द रानात, भरल्या आसमंतात उंच कापीव कड्यातून आवाज उमटले, ''हर हर महा ऽऽ देव!'' ''हर हर महा ऽऽ देव !'' गोविंदरावांची छाती रुंदावली. उजवा गुडघा टेकून त्यांनी डोळे मिटले. तीर्थाची भरली ओंजळ सर्वांच्या साक्षीनं तीर्थासमोरच्या शिवलिंगावर ओघळली. पिंडीच्या धारेतून ओघळणारे तीर्थ गोविंदरावांनी हाती घेतले आणि आपल्या साथीदारांवर शिंपडले. पुन्हा एकदा गर्जना झाली ''हर हर महा ऽऽ देव !'' सर्वांचे हात जोडले गेले. गोविंदरावांनी सर्वांना दोन्ही हात उंचावून बसावयास सांगितले. सारे त्यांच्या पुढ्यातल्या ओल्या कोरड्या दगडी फरशीवर आपली हत्यारे सावरीत बसले. गोविंदरावांनी मग बोलायला सुरुवात केली, ''माह्या भानावु ह्या कळसुआईच्या छायेमंदी, या डांगाण रानच्या मायाच्या पदरामंदी आपुनी मोठ्या मरदुमकीना राज केलं. एक मुसलमान इकडं फिरकू दिला न्हायी. शिवाजी महाराजांच्या राज्याचं आपण सेवक. हे राज्य ह्या म्हादेवाचं असं शिवाजी राजं म्हणायचं. ह्या म्हादेवाच्या समुर त्यांनी आपलं राज करायची आण घेतली. आपल्या इश्वासाव त्यांनी त्या पट्ट्याला टाकसाळ काढली. मावळापासून तिरमका पोहोत सारा रान आपल्या स्वाधीन केला. हे राज आपलं. शिरीमंत पेशव्यांना आन् होळकरानं सुदिक आपलं राज्य आपल्या हाती दिलं. आपलं रान आपल्या हाती व्हावं हीच त्येंची विछा व्हती.'' ''ह्या आपल्या राज्यात त्या

सायबाचं ध्यान आन त्येला त्या समिंदरापलकडून आलेल्या गोऱ्या सायबाला आमी आमची आय दियाची काय?'' ''नाही नाही!'' सर्वांच्या तोंडातून अनाहुतपणे शब्द बाहेर पडले. ''आरं हे आपलं राज हाये आन् आपलंच ऱ्हायला पायजेल, समदी पेशवाई बुडाली असल अन् नासकाचं होळकराचं राज्य सुदिक गेलं असलं तरी सुदिक आपण पुन्हा हे राज्य आपल्या मनगटांवर उभं करूं. बोला हाये मंजूर? जीवात जीव हाये तो पोहतोर हे राज्य पुन्हा उभं करण्याचं परयत्न करायचं. मंजूर?'' ''मंजूर, मंजूर !'' आवाज उमटले. गोविंदराव पुढे बोलू लागले. ''शाब्बास माझ्या भावानु, त्या शिवाजी राजानं आपल्या मैतरांच्या बरूबरच असं राज मिळवायचं ठरवलं आन् पार दिल्लीच्या राजाला मुरसड आणली. आपलं काम लय अवघड हाये. आपलं जातभाई आपल्या बाजूला न्हायी. आपल्याकडं पैकं न्हाई पर आपल्या मनगटावर आन् आपल्या तलवारीवं आपण एकेक शेठ सावकार पार लोळवू आन् पैसं उभं करू. सरकारच्या खजीन्याव दरुडं घालू आन् पैसं आनु. आपल्या ताकतीव एकेक गोष्ट करीत आपण आपला राज उभा करायचा. आपल्या गरीब भावाना आपुनी आपलं करू. त्यांचा दोष न्हाई. त्ये सायबाकडं जात्यात ह्या त्येंच्या पोटाचा दोष हाये. त्येंच्या पोटाला मिळाला का त्या उजुक आपल्याकं येत्याल. त्येंच्यावर रागवू न्हाई. त्येंच्या संग गोड बोलाया पाजेल. त्येची सावकाराच्या कचाट्यातून सुटका कराया पाजेल.'' मग एकदम त्वेषाने आवाज चढवून गोविंदराव बोलू लागले, ''जसा त्या गोऱ्या सायबाना आपल्याली शरण याया लावला हांगी तसाच त्यालाबी हात बांधून पाय बांधून शरण येयाला लावायचा. बोला तुमी समदं साथ देनार का घाबरूनशेनी दऱ्यात लपणार?'' तितक्याच त्वेषपूर्ण आवाजात प्रतिसाद मिळाला ''मंजूर मंजूर !''

''या देवाला कौल लावू. आपन म्हादेवाचं कोळी. आपल्या वाल्यानं रामायण लिवलं. या रानात सीताला आपुनी समाळला. राजा हरिश्चंद्राला या कोळ्यांनी सावली दिली. अरं त्ये बघा त्या जटायुना येका पाखराना धा तोंडाच्या रावणाला इडच टक्कर दिली. आपन त्या कोळ्याची पोरा आहोत. त्येचा वंस शिवाजींनं. समदा भारत देस, आपला भारत देस, दुश्मनाकुन हिस्कून घ्येयाचा सपान पाह्यला आपण त्येच सपान घेऊ आन् त्या गोऱ्या सायबाला पार त्येच्या देशाला पिटाळू'' आणि मग एकदम हात उंचावून ते म्हणाले, ''बोला, ''हर हर महा ऽऽ देव !'' मग त्यांनी लक्ष्या, वाळ्या अन् रामा किरवा यांना आपल्याबरोबर बोलावले. गोविंदराव पुढे झाले. त्यांनी म्हादेवा पुढं पडलेली दोन रानफुले उचलली. पिंडीवर ठेवली. तिघेही दोन्ही गुडघे टेकून खाली बसले. डोळे मिटले आणि कौल मिळण्याची वाट पाहणे सुरू झाले. साऱ्या साथीदारांनी श्‍वास रोखून धरले होते. नजरा फुलांवर खिळल्या होत्या.

क्षण गेला, दोन क्षण गेले. क्षणामागून क्षण जाऊ लागले. सर्वांचे चेहेरे गंभीर झाले. गोविंदराव, वाळ्या, रामा, लक्ष्या कोणीच हलत नव्हते. कौल मिळत नव्हता. गांभीर्याला भीतीची झालर येऊ लागली. डोळ्यात प्राण आणून कौल काय? कौल का नाही? असे प्रश्न मनाला विचारीत सारे ताठ उभे होते. निश्चल, पण संचित गोविंदरावांची तर समाधीच लागली होती. जणू ते एकाग्र मनाने प्रत्यक्ष शंकराशी स्वराज्याविषयीचे खलबतच करीत होते. किती वेळ गेला कोणास ठावूक आणि पिंडीमागे काही 'वळवळलं'. क्षणार्धात पिवळाजर्द नाग पिंडीमागून फणा काढीत बाहेर येऊन उभा राहिला. ताठ नजरेने तो गोविंदराव आणि त्यांच्या साथीदारांना न्याहाळीत होता. लांब दुधारी जीभ लवलवत होती. कोणाचे लक्ष गेले. जीवाच्या आकांताने ओरडलाच, ''नाग!'' तेवढ्या आवाजाने ते जनावर वळवळले. फड्याच्या एका झटक्याने त्याने उजवे फूल फिसकारले. गोविंदरावांचे डोळे उघडले. समोरचे दृश्य पाहून ते गंभीरपणे उभा राहिले. त्याचे डोळे चमकत होते. त्याने हात वर करून सांगितले, ''माझ्या भावानु म्हांदेव सवता कौल द्यायला आला. त्येनी सांगला का कौल मिळतं नसन तरी कौल असा हिसकावून घ्या. त्येला हात जोडा रं.'' त्यांचे धीरगंभीर बोल ऐकून सर्वांचे हात आपोआप जोडले गेले. तो पिवळाजर्द नाग पुन्हा फडा डोलवित मागे वळवळत निघून गेला. पुन्हा गर्जना घुमली, ''हर हर महा ऽऽ देव!''

वाळ्या कोळी गरजला, ''मह्यां भावांनुं, म्या दरुडं घालण्याचं काम करतु. लक्ष्या ठाकरानं आन् मी आजपतोर पकं पाप केलं पर आता आमचं हात उठतील, बेशरम अवलादींना ठेचाया.'' असे म्हणतांना त्याने लक्ष्या ठाकराचं मनगट आपल्या डाव्या हातानं पकडीत उंचावले होते. लक्ष्या ठाकरानं आरोळी ठोकली ''कळसाईचा ऽऽ'' पाठोपाठ आवाज गरजले, ''उधे असू!'' आणि नकळत सर्वांच्या नजरा उत्तुंग कळसाईच्या उत्तुंग शिखरांकडे गेल्या. कळसाईचं शिखर काळ्याकुट्ट आभाळाला चिरीत अदृश्य झालं होतं. रामा किरवा कडाडला. ''आपलं वसुलीचं अधिकार आपुनी सोडायचं न्हाई, जो देनार नाही त्येला जाब इचारायचा.''

गोविंदरावांनी पुन्हा हात उंचावला. आपल्या मित्रांचा ओसंडता उत्साह पाहून त्यांचं हृदय भरून आलं होतं पण उत्साहाच्या भरात वाटेल तसं सुसाट सुटणं त्यंना पटत नव्हतं. त्यांच्यातला कुशल सेनानी जागा झाला होता. त्यांनी पुन्हा बोलायला सुरुवात केली, ''गड्यानुं असं घाईनं काम हुणार न्हाई. नीट डोक्यानं काम केलं पाजेल. आपलं राज गेलं तरी आपलं जमीन-जुमलं शाबीत हायेत. आन् काही लोकांली वतनंबी मिळल्यातं. आपल्याला नेमलं जमादार आपलाच हाये. पर त्येना सवताला सायबांला इकून टाकला हाये. गड्यानुं, पर त्येला आपला क्येला पाजेल असा एकेक मानुस आपला करायचा. त्येला दुकवायचा न्हाई. गावागावात आपलं समूरच ऱ्हात्यात त्यांचा वसूल आपुनी घीऊ पर तो समजुतीना. पर एक सावकार सोडायचा न्हाई, मंग तो कोनबी असू, आपल्या अन्नावर पोसून गोऱ्यांचं पाय चाटणारं ज्ये कोन असल, दिसल त्येली सोडायचा न्हाई. समद्या चहरांच दिवाळा काढायचा पर ह्ये समदं इचारानं कराया पाजेल, उतावळी बरी नव्हं. सायब काय किल्यालां कायीम येत न्हाई. त्ये किलं उजुक हाती घ्येतलं पाजेल.'' त्यांचं हे बोलणं सर्वांना पटत होतं पन पुढं कसं त्ये कोणाच्यांच ध्यानात येत नव्हतं. तेव्हढ्यातं लक्ष्या ठाकर ओरडला, ''गोविंदराव आमाली समदं मंजूर हायें. तुम्ही आमची सरकार. तुमी तुपल्या डोक्याना हुकूम द्या आमी जीवाचं मोल दिवून आन् त्ये काम केलं म्हून समजा.''

त्याच्या या बोलानं सर्वांच्या माना ताठ झाल्या. लक्ष्यानं सर्वांकडे पाहून करड्या आवाजात विचारलं, ''मंजूर?'' सर्वांच्या तोंडातून एकदम आवाज निघाले ''मंजूर मंजूर !'' ''बोला हर हर म्हादेव!'' आणि सर्वांनी एकदम गर्जना केली. त्याचे प्रतिध्वनी रानात कानाकोपऱ्यातून उमटले. त्या आवाजाचा प्रतिध्वनी पिंडीतून निघाला. तीर्थाचं शांत पाणीही थरारलं. पुन्हा एकदा महादेवाला वंदन करून सारे आपल्या घोड्यांकडे वळले. क्षण दोन क्षणातच तीर्थस्थान निर्मनुष्य झालं. सारा परिसर शांत, स्तब्ध, चिंब होऊन झेपावणाऱ्या स्वारांकडे भरल्या नजरेनं पाहत होता.

* * *

श्रावणातला शेवटचा शुक्रवार होता. पावसाची एक जोरदार सर ओघळली होती. सकाळचे चरणे चारून गायी, बैल, म्हशी, रेडे पुन्हा परतली होती. रख्म्याने ती वाड्यात एका बाजूला दुसऱ्या कौलारू सपरात गोठवली होती. बाजूला वासरं हिरव्यागार गवताशी आपल्या मखमली तोंडांनी उगाचच चाळा करीत होती. रख्म्या गुरांपुढं उगाच काही चघळायला टाकीत होता. विठी फडकीत काहीसं घेऊन आली. विठीची नजर रख्म्याकडे पाहावयास चुकली नाही. रख्म्याने तिच्याकडे पाहताच ती लगबगीने घरात जाऊ लागली पण रख्म्याने हटकलेच. ''कां रं इठे लय बिगीनं, अरं जरा थांब. इकडय सुदिक माणसंच आह्यात.'' ''हा!'' म्हणून विठीनं वेडावले. तसा रख्म्या तिच्याकडे तुरुतुरु पळत जात म्हणाला, ''अरं अरं विठे, फडकीत काय रं आणला.'' ''फुला आह्यात,'' रख्मी म्हणाली. ''फुला?'' ''हा,'' ''का रं?'' आरं बाईली कळसाईला जाआचं असं.'' विठी उत्तर देत गेली. ''आरं तु हये, ते का?'' ''इ बयां, अरं आज शिकीरवार हाये. देवीचा वार, बाईली पूजा कराया जाआचा हाये. बाई देयीला नवस बोलणार हायेत,'' विठी मन लावून बोलली. ''असा? काय रं. आजुक मुलगं बिलगं पाजेल का काय बाईली?'' रख्म्यानं तिला खुलवण्यासाठी विचारले. ''तू म्हंजी येडाच हाईस बग. आरं राज ग्येलं न्हवं आपलां. त्ये सरकारकडं उजुक येवा म्हून, कळलां?'' ''असा असा, आन् तू जानार असनं ना त्येंच्या संग.'' रख्म्याने विठीला मुद्दामच विचारले, ''मंग जाया नकु'' रख्म्याने आपल्या हनुवटीखाली मूठ पालथी धरीत विचारले, ''तू रं काय मांगन्हार? म्हनावा का आमाली यक...'' हे ऐकायला विठी तेथे होतीच कोठे? राधाबाईनी ''विठे ऽऽ'' म्हणून हाक मारताच ती आत पळाली.

थोड्या वेळाने चांदीच्या ताटात फुले, नारळ, तांदुळ, हळदकुंकू घेऊन विठी बाहेर निघाली. तिच्या मागोमाग राधाबाई बाहेर आल्या. त्यांच्या भव्य कपाळावर चांगलं रुपया एव्हढं कुंकू होतं. चोपडं पांघरूण त्यांना खुलून दिसत होतं. रेशमी फडकी त्यांनी डोक्यावरून घेतली होती. हाती पायी येला, वाक्या, तोडे झळकत होते. नाकातली भरदार नथ त्यांचा तोरा वाढवित होती. जोत्यावरून खाली उतरतांना त्यांच्या सुडौल, बांधेसूद



देहाने उगाचच आपल्यावरची फडकी सावरली आणि सभोवार नजर फिरविली. विठीला त्यांनी विचारले, ''विठें–'' ''जी'' विठीने पुढे त्या बोलण्याच्या आतच अदबीने विचारले, ''किशी, धोंडाबाई, फुलवंती, शेवंती, थोरल्याआई येन्हार नव्हं आपल्या संग?'' ''हा! जाताना गांगु त्यांली'' विठीने सांगितले.

जाता जाता पांच सातजणी जमा झाल्या. उभारवट्याची लुगडी लपक लपक चालू लागली. आडव्या कृष्णवंतीत टाकलेल्या धोंड्यावरून सहज पलिकडे जाणं झालं. रान महामूर माजलं होतं. कशीबशी जनावरांची गुरुवाट म्हणून शिल्लक होती. जातांना बाजूच्या आयाबायांनी काढलेले उद्गार अजून राधाबाईच्या मनात घोळत होते– ''जागीरदारीण कळसाईला निगाली जणु!'' ''जागीरदारीण!'' आता कुठे शिल्लक राहिली होती जागीरदारीण. आतां फक्त नांव राहिलं होतं. तेच शल्य ती आज कळसाईला सांगणार होती. गेल्या दोनतीन महिन्यातली गोविंदरावांची अवस्था तिनं पाहिली होती. त्यामुळे ती धास्तावली होती. अपमानित जीणं नको नको झाले होते. आपल्याच माणसांनी आपला घात करावा हे तर तिला चांगलंच बोचलं होतं. तिचा चालण्यातला वेग वाढत होता. तिचा गंभीर चेहरा पाहून अन्य बायकाही काही बोलत नव्हत्या.

कळसूबाईच्या पायथ्याशी वरच्या कळसाईचं एक मंदिर मुद्दामच जहागिरदारानंच बांधून काढलं होतं. देवीनंच आपल्या भक्तांसाठी स्वप्नात येऊन तसं सुचविलं होतं. बारी गावच्या पश्चिमेला कळसूबाईचं शिखर आकाशाशी स्पर्धा करणारं. पावसाळा संपेपर्यंत तेथे कोणी फिरकतही नाही. कारणानिमित्त जायचं म्हटलं की या खालच्या देवळात जायचं. पायथ्याशी कीर्र ऽऽ रान. त्या रानात देवळाजवळ जाईपर्यंत देऊळ दिसत नव्हतं. देवळाला भक्कम दांड्याचा सभामंडप. देवळावर नळीच्या कवलांचं छप्पर. आत चवथऱ्यावर देवीचा फूट दीडफूट उंचीचा तांदळा, त्याला दाट शेंदूर. चांदीचे डोळे लकाकते. अवतीभोवती नवसकऱ्यांनी मुद्दाम करून वाहिलेले चांदीचे, लाकडाचे, तांब्याचे हात, पाय, डोळे आणि काय काय. चवथऱ्याभोवती फेऱ्या मारायला जागा. आत अंधाराचे साम्राज्य मोडून काढणारा तेलाचा दिवा. बारी गांव हा दिवा कधी विझू देत नाही. मंद प्रकाशात भोगलेल्या शेंदुराच्या तुकतुकीने देवीचा तांदळा येणाराला समृद्ध बनवितो. भोवताली भिंतीवर शेंदुराचे कितीतरी पंजे देवीच्या पायथ्याशी प्रसादाचे दगड.

राधाबाईंनी सहज घंटा वाजविली आणि देवूळ एकदम जिवंत झाले. घंटेचा आवाज घुमला. राधाबाई मनोभावे देवीजवळ गेल्या. मीठ, मिरच्या, तांदुळ देवीला वाहिले. वाटीतले तेल दिव्याला घातले. राधाबाईंनी थोरल्या आईने सुचविली तशी सर्व पूजा यथासांग केली. आईची खणा, नारळाने ओटी भरली. मूकपणाने दोन्ही गालावर मारून घेत त्यांनी देवीला दंडवत घातला. ''चुकलं माकलं क्षमा कर'' असं मनोमन म्हटलं. नवस केला.– ''आई कळसाई तुला समदं कळत असं. मह्या मनाजोगं होऊ दी, मी माझं पोर देशासाठी वाहीन.'' थोरल्या आईचे डोळे पाणावले. भरल्या अंतःकरणाने सर्वांनी पूजा केली. राधाबाईंनी अकरा प्रदक्षिणा घातल्या. सर्वांनी त्यांचं अनुकरण केलं. चुकल्या

माकल्याची पुन्हा पुन्हा क्षमा मागितली. तशी थोरली आई म्हणाली, ''राधाबाई, अगं तिला डोळं हायेस. झालं ग्येलं तिला समंद समजताय तू काय सुदिक काळजी करू नग'' राधाबाईनी थोरल्या आईचा हात हाती घेतला. थोरल्या आईनं राधाबाईंच्या डोक्यावरून हात फिरविला. राधाबाईंना खूप बरं वाटलं. तेवढ्यात राधाबाईंचं लक्ष देवीकडं गेलं. विठी अजून तेथेच हात जोडून बसली होती. राधाबाईंनी विचारलं, ''विठे काय ग, मांगतीस?'' तशी विठी लाजली. साऱ्याजणी खळाळून हसल्या. सर्वांच्याच मनावरचं दडपण जरा कमी झालं. मग थोरल्या आईनं सर्वांना बसण्याचा आग्रह केला. देवीच्या पुढ्यात सगळ्याजणी बसल्या. बसताच राधाबाईंनी पुढे होऊन सर्वांच्या कपाळी कुंकू लावलं, शेवंतीनं राधाबाईंनी कंकू लावलं. राधाबाई बसल्या. थोरल्या आईनं सुचविलं, ''अगं बायानु देईला आल्या पांच वव्या तरी म्हना गं, तसा जाऊ नही.'' मग एकमेकींना आग्रह झाला आणि मग एकदमच सर्वांनी म्हणायला सुरुवात केली–

**पह्यला माहा दंडवत बाई पह्यला माहा दंडवत**
**पहिल्या खेपला**
**लागले भजनी कळसाईच्या**
**कळसाईचा डोंगर कड्यानी यंगना**
**निश्चेय ढळना दर्सेन घियाचा ।।१।।**

**दुसरा माहा दंडवत बाई दुसरा माहा दंडवत**
**हरिचंद्राच्या म्हादेवा**
**लागले भजनी महादेवाच्या**
**म्हादेवाचं उपास करीता करवनी**
**निश्चेय ढळनी उपासाचा ।।२।।**

**तीसरा माहा दंडवत बाई तीसरा माहा दंडवत**
**रणदाच्या खालती**
**लागले चरणी घोरपड्याईच्या**
**घोरपड्याईचा नवस फेडता फेडवनी**
**सोन्याचा जावळ काढीला जाऊनी ।।३।।**

**चवथा माहा दंडवत बाई चवथा माहा दंडवत**
**कोदनीच्या जवळी**
**तातुबाची सावूली मांला मिळानी**
**तातुबाची सावूली मिळता मिळानी**
**तीड म्या पाह्यली सीताई मावली ।।४।।**



**पाचा माहा दंडवत बाई पाचा माहा दंडवत**
**अम्रितेशराला**
**अम्रितेशराचा तीरथ मिळावा**
**अम्रितेशराचा तीत तीरत घेतला**
**संवसार मांडीला आवडीना ।।५।।**

**साहा माहा दंडवत बाई साहा माहा दंडवत**
**टाकारीच्या आईला**
**भवानी माताला पाह्येला तेथ**
**भवानीमाताचा देवूळ पाह्यला**
**अनभाव फिटला जलमीचा ।।६।।**

**साता माहा दंडवत बाई साता माहा दंडवत**
**टाकेदा खालती**
**तीरीतात नाले काशीच्यामी**
**काशीचा तीरीत रामाना आणीला**
**मरान चुकला जटायूचा ।।७।।**

ओव्या होताच सर्वांनी मनोभावे पुन्हा नमस्कार केला. आईचा अंगारा भरून घेतला. देवळातून निघता निघता राधाबाईंनी पुन्हा एकदा कळसाईला वंदन केलं. मनोमन प्रार्थना केली.

* * *

वाड्यात पाऊल टाकतात तो समोर ओटीला धोंडा फुरफुरला. रख्या चारा टाकीत होता. आत ओसरीत चारदोन पुरुषांचं बोलणं ऐकू येत होतं. राधाबाई लगबगीनं घरात गेल्या. विठी कामाला लागली.

रात्री निजानीज झाल्यावर अंधाराच्या साक्षीनं गोविंदरावांनी राधाबाईंना विचारलं, ''आज देवीला ग्येला व्हता जनु?'' ''हूं'' राधाबाई हुंकारल्या. ''काय साकडं घातलं देवीला?'' ''राज परत पयल्यासारखं मिळावं म्हून.'' राधाबाई उत्तरल्या. ''राज्याचं येड आमच्यापक्षी तुमाली जास्त लागलया म्हनायचं!'' गोविंदरावांचं हे बोलणं ऐकून ''जीठं दादला तीड बायकू! तुमी, रात न्हाई दिस न्हाई सारकं हिंडताय, आन् आमी देवीला साकडं सुदिक घालू नायी का?'' लटक्या रागानं त्यांनी जरा जोरातच पाय चुरत विचारले. गोविंदराव प्रसन्नपणे हसले.

सूर्यदेवाचे सहस्त्र हात आता सह्याद्रीच्या उंच शिखरावर चौफेर फिरत होते. काळी

निळी शिखरं उन्हात चमकत होती. खंगळी खंगळीतून डोंगर उतरणीवरून आणि कड्या कड्यावरून खळाळत जाणारे पाणी आता शुभ्र झाले होते. कड्यांवरून आदळतांना फेसाळत होते. इंद्रधनुष्ये उठत होती. साग, सादडा, अहेकळ, अळीव, आंबा, निमोणी, किलकिला, वावळा, आळींद, हेंडकळ, जांबूळ, कावीत, वरस, उंबर असे कितीतरी वृक्ष आपल्या नवजात बालकांना आपल्या बरोबर घेऊन टरारून वर आले होते. माजलेल्या गवतातून चालतांना जनावरे गवताच्या हालचालीनेच फक्त ओळखू येत होती. झुडपे वेली पिसाटपणे वारेमाप वृक्षाशी स्पर्धा करीत होती. गर्द जंगलातून खालच्या गुरुंवाटा दिसत नव्हत्या. त्यांत पांजरा, उडदावणा, म्हणजे तर पावसाचं माहेरघर. या भागात पावसाळ्यात येण्याची कोणाची छाती नसे. लक्ष्या ठाकराची जातच लोखंडी. त्यांनी असल्या गावात वसती केली होती. उंच उंच शिखरावरच ती गावे. खालच्या कापीव कड्यावरून मेंढरांच्या अंगावरील लोकरीप्रमाणे दाट रानात लपलेलं दूरवर खोल जाणारं कोकण दिसे. उडदावण्याला लागून अळंगाचा उंच डोंगर होता. कळसुबाईला आव्हान देणारा. अवघड. दिवाळीपासून पावसाळ्यापर्यंतचे चार पांच महिने सोडले तर तेथे सैन्य देखील राहत नसे. खालचे लोकही जात नसत. अळंगाला लागून जोडकिल्ला कळंगा. अळंगाकळंगा म्हणजे अचकट विचकट, अक्राळविक्राळ निव्वळ रानटी. त्या पलिकडे त्याला उपमा नाही. खाली मधल्या दरीत खोल, रुंद, दगडी, अंधाराशिवाय कोणीच आत जाण्याची टाप नसे. हे जोडकिल्ले आणि ती खोल दरीतील गडदी यांनी जोडणारी एक अजब आडवी तिडवी, विळख्याविळख्यांची पायटी होती. ती पांजरा, उडदावणा, घाटघर, कोल्हारवाडी, पेंडशेत या परिसरातल्या गावातील लोकांनाही लक्षात येत नसे. या रानात वाघांचा सुळसुळाट. वाघांचंच रान ते. करवंदांच्या जाळीनं भरलेलं. दरीदरीतून एखाद्या गडदीतून वाघाची डरकाळी ऐकू येई आणि मग दाट जंगलात झाडांच्या शेंड्याला बसलेली वानरे, मोर, जंगलात लपून बसलेली तरस, लांडगे, कोल्हे अशी कितीतरी जनावरे एकच गिल्ला करीत पळत. त्यातली कितीतरी धडपडत.

किल्ला म्हणजे मोठमोठ्या पाचसातशे माणसं मावणाऱ्या गडदी. रानवेली, झुडपे, वृक्ष यांच्या आड लपलेल्या. किल्ल्यांवर, पाण्याची टाकी. अंधाऱ्या गडद्यामुळे विस्तीर्ण गवताळ मैदान झुडपा-झुडपांच्या सैन्याने पादाक्रांत केलेले. दरवर्षी गवत झुडपे यांची तोड होई. सैन्याच्या तुकड्या टेहळणीसाठी जात. चार महिने वरपर्यंत उडदावण्यातून पायाखालच्या रस्त्याने ये-जा चाले.

गडद्यांवरही पश्चिमेकडील उन्हे पडली होती. टाक्यांतील पाणी चमकत होते. गडद्यांच्या तोंडाला विळखा घातलेले वेलींचे नाग थरथरत होते. गडदीच्या आत आता दहा-पंधरा माणसं आणि दोन बायका दिसत होत्या. पाच गडद्यांतली पश्चिमेकडची कोकण पाहणारी गडदी बोलकी झाली होती. गेले दोन-तीन महिने तेथे पाचच माणसे राहत होती. पण तेथे माणसे राहत आहेत हे डांगाणातल्या देखील कोणासही खरे वाटले नसते. ही पांच माणसे होती लक्ष्या ठाकूर, वाळ्या कोळी, कोंड्या आणि लक्ष्याची सुरंगी अन् वाळ्याची परिगा. ही पाच माणसं म्हणजे चालते-बोलते कडेच होते. त्यांना भिऊन रानाचा राजाही पळून जाई. लक्ष्या ठाकूर तर दोन हातानी वाघाचा जबडा चिरून टाके. सुरंगी दारू पाडण्यात पटाईत होती तर परिगा सागुती, वशाट करण्यात पटाईत होती. कोंड्या बिचारा त्यांच्यात खुळखुळ्यासारखाच होता. पण राकट. कोणत्याही सापाला दोन बोटांच्या चिमटीत पकडून एका झटक्यात मारून टाकी. एकदा तर त्याने अजगराला जंब्याने मारले होते. वाळ्याचा नेम म्हणजे रामबाण. अशी एकाचढ एक ती माणसं. टोळीतले बाकी साथीदार पावसाळ्यात घरी जात आणि पावसाळा संपला की येऊन मिळत. या कानचं त्या कानाला कळत नसे.

* * *

आज आणखी दहाजण जमले होते. गडदीत कशाला कमी नव्हते. कोपऱ्यातल्या चुलाण्यावर मोठ्या भगुल्यात दहा-पंधरा ससे शिजत पडले होते. रटरटण्याचा आवाज येत होता. खेकड्या भाजण्याचा खमंग वास सुटला होता. वाळ्या आणि लक्ष्या बसला होता. पुढ्यात हंडाभर दारू होती. मोहाची, मधाची. लक्ष्या म्हणजे पीसाट रानरेड्याचा अवतारच वाटत होता. पीळदार काळ्या दंडावर चांदीचा ताईत उठून दिसत होता. गळ्यात सोन्याचा भला मोठा मारुती चमकत होता. ''वाळीबा हां यव्हढा भांडी लावा'' लक्ष्या धुंदीतच म्हणाला, ''सुरंगे खेकडी आण.'' सुरंगीनं भाजलेल्या दहापंधरा खेकडी त्यांच्यापुढे टाकल्या. मग सगळ्यांनाच चेव आला. तांब्याने दारू थाळ्यात ओतली जाऊ लागली, ते थाळेच तोंडाला लागत होते. दारूचा उग्र दर्प साऱ्या गडदीत घुमत होता. कोंड्या मध्याला काय तरी डाचतय हे लक्ष्याच्या नजरेतून सुटले नाही. लक्ष्या ओरडला, ''का रं कोंड्या, तेंठ लई गपचित बसला? यंठ यी आन बोल भडभडा. आरं तुला काय पानी पियाचा नही काय?'' लक्ष्या दारूला पाणीच म्हणे. कोंड्या डोकं खाजवीत पुढं झाला. लक्ष्याचा आग्रहाचा तांब्या तोंडाला लावून तसाच त्यानं पोटात रिचवला आन् मग तो मोकाट सुटला. ''सरदार, ह्या गोइंदरावाचं पथ्य पानी आपल्याली काय परवडायचा न्हाई. त्येचा आपला काय समंध?'' ''कोंड्या.... तोंड आवर. ह्या लक्ष्याचा सब्द हाये. एकडाव दिला मंजी मागं नही.'' ''पयलं यगळं हुत पर आता मंजी गोइंदराव अडचणीत हाये. आन् त्येचा म्हनना बी बरूबर हाये.'' लक्ष्यान दरडावले. ''आरं पर आपन दरुड पाडनार आन् मिळालेलं दियाचं त्येच्या हातात. आन् तो सांगन तसा ऐकायचा? तसाच जाआचा? त्यंठच जायाचा? मंग आपला कसा भागन.'' ''आरं भागन, भागन, तुला काय कमी पडला तं मला मांग. पर आता माघार घ्यायची न्हाय.'' ''त्या सायबाच्या हातात सापडाया लागलू व्हतो तवा त्येनाच वाचिवला ना? पका मार खाऊन मेलं असतं. आन् गोईंदराव काय दरोडं घालून लुटाया न्हायी म्हनत्यात, पर पाहून पाहून बेइमान, बेसरम आवलादींव दरुडं घालायचं. गोर गरीबाचं खाऊन वर आपल्याली गोऱ्याच्या सावधीन करून आपन तुऱ्यात रयतात काय?

त्येना म्हनावा ह्या चालनार नही.'' लक्ष्याने हाताच्या मुठी आवळल्या होत्या. वाळीवाने ही वादावादी थांबवली. ''आरं त्या तीर्थाच्या आन् रामा म्हादेवाच्या साक्षीना आपुनी आन वाह्यली आन आता मागं फिरनार? अरं बेरडाची जात असली तरी बेईमान नही. कोंड्या घी उजुक तांब्या फिरव.'' बाकी कोणीच काही बोलत नव्हतं. सगळे दौड करून थकले होते. वाळ्यानं परत फर्मावलं ''परीगा टेंभ्याला बत्ती दी.'' परीगानी टेंभे पेटवले. टेंभ्याच्या प्रकाशात साऱ्यांचेच चेहरे भयंकर दिसत होते. मग वाळ्यानं जेवण द्यायला सांगितलं. नागलीच्या अंगठ्या जाडीच्या भाकरी आणि भात त्याबरोबर सस्याचं कालवण सर्वांना दिलं. सगळ्यांचीच हाता तोंडाशी गाठ होती. हळूहळू रात्र होत होती. रस्सा फुरकण्याचे आवाज येत होते. डोळे तांबरलेले होते. सुरंगा आणि परीगा मुकाट्याने वाढण्याचे काम करीत होत्या. ''रातोरात मुक्काम करा आन् उद्या सकाळी सांगोवा येईन तस मंग आपल्याली गावोगाव कडका घ्यायाला जायाचं हाये'' वाळ्या म्हणाला. त्याच्या बोलण्याकडे कोणाचेच लक्ष नव्हते. एकेकजण ढेकर देत चुळ भरून उठला आणि आगटी जवळ येऊन बसला. मग सुरंगा आणि परिगा दोघींनीही उरलं सुरलं खाल्लं. इकडे चिलीम भरली गेली आणि आगटीत लाकूड सारले गेले. धुरांच्या झुरक्याबरोबर बरळणे सुरू झाले. ''आरं तुह्या बायकुली, आमचा राज घ्येतो काय?'' ''घी'' एक ओकला, ''आरं ह्या डांगाण हाये, इठं कोळ्याचाच राज हाये आन् कोळ्याचाच रयणार'' दुसरा बरळला, ''पर, त्या रामजी भांगऱ्याला लय उत आलाय रं'' ''त्यानं आपला समदा ऐकायचा आन् आपल्याली संगनियाचा.'' ''येड्या तुला नही समजायचा.'' ''त्या राजुरातल्या सावकाराना त्या सायबाली समदा सांगला का असा असा.'' वाळ्या अजूनही शुद्धीवर होता. त्याने दटावले. ''त्या ऱ्हाऊ द्या आन् आता निजा पाहू'' आगटीच्या भवतीच घोंगडे आंगावर घेऊन सगळे निजले.

दुसऱ्या दिवशी दिवस अजून माथ्यावर आला नव्हता. तोच सांगावा घेऊन माणूस आला. जुन्नर, नासिक, संगमनेर, नगर आणि खाली कल्याणपर्यंत कोकणात सायबाच्या कायकाय हालचाली आहेत, कोणती गावं लुटायची, कोणकोणत्या ठिकाणी दरोडे घालायचे हे सारे हेरून येण्याची महत्त्वाची कामगिरी वाळ्या आणि लक्ष्यावर सोपवली होती. त्यांना रामा किरवाची माणसं गावोगाव भेटणार होती. 'काशी तीर्थ' हा परवलीचा शब्द ठरला होता. निरोप घेऊन निरोप्या निघून गेला. वाळ्यानी लक्ष्याशी थोडावेळ बोलणे केलं मग आपल्या सगळ्या साथीदारांना योजना समजावून सांगितली. त्यांच्या चार-चारच्या टोळ्या केल्या. स्वतः दोघांनी कोकणात कल्याणपर्यंत जायचे ठरविले. भरपूर डाग बरोबर घ्यायचे ठरले. काही विशेष बातमी लागली तरी ती लगेच कळवावयाची होती. प्रत्येकाजवळ घोडे होतेच. काम जोखमीचे होते. दसऱ्यापर्यंत अवधी होता. आणखी साथीदार बांधून घ्यायचे होते. विश्वासातले. वसुलीचे सांगावे द्यायचे होते.

दुपारची जेवणं झाली आणि सर्वांनी खालच्या दरीत उड्या घेतल्या. गौठणीवर जाऊन आपल्या आपल्या घोड्यांवर मांड ठोकली आणि घोडी सुसाट निघाली. दरोडे पाडायला निघणारी घोडी मुत्सद्देगिरीने, हिकमतीने, गोऱ्यांचे राजकारण उलथून द्यायला सिद्ध झाली.

सुरंगा खाली उडदावण्यात आपल्या आईकडं राहणार होती. तिची आई एकटीच होती. म्हातारी. सुरंगा केव्हां केव्हां तिच्याकडे जाई अन् महिना-महिना राही. परिगाची व्यवस्था मात्र गोविंदरावांच्या घरीच वाड्यात केली होती. वाळ्या आणि लक्ष्या दोघेही किल्ल्याखाली उतरले. त्यांनी आपल्या सुरंगा-परिगाला नेमल्या ठिकाणी सोडले आणि दोघेही पसार झाले.

परिगा-सुरंगाला घेऊन गोविंदरावांच्या राधाबाईकडं आली. कधी नव्हे ते त्या दोघींना घरात घरचं खायला-प्यायला, अन् घरपणानं राहायला मिळालं. दोघीही दोन दिवस राधाबाईंच्या सान्निध्यात बरंच काही शिकल्या. मग सुरंगा निघून गेली आपल्या म्हाताऱ्या आईकडे. परिगानं झालेली सर्व व्यवस्था गोविंदरावांच्या कानावर घातली. गोविंदरावांनी समाधानाचा सुस्कारा सोडला.

गोविंदरावांनी देखील या महिन्याच्या काळात बरीच कामं उरकायची ठरविली होती. डांगाणातल्या आणि रतनगड महालातल्या परिसरातील गावोगांवच्या पाटलांना विश्वासात घ्यायचं होतं. त्यांना गोऱ्यांच्या कारवायांविषयी सांगायचं होतं. स्वराज्याचा मंत्र रानोमाळ, गावागावातून पोचवायचा होता. सामद्रचा हांडे पाटील, घाटघरचा खडके, मुरशेतचा असवले, चिचोंडीचा मधे, बोटनर, वारंघुसचा कडाळी, मुतखेलचा इदे, हापसुले, आंबेवंगणचा धांडे पाटील, खेताडे, कोळटेंभ्याचा बुळे, पेणशेतचा पदमिरे, रणदाचा कोरडे व पटेकर, कोदनीचा बांबेरे, भंडारदऱ्याचा खाडे, मान्हेऱ्याचा गभाले, कोकदरे, गुहीऱ्याचा शिनवणी असे कितीतरी मुकणी, झडे, पांढरे, भांगरे, गिऱ्हे अशा पाटलांना गाठायचे होते. गावोगावचा वसूल, पाटीलकीच्या तक्षीमा सारे काही हक्क जतन करून ठेवण्याच्या सूचना द्यायच्या. आपल्या पक्षात मिळवून घ्यायचे होते. सबंध महिनाभर हा एकच विषय त्यांच्यापुढे होता. दसऱ्याचा दिवस त्यांनी मोहिमेवर निघण्यासाठी निश्चित केला होता. हे सगळे ठरविले होते. तरी रामजी भांगरेची अडचण त्यांच्यापुढे होती. त्याला याच सबंध भागावर जमादार म्हणून नेमले होते. त्याच्यासारखेच आणखी काही पोलिस अधिकारी पाचपट्टे, राजूर, चिंचवणे, आंभोळ अशा अनेक ठिकाणी नेमले होते. पण त्यांच्यावर रामजीचीच देखरेख होती. राजूरला तर जोशी-कुलकर्णी नेमला जाणार होता. शिवाय वतनदार देशपांड्याचा पवित्रा त्यांना अद्याप कळला नव्हता. कितीतरी समस्या त्यांच्यापुढे होत्या. हे सारे काम, सारा प्रदेश पेटवून देण्याचे काम काही सोपे नव्हते.

वाळ्या, लक्ष्या आणि रामा किरवा यांनी उचललेल्या जबाबदाऱ्यांनी त्यांना उमेद आली होती. पण त्याहीपेक्षा राज्यावरचे प्रेम आणि स्वाभिमान त्यांना गप्प बसू देत नव्हते.

✻ ✻ ✻

भंडारदरा. पांचपन्नास उंबऱ्याचं गांव. ठेंगणं ठुसकं टुमदार. खाड्यांचं गांव. कौलारू पाचसात घरं, बाकी सगळी घरं भाताच्या पेंढ्यांनी शेकारलेली. करवंदीच्या जाळीतून गावांपर्यंत गाडीरस्ता. अंधारात बुडालेलं. मिणमिणत्या ज्योतींनी आपलं अस्तित्व सिद्ध करू पाहणारं. गावात शिरतानाच मारुतीचं देऊळ चार बाजूंनी उतरत्या कौलारू छपरांच, भक्कम. समोर पैस पटांगण. चावडी तीच. मारुतीपुढील दिव्यांच्या मंद प्रकाशात रतनवाडी, मुतखेलच्या शिवेपर्यंत भिडणारे, रानाला मुग्ध करून सोडणारे भजनाचे गोड स्वर देवळातून उमटत होते. टाळ मृदुंगाच्या लयीत तुकोबांचा अभंग घोळला जात होता. माना डोलत होत्या, ओठ स्फुरत होते. मारुतीच्या पुढ्यात आगटी पेटलेली होती. मोठा ओणका आणि दोन कवळी लाकडे देवळात उब निर्माण करीत होती. बाप्यांच्याबरोबर घोंगडं, शाल, गोधडी घेऊन मारुतीच्या देवळात आलेली पोरं उबेत झोपी गेली होती. एका पाठोपाठ अभंग, गवळण, भारुड होत होते. कोणालाच कंटाळा येत नव्हता. बारकू खाडा पाटील स्वतःच जातीनं भजनाला हजर होता. त्याला भजनाचं फार वेड. गेणबा मृदुंग्या त्याचा स्वर खाली पडू देत नव्हता. त्यात आज बारकूचा आवाज चांगलाच लागला होता. बाहेर काळ्याकुट्ट अंधाराला विद्ध करणारे लक्षावधी तेजोबाण आकाशात प्रकाशमान झाले होते. आता अंधारातही पायट्या चकाकू लागल्या होत्या. जणू बारकूचे स्वर पायट्या सजीव होऊन जवळपासच्या गावांना नेऊन पोचवित होत्या. मधूनच गावाच्या दुसऱ्या बाजूला जरा दुरूनच कोल्हेकुई ऐकू येत होती. परंतु गोड गळ्यातून बाहेर पडणाऱ्या नादब्रह्मात रंगलेल्या गावकऱ्यांना त्याची चाहूलही लागत नव्हती. भंडारदऱ्याच्या शिवेवर क्षणभर आपलं घोडं उभं करून गोविंदरावांनी गावचा कानोसा घेतला. मंजुळ स्वरांनी त्यांचंही मन भारावून टाकलं. हा बारकूचा आवाज हे त्यांनी लगेच ओळखलं. डांगाणात खाड्यांची दोनच गावं बारी आणि भंडारदरा. त्यामुळे त्याचं नेहमीच भंडारदऱ्यात येणं असायचं. गावात म्हातारे आणि बायकाच बहुधा असायच्या. पावसाळ्याचे चार महिने संपले, दसरा झाला की तरणी पोरं उमदे बापय माणूस रतनगडावरच वसतीला यायचं. मग मोहिमेवर कधी जावं लागायचं. आता ती पाळी त्यांच्यावर येणार नव्हती. रतनगड आता त्यांचा राहिला नव्हता. हे मनात येताना गोविंदरावांचं मन कावरंबावरं होत होतं. रक्त उसळत होतं. आता सारे गावातच राहणार होते. शिवाय गावात विधवांची संख्या वाढली होती. अंतःकरणाला तेही सलत होतं. पण हा प्रश्न आता प्रत्येकच गावचा झाला होता. आतापर्यंत सात-आठ गावांत ते फिरून आले होते. त्यांना अपेक्षित प्रतिसाद मात्र अजून कोठेच फारसा मिळाला नव्हता. त्याचं मन पोळलं होतं. अभंगाच्या उंच स्वराने ते भानावर आले. आपण घोडं उभं करून येथेच काय उभे राहिलो हे मनात येऊन ते स्वतःशीच हसले. त्यांनी घोड्याला टाच दिली आणि घोडा पुन्हा खडकातून, खंगळीतून, करंवदीच्या जाळ्यांतून गेलेल्या पायवाटीवरून सुसाट पळू लागला.

मिणमिणते दिवे जवळ येऊ लागले तसतसे टाळकऱ्यांचे टाळ आणि स्वरही जोरात स्पष्ट ऐकू येऊ लागले. गोविंदराव देवळासमोर आले. इतका वेळ आपल्याच



तानांमध्ये गर्क असलेले गांवकरी घोड्यांच्या खिंकाळीने एकदम भानावर आले. बारकू एकदम सावरून उभा झाला. पाठोपाठ आणखी चार तरणी पोरे खाडकन उभा राहिली. गोविंदरावांनी घोड्यावरून खाली उडी टाकली होती आणि ते देवळाच्याच दिशेनं पुढं येत होते. मंद प्रकाशातही बारकूनं गोविंदरावांना ओळखलं. तो मोठ्यानं पुटपुटला, ''कोण रं गोईंदराव?'' आणि दुसऱ्याच क्षणी तो देवळाच्या पायऱ्या उतरून खाली गेला. त्यानं गोविंदरावांना कडकडून मिठी मारली. गोविंदरावांनाही भरून आलं होतं. त्यांनी बारकूच्या पाठीवर थोपटलं तोपर्यंत पोरांचा अन् गावकऱ्यांचा गोविंदरावांभोवती गराडा पडला होता. सर्वांचे डोळे पाणावले होते. गेल्या चार महिन्यात गोविंदरावांची आणि बारकूची भेट झाली नव्हती. गोविंदराव भंडारदऱ्यापर्यंत येऊही शकले नव्हते. चार महिन्यापूर्वी झालेला रणसंग्राम लोक विसरले नसले तरी चाकरी तुटली होती. शेती करणं आवश्यक होतं. ''आरं मंदी चला. का इडच त्या ह्या कराता? शिवा टेंबा लाव रं'' बारकू म्हणाला अन् सारे लगबगीने हालू लागले. गोविंदराव न राहून म्हणाले, ''बारकू आरं आदुगर तुळाईला भेटू, शेवंतीला गागू.'' तुळाईचे नांव काढताच सारे गंभीर झाले. गेले चार महिने तो आणि तिची गाठच नव्हती. ती अबोल झाली आहे हे त्याच्या कानावर आले होते. ती बोलू लागली तर सारखी वेड्यासारखीच बडबड करी. तिच्या सुनेला कोणी विचारू लागलं तर तिचे डोळे तोंड उघडण्यापूर्वी फुटत आणि आश्रु ओघळतांना सहज नजर तिच्या पोटातल्या वाढत्या जीवाकडं जाई. ''तुळाईकं?'' बारकूनं पुन्हा विचारलं. त्याची तिच्याकडे जायची हिंमतच नव्हती. गेल्या चार महिन्यांत त्याने चारवेळाही तिकडे पाऊल टाकले नव्हते. लांबून लांबूनच तिने खाल्लं, नाही याची चौकशी करी. तिच्या शेतात त्यानं परस्परच आवण्या केल्या होत्या. शेवंताबाईचं चित्र तर फार भयाण होतं. तिला वेड लागलं होतं. ती कोणी आलं की हसत सुटे. विकट हास्याच्या खळखळाटा पाठोपाठ तिला रडू फुटे आणि ती ओक्साबोक्सी रडू लागे. आपल्या उरावर हात बडवून घेऊन मग जी एकदम गप्प होई व ती पुन्हा बोलतच नसे. तिच्या नवऱ्याचे प्रेत समोर असतांना तिची अब्रू अमानुषपणे गण्या शिपायाने लुटली होती. त्याच्या पाठोपाठ आणखी तिघेजण तिच्यावर तुटून पडले होते. ती जेव्हा शुद्धीवर आली तेव्हा तिच्याजवळ म्हातारी सीताबाई थिजल्या डोळ्यांनी बसलेली होती. दोन्ही घरं अशी उन्मळून पडली होती. वेलींनी ज्या वृक्षाच्या आधारानं जगावं, फुलावं, फळावं ते वृक्षच मुळासकट उद्ध्वस्त झाले होते. गोविंदरावांनी खंबीरपणे उत्तर दिलं. ''हं'' मग कोणी काही बोलले नाही. रात्र वाढत होती तरी मोठ्या हिंमतीनं बारकू आणि गोविंदराव पुढं आणि सारे गावकरी मागं अशी दुर्दैवाची दिंडी उद्ध्वस्ता घरीच चौकशीला निघाली होती.

मारुतीच्या मंदिराकडं परत येतांना गोविंदरावांचं उपरणं चिंब झालं होतं. ते भरल्या अंतःकरणानं पण निश्चयी, करारी मुद्रेनं दमदार पावले टाकीत निघाले होते. बारकू खचल्यासारखा झाला होता. त्यांच्या मागून चालत होता. तरणी पोरं गंभीर झालेली होती. आकाशातून अंधाराचं साम्राज्य आपल्या इवल्या प्रकाशानं उधळून टाकण्याचं स्वप्न पाहणाऱ्या

ताऱ्यासारखे त्यांचे डोळे चमकत होते. या प्रकारात शिवा टेंभा करावयाचं पार विसरून गेला होता. तोही भारावल्यासारखा गोविंदरावांच्या मागून चालत होता.

गोविंदराव मारुतीच्या मंदिरात आले. त्यांनी मारुतीला वाकून दंडवत केला. बारकूनं घोंगडं टाकलं. गोविंदराव घोंगड्यावर बसले. बारकू पाटील त्यांच्या शेजारीच बसला. दिव्याच्या मिणमिणत्या प्रकाशात मृदुंग, टाळ आणि टाळकरी अबोल झाले होते. गोविंदरावांच्या चेहऱ्याकडे पाहत होते. त्यांच्या डोळ्यात उत्सुकता होती. व्याकुळता होती. अंतःकरणात आगी पेटल्या. मनाची आर्त संवेदना होती. क्षण दोन क्षण, चार क्षण गेले. कोणीच काही बोलत नव्हते. फक्त दिव्यातली स्निग्धता आपल्या शक्तीनिशी आग ओकीत होती. अखेर बारकू पाटलानं शांततेचा भंग केला, ''गोविंदराव आता पुढं?'' गोविंदराव आता काय बोलणार म्हणून सारे तरुण कानात प्राण आणून ऐकू लागले. गोविंदरावांनी क्षणभर एकटक त्या जळत्या ज्योतीकडं पाह्यलं. त्या ज्योतीची मशाल झाल्याचा भास क्षणभर त्यांच्या डोळ्यांना झाला. तोंडातून शब्द निघाले, ''सूड! ज्यांनी रतनगडाची दैना केली, आपल्या संवसार परपंचाची होळी केली आन् त्येंच्या परं ज्यांनी भाडखाऊपनानं गोऱ्यांचं पाय चाटलं, आपल्याच आयाभनींची अब्रू लुटली त्येंचा सूड!'' ''माझ्या भावानु त्यो म्हादेव समदं डोळ्याना पयतोय रं. ह्या समद्यांना पानी पाजल्या बिगर त्यो म्हादेव शांत व्हयाचा नाही.'' त्यांची नजर शून्यात होती. आवाजात दमदारपणा होता. स्वर संवेदनेने भारला होता. तरणी पोरं भारावून गेली होती. एवढे बोलून होताच गोविंदराव एकदम उठले. उभे राहिले. बारकू पाटलानं विचारलं, ''उठलावं?'' ''हूं'' गोविंदरावांनी हुंकार दिला आणि मग एकदम ते गरजले, ''पोरानु, आपलं एक बेनं शिल्लक ऱ्हायलं नाही तरी चालल पन ह्याला उचकटून टाकायचां. लागा तयारीला.'' आणि गोविंदराव तरातरा आपल्या घोड्याकडं निघाले. बारकू पाटील कसातरी मागून निघाला. तरणी पोरं भारावल्या अंतःकरणानं गोविंदरावांच्या घोड्यापर्यंत पोचली. गोविंदरावांनी मांड ठोकली आणि घोड्यावरून हात उंचावून ते गरजले ''हर हर... म्हादेव!'' तरण्या पोरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ''म्या सांगावा पाठवतो'' एव्हढं म्हणत असतांनाच घोड्याने दौडायला सुरुवात केली होती. जाणाऱ्या स्वाराकडे अनिमिष नेत्रांनी पोरं पाहत होती. अविचल उभे राहून. बारकू पाटलाच्या कपाळावर मात्र आठ्यांचं जाळं पसरलं होतं.

मग भजन आवरलं. टाळाला गाठी बसल्या, मृदुंग हलला. घराकडं पावलं वळली आणि पाचच मिनिटात गाव शांत झाला. पण मारुतीच्या देवळात आगटीजवळ काही तरणी पोरं मात्र आगटीच्या ज्वाला लाकूड सारून भडकावीत उगाच त्या ज्वालांकडे पाहात किती तरी वेळ बसून होती.

* * *

केवढा प्रचंड जटायू पक्षी पंख पसरून पडला होता. त्याच्या चोचीजवळ श्रीरामचंद्राने काशीचे तीर्थ आपल्या धनुर्विद्येच्या किमयेने आणून ठेवले होते. जटायूने आकाशमार्गाने जाणाऱ्या दशाननाशी टक्कर दिली होती. जटायू स्वाभिमानी होता. लढवय्या होता. शूर होता. स्वामीभक्त होता. पण आपल्या स्वामीसारखाच तो सत्यवचनी होता. रावणाने त्याच्या सत्यवचनीपणाचा फायदा घेऊन त्याचे पंख उपटले होते. पण रावणाने मात्र त्याला अंगठाच दाखविला होता. विशाल पट्टागड यालाच शिवछत्रपतींनी विश्रामगड असे नाव दिले होते. पट्टागडाविषयी जटायूच्या समर्पणाची अशी हृदयभेदक आख्यायिका प्रत्यक्ष पत्त्यामुद्यासह सांगितली जाई. खरंच पट्ट्याचा आकार एखाद्या पंख पसरून निपचित पडलेल्या घायाळ पक्ष्यासारखाच आहे. त्याच्या पश्चिमेकडील शिखरांची शीर चोचीच्या आकाराची थेट सर्वतीर्थ टाकेदापर्यंत जाऊन भिडली आहे. बाजूलाच लिंगीचा डोंगर अगदी अंगठ्याच्या आकाराचा आहे. लोक त्याला रावणाचा अंगठा म्हणतात. या गडावर शिवाजी महाराजांना रणमस्तखानाशी तोंड देत असतांना सुरक्षिततेसाठी यावे लागले होते. कोळ्याच्या एका वाटाड्याने त्यांना परमेश्वरालाही सापडणार नाही अशा जवळच्या थेट पट्ट्यावर आणून पोचविले होते. शिवाजी महाराजांना, त्या हिंदवी स्वराज्याच्या संस्थापकाला या जटायूच्या मृत पंखांनीही आश्रय दिला होता. श्री छत्रपतींनी गडावर पेशव्यांच्या सोयीसाठी टांकसाळ काढली होती. बितानगडापासून पट्टा आता स्पष्ट दिसत होता. घोडा दौडत होता. घोड्याच्या दौडीबरोबरच गोविंदरावांच्या मनात पट्ट्याचा इतिहास उजळला जात होता. त्यांचे अंग रोमांचित होत होते. मधूनच या साऱ्या दऱ्याखोऱ्यांकडे ते भरल्या मनाने बघत होते. स्वतःच्या प्राणांचे मोल देऊन वेळोवेळी सत्याला सांभाळले होते. स्वातंत्र्याच्या बाजूने कौल दिला होता. या श्रेष्ठ संस्कृतीचेच आपण पाईक आहोत हे मनात येऊन गोविंदरावांना अभिमान वाटला. पण त्याचक्षणी त्यांच्या मनात झालेल्या अपमानाने डोकावले आणि अंधाऱ्या रानातून एकट्यानेच दौड करतांना लज्जेनं त्यांची मान खाली झाली. पट्ट्याच्या पायथ्यावरून त्यांचा घोडा दौडत होता. ढासाळले तट वर पसरलेल्या चमचमत्या आकाशाला विद्रुप करीत होते. त्यांना तिर्ढापाचपट्ट्याला जायचे होते. काळू गोडा, सौम्या डगळा आणि त्र्यंबक खोकला आज सापडले पाहिजेत असे त्यांना वाटत होते. पट्टागड सोडताना त्यांनी निकराची झुंज दिली होती. अखेर तेही हताश झाले होते. त्यांना मनीचा निश्चय सांगावा या हेतूने आज ते निघाले. त्यांची अवस्था जटायूसारखीच झाली नाही का? असा सहजच विचार त्यांच्या मनात आला. पुन्हा नजर पट्ट्याकडे वळली. पट्ट्याकडे पाहतांना त्यांना समाधान वाटले. पट्ट्याच्या पायथ्याशी तिर्ढ्यात ते आले. तीर्ढा. पांच-पंचवीस घरंसुद्धा नव्हती त्या गावात. पट्टा गावाच्या भोवती तीर्ढे गावाच्या बारा वाड्या. तीर्ढ्यात एक घर बऱ्यापैकी. चिऱ्यांच्या चवथऱ्यावर. सातखणी तीन दालनी. मधोमध भक्कम दरवाजा, बाजूला गुरांसाठी तसंच मोठं एक घर, काळू गोड्याचं. गोविंदरावांचा घोडा दारापुढे अंगणात थांबला. पलीकडे घोरपड्याचं घर शांत होतं. काळू गोड्याच्या घरात सामसूम होती. गोविंदरावांनी कानोसा घेतला. तेव्हढ्यात कोणाच्या तरी खोकण्याचा आवाज येत होता. काळू गोड्याची म्हातारी खोकत होती. ''बहुधा म्हातारी आजारी

असावी'' गोविंदरावांनी मनात म्हटले. त्यांनी दरवाजाला कान लावला. कोणी तरी निवांतपणे घोरत होते. काळू गोडेच होता तो. बाहेर बहुतेक काळू आणि त्याची दोन पोरं झोपली असावीत. घरात अंधारबुडुक होता. गोविंदरावांनी मनाचा हिय्या करून दार ठोठावलं. कडीचा आवाज होताच काळू सावध झाला, ''ह्या वक्ताला कोण रं गड्या?'' त्याच्या मनात विचार आला. उशाशी असलेली दांडगी काठी त्यानं उजव्या हाताशी धरली आणि ताडकन उठत तो ओरडला, ''कोण रं'' गोविंदरावांनी काळूची अवस्था ओळखली होती. ''काळोजी मी हाये, गोविंदराव'', गोविंदराव म्हणाले. ''कोण? गोविंदराव' आन् ह्या वक्ताला काय हाये?'' असे म्हणून तो उठून दाराची कडी काढू लागला. ''मी गोविंदराव खाडे'' गोविंदरावांनी पुन्हा सांगितलं. दार सताड उघडून तो पाहतच राहिला. गोविंदरावांनी त्याचा हात हाती घेतला. एका राकट हातात दुसरा कमावलेला हात होता. हात दाबत गोविंदराव म्हणाले, ''आरं पयतोस काय, येड्यावानी! आवर सोमा डगळा आन त्र्यंबक खोकल्याला गाठायचा हाये.'' काळूनं काही न बोलता बंडी अडकविली. डोक्याला पागोटा बांधला आणि खांद्यावर घोंगडं टाकून वाहणा पायात सरकवता सरकवता तो म्हणाला, ''पाणी बिणी?'' ''काय नकू.'' पण गोविंदरावांच्या मनाला काय वाटलं कोणास ठाऊक पुन्हा त्यांनी पाणी मागितले. काळूने आत जाऊन पाण्याचा भक्कम तांब्या भरून आणला. गोविंदरावांनी घटाघटा अर्धा तांब्या रिचवला आणि पाणी बाहेर फेकून देत ते म्हणाले, ''चलाशी बिगीनं'' काळू बाहेर पडला. जनावरांच्या घराचा दरवाजा उघडून आपला घोडा त्यानं बाहेर काढला. आज अवेळी रपेट करावी लागणार म्हणून घोडा खिंकाळला. काळूने पाठ थोपटली आणि दोघांनी घोड्यावर उडी घेतली. घोडी पाचपट्ट्याच्या वाडीच्या बाजूने चालू लागली. पाचपट्टा हे गावही तीढर्या गावाच्या बारा वाड्यांपैकीच एक. म्हसोबा डोंगराच्या पुढून पाचपट्टा सरळ. धोपट वाट. पांदीपांदीनं. दोन स्वार धिम्या दौडीनं चालले होते आणि कोणी कोणाशी बोलत नव्हते. घोडी पुढे जात होती. दोन मैलांची रपेट चटकन संपली. पाचपट्टा वाडीजवळ आली. पट्ट्याचं रान सगळं तसं उजाड-दाट जंगल नाही. सगळा पठार भाग. पट्टा पठार म्हणूनच ओळखला जाणारा. लांबूनच वाडी दिसत होती. वाडीच्या मारुतीच्या देवळाच्या डाव्या बाजूचं घर त्र्यंबक खोकल्याचं. काळू पुढे झाला. त्यानं दार ठोठावलं. त्र्यंबक खोकल्याची अवस्थाही अशीच झाली. गडबडीने उठून बाहेर आला. तो पाहतच राहिला. आज कितीतरी दिवसांनी तो गोविंदरावांना पाहत होता. गोविंदरावांचा झालेला अपमान त्याने ऐकला होता. पण गोविंदरावांची अन् त्याची गेल्या दोन वर्षात भेटच झाली नव्हती. बाहेर येताच काळू म्हणाला, ''तिरमक, व्हयसा सोम्या डगळ्याला गाग'' ''आरं पर'' त्र्यंबक खोकला गडबडला. ''अरं व्हय त खरां आमी मारुतीच्या देवळामंदी जातो तीडं यी''. पाचच मिनिटात मारुतीच्या देवळात एका बाजूला चौघे बसले. एका बाजूने आगटी मंदावून आता निखारा राहिला होता. भोवताली सात-आठ माणसं झोपली होती. चांगली घोरत होती. देवळातला दिवा केव्हाच विझला होता. दिव्यातली वात पुढं करण्यासाठी सोमा डगळा चकमक पाहू लागला, तसं काळूने



त्याला थांबविलं. निवांत बसल्यावर काळूनं विचारलं, ''का गोईंदराव? इतक्या रातचं अन् एकलंच कसा काय आलं?'' गोविंदराव त्याचा दूरचा, नात्यानं मेव्हणा लागत होते. त्याची जवळीक ज्यास्त होती म्हणून त्यानं पुढाकार घेतला होता. गोविंदराव गंभीर झाले. त्यांना कोठून सुरुवात करावी हे कळेना. मग मनाचा निश्चय करून गोविंदराव त्या गडद अंधारात दमदारपणे बोलू लागले. ''आपल्याली काय भोगावा लागला ह्यातं तुमाली माहीत हायेच. म्या येचा सूड घ्येयाचा ठरावला हाये, तुमी संगती येवा असा मन सांगताय,'' गोविंदरावांनी एकाच दमात सांगून टाकलं. त्यांच्या दृष्टीने ते सारे समजदार होते. घडलेले प्रकार त्यांनाही भोगावे लागले होते. त्यांची आपल्याला सहज मदत मिळेल. तेही उठतील असं त्यांना वाटत होतं. ''मंग काय इचार तुमचा?'' गोविंदरावांनी अधिरतेनं विचारलं. मग सोमा डगळा बोलू लागला, ''गोइंदराव तुमचं मन आन् आमचं मन काय येगळं न्हाई'' त्याचे बोलणे ऐकून गोविंदराव यांना खूपच बरे वाटले. तो पुढे काय म्हणतो याकडे उत्सुकतेने त्यांचे कान टवकारले- ''पर आता आपल्या हाती काय रयला. अरं राजंच पळून गेलं न चाकरांना काय करावा. धनी मेल्याव बाईला रांडाव म्हणून जगावं लागाताय'' गोविंदराव सोमाचं बोलणं ऐकत होते. त्यांच्या हृदयाला सहस्र वेदना होत होत्या. ''आन तुमी एकल्यानं असं टक्कर दिऊन काय साधणार! तुमी लय पोळला आह्यात, जरा थंड डोक्याना इचार करा. कसा?'' त्याच्या त्या बोलण्यावर सर्वांनीच माना डोलावल्या. गोविंदरावांच्या मनाचा थरकाप झाला. त्यांच्या त्यें जिव्हारी लागलं होतं. ''अरं पर?'' एवढेच शब्द त्यांच्या तोंडातून बाहेर पडले. मग त्यांनी बोलणंच आखडलं तसा काळू गोडा म्हणाला, ''गोइंदराव तुमचा इचार पक्का हाय का? लय जमवाजमव करावा लागन म्हून म्हणतो? न्हाय तर आताच संवसाराची परवड झालय त्यात आनखी काय तरी हुयाचा'' त्र्यंबक खोकल्यानं पुस्ती जोडली. आता मात्र गोविंदराव मनातून चिडले होते. या मुर्दाडांना येथेच संपवावे असे एकदम त्यांच्या मनात आले पण त्यांनी स्वतःला आवरले. पुन्हा निर्वाणीच्या स्वरात म्हणाले, ''आमचा विचार पक्का हाये. तुमी छत्रपतींच्या गादीचे चाकर. राजा गेला म्हणून राज्य बुडत नसते. पुन्हा राजा करताईल, तुमी याल म्हून तुमच्याकडं आलो, तुमी काय ठरवता बोला?'' तसे तिघेही चपापले. गोविंदरावांवर त्या तिघांची श्रद्धा होती, प्रेमही होतं. काय शब्द द्यावा हे त्यांना कळेना. शब्द द्यावा तर परत घेता येणार नाही आणि न द्यावा तं आपलं इमान विकल्याचा दोष येतो असा विचार त्यांच्या मनात आला. ''सांगावा तं आई मरती आन् न सांगावा तं बाप कुत्रा खातो'' अशी त्यांची स्थिति झाली होती. मग पुन्हा सोमा डगळा धीर करून बोलला, ''असा पहा गोविंदराव आमचा म्हनना आमी सांगला. आता तुमचा पक्का ठरला असल तं आमी तुमच्या मांग आहोत. काय करावा नाय जमलात आमी बेईमान नक्कीच व्हनार नाही. ह्या ध्यानात राहू द्या. आमालाबी स्वाभिमान हाये, कसा? ठिक.'' ''अरं तुमी एव्हढा केला तरी लय झाला. पर आमचा इचार पक्का हाये.'' असं म्हणत गोविंदराव उठले तसे तिघेही उठले. गोविंदराव गंभीर झाले होते. त्यांचा चेहरा अंधारातही करारी दिसत होता. मारुतीला नमस्कार करून गोविंदराव लगेच देवळाबाहेर

पडले. गोविंदराव आपल्या बोलण्यावर नाराज झाले आहेत हे सोमाच्या लगेच लक्षात आले. पण त्याला दुसरा पर्याय नव्हता. गोविंदरावांचे हे करणे खरे तर त्याला पसंतच नव्हते. उगीचच तो गोविंदरावांना म्हणाला, ''गोविंदराव, इक्त्या रातचं जाण्यापक्षी सकाळचं जावा.'' त्याच्या ह्या बोलण्यावर सर्वांनी आग्रह केला, पण गोविंदरावांचे मन घेत नव्हते. तसा त्र्यंबक खोकले म्हणाला, ''वरां दोन घास खाऊन जावा.'' मग मात्र गोविंदरावांचा नाईलाज झाला. गोविंदराव थांबले तसा त्र्यंबक लगबगीनं घरी गेला. गोविंदराव, काळू आणि सोमा पुन्हा एकत्र बसून राहिले. कोणीच काही बोलत नव्हते. हा भार कमी व्हावा म्हणून काळू गोडा म्हणाला, ''औंदा पाऊस वक्ता वक्तावं पडला, नाही?'' गोविंदरावांनी होकार भरला पण पुन्हा सारं स्तब्ध.

अर्धातास, पाऊणतास, जेवणं उरकली. गोविंदरावांचे जेवणात लक्षच नव्हते. पण आग्रहही कोणी केला नाही. चूळ भरून गोविंदराव बाहेर आले. मग काळू आणि ते लगेच निघाले. घोड्यांच्या चालीला वेग आला. काळू चालता चालता म्हणाला, ''गोविंदराव कुणी काही म्हणलं तरी मी तुमच्या संगट हाये, तुमी कवाई सांगा मी ईन. सांगावा धाडा.'' पण गोविंदराव काहीच बोलले नाहीत. मग काळू देखील उगाच राहिला. केव्हां तीर्ढे आले आणि काळूच्या घरासमोर एकदम घोडे थांबले कळलेच नाही. काळूने विचारले, ''गोईंदराव मुक्काम करता?'' गोविंदराव म्हणाले, 'नकु मला आत्ताच जाया पायजेलं, राम राम.'' गोविंदरावांच्या घोड्याला पुन्हा टाच बसली. घोडं सुसाट पळू लागलं. आता वाटा चांगल्याच दिसू लागल्या होत्या. रात्रही बरीच झाली होती. गार गार वारं सुटलं होतं. गोविंदरावांचं त्याकडं लक्षच नव्हतं. अजून पंधरा मैलांचा प्रवास व्हायचा होता. घोडं चाललं होतं. त्याचबरोबर मनही पिसाट बनलं होतं. विचारांच वादळ चाललं होतं. सोमा डगळेचं बोलणं पुन्हा पुन्हा घण मारल्यासारखं मनात आदळत होतं– ''धनी मेल्यावं बाईला रांडाव म्हनच जगावं लागतं!'' खरंच गोविंदरावांचा धनीच कमकुवत ठरला होता. पळपुटा बाजीराव म्हणून लोक हेटाळणी करीत होते. ज्या गादीच्या स्वाभिमानासाठी गोविंदराव लढले होते, त्या गादीचे धनी इंग्रजांपुढे नत झाले होते. सोमाच्या म्हणण्याप्रमाणे त्याला रांडाव करून गेले होते. गोऱ्या अधिकाऱ्यानं पकडू नये म्हणून सह्याद्रीच्या कुशीत, दऱ्याखोऱ्यात जीवापाड मेहनतीनं बाजीरावाला जपलं होतं. पण तो सापडला होता. त्याला तेथून पळून जावं लागलं होतं आणि अखेर त्या गोऱ्याला शरण जावं लागलं होतं. सारी मेहनत फुकट गेली होती. धनीच शरण गेल्यावर चाकरानी कशाचा मान अन् सन्मान पाहावयाचा? कशाचा अभिमान बाळगावयाचा? असे कितीतरी विचार त्यांच्या डोक्यात पुन्हा पुन्हा त्यांना छळत होते. काय खोटं आहे सोमाचं? असं त्यांचं मन त्याला विचारीत होतं. पण बाजीरावाच्या पळपुटेपणापेक्षा, त्याच्या शरणागतीपेक्षा एकापेक्षा एक जहागिरदार, सरदार शरण गेले होते. त्यांनी एकीनं राज्य टिकविण्याचा प्रयत्न केला असता तर...! पण ते तनखे घेऊन गप्प बसले होते. कोणी नामधारी अधिकारी राहिले होते. एकमेकांशी भांडत आणि मानापमानाची नसती चौकशी करीत. आपल्या तलवारी म्यान करून त्या



शिवछत्रपतींच्या सुंदर स्वप्नाला ते स्वतःच्याच लाचारीच्या आणि दुहीच्या पायाखाली, खदखदुन हसत, चिरडत होते आणि पुन्हा हताश होत होते. याचेच शल्य त्यांच्या मनात अधिक बोचत होते. सगळ्याचं रक्त गोठलं का? सगळ्यांच्या अंगान भानुबायांचा संचार तर झाला नाही ना? सर्वांनी आपले इमान लाचारीला वाहिलं तर नाही ना? असे एक ना अनेक प्रश्न त्यांच्या मनात घोळत होते, त्याचं मन उद्ध्वस्त होत होतं, पण पुन्हा विवेक स्वैर मनाचा लगाम खेचून त्यांना बजावित होता– तू इमान सोडणार का? ज्या गोऱ्यांनी आपल्याच माणसाच्या मदतीनं आपल्याला लाचारपणे त्याच्या समोर उभे राहावयास लावलं ते योग्य होतं का? त्याला जाब विचारणारा एक थोर पुरुष देखील या मराठी मातीत राहिला नाही का? सर्वांचे शौर्य देवाच्या पिंजऱ्यात अडकलंय का? त्या दुर्दैवाला ठोकर मारून कोणीच का जगण्याचा प्रयत्न करणार नाही – स्वराज्यात, स्वातंत्र्यात? असे कितीतरी प्रश्न अन् त्याचं मन ओरडून उठे, ''नाही मी सोडणार नाही! त्या गोऱ्या सायबाला पुन्हा साता समुद्रा पलिकडे पिटाळून लावल्याशिवाय गप्प बसणार नाही!'' पण पुन्हा सोमाचे शब्द त्यांना वाकुल्या दाखवित आणि म्हणत– ''अखेर तूही हात बांधून शरण गेलेला किल्लेदार! एक तुच्छ जहागिरदार! नावाचा! अरे टिटवीने समुद्रप्राशनाची प्रतिज्ञा करावी? उंदराने सिंहाला नारद करण्याची धमकी द्यावी? किंवा कावळ्याने सूर्याला गवसणी घालण्याची मनिषा बाळगण्याचा प्रयत्न करावा? अरे, वेड्या त्याचा निश्चय व्यर्थ आहे गोविंदराव...! कोण गोविंदराव? एक नाईक? एक किल्लेदार? एक जहागिरदार? की कोऱ्या साहेबापुढे हात बांधून फटके खाणारा एक गुलाम. त्याने त्या जगजेत्या गोऱ्या साहेबाला पुन्हा पिटाळून लावण्याचे मनसुबे रचावेत? अन् ते आपल्या गेलेल्या जहागिरीच्या जोरावर? तुकडीशिवाय असलेल्या नाईक पदावर? का? कोणी? आणि कशी त्याची साथ करावी? कशी त्याला मदत करावी? आपल्या बायका-पोरांची कत्तल करून घेण्यासाठी? स्वतःला आजन्म तुरुंगात डांबून घेण्यासाठी? की घरादाराची राखरांगोळी करून टाकण्यासाठी? पुन्हा पुन्हा छळणाऱ्या या प्रश्नांनी गोविंदराव अस्वस्थ होत होते. मनोमन होरपळले जात होते. स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करूनही त्यांचं मन गोंधळलं होतं. पण त्यांचं घोडं मात्र अचूक मार्गानं सुसाट पळत होतं. न थांबता न अडखळता. आपण कोठपर्यंत आलो याचं भानही गोविंदरावांना नव्हतं. या विचारांनी त्यांना वेडं केलं होतं. पण घोडा मात्र नेहमीच्या तेजानं जात होता. आपल्या मालकाला कोणताही त्रास होऊ नये, आपल्यामुळे त्यांच्या योजनेत विक्षेप येऊ नये याचीच जणू काळजी घेत होता. गावाजवळ येताच गोविंदरावांनी आपल्या घोड्याकडं पाहिलं होतं आणि सहज त्यांच्या मनात हे विचार आले होते– ''घोडंसुद्धा किती इमानी असतं माणसापेक्षा. ते आपला धनी जिंकतो की हरतो हे पाहत नाही. आपलं काम बजावून जास्तीतजास्त प्रयत्न करणं एव्हढंच त्याला माहीत. किती श्रेष्ठ जनावर. आपण मात्र किती कोत्या मनाचे भित्रे, गडबडतो. स्वाभिमानावर दुबळेपणाने प्रहार करतो!'' असे विचार येतांना गोविंदराव स्वतःशीच हसले.

* * *

घोडा दौडत दौडत वाड्याच्या दाराशी आला आणि पुढचे दोन्ही पाय उंचावून खिंकाळला अन् मग शांतपणे उभा राहिला. गोविंदरावांनी खाली उडी ठोकली. दोन क्षणातच अडसर काढला गेला आणि रखम्यानं दार उघडलं. बाहेर कोंबडा आरवला होता. घोड्याच्या खिंकाळण्यानं राधाबाई जाग्या झाल्या होत्या. त्या लगबगीनं बाहेर आल्या. दिव्यातली वात सारली आणि त्या गोविंदरावांना सामोऱ्या गेल्या. तोपर्यंत गोविंदराव ओसरीत आले होते. अंगावरची हत्यारे त्यांनी काढायला सुरुवात केली तोच राधाबाईंनी तत्परतेने ती हातात घेतली. जागेवर नीट ठेऊन त्या परतल्या. गोविंदरावांची घोंगडी अन् पागोटं घेऊन त्यांनी नीट जागच्या जागी ठेवून दिलं. त्या लगबगीनं घरात गेल्या आणि त्यांनी चरवी भरून पाणी आणलं. गोविंदरावांनी हातपाय धुतले. चूळ भरली. तोपर्यंत रखम्याने घोड्यापुढं चारा टाकून तो त्याच्या बिछान्याकडे वळला होता. राधाबाईंनी गोविंदरावांच्या हातातली चरवी घेतली तेव्हा त्यांचा गोविंदरावांना स्पर्श झाला आणि त्या चमकल्या. गोविंदरावांच्या अंगात ज्वर भरला होता. राधाबाईंनी चरवी घरात ठेवली आणि चुलीला लाकूड सारून त्यांनी काढा उकळायला ठेवला आणि आत गोविंदरावांच्या पलंगाशी गेल्या. पलंगावर तक्क्याला टेकून गोविंदराव कसलासा विचार करीत होते. राधाबाईंनी त्यांच्या डोक्यावरून हात फिरवला. केसातून राधाबाईंची बोटे फिरताना गोविंदरावांना बरं वाटलं. त्यांनी एक सुस्कारा सोडला. राधाबाई गोविंदरावांच्या पायाशी बसून त्यांचे पाय चुरत होत्या. गोविंदराव काही बोलत नव्हते. राधाबाईंनी न राहवून विचारले, ''पकी रात झाली? आन आंग फणफणलाय नव्हं. असा करून उपेग न्हाई.'' गोविंदराव काहीच बोलले नाहीत. त्यांना पुन्हा सुस्कारा सोडला. राधाबाई उठून चुलीकडे गेल्या. उकळलेला काढा काशाच्या थाळीत ओतून त्या गोविंदरावांकडे आल्या आणि म्हणाल्या, ''घ्या पीऊन, बरां लागन''. गोविंदराव गहिवरले. त्यांचे डोळे पाणावले. राधाबाईंच्या हातातील थाळीला धरून त्यांनी काढा घशाखाली लोटला आणि राधाबाईंकडे पाहून ते म्हणाले, ''काय जरवर व्हती व्हय? पर. तुमाली गप ऱ्हावायचं नही.'' राधाबाईंनी मग पुन्हा डोक्यावरून हात फिरवला. ''निजा, लय थकलं बगा.'' त्या म्हणाल्या. गोविंदराव हात तसाच डोक्यावर धरून हळूवारपणे दाबत ते म्हणाले, ''तुमी आमच्या संगट असल्यावं आमी कशाला माघार घेतोय. त्या गोऱ्याम्होरं रं!'' राधाबाईंचा चेहरा अभिमान अन् लाजेनं प्रसन्न झाला.

* * *

कृष्णवंती नदीचं झुळझुळ पाणी. वळणावळणाचं. दाट दाट आंब्याच्या कमानीखालून दुडदुडत धावणारं. पाण कणसांच्या पुंजक्यातून, वेळूच्या बेटातून लव्हाळांना, गंधाना, कवदरीच्या कंदांना दोन्ही काठांवर फुलू देत, तरवरू देत धावत जाणारं. लपंडावचा खेळ खेळत भात खाचरात उतरणारं. गवताळ उतरणांमधून वाट काढणारं. मोराची मेमाटं कान देऊन ऐकणारं. लावऱ्याकावऱ्यांना मधूनच माळढोकांना, वावस्या पावश्यांना, पोखे, होले 'कोयाळ्यांना करकोचे' बगळे, सुगरणी, साळुंकी, खंड्या चकवा, पकवा, कावळे, चिमण्या अशा किती तरी पक्ष्यांना आपल्या वनराजीत सुखानं नांदविणारं, गायी, म्हशी, बैल, शेळ्या, कुत्री आणि घोडी यांना मनसोक्त डुंबू देणारं, त्यांच्या मनमुराद चरण्याची सोय करणारं. वानरांचा फांद्याफांद्यावरचा खेळ पाहणारं, रानउंदीर, पांढरे ससे, करडे ससे यांची शिवाशिव पाहणारं, कृष्णवंतीचं पाणी. कधी कधी गावच्या पोरांचा खेळ पाहण्यात दंग व्हायचं तर कधी मोरांमागं झेपावत पळत जाणाऱ्या पोरांशी स्पर्धा करायचं. कधी चांदण्यारात्री इवल्या इवल्या पांढऱ्याशुभ्र सस्यांना वाघुरांकडं जीवाच्या आकांतानं पळत जाताना तडफडताना देखील पाह्यचं.

पौर्णिमा परवाच होऊन गेली होती तरी चांदणं बरं पडलं होतं. माणसांची निजानिज केव्हाच झाली होती. आज संध्याकाळी मारुतीच्या देवळाजवळ किस्ना, ठका, अमृता, इठल्या, शंकऱ्या अशा पाचसात पोरांचं 'सस्याली' जायचं ठरलं होतं. कृष्णवंतीच्या वारंघुसीकडच्या न्याहाराला ससे फार गावायचे. गोविंदरावांचा किस्ना तेरा-चवदा वर्षाचा पण सस्याला वाघुर मांडण्यात मोठा पटाईत. वाघूर कुऱ्हाडी, कोयते, दोऱ्या चकमक सर्व तयारीनिशी पोरं निघाली होती. किस्नानं थेट उताराच्या खालती, रामेठा, करवंदी, टणटणी, सुफली, बरवडा, आंभळ, दवणा अशा झुडपांच्या मधून वाट काढीत काढीत नीट मोक्याच्या जागी वाघूर मांडलं होतं. दबा धरून बसायच्या जागा नेमून दिल्या होत्या. शंकऱ्या वाघुराजवळच्याच झुडपात दडून बसला होता. त्याला वाघरात सापडलेले ससे गपकन पकडता येत असत. किस्ना मात्र शेवटी दूर एका करवंदी आड लपला होता. सस्याच्या लेन्ड्या पाहून त्याच्या घावऱ्या वाटांचा सुगावा पोरांनी अचूक हेरला होता.

ससा पकडायचा म्हणजे काही सोपी गोष्ट नाही. प्राणी गरीब, निरुपद्रवी, गोजिरवाणा पण तेवढाच चपळ - श्वासाची चाहूल सहज घेणारा. त्याच्या भित्रेपणामुळे त्याला चाहूल सहज लागत असावी, पण त्या सस्यांची कितीतरी वेळ वाट पाहत बसायचं सावध, स्तब्ध, डोळे फाडफाडून. मग कधीतरी सस्यांच्या पाचसात, दहाबाराचं लेंडार पाण्याकडे निघायचं तुरुतुरु पुढच्या दोन मागच्या दोन पावलांवर सहज जलद झेपावत आणि वाघराच्या जाळीजवळ आले की गडबडून उलट दिशेनं गोंधळून, धडधडत पळ काढणारं. कधी कधी पोरं कंटाळून सस्याचं रान उठवित असत. ''शू ऽऽ क, शू ऽऽ क'' चे आवाज सस्याच्या लपणाजवळून काढत जायचं. मग घाबरलेले ससे, बावरलेले ससे धूम पळू लागत. लेंडार एका बाजूला तर चुकली मुकली दुसऱ्या बाजूला. अशी चुकली मुकलीच वाघरात येत असत. मग सस्यांना गपकन धरले जाई.

सगळ्यांनी श्वास रोखले होते. रातकिड्यांच्या किरकिरीशिवाय कोणतेच आवाज येत नव्हते. तासभर वेळ निघून गेला तरी देखील ससा येईना तसा किस्ना हळूच उठून

अमृतापर्यंत आला. ''आम्रिता आपल्याली ससं काढाया लागतील रं,'' किस्ना म्हणाला. अमृता तसा मोठा पण त्याला यातलं तितकं गम्य नव्हतं. तो म्हणाला, ''का? यील इकत्यात.'' ''आरं कवाचं थांबलूय, रात निगून जायाची-'' किस्नाने सांगितले. 'मग ससं काढाया जायचा?'' ''हां'' किस्ना म्हणाला. मग ठका, इठल्या सर्वांना बोलावलं. शंकऱ्याला आपली जागा सोडू नको म्हणून बजावलं. हातातली कुऱ्हाड अन् कमरेची कोयती सावरीत तीन पोरं रानात दूर गेली.

''शू ऽऽ क! शू ऽऽ क'' चित्कार सुरू झाले. पळापळ, आवाज, पळापळ यामुळे उंदीर, खोकड, ससे, मुंगसं सगळेच घाबरले. त्यांचीही पळापळ सुरू झाली. काही पाखरंही फांद्या-फांद्यावरून ओरडू लागली. मध्यरात्री रान जागे झाले. आपापल्या जागेपर्यंत पळत येऊन पुन्हा आपल्या जागा धरून पोरं दबा धरून बसली. पुन्हा वाट पाहणं सुरू झालं. पाच-दहा-पंधरा मिनिटे गेली आणि दोन करडे ससे सुसाट पळत जीवाच्या भीतीनं वाघुरापर्यंत आले. एकानी वाघराला ठोस दिली अन् पुढं जाता येत नाही हे लक्षात येताच तो अगदी क्षणच पाय जवळ आवळून पवित्र्यात थांबला. तेवढ्यात धपक् धपक्. गडबडला. काय करावं म्हणून तो शंकऱ्यानं त्याचे कान बरोबर पकडले होते. दुसरा हात त्याच्या मानगुटीवर आवळला गेला होता. अचानक आपल्या मित्रावर झालेला हल्ला पाहून दुसरा त्याच्या पाठोपाठ टप्प्यात पळत असलेला केव्हाच दिशा बदलून पळू लागला. हातात सापडलेला ससा गुदमरून गेला होता. शंकऱ्यानं तो तसाच पोतडीत टाकला आणि पोतडीचं तोंड बांधलं आणि पुन्हा आपल्या जागेवर दबा धरून बसला. आता पंधरा मिनिटे बसायला पाहिजे होते. त्यामुळे तो जरा निवांत होता. डोळे मात्र फाडफाडून धावऱ्याकडे पाहत होते. एक ससा गावल्याची बातमी किस्नापर्यंत आली होती. सातआठ ससे घेऊनच आज पोरं जाणार होती. किस्ना आनंदला होता. पोरांनाही हुरुप आला होता. पुन्हा सर्वांचे श्वास रोधले गेले. डोळे ताणले गेले. पण त्यांना फार वेळ वाट पाहावी लागली नाही. आणखी पाचसात मिनिटातच आणखी एकदम चारपाच ससे सर्वांनी वाघराकडं पळताना पाहिले, तसा विठल्याही शंकऱ्याच्या दिशेने पळाला. शंकऱ्यानं चपळाई केली. आलेली शिकार सोडली नाही. विठल्यानंही गपकन एक ससा पकडला. पोतडीत आता चार ससे झाले होते. बातमी किस्नापर्यंत पोहोचली, तेवढ्यात अमृता त्याच्यापर्यंत आला आणि म्हणाला, ''किस्ना बास झालं कायरं ससं?'' त्या दोघांची हालचाल पाहून इठल्यानं त्यांना हात दाखवून सावध होण्याची खूण केली, तसं अमृताचं काहीच चाललं नाही. त्याने पुन्हा आपली जागा धरली. पुन्हा श्वास रोधले गेले. दहा, पंधरा, वीस मिनिटे गेली. अजून ससा येत नव्हता. अमृता अस्वस्थ झाला होता. ठका त्याला लांबूनच गप करीत होता. सर्वांचे डोळे धावऱ्याकडे रोखून लागले होते.

दुरून कोठून तरी उग्र दर्प आला किस्नाच्या नाकापर्यंत. नाकात घुसमटला तसा किस्ना सावध झाला. त्याने हळूच उठून चौफेर नजर टाकली. अजून काहीच दिसत नव्हते. ताठ उभे राहून तो खालच्या खंगळीत टकू लागला आणि दचकलाच. चांदण्याच्या मंद



प्रकाशात दोन हिरवट डोळे चमकत होते. हळूहळू ते वाघुराच्याच बाजूला येत होते. शंकऱ्या दबा धरून बसला होता. त्याला कदाचित समोरून काय येते याची कल्पनाही नसेल असा विचार मनात येऊन किस्ना हादरलाच. त्याच्या ढाणग्या शरीराला क्षणभर कोवळ्या वयानं कंपायमान केलं. पण सावरला. आपण ओरडलो तर कदाचित ते जनावर नक्कीच आपल्यावर चाल करील अन्यथा कदाचित ते दुसऱ्या वाटेनं निघूनही जाईल असा विचार त्याच्या मनात आला. त्याला लहानपणी आई सांगत असे, किडुक असो की वाघरू असो आपण होऊन माणसाच्या वाटेला ते कधी जात नाही. ते त्याच्या वाटेनं जात असतं. माणूसच त्याच्या वाटा अडवितो आणि मग त्याला माणसाचा समाचार घ्यावाच लागतो. मग हळूच तो पुन्हा खाली बसून हळूहळू अमृताकडे सरकला. अमृताला त्याने सावध केले. त्याच्या हातातील कोयता आपल्याकडे घेतला आणि कमरेला लटकवला. अमृता फारच घाबरला होता. तो जागीच लटपट कापू लागला. जणू आपल्या अंगावरच आता जनावर चाल करून आले आहे असे त्याला वाटले. किस्नानं पुन्हा उभे राहून पाहिले. डोळे आता अगदी सरळ शंकऱ्या जेथे दबा धरून बसला होता त्याच बाजूला हुंगत हुंगत चालले होते. आता आपण थांबून चालणार नाही हे किस्नानं ओळखलं. तो विठल्याकडं उठून पळाला. विठल्या तसा कडक होता आणि अंगापिंडानं अन् वयानंही जरा जाणता होता. त्यानं एकदा आपल्या वडिलांना जनावराशी झुंजताना पाहिलं होतं. त्याने आपले हात सावरले. त्याच्या हातात कमरेला लटकलेली कुऱ्हाड होती. किस्ना मग ठकाकडे सरकला. ठकाला आता चाहूल लागली होती. ठकाला सांगावे की नाही हाच विचार त्याच्या मनात येत होता. ठका अन् अमृता यात फारसा फरक नव्हता. त्यानं ठकाजवळ जाता पुन्हा एकदा डोळ्यांच्या दिशेने नजर टाकली अन् तो आता मात्र थांबला नाही. त्याने शंकरला हाक मारली, ''शंकऱ्या, अरं तुह्याकं वाघरू येताय पळ!'' त्याचा आवाज साऱ्या शांततेचा भंग करणारा ठरला आणि त्याच्या आवाजाला प्रतिसाद म्हणून की काय समोरून येणाऱ्या त्या वाघाने जोरदार डरकाळी फोडली. त्या डरकाळी पाठोपाठ अनेक प्राण्यांचे आर्त आवाज त्या रानात घुमले. तो चांगला मोठा, लांब रुंद बिब्या वाघ होता. त्याने क्षणभर पवित्र्यात बैठक मारली आणि मग ते जनावर जे उडाले ते एकदम शंकऱ्याच्या दिशेने झेपले. आता काय होणार याचा अंदाज येऊन किस्न्याने व इठल्याने डोळेच मिटले आणि क्षणाचाही विलंब न करता ते दोघे आपल्या हातातील शस्त्रे सरसावून धावले. किस्न्याच्या हातात कोयता होता तर इठल्याच्या हातात कुऱ्हाड होती. दुसऱ्याच क्षणी त्यांना जे चित्र दिसलं ते मोठेच विचित्र होते. शंकऱ्याने आपल्या हातातला कोयता आपल्यावर झेपावणाऱ्या, आपला घास करू पाहणाऱ्या वाघावर सर्व बळ एकवटून भिरकावला. कोयत्याने अचूक वेध घेतला, पण उलट्या बाजूने! तरी वर्मी टोला लागल्याने आक्रमण करणारा वाघ थोडा गडबडला. त्याला एकवार तिरीमिरी आली आणि त्याने खाली लोळणच घेतली. पण तितक्याच जोराने तो उठला. आता शंकऱ्याला अवसर मिळाला नाही. वाघ त्याच्या अंगावर उडाला. आता आपण मरणारच आहोत तर वाघाची

मान धरून पिरगाळू, या विचाराने त्याने आपल्या हाताची पकड साधली. वाघ शंकराच्या अंगावर पडण्यापूर्वी त्याच्या काळजाचा वेध घेणारा कोयता आपले धारदार टोक आत खुपसून रूतून बसला होता. तशा अवस्थेत मानेच्या खालच्या भागापासून आतून उभे चिरीत जाणाऱ्या कोयत्याला घेऊन ते धूड शंकऱ्याच्या अचूक पकडीत सापडले. शंकऱ्याने ते जाम सोडले नाही. त्याने सारी ताकद पणाला लावली होती. ताकद काय, त्याचा जीवच पणाला लावला होता. हातात मान सापडल्याने अन् चिरत जाणारा कोयता अडकल्याने वाघाचे काहीच चालेना तरी त्याने आपले दोन्ही पुढचे पंजे शंकऱ्याच्या दोन्ही खांद्यात खुपसले होते. दोन्ही वाघांनी आता जमिनीवर लोळण घेतली होती. चंद्राच्या साक्षीनं दोन जीव एकमेकांवर तुटून पडले. ते दृश्य ठकाने आणि अमृताने पाहिले आणि त्या दोघांनी गावाकडे धूम ठोकली. ते पुन्हा मागे वळून पाह्यलाही तयार नव्हते. त्या दोघांची लोळण पाहून मात्र विठल्या पुढे झाला होता. जोरात धुमसणाऱ्या वाघाच्या नेमक्या डोक्यावर त्याने मोठ्या शौर्याने कुऱ्हाडीचा वार केला होता. तसा वाघ शंकऱ्याला सोडून पळू लागला. आता त्याची छाती, मस्तकही रक्तबंबाळ झाले होते. तो जिवाच्या आकांताने पळत निघाला होता. तेवढ्यात किस्नाने दुसरा कोयता भिरकावला होता. आता त्या कोयत्याचे पाते रुतून बसल्यावर मात्र वाघ धडपडत खालच्या मोठ्या खंगळीत उताणा आदळला. त्याची धडपड जोरात चालली होती पण, उरात रूतलेला कोयता अधिक फाडत जात होता आणि मस्तकांतली जखम केव्हाच त्याचे भान हरवून गेली होती. त्या एव्हढ्या मोठ्या वाघाने आपले पाय झाडत चार आचके दिले आणि पाय लांबवून ते धूड निपचित पडले. अजून त्याचे श्वास चालू होते. इकडे दुसरा वाघही निपचित पडला होता. दोन्ही खांदे रक्तबंबाळले होते. आपण जिवंत आहोत यावर त्याचा विश्वास बसला नसता, पण किस्नाने धावत जाऊन कृष्णवंतीतील पाणी आणून त्याच्या तोंडावर शिंपडले आणि त्याने हळूहळू डोळे उघडले. त्याला आपल्या हातांचा आधार देत विठल्या आणि किस्ना यांनी उठवून बसविले. त्याचे खांदे चांगलेच रक्ताळलेले होते. विठल्याने आपल्या कमरेच्या उपरण्याने शंकऱ्याचे खांदे पुसले. त्याने चंद्राच्या प्रकाशात धूम ठोकली आणि कसलासा पाला घेऊन तो पुन्हा आला. त्याने तो पाला हातावरच रगडला आणि शंकऱ्याच्या रक्ताळलेल्या खांद्यावर थापला. आता शंकऱ्या पूर्ण सावध झाला होता. क्षणापूर्वी कोणते दिव्य आपल्याला करावे लागले होते हे आठवून तो एकदा शहारला. मग तिघेही आपण मारलेले ते धूड पहावयास त्या खंगळीजवळ आले. तेव्हा दोन रान उंदीर त्या धूडाजवळ घुटमळत होते. किस्नाला ते पाहून हसू आले. ते धूड पाहून तिघांनी बसकणच मारली आणि काय झाले याची तावातावाने चर्चा सुरू झाली.

✻ ✻ ✻

अमृता आणि ठका पळत गावाकडे गेले. त्यांनी धापा टाकतच किस्नाचे दार



गाठले. किस्नाचा वाडा जागाच होता. रखम्याने दार उघडले आणि किस्ना नाही असे पाहताच ''किस्ना कुठं?'' म्हणून पृच्छा केली. नुकतेच गोविंदरावही वाड्यात आले होते. ते बरेच उद्विग्न होते. अजून त्यांना झोप लागली नव्हती. रखम्याचा आवाज अन् पाठोपाठ अमृता आणि ठक्याचा आवाज ऐकताच ते बाहेर आले. त्यांची ती भयभीत अवस्था पाहून त्यांनी दरडावून विचारले, ''अरं काय झाले त्ये सांगशी लवकर'' मग जे त्यांना कळले ते त्यांच्या काळजाला चिरून टाकणारे होते. ते तसेच माघारी फिरले. आपली बंदूक त्यांनी खांद्याला लटकविली. घोडं सोडलं, वाड्याच्या बाहेर येताच मांड ठोकली अन् घोड्याला जोरात टाच दिली. तोपर्यंत रखमा गावात शिरला होता. त्यानं चारसहा गडी माणसांना गागलं होतं. तशी लोक भाले घेऊन धावले होते. शंकऱ्याच्या आणि विठल्याच्या घरी ही बातमी पोचली होती. त्यांच्या घरी तर हाहाःकार उडाला होता. आता गावही जागा झाला होता. पाचपंचवीस लोकं हाताला लागेल ते हत्यार घेऊन बाहेर पडले आणि सारेच पळत कृष्णवंतीच्या उताराकडे निघाले. इकडे राधाबाई जाग्या झाल्या होत्या. त्यांना जेव्हा हे समजलं तेव्हा त्यांनी बसकणच मारली. त्यांचं काळीज तुटून पडल्याचा भास त्यांना झाला. आपलं एकुलतं एक पोरगं कोण्या वाघानं संपवल्याच्या विचारात तिचे श्वास कोंडले होते. ती घरात मांडलेल्या देवाजवळ जाऊन कपाळ आपटू लागली होती.

तेवढ्या वेळात गोविंदराव आपलं घोडं दवडीत थेट उतारापर्यंत पोचलेसुद्धा होते. घोड्याच्या टापांचे आवाज ऐकू येताच काय घडलं असेल हे किस्ना, विठल्या अन् शंकऱ्याच्या ध्यानी आलं होतं. ते घोड्याला सामोरे गेले होते. पोरांना सुरक्षित पाहून गोविंदरावांचे बेचैन मन जागेवर आलं पण तितकेच ते उसळले. शंकऱ्याच्या रक्ताळलेल्या खांद्याकडे बघून, ''कुठं हाय त्यो वाघरू?'' ते गरजले. त्यांनी आपला डावा हात बंदुकीला लावला. जेव्हा पोरांनी खंगळीतले ते धूड त्यांना दाखविले तेव्हा त्यांना क्षणभर हे कसं झालं ते समजेना. तेवढ्यात गावाकडून पळत येणारे लोक तेथपर्यंत येऊन पोचले. त्यांनी तो वाघ पाह्यला आणि डोळेच फिरविले. शंकरने सगळी हकीगत जेव्हा गावकऱ्यांना, गोविंदरावांना ऐकविली, तेव्हा क्षणाक्षणाला त्यांची छाती रुंदावत होती. आपल्या पोराच्या त्या काळ्या भक्कम रुपड्याकडे ते अनिमिष नजरेने पाहत होते. चंद्राच्या मंद प्रकाशात ती पोरं अधिक तेजस्वी दिसत होती. गोविंदराव गहिवरले. सगळे गावकरी कळल्या बातमीनं बेहोश झाले. त्यांच्या बरोबर पुन्हा पळत येणाऱ्या ठका अन् अमृतानी मात्र माना खाली घातलेल्या होत्या.

गोविंदरावांनी पोरांना आपल्या छातीशी कवटाळले. त्यांच्या डोळ्यातून गरमागरम अश्रु ओघळले. त्यांनी किस्नाच्या पाठीवर प्रेमभराने थोपटले आणि ती सर्वच मंडळी मग गावाकडे वळली. गावात शिरतांना मध्यरात्र टळली होती तरी गोविंदरावांनी वाजंत्रीवाले बोलावले. गावच्या शिवेपासून पोरांची मिरवणूक निघाली होती. तेवढ्यात गावातल्या सात-आठ लोकांनी चपळाईने लेझीम आणून खेळायला सुरुवात केली होती. चार लोकांनी शंकऱ्या, इठल्या अन् किस्न्या यांना खांद्यावर उचलून घेतले होते. एवढ्या वेळात रखम्याने

आपले काम अचूक बजावले होते. त्यामुळे राधाबाई मारुतीच्या मंदिराजवळ येऊन थांबल्या होत्या. मारुतीच्या मंदिराजवळ येताच चार टेंभे पेटले. त्या टेंभ्यांच्या उजेडात पोरांची अलाबला काढली गेली. मात्र लेझीम रंगली. सारा गाव जागा झाला होता. चार महिन्यानंतरची ही पहिली मिरवणूक होती. अवेळी रात्री अशा अनेक रात्री गेले पाच महिने केवळ निःश्वास टाकण्यात गेल्या होत्या.

पूर्वेकडे फटफटले होते. ठरल्याप्रमाणे दहा तगडे बापय दांडा दोर घेऊन कृष्णवंतीच्या उताराकडे गेले आणि काही वेळातच तरण्या पोरांना स्वर्गाची वाट दाखवणारा तो बिबट्या वाघ स्वर्गाकडे तोंड करून लांब शेपटी खाली लोंबकळवीत दांड्याला टांगून घेऊन आले होते. मारुतीच्या देवळापुढे येताच सारा गाव, पुरुष, स्त्रिया, पोरेसोरे त्या वाघास बघावयास जमले. तसे वाघ त्यांनी नेहमीच पाहिले होते, रानात पिसाट हिंडणारे. पण हा वाघ गावच्या कोवळ्या पोरांनी मारला होता.

एकवार त्या प्रचंड वाघाकडे समोरच्या रानाकडे पाहात गोविंदरावांनी आपल्या पोराला पोटाशी धरलं. त्यांचा ऊर अभिमानानं भरून आला. त्यांनी पोराला कुरवाळलं, थोपटलं, त्याच्या मस्तकाचा मुका घेऊन ते पुटपुटले, ''शाब्बास रं माझ्या कोकरा! सस्याच्या शिकारीला ग्येलास आन् वाघ मारून आलास!'' पोराचे डोळे पाणावले. त्याने गोविंदरावांना मिठी मारली. सारं गाव कौतुक पाहत होतं. भरल्या नजरेनं. राधाबाईंच्या डोळ्यात पोरगं मावत नव्हतं. ''आपल्यालाही असंच दिव्य करायचं नाही का?'' असा सहज विचार गोविंदरावांच्या मनात आला आणि ते एकदम गंभीर झाले. थोड्या वेळानी मिरवणूक संपली. त्या धुडाची विल्हेवाट लावली गेली. त्याचा वाघदेव झाला. त्या दिवशी गोविंदरावांनी गावकऱ्यांना चांगल्या सागुतीचं जेवण दिलं.

जेवणावळी झडत असतानाच एक स्वार आपल्याबरोबर दहाजणांची तुकडी घेऊन दौडत आला. रपेटीनं तो थकून गेला होता. त्याचा उंचापुरा, दणकट देह म्लान झाला होता. तरीसुद्धा डोळ्यात चमक होती. उत्साह होता. डोक्याला भले पागोटे, गळ्यात लांब घोंगडी, कमरेला करकचलेलं उपरणं आवळलेलं धोतर, खांद्याला लटकलेली बंदुक अन् काडतुसांचा पट्टा – पट्ट्याच्या आत जंब्या. अशा वेशातले ते स्वार धाडदिशी एकदम उतरले.

त्यांना पाहताच गोविंदराव पुढं झाले. तो रामा किरवा होता. रामाचा हात धरून गोविंदरावांनी त्यास मिठी मारली. झाला प्रसंग ऐकताना आपण कोणते काम घेऊन आलो आहोत हे रामा किरवा विसरला. गोविंदरावांनी त्यांना आग्रहानं जेवायला बसवलं. चुळा भरून सारे जेवायला बसले. भुकावलेल्या पोटांनी सागुतीवर जोरदार ताव मारला. जेवताना गोविंदराव जातीने आग्रह करीत होते. किस्ना मधेमधें लुडबुडत होता. त्याची प्रशंसा ऐकून त्याला मांस चढत होतं. ''गोईंदराव पोरगं बापसवय होणार!'' रामा बोलला. किस्नाच्या मनात ते वाक्य कितीतरी वेळ घोळत ऱ्हायीले.

मग सुपारी घेतांना रामजीनं आपल्या रपेटीचा वृत्तांत गोविंदरावांना सांगितला



आणि गोविंदरावांचं मन आनंदानं भरून आलं. बरीच काही खलबतं झाली आणि मग सांगावा धाडायचं ठरवलं.

* * *

मारुतीच्या पुढचं पटांगण पकं फुलून गेलं होतं. जवळच्या घरात दारूचं पेव फुटलं होतं. लंगोट्या लावलेले, बंडी घातलेले, डोक्याला मुंडासा बांधलेले, मिशाळ, दाढीवाले झांबे, खांद्याला घोंगडी टाकून झिपऱ्या घरात जात होते अन् तर्र होऊन येत होते. एका बाजूला देवळात आवा जमल्या होत्या. गावचं दोनपाचशे माणूस समदं जमलं होतं. बाळ्या ढोलीया आज मोठाच खुशीत होता. त्याला चांगला रात्रभर ढोकला वाजविता येणार होता. मग झिंगणारे एक एक माणूस अंगणात दाटी करू लागलं. आज कोणी कोणाला शिव्या देत नव्हतं. सगळे पिऊनही नम्र होते. कोणता तरी अनामिक उत्साह त्यांच्यात संचारला होता. खेळणारं गडी एकेकाला आग्रह करून रिंगणात ओढू लागलं. मग रिंगण सजलं. काळेकुट्ट देह रिंगणात कंबरा बांधून तयार झाले. ढोलका वाजविणारा बाळ्या ओरडला, ''कळसाई माताकी ऽऽ'' ''जोय!'' सर्वांनी प्रतिसाद दिला आणि सबंध देह व्यापणारा प्रचंड ढोलका आवाज देऊ लागला. ''बंग ऽऽ बंग ऽऽ पक् पक् बंग, डंग टूक बक् बक् बंगऽ बंगऽ पक् पक् बग डंक टक् बंग बंग'' आणि ठाकराचे पाय उंचावले. जमिनीवर आले आणि मग एकच गिरकी घेऊन नाचायला सुरुवात झाली. पाया पाठीमागे पाय रिंगणात ठेक्यात आदळू लागले आणि हात उंचावले जाताच जीवानं कानाला हात लावून आपल्या थोड्या चिरक्या आवाजात ढोलीयाच्या शेजारून ढणढणत्या डवण्याच्या टेंभ्याच्या प्रकाशात घसा ताणून ताण दिली.

**रंगाण ऽ रंगाण ऽऽऽ हे**
**मातीचं रंगाण ऽऽऽ हे**
**ये ई रं रंगणात ऽऽ हे**
**आजूच पायी दिला ऽऽ हे**
**आजूच नाच केला ऽऽ हे**
**धुळवडा उठईला ऽऽ हे**
**गंगणाला गेला ऽऽ हे**
**चंद्रसूर्या झाकोळला ऽऽ हे**

ठेका, सूर अन् पायाची चपळाई एकजीव झाली आणि मग बसत उठत पवित्रा घेत, दुसऱ्याच्या पाठीला विजेच्या चपळाईने स्पर्श करून गिरकी घेत झर्रकन सर्वांनी खालच्या तांबडमातीला स्पर्श केला. धूळ आपल्या मस्तकी लावली, तोच ढोलीयाच्या दुसऱ्या बाजूनं कानावरच्या हातातून आवाज आला आणि कांबडवण्यातले खेळगडी नम्र झाले. मातीच्या प्रेमानं भारून गेले. लका ताण देत होता –

**धरते तू माते ऽऽ**
**रुसवा ना धरी जो ऽऽ**
**रुसवा ना धरी जो ऽऽ**
**तुझ्या पाया मी पडितो ऽऽ**
**तुझी किरपा मी पाह्यतो ऽऽ**
**तुला कपाळी लायीतो ऽऽ**
**धरते तू मात ऽऽ**
**रुसवा ना धरी जो ऽऽ**
**तुला नाक मी घासितो ऽ**
**तुझ्या पाया मी पडितो ऽऽ हे**

शेवटच्या चरणाला एकदम ढोलक्याचा ठेका वाढला तसा नाचकऱ्यांचा वेग वाढला. गिरक्यावर गिरक्या, उड्यावर उड्या, जणू वीज वर्तुळाकार फेर धरून नाचत होती. धरणीला पाय टेकत नव्हते. जणू त्या धरती मातेला पाय कसे लावावे ह्या हेतूनेच ते अधांतरीच नाच करीत होते. तेवढ्यात लक्ष्या ठाकर रिंगणाच्या बाहेर ढोलियाजवळ आला. तो आला आहे. त्याचे साथीदार सभोवार उभे आहेत त्यातलेच आता कांबडवण्यात घुसणार आहेत हे कोणाला सांगून समजलं नसतं. पण उडदावण्याच्या परगण्या पाटलानंच लक्ष्याला कांबडवण्यात आणलं होतं. लक्ष्यानं कितीतरी दिवसात कांबडवण्यात खेळ केला नव्हता. त्याला रात्र रात्र नाचायला आवडत होते पण त्याच्या व्यवसायाने तो या आनंदाला वंचित झाला होता. लक्ष्या येताच त्यानं कानावर हात दिला. त्याचा पुष्ट हात उंचावला गेला आणि त्याच्या वाघासारख्या जबड्यातून गाना बाहेर पडला–

**भूवनी ऽऽ डोंगर ऽऽ हे**
**आहे तीनरं माजल्या**
**पहिल्या माजल्यात**
**अशी सोनकी पूजीली**
**अशा दुसऱ्या माजल्यात**
**अशीर्वंची उबळले**
**अशा तिसऱ्या माजल्यात**
**आईबाईचा ठाना क**
**आईबाई कळसाई**
**असा यावा रिंगणात ऽऽ**
**असा भूवनी डोंगर**
**आहे तीनरं माजल्या**

त्यांच्या ह्या तानेबरोबर फक्त एकदाच खेळकऱ्यांनी चमकून लक्ष्याकडं पाहिलं. खेळगडीच ते. लक्ष्या तान देतो पाहिल्यावर अधिक उसळले. नाचाला चांगलाच जोर चढू लागला



आणि लक्ष्यानं टेंभ्याकडं जोरजोरात हात फैलावून नाचकऱ्यांना आणखीच पेटविले–

**असा नाचु व निंगाला ऽऽऽ**
**असा टेंभा ना पेटीला ऽऽऽ**
**असा ढोल ना वाजीला ऽऽऽ**
**आईबाईच्या सनाला ऽऽ**
**आईबाईच्या पूंजाला ऽऽ**
**असा ठाकर नाचला ऽऽ हे**
**ठाकरना बाई आजच नाच केला ऽऽ हे**
**आजूच पायी दिला ऽऽ हे**

एकदम नाचकऱ्यांनी गिरकी दिली आणि काय झाले त्ये समजायच्या आतच प्रत्यक्ष परगण्या पाटील रिंगणात येऊन नाचायला लागला. परगण्याने आयुष्यात कधी नाच केला नव्हता. तो नेहमीच ओटीवर बसून धुंदपणानं कोंबडनाच पाहत असे. लक्ष्यानं त्या पाटलाला ठाकरांच्या कोंबडनाचात फेकलं होतं. थोडा वेळ काय करावं हे त्याला समजेना पण मग हसत तोही हातपाय उंचावून परगण्या रावणाचं सोंग काढू लागला. लक्ष्यानं पुन्हा तान मारली–

**असा लंकाचा रावन ऽऽ आहे**
**कसा दाही तोंडा दिसं ऽऽ आहे**
**त्येच्या मना मंदी राम ऽऽ आहे**
**कसा खुलुनिया दिस ऽऽ आहे**
**असा रामाचा रावन ऽऽ आहे**
**अस संगतीना चालं ऽऽ आहे**
**सात दिस युद्ध झालं ऽऽ आहे**
**कसं गंगणाला गेलं ऽऽ आहे**
**त्येही गंगणात बाई ऽऽ आहे**
**रामाचं बान दिसं ऽऽ आहे**
**त्याची बानाला का ऽऽ बाई**
**रावन छातीवरी झेलं ऽऽ बाई**
**आन छातीवरी बान ऽऽ बाई**
**कस पडत्याती फुलं ऽऽ बाई**
**राम मारी यकबान ऽऽ बाई**
**रावन जातुया गंगान ऽऽ बाई**
**असा लंकाचा रावन ऽऽ बाई**
**रींगनात आला ऽऽ बाई**
**आजूच्या दिसाला ऽऽ बाई**

**नाच त्येना केला ऽऽ बाई**

आज नवरात्रातील पाचवी माळ होती. दरवर्षी पाचव्या माळेला ठाकरांचा कांबडवणा होई. दारू, नाच, गाना आणि त्या सगळ्याला भुलविणारा ढोलकं यात सारे धुंद होऊन जात.

उडदावणं गाव तसं छोटसं. ठाकरांची वस्ती त्यात बरीच होती. पाच-पंचवीस उंबरा. परगण्या पाटलाचं गाव ते. अळंगा-कुळंगा जोड किल्यांच्या पायथ्यांशी निबिड अरण्यात कोकणच्या सरहद्दीवर दणकट कणखर. परगणा पाटील तसा फारच कडक. पण त्याचे अधिकार गोऱ्यांनी संपवलेच होते. लक्ष्यानं त्याला चांगलाच घेरलं होतं.

* * *

ती मोठी गंमतच झाली. वाळ्या आणि लक्ष्या. पंधराच दिवसाखालची अंधारी रात्र. परगण्या पाटील आपल्या घरात निवांत झोपला होता. अपरात्री दार ठोठावलं गेलं. परगण्याने आतून झोपेतच दर्डावून विचारलं, ''कोन रं?'' 'मी सुरंगी काळू आईची.'' अशा अपरात्री ती आपल्याकडे कशाला आली, हे परगण्याच्या लक्षात येईना. तो बावचाळला. सुरंगी तशी दिसायला फारच रेखीव अन् घोटीव अंगाची. रस्त्याना जाताना परगण्याची आणि तिची पाच सात वेळा गाठ पडली होती. काळुआईच्या झोपडीकडे पाणी घेऊन महामुर पावसात जाताना, फडकी खालच्या सौंदर्यावर परगण्याची नजर पडली होती. जिभल्या चाटणारी. हे सुरंगीन ओळखलं होतं. ती वस्ताद. पुन्हा भेटताना ती परगण्याकडे पाहून खुदकन हसली होती. तसा परगण्या आपला रूबाब विसरून कसा कोण जाणे चार बायकांचा धनी पण पार पघळून गेला. लाजत गोड हसला आणि आज अपरात्री सुरंगी दारावर आली होती. परगण्या पुरताच बावचळला. तो आपली कापडं सावरीत दाराशी आला. त्यानं दाराची कडी काढली अन् दार उघडलं. दारात सुरंगी उभीच होती, टंच. परगण्यानं खुलावून विचारलं, ''काय रं सुरंगे लय रातची मही सय झाली?'' तशी सुरंगा समजली. तिनं मनाशी ठरवलं. ती पाटलाला म्हणाली, ''अवं भाईरतं या.'' ''अरं तुह्या! काय आऊ हायेस!'' असं पुटपुटत परगण्या तिच्याबरोबर चालू लागला. पाच-सात घरं ओलांडून दाट झाडी आणखी दाट झाली होती. पाटलानं न राहवून विचारलं, ''अरं तुह्या बायली, अरं कुढं?'' ''पाटील ईठच.'' असं म्हणत सुरंगानं पाटलाचा हात धरला. पाटील पुरताच खलास झाला. सुरंगानं जवळजवळ ओढतच पाटलाला आंब्याच्या थोरल्या झाडामागे नेलं. तेवढ्यात एक घोडं त्यांची चाहूल लागून खिंकाळलं, तसा परगण्या बिथरला. त्यानं डोळे फाडून समोर पाहिलं आणि तो पार गार झाला. समोर दोन पुष्ट व्यक्ती उभ्या होत्या. दोन घोडी झाडाला बांधली होती. लक्ष्या आणि वाळ्या. पाटलानं लगेच ओळखलं. लक्ष्याचं आणि सुरंगाचं नातं त्याला आठवलं आणि त्याला कापरंच भरलं. आपल्या पापी मनाला त्याने मनातल्या मनात मोठ्यानं शिव्या हासडायला सुरुवात केली. लक्ष्याच्या लक्षात ह्या गोष्टी सहज आल्या होत्या. त्यानं करड्या आवाजात रामराम ठोकला. त्याचा



रामराम घेताना पाटलाची बोबडीच वळली होती. एवढा मोठा परगण्या पाटील पण पार हादरला होता. त्याला मागची एक चांदरात आठवली. त्याच्या घरावर लक्ष्यानं दरोडा घातला होता आणि त्याला बांधून ठेवला होता. त्याच्याच घरात साऱ्या गावानं त्याची फजिती सकाळी पाहिली होती. आता पुन्हा समोर तेच मरण उभे होते. त्यात त्याने सुरंगाकडे पाहण्याचा गुन्हा केला होता. लक्ष्या पुढे आला. त्याने पाटलाच्या खांद्यावर हात ठेवून म्हटलं, ''पाटील अरं घाबरू नको, आम्ही काय दरूडा घालाया नाही आलो.'' मग त्यानं त्याला ठाकून ठोकून स्वराज्याच्या तयारीची योजना सांगितली. तयार केला. आता उडदावण्याच्या अळंगा-कुळंगात मनमुराद राहता येईल, हा लक्ष्याचा डाव होता. परगण्या पाटील मनोमन त्याचा झाला होता. त्यांच्याही मनात गोऱ्या साहेबाविषयी चीड निर्माण झाली होती. पण तो हताश झाला होता. त्याला काही करायला मनाचा धीरच होत नव्हता. एवढा अळंगा कुळंगा अवघड, पण बंदुकांच्या फैरी करून आणि घरभेद्यांच्या मदतीने गोऱ्यांनी ताब्यात घेतला होता. घाबरला असला तरी आपल्या जीवाचं काही सार्थक होणार या विचारानं परगण्या मनात सुखावला होता.

आज म्हणूनच परगण्याने गावच्या कांबडवण्यात लक्ष्याला मुद्दाम बोलाविले होते आणि लक्ष्यानेही नाचाला रंग भरला होता.

टुमदार मंदिराच्या पुढ्यात दारूच्या धुंदीत टेंभ्याला साक्षी ठेवून आज लक्ष्या आपल्या गाण्याची हौस पुरवून घेत होता. लांबून सुरंगी देहभान हरवून तिच्या लक्ष्याकडं पाहात होती.

वाळ्या मात्र बाजूलाच बसला होता. भानावर. मध्यरात्र उलटून गेली होती तरी अजून गोविंदरावांकडे गेलेला स्वार परतला नव्हता. तो सचिंत मनाने त्या स्वाराचीच वाट पाहत होता. त्याने अन् लक्ष्याने निम्मा कोकण पालथा केला होता. नासिक, सिन्नर, घोटी, इगतपुरी, मग ठाणे, जव्हार मुरबाडच्या भागात ते फिरून आले होते. जुन्नर, नारायणगाव, संगमनेर अशी कितीतरी गावे त्यांनी पालथी घातली होती. गोऱ्यांच्या कारवाया कोठून कशा झाल्या, त्यांना साथ कोणत्या व्यापाऱ्यांनी आणि बेशरम फितुरांनी दिली याचा पत्त्यामुद्यासह हिशेब काढला होता. मनाशी ताठ निश्चय करून आणि रामा किरवाच्या मदतीने पुढच्या पाच-सहा महिन्यातील योजना आखली होती. दोनपाचशे स्वारांची टोळी राखायची म्हणजे सारा पैसा, काडतुसे, लपण या साऱ्यांचा विचार होता. सैन्य पोटावर चालतं हा गोविंदरावांचा हिशेब त्याला माहीत होता. पटला होता. पैसा मिळविण्यासाठी त्याने अन् रामा किरवाने ठरविलेल्या योजना चोख होत्या. त्याचबरोबर, लोकांची सहानुभूती त्यांना मिळवावयाची होती. गोऱ्यांच्या आणि त्यांच्या सहाय्यकांच्या कारवायांनी पोळलेले, पछाडलेले, तापलेले लोक हाताशी धरायचे होते. हे सारे गोविंदरावांचे सांगणे त्यांनी बरोबर लक्षात ठेवून हेरगिरी केली होती. पण ह्या साऱ्या कामात लक्ष्याने आणि त्याने साठविलेला सगळा माल संपला होता. त्यांच्या टोळीतील लोकांचे पडत्या पाण्यातल्या हिंडण्याने फारच हाल झाले होते. आता आबादी आबाद झाल्याशिवाय ते नीट साथ देणार नाहीत हे त्याच्या

लक्षात आले होते. म्हणूनच आता तातडीने लुटीला सुरुवात केली पाहिजे हे त्यांच्या मनी होते. रामा किरवाने गोविंदरावांच्या कानावर सगळे घातले असणार आणि तरीसुद्धा सांगावा अजून कसा येत नाही याचा विचार त्यांच्या मनात घोळत होता. तोच लांबून घोड्याच्या टापांचा आवाज आला. त्याने कान टवकारले. होय तोच! सांगावा आणायला गेलेला काळूच होता तो! काळू जवळ येताच त्याने घोड्यावरून उडी टाकली. वाळ्या उठूनच उभा राहिला होता. घोडा तसाच हातात धरून काळू म्हणाला, ''गोईंदराव सवता आपल्या संगट येनार हायेत, वाळ्या आन लक्ष्या सांगतील तस आमाली मंजुर हाये असं सांग जा, असा गोईंदरावांनं सांगला.'' हे ऐकताच वाळ्याला आनंद झाला. आता त्यांच्या पद्धतीने ते योजना करू शकणार होते.

कांबडवणा जोरात चालूच होता. एकापाठोपाठ एकेक सोंगं निघत होती. नाच रंगत होता. लक्ष्या आजच नाचातच हरवला होता. वाळ्याही झिपऱ्या घराकडे गेला. त्यानं दोन तांब्ये आपल्या पोटात रिचवले आणि तोही कांबडवण्याच्या रिंगणाजवळ येऊन उभा राहिला. आता लक्ष्या नाचत होता. जीवा गाण्याच्या ताना देत होता. परगण्या पाटील देखील रंगात आला होता. देहभान हरपून सगळे नाचत होते. उडदावण्याच्या पोरांत लक्ष्या ठाकूर दरोडेखोर राहिला नव्हता, तो पोर झाला होता. पोरांच्या हातात हात घालून तो नाचत होता. लक्ष्याने ढोलियाकडे चेतावणी देण्यासाठी म्हणून पाहिले. ढोलियाजवळ वाळ्या उभा होता. वाळ्याला पाहताच लक्ष्याला अगदीच चेव आला. त्याने रिंगण सोडले आणि पळत जाऊन वाळ्याचे मनगट धरून ओढतच आणले. वाळ्याचा आता इलाजच नव्हता. लक्ष्याचा तो अवतार पाहून त्याला राहवले नाही. तो रिंगणात घुसला आणि मग नाचाला आणखीच रंगत आली. पोरं नाचत होती. तरी त्यांना परगण्या पाटील, लक्ष्या, वाळ्या हे आज नाचात कसे याचं कोडं उलगडत नव्हतं. पण पोरांच्या मनात त्यांच्याविषयी सहजच आदर निर्माण झाला होता. वाळ्या अनेकवेळा ठाकर पोरांबरोबर कांबडवणा खेळला होता. त्याला उड्या सहज जमू लागल्या आणि ढोलियाने जोराने आरोळी ठोकली. ''आरं ऽऽ हा ऽऽ रं है शा !'' आणि नाचाने रंग पालटला. मग गुलहौशी जीवानं जरा रंगेल गाणं सुरू केलं –

**डांगरीच्या आळ्याव**
**पाय मी कसा द्याव**
**शके मह्या मेव्हनीचं**
**नावमी कसं घ्यावं**
**मही मेव्हनी रुपाची**
**कशी सोन्याची चांदीची**
**तिच्या नावानं भरली**
**मह्या मनाची ना दरी**
**डांगरीच्या आळ्याव**



**पाय मी कसा द्याव**

सुरंगा डोळे भरभरून तिच्या लक्ष्याकडे पाहत होती. लक्ष्याचं तिच्याकडे लक्ष जाताच तिला मनापासून हसू आले. सहज नेत्रपल्लवी केली. तेव्हढ्यात तिने एक मिश्कील कटाक्ष परगण्या पाटलाकडे टाकला. त्याचेही लक्ष तिच्याकडे गेले आणि परगण्या पाटील वरमला.

एका पाठोपाठ एकेक गाणी झाली. एकापेक्षा एकेक नाच निघाले. एकापेक्षा एकेक सोंगे निघाली – कळसाई, हनुमान, राम, परशुराम, हरिश्चंद्र, वाघ्या आणि कितीतरी. नाचाच्या रंगात केव्हा रात्र सरली कळलेही नाही, पूर्व दिशा उजळली. रक्तछटा पूर्वेला पसरली. डवण्याच्या टेंभ्याचा प्रकाश सूर्यदेवाने निस्तेज केला. तसा नाच संपला. दमली पोरे थांबली. पोरे आपापल्या झोपड्यातून परतली. परगण्या पाटलानी वाळ्याला अन् लक्ष्याला पाहुणचार केला. पुन्हा पिणं, खाणं झालं. यथेच्छ. लक्ष्या, वाळ्या आणि त्यांचे साथीदार रानात घुसले.

अळंगा कुळंगा किल्ले बोलके झाले. वर्दळ सुरू झाली. तयारी झाली. मोहीम ठरली आणि गडावरची स्वारांची संख्या वाढली.

* * *

विजयादशमीचा दिवस. कळसुबाई शिखरावर जाऊन दर्शन घेण्याचा. संततधार पावसात चार महिने वर जायची सोय नाही. आभाळाला भेदून आकाशाशी स्पर्धा करणारं कळसुबाईचं, सह्याद्रीचं सर्वात उंच शिखर. उभ्या चढणीचं, धाप लावणारं, उरस्फोड करायला लावणारं. अवघ्या रानावर उंच नाक करून लक्ष ठेवणारं. डोंगराच्या टोकावर छोटासा माळ. त्यावर जेमतेम दहा माणसं एकावेळी आत जाऊ शकतील असं छोटं देऊळ चिऱ्यात बांधलेलं. डोंगराचं हे शेवटचं टोक म्हणजे चढणाऱ्याची परीक्षा. अशी जीवघेणी परीक्षा घेऊनच कळसुबाई दर्शनाला येऊ देते. पण आज विजयादशमी. सगळे लोक कळसाईच्या दर्शनाला येणार. उंच डोंगराच्या पहिल्या टप्प्यावर कितीतरी दाट जंगल. सारा पावसाळा घटाघटा पिऊन तर्र झालेलं. भयाण लांबांनी भरलेलं. गवतातून त्यांचा संचार. त्या गर्द गवतातून, झाडीतून आज वाट निघणार. ती वाट तुडवून तुडवून मळली जाणार. मग आईचं दर्शन घेण्यासाठी उघडी वाघडी दोन टोकं चढून जायची. ढगांच्या पलिकडे. सगळा निळा खडक. माथ्यावरच्या माळावर गवत आपापल्यात व्यर्थ स्पर्धा करीत उगवलेलं, ते माळही आज तुडवले जाणार. मग शेवटचा कडा कापीव–उंच, चढायला एकच खोबण – कसंबसं हात पाय अडवीत चढायचं. कोणी घसरला तर, चिंधुक देखील हाताला लागणार नाही. पण आजपर्यंत तेथून कोणी घसरलं नाही.

कळसाईचं दैवत जागृत. डांगाणची आईच ती. नवसाला सत्वर पावणारी. लेकुरवाळ्या पोरांना घेऊन शिखर यंगतात, पोरंसोरं, म्हातारे–कोतारे, तरणेताठे सारेच

घाबरत घाबरत पण मोठ्या विश्वासाने शिखर चढून जातात. डांगाणचे सारे प्रश्न त्या आईवर सोपविले जातात. डांगाणी लोकांचं रानजीवन तिच्या कुशीत फुललेलं. सारं डांगाण तिच्या छायेत, फुललेलं. गेल्या अनंत वर्षाचा इतिहास पाहिलेलं. आपल्या लेकरांच्या हाती कायम सत्ता या ना त्या रूपाने ठेवणारं, ज्वलंत दैवत. तिचा आशीर्वाद असला की सारं सुरळीत होतं.

शेताभातांसाठी जमिनी राबतांना, गुडघा-गुडघा चिखलात उभे राहून आवण्या करताना, अखंड आशीर्वाद देणारी, आपल्या मायेची पाखर धरणारी आई. भलकऱ्यांना उत्साह देणारी. कोळी, ठाकर, कानडी अशा कितीतरी वन्य जमातींची आपली आई.

कळसाबाईचं दर्शन घेऊनच आपण पहिल्या मोहिमेवर निघायचं हे गोविंदरावांनी पक्कं केलेलं. आज पन्नास-साठ स्वार एका नव्या मोहिमेवर या आईच्या आशीर्वादाने निघणार. रामा किरवा, वाळ्या, लक्ष्या सारे येणार होते.

गोविंदराव आणि राधाबाई दोघांचीही खूपच गडबड उडाली होती. दुपार टळून गेली होती. देवीला जायची तयारी झाली. शिंगाडे, ढोलिया, लेझीमवाले असे सारे जमा झाले होते. गोविंदराव मिरवणुकीने घोड्यावर स्वार होऊन कळसाईच्या पायथ्यापर्यंत येणार होते. वेळ आली तशी गोविंदराव शानदार सजविलेल्या घोड्यावर आरूढ झाले. दुसऱ्या एका घोड्यावर किस्ना आरूढ झाला होता. शिंगाड्याने शिंग फुंकले. गोविंदरावांना ते रणशिंग वाटले आणि शेदोनशे माणसांची मिरवणूक निघाली. मिरवणूक पायथ्याशी यायला फारसा वेळ लागला नाही. पायथ्याशी येताच गोविंदरावांनी सभोवार नजर टाकली. ते कावरेबावरे झाले. त्यांच्या ठरल्याप्रमाणे ते मिरवणुकीने तेथे येण्यापूर्वी बाकी सर्व स्वारांनी तेथे पोहोचावयाचे होते, पण अजूनही कोणीच आले नव्हते. मग गोविंदराव आणि त्यांचे गांवकरी निघाले. सर्वांच्या मनात अपूर्व उत्साह होता. चार तरणीताठी पोरं उत्साहाने काठ्या घेऊन पुढे निघाली होती. गवत झोडपून ते वाट काढीत होते. पाठीमागून गावकऱ्यांचा लोंढा ती वाट तुडवित पुढे चालला होता. झपाझपा पावले उचलली जात होती. ''हर हर महादेव''च्या आरोळ्या ऐकू येत होत्या. गावातील बाया उगाच आपल्या अंगणातून टाचा वर करकरून पाहण्याचा प्रयत्न करीत होत्या. पहिला टप्पा चढून गेला असेल नसेल तोच चार दिशांनी सुसाट दौडत घोडेस्वार आले. त्यांनी स्वारीवर निघण्याचाच पोषाख केला होता. कोणाच्या पाठीला थैल्या बांधल्या होत्या. प्रत्येकाच्या कमरेला तलवारी लटकत होत्या. दहा-बारा लोकांच्या खांद्याला बंदुकाही दिसत होत्या. एका पाठोपाठ एक स्वार दौडत कळसुबाईच्या डोंगरपायथ्याशी येऊन आपला घोडा बांधून, उभा राहत होता. पाचपन्नास स्वार आले आणि मग गड चढायला सुरुवात झाली ''हर हर महादेव'' अशी आरोळी आली आणि पाठोपाठ 'कळसाई माता ऽऽ की'' ''जोय'' अशीही गर्जना झाली. त्या प्रदीर्घ जयवादाने सारे रान थरारले. वर गेलेल्या गोविंदरावांपर्यंत तो जयनाद पोचला. गावातल्या घराघरातून तो जयनाद दुमदुमला. गोविंदराव गडावर आणि राधाबाई घरात सुखावल्या. एका सपाट्यातच सारी सेना गड चढून गेली. कळसाईला पोहोचल्यावर रामराम



झडले. सोन्याची देवाण-घेवाण झाली. कळसाईच्या साक्षीनं मनोमन सर्वांनी काही ठरवले. गोविंदरावांनी पुढे होऊन वाळ्याला आणि लक्ष्याला गाढ आलिंगन दिले. सारा गाव हे दृश्य पाहून थक्क होऊन गेला. कळसाईला साष्टांग दंडवत घालून सारे परत निघाले. काही क्षणातच शिलंगणाला गेलेले गांवकरी आणि गोविंदरावांचे साथीदार खाली उतरले. पायथ्याजवळच्या देवीचे दर्शन घेतले. पायथ्याशी बांधलेली पाचपन्नास घोडी पाहून गावकरी आणखीच चकित झाले. मग पुन्हा मिरवणूक सुरू झाली. आता घोड्यांची संख्या खूपच वाढली होती. गतवर्षी गोविंदरावांची स्वारी शिलंगणाला गेली होती, आज गोविंदरावांची टोळी शिलंगणाला गेली होती एव्हढाच फरक. ढोल वाजत होता. लेझीम रंगली होती. मिरवणूक मारुतीच्या देवळाजवळ येताच लेझमांचे एकदोन डाव झाले. तोपर्यंत अंधार पडला होता, मशाली पेटल्या गेल्या. मशालींच्या उजेडात मारुतीला सोनं लुटलं गेलं. पुन्हा एकमेकांना सोनं देऊन आलिंगनं दिली गेली. मग गांवकरी गावात सोनं देण्यासाठी जाऊ लागले. गोविंदरावांचे सारे साथीदार गोविंदरावांच्या घराकडे निघाले. घोडी बाहेर बांधून स्वार वाड्यात शिरले. वाड्यात बसण्याची व्यवस्था चोख ठेवली होती. मग सुरंगी, परिगा आणि राधाबाई पुढे आल्या. राधाबाईनं उगाच आपली फडकी सावरली. विठीनं हातात तबक आणलं होतं. तबकात तांदूळ, निरांजन, कुंकू, हळद सारं काही होतं. मग राधाबाईंनी जातीनं गोविंदराव, रामा, वाळ्या, लक्ष्या यांना अन् त्यांच्या साथीदारांना ओवाळलं. किस्नाही पुढंच बसला होता. सर्वांच्या कपाळी कुंकवाचा तांबडा भडक टिळा लावला गेला. ओवाळताना राधाबाईंचे डोळे भरून आले. सगळे राधाबाईंच्या पटापट पाया पडत होते. सुरंगी, परिगाही ओवाळण्यात गर्क झाल्या होत्या. राधाबाईंचे भरून आलेले डोळे पाहून लक्ष्याला राहवलं नाही, तो म्हणाला, ''राधाबाई आमी इक्त तुझं भाव असतांना डोळ्यात पानी कशापाय?'' त्याच्या या बोलण्याने सारेच भारावले. गोविंदरावांनी त्याचा हात दाबला. त्यांचे डोळेही भरून आले होते. वाळ्या ओरडला, ''बोला कळसाई माता की ऽऽ'' ''जोय'' सर्वांनी प्रतिसाद दिला. मग वाड्यात पत्रावळी पडल्या. आज पुन्हा जेवणाची तयारी जोरात झाली होती. भात शिजला होता. सस्याचा रस्सा चांगलाच चविष्ट झाला होता. मग जेवायला बसण्यापूर्वी हांडाभर मोह सगळ्यांच्या घशाखाली उतरला आणि घास घशाखाली जात असतांना तितक्याच जोरानं आजच्या मोहिमेचे विचार डोक्यात तरळत होते. राधाबाई, सुरंगी, परिगा अन् विठी आग्रह करून करून वाढत होत्या. मनमुराद जेवणे झाल्यावर चुळा भरल्या गेल्या. ढेकरा दिल्या गेल्या आणि पानसुपारी झाली. चिलीम सजली आणि साग्रसंगीत सगळे आटोपल्यावर सगळे ताडकन उठले. जेवणं झाल्यानंतर त्यांच्यात वारेच संचारले होते. सगळे बाहेर आले. आपली हत्यारे तपासून पाहिली. सगळं सामान ठिक आहे असे पाहिल्यावर गोविंदराव राधाबाईजवळ आले. राधाबाईंशेजारी किस्न्या उभा होता. त्याने हळूच विचारले, ''बा, मी येऊ काय?'' गोविंदरावांना आनंद वाटला. अभिमानानं छाती भरून आली. ते म्हणाले, ''आज नगं पुन्हा न्हीन.'' ''आमी येतो.'' असे म्हणून ते निघाले. वाळ्या-लक्ष्याने लांबूनच हात उंचावले. टेंभ्याच्या प्रकाशात

सर्वजण एक अपूर्व तेजाने उजळून निघाले होते. रामा किरवाने एकदा, ''हर हर महादेव'' ची आरोळी ठोकली. तसे सर्वांनी झटकन तयार घोड्यांच्या पाठीवर थापा मारून मांड ठोकली आणि दुसऱ्या क्षणी विजेच्या गतीनं ते गाव सोडून नाहिसे झाले. जाताना सहस्त्र सूर्य आकाशात एकदम चमकावेत तसे वाटले. त्यांच्या जात्या वाटेकडे कितीतरी वेळ राधाबाई एकटक पाहत होत्या. राधाबाईंच्या शेजारी सुरंगी व परिगाही भान हरपून उभ्या होत्या.

किस्ना मात्र विचारात गढून गेला होता. दूरवर जाणाऱ्या घोड्याच्या टापांचे आवाज त्याला अजूनही ऐकू येत होते.

* * *

कळसूबाईचा घाट दाट झाडीतून. सापमोडी. घाट उतरून जाणारी गाडीवाट तांबडमातीतून धावणारी. खडकांवर आपटणारी. सगळ्यांना न जुमानणारी. दूर एकदम पठारावर निघणारी. झाडांच्या दाट गर्दीतून वाटेपलीकडचे दिसतच नाही. मजल दोन मजला ओलांडून पलीकडे जाताना वाटेत चिमुकली गावं. कोळ्या कुणब्यांची. उतरत्या छपरांची. कौला गवतांची. सापडेल तेथे भातखाचरे भोवती पसरलेली. घाटातून जातांना वाघाची दरी. तरसाचं रान, लांडग्याचं जंगल, कोल्ह्याची वस्ती, सर्पांच्या सरपटी. छोट्या-मोठ्या जनावरांची धावं. अशी वाट ओलांडून पलीकडे जाते.

वाटेच्या पलीकडे अवघ्या वीस पंचवीस मैलांच्या परिसरातलं छोटसं शहर. मोठसं गाव. चारपाच माड्यांची घरे. छान बांधलेली. चौकोनी चिऱ्यांची. कोरीव लाकडांची. भरभक्कम दारांची. शेठ-सावकारांची माड्यावरची छपरे कौलारू. नळीची. दोन तीन गल्ल्यांमध्ये एकटीदुकटी माडी. एक पाटलाची, एक देशमुखाची, एक कुलकर्ण्याची. चांदण्यात पठारावर उठून दिसतंय गाव. मध्यरात्रीचा सुमार. गाव शांत झोपलेलं. चांदण्याच्या कुशीत. आजुबाजूला जागपणासाठी दहाबारा कुत्री. सगळी दारे बंद. गुरांच्या सपराची कवाडेही बंद. बंद दाराच्या फटीतून चुकूनमुकून येणारी मंद मंद किरणे. गाव टुमदार माड्या पैसेवाल्या. गल्ल्यांच्या सांधणीवर दोन मोठे चौक. चौकात एका वाण्याची पेढी. दोन मजली मोठे घर. ओटी चिरेबंदी. खांबावर कोरीव काम सुबक. खांब मोठे भक्कम. घर चांगले सातखणी. तीन दालनी. माडी उंच. माडीचा सज्जा रुंद. सज्जासुद्धा बंद. काचेची तावदाने आत. बाहेर जाळीदार लाकडी दारे. आत भक्कम दारे बंद. वरच्या मजल्यावर सक्रूशेठची झोपण्याची खोली. खाली पेढी ऐटदार. ओटीवर गादी. भक्कम. दगडी भिंतीत लोखंडी तिजोरी. तिजोरीच्या मुठी पितळेच्या. गादीच्या भोवती पितळी बारांचा कठडा. रुंद गादीवर टेकायला तक्क्या. तक्क्याच्या बाजूला पानाचा डबा. भला मोठा. तिजोरीच्या शेजारी कुलूप लावलेले कपाट. कपाटाच्या फळ्या चांगलेच तेल प्यालेल्या. त्याच कपाटात सगळ्या हिशोबाच्या वह्या-चोपड्या. लाललाल कापडाच्या शिवणीच्या. अनेकांच्या नशीबाचे हिशेब कोंडून



ठेवणाऱ्या. चोपड्यांच्या पानापानातून नशीबाचे ग्रह. भांडणारे. भोवतालच्या कोळ्यांचे, कुणब्यांचे, गोरगरिबांचे, त्याच कपाटात, जमीन गहाणवटीचे रोखे, करारपत्रे, कितीकांच्या तांबड्याआया, काळ्याआया, त्यात सडत पडलेल्या. कपाट भरून. तिजोरीच्या आत एक कप्पा सोन्याच्या मोहरांचा. एक खण गहाण घेतलेल्या दागिन्यांचा. गोठपाटल्या, तोळबंद, हार, कंठा, सरी, नथां, तोडे, वाक्या नाना प्रकार. सोन्याचे, चांदीचे किती प्रकारचे कुसरीचे, ओतलेले, जडावाचे, खण भरून. तिजोरीच्या आत गच्च थैल्या मोहरांच्या. चांदी, रूपं, सोनं अमाप. गच्च गच्च. तिजोरीच्या आत एक चोरकप्पा. त्यात सोन्याच्या विटा कितीतरी. तिजोरीच्या चाव्या एका भरभक्कम तिजोरीत. ही तिजोरी भिंतीत दुसरीकडे. तिच्या चाव्या कमरेला. बाहेरच्या पेढीच्या जागेखाली तळघर. तळघरात सोन्याचांदीच्या दागिन्यांनी भरलेले रांजण. सात. दुसऱ्या बाजूला भक्कम पेट्या. त्यात भरजरी वस्त्रे, दुसऱ्या भागात मोठे तळघर. तळघर नव्हे धान्याचे कोठार. वाढीदिडीने, दुपटीने घेतलेले धान्य. अतोनात भरलेले. मोजमाप नाही. उंदीरघुशींच्या स्वाधीन. गोरगरीब उपाशी. आतले दालन शेठाणीचे. चांदीच्या ताटांचे, भांड्यांचे, पेल्यांचे, शेठला चांदीच्या ताटाशिवाय ताट चालत नाही. चांदीच्या चौरंगावर, चांदीच्या पाटावर शेठच्या जेवणाचा थाट. शेठाणीचा स्वयंपाक तांब्यापितळेच्या भांड्यात शिजायचा. घर भरलेलं. बदाम, पिस्ते, काजू, भरपूर. घर बंदोबस्ताचं कडेकोट. चोरांची भीती! सारे झोपायला माडीवर. वर शेठचा दिवाणखाना. हंड्या झुंबरांनी सजवलेला. मखमलींनी सजवलेला. गाद्यागिर्द्या, लोडतक्के, ऐसपैस. चुनेगच्ची भिंती. रंगीत, चित्रांकित. पाठीमागे शेठची खोली. झोपण्याची. मंद समयी तेवणारी. शिसव्याचा पलंग छपरी. जाडजूड गादीवर शेठ-शेठाणी एकमेकांच्या कुशीत गाढ झोपलेले. सक्रूशेठ मोठा सावकार. पंचवीस गावात त्याची सावकारी जोरात. असंख्य गावातून व्यवहार. शिवंच्या शिवं, गावंच्या गावं त्याच्याच मालकीची. राबराब राबणाऱ्यांनी राबायचं. पडत्या पावसात सडून जायचं. मग धान्य आणायचं. अन् सावकारांनी त्याची विल्हेवाट लावायची. दसऱ्याच्या नंतर खळी पडायची. सावकाराची फेरी ऐनवेळी असायची. पैशाला पैसा, धान्याला धान्य, शेताला शेत. उदंड संपत्ती सक्रूशेठच्या घरी जमा व्हायची. सक्रूशेठ मोठा धार्मिक माणूस. दसरा-दिवाळीला, औसा-पुनवेला, सणा-पर्वणीला तो कोणाचे व्याज माफ करी. कोणाची दामदुप्पट त्याला बोलावून सोडून देई. फुकट जाणारे धान्य गायीगुरांना, ब्राह्मणाला देई. सक्रूशेठ मोठी आसामी. पाटील-देशमुख त्याच्या बैठकीत. देशपांडे त्याच्या तालावर. नासिक शहरात दोन मोठे वाडे. याच गावात त्याची पाच घरे. घरे कसली कोठारेच ती. राशीनं यायचं. राशीनं विकायचं. कशाला कमी नव्हतं. सक्रूशेठला जीवाला जीव देणारी माणसं कितीतरी बुधा ठाकर, गणा रामोशी, हणम्या भिल्ल. म्हाद्या कोळी, या सगळ्यांवर त्याचे अनंत उपकार. जीवाला जीव देणारी माणसं, पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे, हेही त्याच्याशी एकनिष्ठ. त्यांना कर्ज सावकार द्यायचा. प्रेमाचे. सक्रूशेठला दुःख एकच. पोर नव्हतं. कोणाचा दोष? पण सक्रूशेठला एकच नाद. बायडीचा. रानातल्या टंच बायड्या त्याला आवडायच्या. मनात भरली की बायडी मिळायची. त्याच्या जीवाभावाची

माणसं त्याला रानातच पुरवायची. त्यांच्या अंगाचा चाळा संपेपर्यंत बाहेर राखण करायची. मग ही मालमत्ता या जीवाच्या माणसांची व्हायची. अशी कितीतरी घरं झाली होती. प्रेमाची. संबंधाची. रानची जहागिरीच त्याला मिळालेली घर भरून देणारी. सक्रूला त्रास होता मराठ्यांच्या सत्तेचा. त्यांचं हे मोठेपण खपत नव्हतं कोणाला. पण देशमुख-देशपांड्याच्या जीवावर त्यांचं सारं खपत होतं. तीनतीनशे वर्षाची वंशपरंपरा गतकर्जे अजून संपत नव्हती. सत्ता कोणाचीही असो. त्याचा धंदा बुडत नव्हता. त्याच्या चोपड्यांना ब्रह्मदेवाचा वर होता. काही गोष्टी सक्रूशेठने खरंच चांगल्या केल्या होत्या. भोग देणाऱ्या बायड्यांना उपभोगासाठी जमिनी दिल्या होत्या. उद्ध्वस्त झालेल्या अब्रूंना कर्ज माफ करून ऋणी केलं होतं. आपल्या शेतावरच कूळ बनवून कितीकांना पोटापाण्याला लावलं होतं.

* * *

गोरा साहेब हिंडत त्याच्यापर्यंत पोचला होता. हा घोटी शहरातला शेठ त्याला पसंत आला होता. त्याची त्याने पाठ थोपटली होती. गावोगावची अचूक माहिती सक्रूनं त्याला पुरविली होती. जीवाभावाची माणसे देऊन जंगलातल्या गुप्त वाटा सक्रूने बसल्या जागेवरून दाखविलेल्या होत्या. गोऱ्या साहेबानं त्याच्या सगळ्या वह्यांना, चोपड्यांना, रोख्यांना मान्यता दिली होती. गोरासाहेब पाच दिवस त्याच्याकडे मुक्काम ठोकून मेजवान्या झोडत होता. तेव्हा त्याची चांगलीच मैत्री जमली होती. गोऱ्या साहेबाला सोन्याची अत्तरदाणी अन् हिऱ्याची कंठी त्याने प्रेमाची भेट म्हणून देऊन खूष केले होते. देशमुख, देशपांडे, पाटील यांचं न ऐकता गोऱ्याला सक्रूने आश्रय दिला. त्याची ठेप ठेवली होती. देशमुख, देशपांड्यांना, पाटलालासुद्धा ढेरी खाजवीत गोऱ्याची भेट घ्यायला लावली होती. बरोबर मेजवानी झोडायला लावली होती.

मध्यरात्र झाली होती. चंद्र चांगला डोक्यावर आला होता. पांचपंचवीस स्वार दौडत गावात शिरले. सर्वांच्या तोंडावरून फेट्याचे सोगे गुंडाळून करकचून बांधले होते. घोडी चौकात येताच एकदम लगाम खेचले गेले. म्होरक्याच्या हाताच्या इशाऱ्याने टोळीच्या तीन तुकड्या झाल्या. आणि तीन बाजूंनी सक्रूशेठचा वाडा घेरला गेला. सगळ्या वाटा रोधल्या गेल्या. घराघराच्या आडोशाने घोडे उभे करून स्वार खाली उतरले होते. चौकातील घरांच्या दरवाजासमोर एकेक स्वार बंदूक रोखून उभा होता. पाटलांच्या वाड्याजवळ पाच स्वार पाळत ठेवून होते. देशपांड्याचा वाडा लांब होता. देशमुख गावात राहत नव्हता. दहा पंधरा स्वार सक्रूच्या घराभोवती जमले. पाठीमागच्या दाराशी दोन अन् पुढच्या दाराशी तीन-चार असे उभे राहिले. आत जायला मार्ग नव्हता. तरी कसे शिरायचे याची योजना जणू ठरलेली होती. एक स्वार अगोदरच गावात येऊन थांबला होता. त्याने कोठून कसे जायचे हे पाहून ठेवले होते. घराच्या कौलांवर समोरून उजव्या बाजूला मधल्या आढ्यापाशी दुसऱ्या मजल्यावरच्या पाटईला माळ्यावर चढायला वाट होती. तेथून कौलांचा भाग सरळ



दिसत होता. लक्ष्या आणि त्याच्या पाठोपाठ रामा किरवा कौलांवर चढत गेले होते. लक्ष्या तरबेज होता. त्याने कौले बाजूला सारली. आतल्या लाकडी पट्ट्या खसाखसा उपटायला सुरुवात केली. त्याच्या बलदंडाने चार-पाच पट्ट्या तुटल्या. एकावेळी आत उतरू शकेल एवढी जागा झाली. लक्ष्याने अन् पाठोपाठ रामाने आत उडी मारली.

अजून तरी गाव शांत होते. कोणालाही थांग लागला नव्हता. पण चौकातल्या एका छोट्या घराचे दार थोडे करकरण्याचा आवाज आला होता. चौकातला स्वार त्या दिशेने धावला होता. पण काहीच नाही. त्या घराचे दार किलकिले झाले होते. त्यातून दोन क्षीण डोळे बाहेरच्या चांदण्यात जलदगतीने अन् सावधपणे हलणाऱ्या आकृत्या टेहळत होते.

लक्ष्या आत शिरला. कोठल्याही क्षणाला आतून आवाज झाला असता अन् गाव जागे झाले असते तर चौकाच्या त्या बाजूच्या गल्लीतरी चार तरणी पोरं बंदूक, लाठ्या घेऊन बाहेर येऊ शकली असती. गावातल्या तालमीत घुमणारी पोरं होती ती. आत उतरताच माळवदावरून तो खालच्या माडीत आला. पण आत खोलीत शिरायला वाट नव्हती. सर्वच दारे बंद होती. लक्ष्याने युक्ती केली. खालच्या माडीच्या दिवाणखान्याच्या दालनात दोन पेट्या होत्या त्या पेटीवर त्याने जोरात उडी मारली. धप्प धप्प असा आवाज झाला. तशी आतल्या खोलीत हालचाल झाली. दाराच्या आड रामा लपला. पुन्हा धप्प धप्प... दोन उड्या लक्ष्याने मारल्या. आत सक्रूशेठ जागा झाला होता. तो दिव्याकडे सरकला. दिव्याची वात त्याने सारली. सक्रूचे पोट लोंबत होते. उघड्याभप्प पिवळ्याजर्द अंगातील चरबी लक्षणीय होती. डोक्याची शेंडी हालत होती. गाल थुलथुलत होते. आपले पोट सावरत त्याने कोपऱ्यातली काठी घेतली. मांजरीला शिव्या देत त्याने दाराची कडी काढली. पण त्याला दार उघडावे लागले नाही तोच दार धाडकन् लोटले गेले. तसा दाराच्या धक्क्याने तो धप्पदिशी पडला. दाराचा आवाज झाल्याने शेठानी उठली आणि आपल्या नवऱ्याच्या अंगावर बंदूक रोखली गेलेली पाहून ती जोरात किंचाळली अन् बेशुद्ध पडली.

किंकाळीचा आवाज चौकापर्यंत आला. शेजारच्या घरातून काय झाले म्हणून कोणसे बाहेर पडण्याचा प्रयत्न करू लागले. दार उघडताच बाहेरचे दृश्य पाहून त्याची झोप उतरली. दार बंद करून आतूनच जोरात ओरडू लागले, ''चोर! चोर! धावा रे धावा!'' आवाज उमटत होते. आपण त्या माणसाला का मारू शकलो नाही हे लक्षात येऊन चौकातील स्वार शरमिंदा झाला होता पण आता येणाऱ्या प्रसंगाला तोंड देणे भाग होते. त्याच्या ओरडण्याने घराघरातून आवाज उठले ''चोर ! चोर!'' बाहेरचा कल्ला सक्रूशेठच्या कानापर्यंत पोचणे शक्यच नव्हते. पण आता लवकर हालचाली केल्या पाहिजेत हे लक्षात आले. चार दोन घरांची दारे उघडली जात होती. तोच वाळ्याचा आवाज घुमला, ''खबरदार कोणी बाहेर आलं तं! खून पडत्याल!'' त्याच्या आवाजाबरोबर बंदुकीचा बार उमटला होता. रामाने सक्रूला उभे राहण्याचा हुकूम सोडला. सक्रूला काय होते हे कळायला मार्गच

नव्हता. हुकूम पाळण्यापलीकडे त्याला काही करता येत नव्हते. तो निमूटपणे उठण्याचा प्रयत्न करू लागला. तसे लक्ष्याने त्याचे बकोट धरून त्याला उठवले. ''तिजोरीच्या किल्ल्या दे.'' तो गरजला. आता सक्रूशेठच्या लक्षात आले. तो कां कूं करू लागला. तोच रामाने त्याच्या पाठीत सणसणून लाथ घातली. तसा सक्रू कळवळला. त्याने निमूटपणे कमरेच्या किल्ल्या लक्षाच्या हाती देऊ केल्या. तसा लक्ष्या ओरडला, ''चाल! कुलूप उघड!' मग सक्रू वरमला. त्याच्याबरोबर दोघे सावधपणे चालले होते. खालची सर्व दारे उघडली गेली. आणि पुढच्या पेढीच्या दालनात तिघे आले. तसा रामा दाराच्या दिशेने गेला. त्याने दार उघडले. गोविंदराव आणि अन्य चारजण आत घुसले. आतला अंधार पाहून गोविंदरावांनी आपल्या अंगरख्यातील चकमक काढली. चकमकीने जाळ करताच दिवा दिसला. त्यांनी वात सारली. अन् पुन्हा चकमकीने पेटविली. पाठोपाठ हातात टेंभा घेऊन आत शिरलेल्याने दिव्यावर टेंभा पेटविला. आता टेंभ्याच्या प्रकाशात सारे स्वच्छ दिसू लागले. सक्रूने त्याचे लहान कपाट उघडले. लहान कपाटातील किल्ल्या हातात घेऊन लक्ष्याने त्याला तिजोरी आणि कपाट खोलून द्यावयास सांगितले. तिजोरी उघडताच आतला सगळा ऐवज तिघांनी बाहेर काढला. एका पोतडीत बांधून ते बाहेर पळाले आणि दुसऱ्या पाच-सात जणांना त्याने आपल्याबरोबर यावयास सांगितले. लक्ष्याला तळघराची माहिती मिळालेली होती. त्याने तळघर दाखवावयास सांगितले. सक्रूशेठ हादरलाच पण त्याचा नाईलाज होता. भराभर पाचजण एक टेंभा घेऊन तळघरात गेले. तेथील ऐवज उचलून ते बाहेर पळाले. मग गोविंदरावांनी त्याच्या कपाटातील सर्व वह्या भराभर बाहेर फेकल्या अन्य दोघांनी बैठकीतल्या गादीसह त्या बाहेरच चौकात आणल्या आणि त्याला टेंभा लावला. सक्रूशेठला ती होळी पहावयास बाहेर आणले.

क्षण दोन क्षण गेल्यावर सक्रूशेठची बायको शुद्धीवर आली होती. तिच्या लक्षात ही सर्व गोष्ट केव्हाच आली होती. मागच्या बाजूनं पळून जाऊन आपल्या माणसांना घेऊन यावे म्हणून ती मागच्या दारी पळाली. तिने दार उघडले तोच बाहेरच्या स्वारांनी तिला पकडले आणि तिच्या पाठीत सणसणीत दस्ता हाणून डोक्यात एक फटका मारून बेशुद्ध करून तिला तेथेच टाकून दिले होते. तिच्या हातातले, गळ्यातले दागिने काढून घेऊन मागच्या दाराला बाहेरून कडी घालून बंद केले होते.

आता होळी करून हे सारे पळून जाणार असे सक्रूशेठला वाटत होते. तेव्हढ्यात दोघांनी त्याला उचलले. एकाने तंगड्या अन् एकाने हात. त्याला चार-पाच हेलकावे देऊन होळीत फेकून दिले. तो त्यातून उठून पळण्याचा प्रयत्न करतो आहे तोच एका बंदुकीतून गोळी सुटली आणि तिने सक्रूशेठचा बळी घेतला.

गोळीबाराच्या आवाजाने पाटील जागा झाला होता. त्याने आपल्या हातात बंदूक घेऊन तो बाहेर आला होता. बंदूक घेऊन वाड्याचा दरवाजा उघडून तो बाहेर येतो तोच दाराच्या दोन्ही बाजूच्या दोघांनी त्याच्यावर बंदुका रोखून त्याला बंदूक टाकून द्यावयास भाग पाडले होते. त्याला पकडून चौकात आणले. सावकाराच्या घराच्या ओटीवरच्या



खांबाला त्याला करकचून बांधले. त्याच्या साक्षीने सावकार ठार झाला होता.

मग लक्ष्याने जोरात आरोळी ठोकली. ''गावकऱ्यानु सावकार मारलाय. त्येच्या साऱ्या चोपड्या जाळून टाकल्या हायेत. संमद्याचं करज माप झालंय. जर कोन येची वर्दी सरकारात नेईन तर पाटलासारखी गत व्हईल.'' चोपडीची काळी राख पाटलाच्या तोंडाला फासली होती आणि मग सगळे स्वार आले तसे बंदुकीची एकेक फैर झाडीत पसार झाले होते. टापांचा आवाज ऐकू येईनासा झाला तशी धडाधड दारे उघडली गेली. चौकात लोक जमून झाला प्रकार पाहून भयचकित होत होती. दरोडेखोरांनी अन्य कोणालाही त्रास दिला नव्हता. अडथळा करणाऱ्या पाटलाला त्यांनी चांगलाच धडा शिकवला होता. परंतु लोकांना आश्चर्याची गोष्ट ही वाटत होती की आजपर्यंत कोणत्याही दरोड्यात जे घडले नाही ते येथे घडले होते. ''हिशेबाच्या वह्या का जाळल्या होत्या? त्यात दरोडेखोरांचा हेतु काय असावा?''

दुसऱ्या दिवशी अवघ्या पंचवीस तीस मैलांच्या परिसरात एकच चर्चा होती. ''सक्रूशेठ ठार झाला. त्याच्या पेढीवर दरोडा पडला. त्याचे सगळे हिशेबाचे कागद दरोडेखोरांनी जाळून टाकले. पाटलाच्या तोंडाला काळे फासून बांधून ठेवले.'' ज्यांना ज्यांना ही बातमी समजली होती ते ते दरोडेखोरांना दुवा देत होते. परमेश्वरानेच त्यांना पाठविले असावे असाच भाव सगळ्या लोकांकडून जणू व्यक्त होत होता.

* * *

बातमी गोऱ्या साहेबापर्यंत जेव्हा गेली तेव्हा नासिक त्र्यंबकेश्वर परिसरात बंदोबस्त ठेवण्याच्या सूचना फक्त सुटल्या. अन्य फारसे काही झाले नाही. पण साहेबाच्या मनात मात्र चिंता निर्माण झाली होती.

सक्रूशेठला लुटून घोडेस्वार पळाले आणि रातोरात पसार झाले. तरी टाकेद सर्वतीर्थावरील महादेवाच्या पिंडीसमोर दुसऱ्या दिवशी एका कोळणीला सोन्याचे कडे सापडले. तिने ते उचलले. तो दिवस सोमवारचा होता. तिला तो शंकराचा प्रसाद वाटला. ती रोज नियमाने सर्वतीर्थावरच्या शंकराला आणि श्री रामचंद्रांच्या मूर्तीला तीर्थातल्या पाण्याने स्नान घालीत असे. आज आपली तपश्चर्या फळाला येऊन आपल्याला हा प्रसाद मिळाला असे तिला वाटले.

ती जेव्हा गावात आली तेव्हा ती वेडावल्यासारखी गावातल्या लोकांना ते कडे दाखवित होती. प्रत्येकाला आपण कशी सेवा करतो आणि आपल्याला हे कडे कसे सापडले हे रसभरीत वर्णन करून सांगत असे. त्या दिवशी तिला अपूर्व आनंद झाला होता. ती परमेश्वराचे मनोमन आभार मानीत होती. गेली पाच-सात वर्षे तिचा हा नेम होता. तिने हताशपणाने हा नियम सुरू केला होता. ती एकटीच गावाच्या बाहेर झोपडीत, गेली सात वर्षे राहत होती. नाकी डोळी नीटस असलेली ती बाई दिवसभर शेतावर काम करी अन् रात्र

झाली की दुःखी होई. आपल्या जीवनाची होळी झाली हे शल्य तिला बोचत होते. आपल्या तारुण्याने आपला कसा घात केला हे तिला राहून राहून खटके आणि आज प्रत्यक्ष शंकर प्रत्यक्ष महादेव आपणावर प्रसन्न झाला, आपला कलंक धुऊन निघाला असे तिच्या मनी येत होते.

चार दिवसांनी तिच्या कानावर बातमी आली. ''आधितवारी सक्रूशेठच्या घरावर दरोडा पडला, सक्रूशेठ ठार झाला, त्याचा सारा ऐवज दरोडेखोरांनी पळवला, त्याला ठार मारला'' ही बातमी समजल्यावर एक जळजळीत निःश्वास तिच्या अंतःकरणातून उमटून गेला. दरोडेखोरांनी सक्रूशेठला मारलेच नाही तर त्याची कागदपत्रेही जाळली हे जेव्हा तिला कळले तेव्हा तिला अपार समाधान झाले.

पाचसात वर्षापूर्वी ती देखील सक्रूच्या पाशवी वासनेच्या तडाख्यात सापडून उद्ध्वस्त झाली होती.

मोठी दिवाळी शनवारी होती. मोठ्या दिवाळीची योजना तयार होती. गोरखगडावर शंभर तगड्यांची तुकडी सज्ज होती.

* * *

रतनगडच्या खाली खोल-खोल दऱ्या, घाटघर, कोल्हारवाडी, रतनवाडी, ठाकरवाडी असा सलग कापीव कडा. पश्चिमेकडून दक्षिणेकडे कापीत जाणारा. रतनगडाच्या पश्चिम दरवाजापुढच्या खिंडीतून खाली कोकणात वाट. मुरबाड परिसर, लांब उल्हास नदीचे खोरे. दरीतून खाली दक्षिणेकडे दहा-पंधरा कोसाच्या जंगल दरीतून थेट बहीरगड, जीवधनगड, मच्छिंद्रगड, गोरखगड, सिद्धगड अशी एकजात गडांची रांग. उद्ध्वस्त किल्ले, त्यातल्या त्यात गोरखगड सुरक्षित. किल्ल्यापासून गांवे खूप दूर. मधे घनदाट रान. ठाण्याकडे आणि पुण्याकडे जायला हा फार सोपा अन् जवळचा भाग म्हणूनच निवडला होता. गेले पंधरावीस दिवस ह्या गड्यांच्या जागा सुरक्षित करण्यावरच गोविंदरावांनी जोर दिला होता. मधे येणाऱ्यांना दरोडेखोरांच्या भाषेत तंबी दिली होती. सक्रूशेठच्या दरोड्याची भीती गावोगाव पसरली होती. दरोडेखोरांची टोळी कधी येईल याचा नेम नव्हता. म्हणून गावोगाव, वाड्यावाड्यांवर भीतीच भीती होती. रानगट आपल्या तलवारी, कोयते परजून होते. तर गावा, माळातले पाटील चार-सहा पोरांच्या तुकड्या तयार करून बंदुका रोखून होते. पण घडत होते उलटेच. गावागावातून, वाड्यावाड्यातून कोणीतरी आवयी उठवित असे, ''त्या दरीत दरोडेखोर वसतीला होते, त्या किल्ल्याली ते राहतात, त्या गडदीत लपायला येतात'' आणि मग या किल्ल्यांकडे कोणी फिरकत नव्हते. त्याचा फायदा गोविंदराव खाडे, रामा किरवा, लक्ष्या अन् वाळ्या यांना मिळे. आता त्यांची टोळी जवळ-जवळ सत्तर-पंच्याहत्तर स्वार आणि तीस-पस्तीस इतर तगडे अशी झाली होती. त्यामुळे त्यांच्या निरनिराळ्या ठाण्यावर दोन-दोन स्वार चार-सहा पावखलक ठेवणे शक्य झाले होते. दसऱ्याच्या दिवशी



सुरू झालेल्या मोहिमेने चांगलीच मजल गाठली होती. पाचसात पावसात कोसांवर ठाणी तयार झाली होती. लोकांत घबराट निर्माण झाली होती. दोन-तीन पाटलांना, चार-सहा भुरट्या चोरट्यांना त्यांनी यमसदनाला पाठविल्यामुळे लोक चांगलेच हादरले होते. दाट जंगलात चाललेल्या कारवाया ते दाट जंगल आपल्या पोटात ठेवत होते. आता पावसाचा प्रश्न नव्हता. मोहिमेवर मोहिमा करणे आवश्यक होते. टोळी पोसायची होती आणि माणसंही जमवायची होती. म्हणूनच टिपून टिपून माणसं ठरविली होती.

* * *

दोन दिवसांच्या विश्रांतीसाठी गोरखगडावरच सारे जमले होते. दिवाळीची गम्मत तेथेच साजरी होणार होती. सुरंगी अन् परिगा या दोन म्होरक्याच होत्या. त्यांची धावपळ चालली होती. आता त्यांच्या जोडीला भरपूर मदतनीस मिळाले होते. दारू पाडणं आणि एवढा बारदाना जेऊ-खाऊ घालणं त्यांना जमत होते. विश्रांतीच्या दिवशी मस्त शिकारी होत होत्या. रानं गाजत होती. सागुती होत होती. दोन दिवसांच्या विश्रांतीत मनमुराद दारू पिऊन झाली होती. रानरेड्यांचे मांस शिजले होते. सारे गडी खाऊन सुस्त झाले होते. कोणाच्या मनात अन्य विचार नव्हता. खायचं, प्यायचं, दौड करायची, लूट करायची आणि जमेल तेथे दारू पिऊन मस्त झोपायचं. गोरखगड अगदी सुरक्षित असल्यामुळे तर सर्वांची चंगळच झाली होती. गोरखगड मुरबाडपासून पाचसहा कोसाच्या अंतरावर होता. उंच उभा, तळापासून चारपाचशे फूट उंच. खालचा किल्ला पसरट, वरचा किल्ला वर निमुळता. असे किल्ल्याचे दोन भाग. खाली एक टेकडी. टेकडीच्या पायथ्यापासून बिकट वाट. खालच्या किल्ल्यात घोडी बांधायला भरपूर जागा. गुहेतल्या जीन्याने वर यायला वाट. वरच्या माळात खडकातली टाकी आणि मोठमोठ्या गडद्या किंवा गुहा खडक फोडून वरच्या किल्ल्याने प्रवेश. वरच्या किल्ल्यात मनमुरादपणे चाललेल्या दंग्याची मुरबाडला कल्पनाही नव्हती.

आज मोठी दिवाळी, अवसेची रात. मुरबाड शहर मुसलमान दारूबाजांनी तयार केलेली दारू उडविण्यात दंग. वारली, कोळी, वंजारी, ठाकर लोकांची घरे पाड्यावर असे चारपांच पाडे अगदी जवळजवळ अवतीभोवती. तेथे दिवाळी पोचलीच नव्हती. गावातच दिवाळीचा जोर होता. बिच्चूशेठ सावकाराकडची दिवाळी फार जोरात असे. तो आपल्या दुकानीत लक्ष्मीपूजन करी. जोशी बोलावून त्याच्याकडून ही पूजा यथासांग होई. दारूची आतषबाजी फारच मोठ्या प्रमाणात होई. त्या दिवशी दुपारी शेखसाब, इबल्या, बारली, शिंद्या ठाकूर, इद्या कोळी, भिकूशेठ सोनार मेजवानीला असत. विष्णूभट मात्र जेवायला नसत. पण पूजेला दक्षिणा त्यांना थैलीभर मिळे. शेखसाब म्हणजे दहा गावचे जहागीरदार पण आता ते नावालाच जहागीरदार राहिले होते. ते आता मुरबाडला पोलिस अधिकारी म्हणून काम पाहत होते. मुरबाड म्हणजे मोठे ठाणे. त्यांच्या हाताखाली दहाबारा हवालदार

होते. शेख म्हणजे लढवय्या माणूस. जहागीरदाराचा आणि बिच्चूशेठचा फार लोभ होता. बिच्चूशेठची शेठाणी शेखसायबावर फार खूश. त्या दिवशी जेवायला वासुंदीचा बेत असे. गण्याकोळी बिच्चूशेठकडे चाकरीला. त्याची वाढताना तारांबळ उडे. गण्यासारखे आणखी तीनजण बिच्चूशेठकडे चाकरीला होते. पाणी भरण्यापासून ते शेठ आणि घरातल्या अन्य सर्वांची अंग रगडण्यापर्यंत सर्व प्रकारची सेवा त्यांना करावी लागे. गण्याची बायको पाड्यावर राही. तिच्याकडे जायला आठवड्यातला फक्त एक दिवस मिळे. बाकी सारा वेळ त्याचा सावकाराच्या वाड्यावरच जाई. गेले पंधरा दिवस तर त्याची बायकोही सावकाराच्या वाड्यावरच आली होती. दिवाळीचे कामच खूप!

* * *

आज दुपारी अशीच पंगत बसली होती. बासुंदी अन् पुरीचा बेत चांगला चापला जात होता. बिच्चूशेठ स्वतः आग्रह करून वाढत होता. पण त्याच्या वाढण्यात आज नेहमीचा उत्साह नव्हता. तो मधूनच कोठेतरी हरवून जाई. काय घडले होते ते त्याला अन् गण्यालाच माहीत होते. आज बिच्चूशेठकडे आल्यापासून त्याला बिच्चूशेठचे एकूण लक्षच नाही, ही गोष्ट ध्यानात आली होती. शेखसाहेबाने न राहून विचारले होते, ''क्यो बिच्चूशेठ, आज जी नही लगता क्या? सब खैरियत तो है?'' त्याच्या प्रश्नाचे उत्तर देताना बिच्चूशेठ गडबडला होता. त्याने कसेबसे उत्तर दिले, ''हां हां सब खैरियत है !'' जेवण उरकल्यावर पानसुपारी झाली होती. पण गप्पा मारताना बिच्चूशेठ आपल्यापासून काहीतरी लपवून ठेवतो आहे हे शेखसाहेबांच्या लक्षात आले होते.

विष्णूभटाला देखील त्यांनी आज लवकर बोलावले होते. त्याच्याकडून अंधाराच्या आतच त्याने कशीबशी पूजा करून घेतली. विष्णूभटाच्याही ते लक्षात आले होते. त्याने हळूच गण्याला विचारले आणि गण्याने मग त्यांच्या कानात उत्साहाने सांगितले होते. विष्णूभट मनातून आनंदला होता. विष्णूभटाच्या कानावर सक्रूशेठवर पडलेल्या दरोड्याविषयी आले होते. तो संधी मिळेल तेव्हा बिच्चूशेठला सांगत आला होता, पण बिच्चूशेठने त्याच्या सूचनांना हसण्यावारी नेले होते.

शेखसाहेबाला राहवले नाही. त्याने आपल्या मोहल्ल्यात गण्याला बोलावून घेतले होते. गण्याकडून जी माहिती मिळाली होती ती ऐकून शेखसाब फार चिडले होते. आपण येथे मौजूद असताना असे होऊ शकते? अशी हिंमत होते? त्याचे त्याला आश्चर्य वाटत होते. त्याने मनोमन काही ठरविले होते.

रात्रीच्या अंधाराचं राज्य मुरबाडवर पसरलं होतं. त्या साम्राज्याचे दिवाळं काढण्याचा प्रयत्न कोनाड्यातून लावलेल्या पणत्या करीत होत्या अन् त्याच्या उजेडात मुरबाड उजळलं होतं. मुरबाड कोकणी शहर. एका पेठेचं. कवलारू उतरत्या छपराचं. नळीची कौले. शेतीनशे घराचं मुख्य गांव. मग बाजूच्या गल्ल्या पाचपन्नास, पाचपन्नास घरांच्या पेठेत



बसक्या कौलारांखाली बसलेली फडताळे हीच दुकाने. ऐन बाजारपेठेत मध्यभागी एकच तीनमजली उतरत्या छपराची भक्कम इमारत. पहिल्या मजल्या दीड-मजल्याच्या उंचीपर्यंत दगडी चिऱ्यात बांधलेली. वरपर्यंत मोठ्या पक्क्या विटांच्या चांद्या. पुढचा सगळा भाग भक्कम सागवानाचा. मोर कोरल्या नक्षींचा खालची दुकानी. वरची सज्जा. वरच्या मजल्याला जाळी बसविलेली दारे. कौलांच्या पुढे नक्षीदार पान. खालच्या दगडी जोत्यात बसविलेल्या लोखंडी कड्या. या तीन मजल्यात लक्षावधी रुपयांचा ऐवज होता. अनेक गोरगरिबांच्या माना मुरगळून पडल्या होत्या. अनेकांना वेठबिगार बनविणारे कागद होते. गेल्या तीन-चार वर्षात ते गोऱ्या साहेबाचे मैत्रीचे ठिकाण बनले होते. या शेठ सावकारानं सायबाला कोकण दाखविलं होतं. शेखसाबला पोलिस अधिकारी बनविलं होतं.

गावच्या या बाजूला शेखसाहेबांचा मोहल्ला होता. त्याचा चांगला भक्कम वाडा गढीवजा होता. त्याच्या हातात साहेबानं शस्त्र दिली होती. दिली होती म्हणजे निजामानं दिली होती, ती काढून घेतली नव्हती. त्याच्याजवळ एकवीस शिपायांची तुकडी होती. पंधरा बंदुका होत्या. जंगलाच्या दृष्टीनं त्या आवश्यक होत्या, शेखसाब तसा शूर माणूस. मोहिमा गाजविलेला. राजकारणाचं पारडं फिरताच त्याने सायबाघरची पोलिस अधिकाऱ्याची जागा स्वीकारली होती. आपण होऊनच साहेबाच्या ताब्यात परिसरातील किल्ले देवविले होते. शेखसाहेब आपली जहागिरी फार हिकमतीने सांभाळी. त्यानं केव्हाही कोणत्याही गावात जावं, पाटलाला आणि गावकऱ्यांना हवं तसं लुटावं हा त्याचा शिरस्ता होता. मिळेल त्या बाईवर तुटून पडावं, आपल्या भाईबंदांना तुटून पडण्याची परवानगी द्यावी आणि आपली जमात वाढविण्याचा प्रयत्न करावा. तसा तो फार धार्मिक होता, त्यानं नमाज पढणं कधीच चुकविलं नव्हतं.

अवसेच्या अंधारात दहापंधरा टेंभे पेटलेले एका बाजूने येत होते. हळूहळू ते टेंभे मुरबाडच्या दिशेने सरकत होते. सरकणाऱ्या या टेंभ्यावर दबा धरून आठदहा बंदुका निशाणासाठी टकून होत्या. टेंभे सरकत होते. टेंभे आता अगदी गावाजवळ आले होते. गावात एकदम गोळीबाराला सुरुवात होते. पण हे गोळीबार दबा धरून बसलेल्या बंदुकातून होत नव्हते, त्यांच्या मागून कोणीतरी त्यांच्यावर वेध धरून बंदुका चालवित होते. शेखसाहेबाला हे अनपेक्षित होते. त्याने आपल्या तुकडीची रचना टेंभे पाहून त्या दिशेला केली होती, पण त्या दिशेला दहाच स्वार तीन-तीन टेंभे आपल्या बंदुकांच्या वरच्या संगिनींना बांधून दौडत होते. दरोडेखोरांची मोठी टोळी आहे असे वाटून शेखसाहेबानं आपली सगळी ताकद याच बाजूला लावली होती. त्याच्या हेही ध्यानात आले नव्हते, दरोडेखोर असे टेंभे घेऊन धावणार नाहीत. पाहता पाहता एक, दोन, तीन, दहा, पंधरा शिपाई माशासारखे तडफडून मेले. शेखसाहेबाच्या पायात दंडात गोळी लागली होती. हे सगळे कंदन चालतांना गावकरी मात्र बाहेर येण्याची हिंमत करीत नव्हते. दिवाळीचा आनंद लुटून शांत झोपलेले गावकरी घाबरले होते. पण शेखसाहेबाचाच काही अत्याचार चालू असेल असे वाटून ते लोण आपणापर्यंत येऊ नये म्हणून लोक दारे बंद करून कानोसे घेत

होते. जखमी शेखला स्वारांनी पकडले आणि हातपाय बांधून एका घोड्याच्या पाठीला करकचून आवळले. तो घोडा मोकळा सोडून बाकी स्वार बिच्चूशेठच्या घराकडे निघाले होते. स्वारांची एक तुकडी मुरबाड गावातून गस्त घालण्यात गुंतली होती.

सावकाराच्या घरावर गोविंदरावांनी दणका दिला तसा तो दरवाजा हादरला पण लगेच उघडला गेला आणि एकदम एक काळीकुट्ट व्यक्ती गोविंदरावांच्या पायावर कोसळली. तो गण्या होता. ''सरदार आमाली वाचवा. आमी दोन पिढ्याचं वेठबिगार आह्यात.'' गोविंदराव क्षणभर गोंधळले. त्यांना ही सावकाराची चाल असावी असेच वाटत होते. झाल्या अन् पाहिल्या प्रकारानं बिच्चूशेठ मात्र हात बांधून उभा होता. तो केविलवाण्या स्वरात गोविंदरावांना म्हणाला, ''सरकार, तुमाली काय लागन त्ये नेईजो, पन आमाला मारो नाय.'' गोविंदरावांच्या पाठोपाठ शिरलेल्या लक्ष्याने गोविंदरावांचा स्वभाव ओळखला होता. गोविंदराव त्या सावकाराला सोडतील असे वाटून लक्ष्याने त्याला हाताला धरून हिसकले. तो खालीच आदळला. त्याला मानगुटीला धरून उठवित सगळा खजिना उघडा करून घेतला. गोविंदरावांनीसुद्धा अशी संपत्ती पाह्यली नव्हती. दागदागिन्यांचे गाठोडे, थैल्या बांधल्या गेल्या. दारातून बाहेर नेणारे स्वार वळले. मात्र मधल्या दारात एक तरणीताठी पोर बंदुकीचा बार काढून मोकळी झाली होती. गोळीने अचूक वेध घेतला होता. गाठोडी उचलणाऱ्यापैकी एकाच्या पोटरीत गोळी घुसली होती आणि तो कळवळून खाली पडला होता. तिच्या पाठीमागून एकाने तिला आवळले तशी तिची बंदूक हातातून गळून पडली. दोर फेकून तिला खांबाला आवळण्यात आले. मग सावकाराच्या घरात शिरून दोन पोरे आणि सावकाराची बायको यांनाही पकडून आणले. गण्या या सर्वांना बांधण्याचे काम करीत होता. सर्वांच्या बोबड्या वळल्या होत्या. लहान मुलाने मात्र रडून आकांत केला होता. एव्हढे झाले तरी बिच्चूशेठ अजून घाबरला नव्हता. त्याने गयावया केली. तसा लक्ष्या पुन्हा ओरडला, ''चोपड्या कुठं हायेत बोले?'' आता मात्र बिच्चूशेठ गडबडला. तो पुढं होईना तशी कंबरड्यात जोरात लाथच बसली. तो पुढे सटपटला तरी तो सांगायला तयार होईना. तसा गण्या पुढं झाला. त्याने तळघराकडे बोट दाखविले. लक्ष्याचे स्वार गोविंदरावांबरोबर पुढे झाले. सर्वांनी मिळून कागद अन् कागद बाहेर काढला. चोपड्यांबरोबरच महत्त्वाचा मौल्यवान माल सावकारानी तळघरात लपवून ठेवला होता. तळघराचा कानाकोपरा धुंडाळला. तेव्हा एका ठिकाणी एक दगड हालला. तसे गोविंदरावांच्या लक्षात आले. त्यांनी तो दगड सरकावयास सांगितले. आत खोबणीत मोती आणि हिऱ्याचे हार होते. दोन चोपड्या ठेवल्या होत्या. हे सारे घेतल्यावर सगळे वर आले. ठरल्याप्रमाणे खजिना निरनिराळ्या घोड्यांवर बांधण्यात आला. अपार संपत्ती पाहून स्वार बेहोश झाले. त्यांनी चोपड्यांची होळी केली. गण्याने हातात टेंभा धरला होता. त्याची वेठबिगारी संपली होती. त्याची जमीन त्याच्या मालकीची झाली होती. चारजणांनी बिच्चूला झोळवले आणि चोपड्यांच्या भडकलेल्या ज्वाळांमध्ये टाकून दिले. शेखसाहेबाचे घोडे त्या होळीभोवती तीनदा फिरविले आणि शेखसाहेबाचा मुटका त्या होळीत फेकून दिला. धगधगत्या ज्वालांमध्ये पणत्या-पणत्यातले



उरले तेल ओतले. सावकाराच्या घरातले कपडे, तेल सारं काही त्यांच्या कामी आलं होतं. दोघांच्या जळण्यानं सारा मुरबाड परिसर मुक्त होत होता. मग लक्ष्याचं लक्ष मघाच्या त्या पोरीकडं गेलं. लक्ष्यानं आपल्या कमरेचं पातं काढलं आणि सफाईदारपणानं पोरीचे नाक आणि कान कापून घेतले.

तळतळच्या जिवांच्या साक्षीनं गोविंदराव गरजले, ''समद्या चोपड्या जाळून टाकल्या आह्येत, समद्यांची कर्ज माप झाली आह्यात. गोऱ्या सायबाला जो कोन थारा दिल आन ह्या कानची गोठ त्या कानला जाईन त्येचा बिच्चूशेठ व्हईन'' ही आरोळी होत असतानाच बिच्चूशेठ शेवटचा आचका देत होता तर शेखसाहेब हातपाय झाडीत होता.

गोविंदराव मग शेखसायबाच्या घरी पोहोचले. त्यांच्या घरात कोलाहल चालू होता. तोंडावरून उपरणे गुंडाळलेला हा स्वार हा दरोडेखोरांपैकीच आहे असे पाहताच शेखसाहेबाच्या बेगमेने हात पसरून करुणा भाकण्यास सुरुवात केली. ''उनकू मत मारो, भाईजान, उनकू मत मारो!'' गोविंदराव हे ऐकून एकदम गरजले, ''शेखसायबाच्या माणसांली काय कमी पडायचा नही.'' एवढेच बोलून गोविंदराव माघारी फिरले. शेखसायबाची पत्नी काय ओळखायचं ते ओळखली.

एवढे होईतो कोंबडा आरवला होता. अवसेची रात, मोठी दिवाळी चांगलीच साजरी झाली होती. सगळे स्वार पूर्व दिशेकडे नम्र नजर टाकून गोरखगडाच्या दिशेने पसार झाले होते.

* * *

दुसऱ्या दिवशी पाडवा होता. रात्रीची मोठी दिवाळी अनेक घरातून निरखली जात होती. बोबडी वळत होती. भयकंपा निर्माण होत होती. पण दाराआडची प्रत्येक व्यक्ती शेवटच्या होळीच्या प्रसंगानं अन् गोविंदरावांच्या घोषणेनं रोमांचित झाली होती. गावकऱ्यांनी गावात दरोडे पाहिलेच नव्हते असे नाही, पण असा दरोडा ते पहिल्यांदाच अनुभवित होते. पाडव्याच्या प्रसन्न उन्हात शेखसाब थडग्यात गाडला गेला आणि बिच्चूशेठ चितेवर पुन्हा ठेवले गेले. त्या मुलीचे कापलेले नाक अन् कान पाहताना लोकांची हृदये हेलावली होती. गण्या मोठ्या तत्परतेनं दोघांच्या सार्थकाच्या कामी गढून गेला होता. बिच्चूच्या बायकापोरांना त्यांनी आता अभय दिलं होतं. पण बिच्चूची बायकापोरं त्याला शिव्या देत होती. हा उलटा प्रकार गावकऱ्यांच्या ध्यानी येत होता.

हा हा म्हणता पाडव्याच्या दिवशी मुरबाड परिसरात ही दरोड्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली तेव्हा कर्ज बंधनातून मुक्त झालेल्या कर्जदारांना दरोडेखोरांनी दिवाळीनिमित्त दिलेली ही अपूर्व प्रेमभेट वाटली. गावोगावच्या पाटलांनी आनंदोत्सव साजरे केले. मग टिपऱ्यांचे ताल जमले. वारल्यांचे फेर रंगले. ठाकरांचे कांबडावणे दंगले. कोळ्याची लेझीम झाली.

सर्वांच्या मनात एकच प्रश्न होता, ''गोऱ्या साहेबाचा तिरस्कार करणारा, माना

मोडून, जीव घेऊन आयुष्याची बरबादी करून टाकणाऱ्या सावकारांना धूळ चारणारा अन् गोरगरिबांना स्वर्ग प्राप्त करून देणारा, सुख प्राप्त करून देणारा हा दरोडेखोर कोण? कसला हा दरोडेखोर! हा तर गरिबांचा वाली! त्यांचा देव! हा राबणारांचा राजा'' त्याला यश देऊ दे अशी प्रार्थना लोक करीत. हीच तर अपेक्षा गोविंदरावांची होती.

गोविंदराव गावोगाव टेहळणीसाठी लोक पाठवित. लोकांमधील सहानुभूतीच्या बातम्या आल्या की तो लक्ष्याच्या ध्यानात आणून देई. मग लक्ष्या भान हरपून म्हणे, ''खरं रं गड्या.''

सकाळी सूर्योदयाला दमली भागली तुकडी एका जखमीला घेऊन गोरखगडावर आली. त्यांचा तो विजय पाहून आणि आणलेली लूट पाहून सर्वांचे डोळेच विस्फारले होते. केव्हढी प्रचंड संपत्ती सावकारांच्या घशात अडकून पडली होती! अशी दहा हिंदवी स्वराज्य परत उभारण्याची ताकद या संपत्तीत आहे असे उगाच गोविंदरावांच्या मनात आलं, अन् गोविंदराव सुखावले.

दिवाळीचे दोन दिवस सर्वांनी पुन्हा विश्रांती घ्यावी. ज्यांना घरी जाऊन भेटून यायचं असेल त्यांनी यावं असं गोविंदरावांनी सुचविलं, तशी लक्ष्याच्या कपाळी आठी पडली. तो खंबीरपणानं म्हणाला, ''सरदार, आता घोडी घरी फिरतील ती पावसाळ्यातच. घरची आठवण सुदिक इऊ दियाची नाही.'' त्याच्या ह्या बोलण्याला सर्वांनी रूकार दिल्यावर गोविंदराव आणखी सुखावले. ''माझ्या भावानु, तुमी जर असं साथ द्यान त मग छत्रपती राजं पुन्हा अवतार घेत्याल पघा.'' गोविंदरावांच्या या भारावलेल्या बोलांनी सर्वांच्या छात्या फुगल्या. ''हर हर महादेव'' घोषणा झडली आणि मग दिवाळीची हौसमौज दोन दिवस गोरखगडावरच झाली.

* * *

मुरबाडच्या दरोड्याची बातमी कल्याणला कॅप्टनसाहेबाच्या कानावर गेली. तेव्हा त्यांना या दरोडेखोरांचा आचंबाच वाटला. हा दरोडेखोर अजब आहे हे त्यांच्या ध्यानात आलं. त्यांना सहज शिवछत्रपतींच्या सुरत लुटीची आठवण झाली आणि ते गंभीर झाले. दरोड्यांच्या बंदोबस्तासाठी काही हालचाल करावी असे त्यांनी मनी ठरविले. आपला पोलिस अधिकारी मारला ही गोष्ट त्यांच्या मनाला भयंकर लागली होती.

दोन स्वार राधाबाईंच्या घरीही पोचले होते. राधाबाईंना हा सगळा वृत्तांत ऐकताना स्वाभिमानाने भरून आले. स्वारांना जेवूखावू घालून निरोप देतांना त्यांनी मातेच्या ममतेनं बजावलं होतं, ''जिवाला जपून राहा!''

स्वार निघून गेल्यावर किस्नानं आईला प्रश्न विचारून विचारून भंडावून सोडलं होतं. मोहीम फत्ते झाली असं आईनं त्याला सांगितलं. त्याचे बाहू स्फुरले होते. त्याला स्वारीवर जाण्याचा मोह आवरत नव्हता. पण त्याचं वय त्याला घराबाहेर पडू देत नव्हतं.



आई समजूत घालीत होती. सर्वच मोहिमेवर गेले तर आईचं राखण कोण करील? पण पोरगाही हुशार होता. तो अहिल्यादेवींचं उदाहरण देऊन मोकळा व्हायचा. पोराचं कौतुकाचं बोलणं ऐकून राधाबाईंचं मन फुलून जायचं.

इकडे मनमुराद विश्रांतीच्या दिवसात आणखी चारपाच स्वार, जवान टोळीला येऊन मिळाले होते. त्यात बिच्चूकडचे दोन वेठबिगार होते. ''आमाली तुमची वेठबिगारी करायची'' असं त्यांनी सांगितलं होतं. त्यांची परीक्षा पाहताना त्यांना गोविंदरावांनी अन् लक्ष्याने कड्याजवळ उभं केलं होतं.

झाडगडाच्या पायथ्याशी वेढलेलं दाट जंगल. साग, सादडा, उंबर, घावडा, एहेळा, आवळी, किळकिळा, जांभूळ, निंब अशी विविध प्रकारची झाडी. झाडगडच तो. झाडगडाच्या पश्चिमेला झाडांच्या खालून वाहणारा खळखळता वहाळ. वहाळाच्या टोकावर दरीच्या कडेवर म्हसूबाचं स्थान. उघडंच. चार दगडांच्या ओट्यांचं. शेंदूर भोगल्या सुळक्याचं. म्हसूबाच्या पलिकडे. दरीत कोसळणारं शुभ्र पाणी. समोरून जाणारा सापमोडी घाट. झाडीत दिसेनासा होणारा झुडपाझुडपातून डोकावणारा. पुढची दरी उतरून जाणारा. समोर डोंगराच्या खोबणीत गडप होऊन कल्याणकडे पळणारा.

* * *

म्हसूबाच्या चौथऱ्यावर भरभक्कम पिळदार, तगडा, राकट, लिंबमावत्या मिशांचा. झिपऱ्या झिपऱ्या भिवयांचा. खालच्या जाड ओठांचा. टिळा लावल्या कपाळाचा वाळ्या कोळी आणि त्याच्या बरोबरीचे दोन स्वार घाटाकडे टकत होते. येऊन प्रहर झाला होता. वाट पाहणे संपत नव्हते. धोका तर होणार नाही? अशी शंका वाळ्याच्या मनात क्षणभर उभी राहिली पण मग त्याच्याच मनानं शंकेचं ठाम निरसन केलं. असं काही कधीच घडलं नव्हतं. अनुभवांनी त्याला बजावलं. इसूफखान पठाण. मुसलमान. नेक माणूस. दरोडेखोरांना बत्ती दारू पुरविण्याचा त्याचा धंदा. बंदुकीसाठी काडतुसे तो कशी मिळवी कोणास ठावूक? त्याचं हे गुपित त्याला कधी कोणी विचारलं नव्हतं. प्रत्येकवेळी पुढच्या वेळचा ठिकाणा वेगळा ठरे. तो तेथे बिनबोभाट येई. दारूबत्ती देई. मग तो एका दिशेला आणि गिऱ्हाईक दुसऱ्या दिशेला, कसे निघून जात कळतही नसे. कोकण आणि देशावरच्या अनेक दरोडेखोरांशी इसूफखान पठाणचा परिचय होता. पण त्याला कोणी जहागिरी देऊ केली असती तरी त्यानं आपलं इमान विकलं नसतं आणि तरीसुद्धा सूर्य डोक्यावर येतो नाही तोच येण्याचा वायदा केलेला इसूफखान अजून घाटाच्या सीमेवरही दिसत नव्हता. म्हणूनच वाळ्या चिंतेत पडला होता. दारूबत्ती मिळणे आवश्यकच होते, नाही तर तो केव्हाच निघून गेला असता. त्याने आपल्या बरोबरच्या स्वाराला विचारले, ''काय रं गड्या, अजून इसूफखान येत नाही, काय मेलाक काय?'' पण तेव्हढ्यात समोरच्या डोंगराच्या खोबणीत काहीशी हालचाल झाली. मग उंचापुरा काळा घोडा खिंडीतून दवडताना

दिसला. पाठीच्या दोन्ही बाजूला दोन गोण्या लटकत होत्या. वर इसूफखान बसला होता. इसूफचा घोडा ठरलेलाच होता. त्या घोड्यावर त्याचा आतोनात जीव. घोडा कुठेही सोडावा लागला तरी तो एकटाच इसूफच्या ठाण्यावर जाई हे त्याचं वैशिष्ट्य होतं. घोडा दौडत होता. पण वाळ्या एकदम चमकला. इसूफ थोडा पुढे सरकतो तोच खिंडीतून चारपाच स्वार त्याचा पाठलाग करीत आले. एकाच्या डोकीवर उंच टोपी वाळ्याला लांबूनच दिसली. बाकीची मुंडासीच होती. वाळ्याला अंदाज लागणं अशक्य होतं पण तरी पाठोपाठ येणाऱ्या स्वारांचा अर्थ तो उमगला. इसूफ अडचणीत सापडलाय हे त्याने ओळखले. एव्हढ्यात इसूफचा घोडा झाडांच्या दाट गर्दीत कुठे दिसेनासा झाला कळलेच नाही. पाठोपाठ मागचे स्वारही दाट झाडीत शिरले. बंदुकीच्या टप्प्यात असूनही मागचे स्वार इसूफला गोळी का मारीत नाहीत, याचा विचार सहज वाळ्याच्या मनात आला आणि तो चमकलाच. आपला माग काढण्यासाठीच ते प्रयत्न करत असावेत हे त्याच्या सहजच लक्षात आले. आपल्या बरोबरच्या दोघांना ''निंगा रं'' असे म्हणून त्याने आपली बंदूक सरसावली. साथीदारांच्या लक्षात आले आणि तीन घोडी सुसाट दाट झाडीचा वेध घेत पळू लागली. वाळ्या पुढे, स्वार मागे. ऐन दरीत वाळ्याची अन् इसूफची गाठ झाली. इसूफच्या नजरेला नजर भिडताच इसूफने नेत्रपल्लवी केली. वाळ्या आता चांगलाच उमगला. इसूफनेही आपला घोडा फिरविला आणि समोरून येणाऱ्या पाच घोडेस्वारांना चौघे सामोरे झाले. अचानक घडलेला हा प्रकार पाहून टोपीकर गडबडला होता. त्याने आपली घोडी झाडाच्या आड लपविण्याचा प्रयत्न केला. पण त्या अगोदरच दोन स्वार वाळ्याने अचूक टिपले होते. मग झाडांच्या आडोशाने बंदुकांच्या फैरी सुरू झाल्या. दरीतून एकेका स्वाराचे प्रतिध्वनी उमटू लागले. सात-आठ जणांत चाललेले हे युद्ध जणू दोन टोळ्यांत चाललेले आहे असा भास दरीत निर्माण झाला होता. आणि टोपीकराच्या बंदुकीतून हणम्याच्या छातीला जाऊन भिडणारी गोळी सुटली. वाळ्याबरोबर आलेला हणम्या आकांताने ओरडून जमिनीवर कोसळला. आता मात्र वाळ्या खवळला. इसूफखानही पेटून उठला. एका पाठोपाठ एकेक गोळ्या सुटू लागल्या. एक, दोन, तीन, पाच पन्नास पण कोणी तडाख्यात सापडेना. कोणालाही वेध भिडेना. तेव्हढ्यात टोपीकराने कसलासा इशारा केला आणि घोडी उलट दिशेने पुन्हा सुसाट पळू लागली. वाळ्या, इसूफ आणि त्याचा साथीदार घोड्यावर मांड ठोकण्यापूर्वीच घोडी बरीच लांब दौडली होती. पण वाळ्याचा निश्चय पक्का होता. त्याने आपल्या घोड्याला जोरदार टाच दिली तसा इसूफलाही चेव आला आणि घोडी चौखूर उधळली. आपला पाठलाग होतो हे लक्षात येताच टोपीकराने कसल्याशा छोट्या हत्याराचा उपयोग केला होता. सण्ण आवाज करीत काहीसे कानाजवळून दूर जाताना वाळ्याला जाणवले आणि वाळ्याची बंदूक कडाडली. एक स्वार खाली पडला पण टोपीकराला गोळी भिडेना. दोन्हीकडून गोळ्या सुटत असताही टोपीकर अंगविक्षेप करीत बरोबर गोळ्या चुकवीत पळत होता. पुन्हा पुन्हा आपल्या शुभ्र घोड्याला टाच देत होता. शेवटचा निकराचा प्रयत्न म्हणून वाळ्याने नेम धरून गोळी मारली. इसूफच्याही बंदुकीतून गोळी सुटली. इसूफच्या



गोळीने उरल्या स्वाराचाही वेध घेतला होता. पण वाळ्याच्या गोळीने टोपीकराचा दंड फोडला होता. तशाही अवस्थेत टोपीकर बेफाम वेगाने पळून गेला. मग मात्र इसूफने परतण्याचा सूज्ञ सल्ला दिला. परत निघताना माहिमच्या खाडीतल्या दरोडेखोरांनी इसूफच्या मागे हा ससेमिरा लावला होता हे वाळ्याला कळले, पण नुकत्याच घडलेल्या प्रकाराने हा टोपीकर पोलिस अधिकारी पुन्हा आपल्या वाटेस जाणार नाही असेही वाळ्यास वाटत होते. जाताना हणम्याच्या प्रेताजवळ तिघेही थांबले. वाळ्याने हणम्याचे प्रेत आपल्या पुढ्यात घोड्यावर टाकले. हणम्याचा घोडा तेथेच खिंकाळत उभा होता. मग यूसूफच्या घोड्यावरील हवा असेलला माल हणम्याच्या घोड्यावर चढवून वाळ्या, हणम्या अन् त्यांचा साथीदार तिघे म्हसुबापासून दूर झाडगडाच्या रानात दिसेनासे झाले. इसूफने आपला घोडा कल्याणच्या दिशेने वळविला. हणम्याचे प्रेत घेऊन जेव्हा वाळ्या लक्ष्याच्या समोर उभा राहिला, तेव्हा लक्ष्या अंतर्बाह्य पेटला, दात ओठ खात तो स्वतःशीच पुटपुटला, ''अरं तुह्या बायली, टोपीकरा माझ्या म्होरं ये रं!'' गोविंदराव शहारले होते. आपला एकेक साथीदार गेला की त्यांना अतिशय दुःख होई. एकेक इमानी साथीदार मिळवितांना कमालीचे कष्ट होत. पण आज इसूफला वाचविणेही आवश्यकच होते. पण त्याहीपेक्षा त्यांना दुःख झाले ते या देशातल्या बेशरम फितुरीचे. ज्याच्या जीवावर दारूबत्ती घेऊन जीव जगवला. त्याच्याच जीवावर आज दरोडेखोर उठले होते. टोपीकराच्या नादानं त्यांची नजर शून्यात काहीतरी शोधीत होती. वाळ्याने दारूबत्तीच्या पोतड्या समोर टाकल्यावर ते भानावर आले.

* * *

उन रणरणत होतं. घामाच्या धारा, अंगात कपडे नकोसे. अनेकांची अंग उघडीच. मागांचे आवाज 'सटक् शीड् साट् सट्, सट् सटक्'' कापड तलम. मऊ मऊ. धागा लांब. पक्का चिवट. गल्ली गल्ली मागांच्या गर्जनांनी गजबजलेली. एका बाजूला भक्कम पांढऱ्या इमारती. हिरवी दारे, लाल पिवळ्या रंगाची तावदाने. घरांच्या बाजूला घुमटांची आणि चार मनोऱ्यांची एक मशीद. सब्जाचा सुगंध सर्वत्र दरवळला. बाजूला एक प्रचंड वाडा. चिऱ्यात बांधलेला चुनेगच्ची गिलाव्याचा भव्य. चौकोनी खांबांचा सुबक सुंदर कुसरीचा. खिडक्यांना हिरवे पडदे. पडद्या आतून वाळ्याचे पडदे. ओलेचिंब. सुख सुवासिक. प्रवेशद्वारावर उर्दू अक्षरे. दरवाजाला दिंडी. इमारतीच्या चारी कोपऱ्यावर उंच सुडौल मनोरे. उतरत्या कौलारांना सावरणारे. गजल्याच्या खिडक्यामधील भिंतीवर हिरव्या रंगात रंगविलेल्या सुंदर डेरेदार फुलझाडांच्या कुंड्या. त्यावर निरनिराळ्या पक्ष्यांच्या आकृती. इमारतीच्या बाहेर बसक्या सलग कौलारू ओवऱ्या. शिपायांच्या चौक्या. सरदार, वझीर, नबाबसाब येथे राहत. सरदार! वझीर! नबाबसाब! कोणी लष्करी अधिकारी किंवा खरा हुद्दाधारी नाहीच किंवा सुभेदार, किल्लेदार असा कोणीच नव्हता. त्याचा जडजवाहिर याचा धंदा होता. राजेरजवाड्यांना जवाहिर पुरवण्याचा त्यांचा धंदा होता. भरपूर संपत्ती. व्यापार मोठा. संरक्षणासाठी पाचपंचवीस

बंदुकधारी शिपाई खाजगी दिमतीला. शहापूरच्या एक बाजूला हा वाडा! मोठ्या डौलात अन् झोकात उभा. गोऱ्या साहेबाच्या ठाणे, कल्याण, डहाणू, पालघर या भागात फेऱ्या सुरू झाल्या की याने साहेबाचा शौक, नोक, झोक ओळखून त्यांच्याशी जवळीक साधायची. जनरलपर्यंत त्याच्या ओळखी. दरबारी त्याचा मोठा रूबाब. नवाबसाहेब हे मोठेच प्रस्थ होते. सुभेदार, सरदार, किल्लेदार, नाईक यांच्यात व साहेबात मध्यस्थी करण्यात त्याचा मोठा पुढाकार असे. ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, नासिक, जावळ भागातील जुन्नर, शिरूर आणि अन्य कितीतरी शहरात अन् मोक्याच्या जागी त्याच्या पेढ्या होत्या. पण कायम राहण्याच्या दृष्टीने जंगलाच्या जवळचे, दऱ्याला आणि दरियाला जवळचे असे हे ठिकाण त्यांनी मुद्दामच निवडले होते. कोकणात जाण्याचा हा मोक्याचा मार्ग सह्याद्री उतरून येऊन दरियाकडे जाणारा.

अनेक कृष्णकृत्ये नवाबांच्या वाड्यात चालत असत. नबाबांचा आणखी एक धंदा होता. टंच, तरण्या. खुबसुरत लडक्यांचा व्यापार. हा व्यापार तर फार मोठ्या प्रमाणावर चाले. त्यासाठी त्यांना कल्याणच्या हवेलीतील कस्तुराबाईची मोठीच मदत होई. नवाबसाहेब थोरामोठ्यांच्या जनानखान्यात अंतःपुरात, रंगमहालात, रंगभरी कोकणातलं सौंदर्य, समुद्रातली चमचमती मासळी, ते सहज कोणालाही देऊन तृप्त करीत.

नवाबसाब म्हणजे उमदा माणूस. बग्गीतून त्याची स्वारी निघाली की शहरातले लोक त्याला लवून भजून सलाम करीत. त्याची मेहरनजर ज्यावर जाई त्याचे सोने होई (?) नवाबसाहेबांनी कित्येक मशीदी आपल्या हातानं उभ्या केल्या होत्या. अनेक ठिकाणी पाणपोया नवाबसाहेबाच्या नावानं चालत होत्या.

नवाबसाब जेव्हा ठाणे आणि कल्याणच्या खाडीवर, कधी माहीमच्या खाडीवर असत तेव्हा त्यांचा रूबाब मोठा और असे. कित्येक गोऱ्या सोजिरांनी त्यांना सलाम ठोकल्याचं कोळ्यांनी पाहिलं होतं. सुरतेपासून रत्नागिरी अन् पोर्तुगिजांच्या गोव्यापर्यंत त्याचे संदेश जात असत, त्याच्या मालाची - जड व जवाहिऱ्यांची ने-आण चालत असे.

लेफ्टनन फूट आणि नवाबसाब यांची दोस्ती आता गोऱ्या सोजिरांना माहित झाली होती. तो जेव्हा त्याच्या परिसरात प्रवास करी तेव्हा त्या दोघांची उत्तम मैफल जमे. लेफ्टनन फूटला घोटीव, मोठमोठ्या मासळीचा चांगलाच शौक होता. नवाबसाब त्याला अगदी खुश करून टाकी. सायबाच्या पेल्यात मदिरेचा घोटा घेताना नवाबही अगदी बरसून जात असे. त्यांचा त्या वेळचा अवतार विशेष असे. रातराणीच्या फुलांचा गजरा ते आपल्या तलम रेशमी अंगरख्याला मनगटाशी बांधीत. गळ्यात मोत्याचा कंठा असे. त्यांच्या सर्वांगाला विविध प्रकारची अत्तरे लावलेली असत. त्यांच्या रंगमहालात जमलेल्या या मैफलीत चांदीच्या सुरईतून विलायती मदिरा नक्षीदार चषकातून ओतली जाई अन् त्यांच्या मांडीवर बसून मदिराक्षी तो चषक त्याच्या ओठाला लावी. त्यांच्या त्या महालात मग तबला, पेटी, सतार यांचे तालसूर निघत. त्यात गोड गळ्यातून इश्काची आतषबाजी होत असे. मग कोळ्यांची पोरं लेफ्टनन फूटची आवडती त्याच्या पुढं जाळं टाकी. रात्र रंगून जाई. दुसऱ्या दिवशी एतद्देशीयांची सत्ता उद्ध्वस्त करण्याच्या मसलती होत.

ले. फूटने नवाबसाहेबाला एक खास साहेबी पोशाख नजर केला होता. तो पोशाख घालून मिशीवर अन् कोरीव दाढीवर सुगंधी हात फिरवत आपल्या चंदेरी घोडीवरून नबाब फिरून येई. नवाबसाहेबाला शिकारीचा फार नाद. त्याने डुक्कर, पट्टेरीवाघ, बिबळे वाघ यांच्या कितीतरी शिकारी केलेल्या. त्यांच्या स्वतंत्र शिकार दालनात त्याचे पुरावे ठेवलेले.

एकच गोष्ट नवाबसाहेबाची विचित्र होती आणि ती म्हणजे नवाबाच्या दहा बारा बिबीपैकी शहापूरच्या नबाबवाड्यात कोणीच नव्हते अन् याच वाड्यावर नबाबसाहेबांचा नेहमी मुक्काम असे.

नवाबसाहेबांच्या वाड्यातून रात्री अपरात्री कितीतरी किंकाळ्या, चित्कार ऐकू येत पण शहरातली मंडळी कधीच तिकडे लक्ष देत नसत. शहरात बडे गुजराती व्यापारी पुष्कळ होते, पण त्यांचा नबाबाला किंवा नबाबाचा त्यांना कधीच त्रास नव्हता.

शहरात एक जहागिरदार त्याची गढी. जहागिरदार रुस्तमखान त्याची जहागिरी जुनी. त्याच्या जहागिरीत एकवीस गावे. त्याच्या गढीत लोकांची वर्दळ. रुस्तमखान म्हणजे मोठा दिलदार माणूस. त्याच्याकडे गेलेल्या कोणालाही न दुखावणारा. त्याच्या आश्रयाने कितीतरी लोक जगत होते. त्याची जहागिरी केवळ नावापुरतीच शिल्लक होती. तरी त्याचा स्वभाव लोकांच्या कामी येई. पण अलिकडे नवाबसाहेबांशी त्याची बरीच ये-जा सुरू होती. नवाबसाहेब देखील बग्गीतून त्याच्याकडे जात असत. नवाबसाहेबाच्या दोस्तीनं त्याच्या वागणुकीत फरक पडू लागला होता. एकदा तर त्याच्या जहागिरीतल्या पाटलाच्या पोरीचीच सरळ मागणी केली. त्या कोळी पाटलाने साफ नकार दिला. पण त्याची पोरगी हातोहात पळविली गेली. नवाबसाहेबाला नजर केली गेली. त्या प्रकाराने लोकांच्या मनात एक प्रकारची साशंकता निर्माण झाली होती. लोकांची ये-जा देखील थांबली होती. पंडित बम्मन तर आता त्याच्याकडे फिरकेनासा झाला होता. त्या पंडित बम्मनला सुभेदाराकडून दोन गावे इनाम म्हणून मिळाली होती. त्यांचा ज्योतिषाचा अभ्यास दांडगा होता. पंडित बम्मनची जहागिरदाराकडे अगदी बैठक असे. गावात आणि वाड्यापाड्यावर देखील पंडित बम्मनविषयी एक प्रकारची आदराची भावना होती. पण पंडित बम्मन आता अगदी नवाबसाहेब आणि जहागिरदारावर चिडून होता. त्याच्या दुबळ्या हातात करण्यासारखं काही नव्हतं पण तरी त्या दोघांविषयी हिंदूतच नव्हे तर मुसलमानातही त्याने विषवल्ली जरूर पेरली होती. असे असूनही कधी कधी नवाब देखील पंडित बम्मनच्या घरी येऊन मसलतीचा सल्ला विचारी. त्याच्या मसलतीचा त्याला चांगलाच अनुभव होता.

आज त्या रणरणत्या उन्हात एक स्वार शहरात शिरला होता. त्याने थेट नवाबसाहेबांच्या वाड्यावर आपला घोडा वळविला होता. चौकांवर शिपाई उभा होता. त्याने नवाच स्वार पाहून हटकले, 'साहेबके पास आये' असे म्हणताच शिपाई काय समजायचे ते समजला आणि त्याने त्यास आत सोडले. प्रत्येक ठिकाणी असेच सांगत तो

स्वार थेट नवाबाच्या रंगमहालात पोहोचला. नवाब वाळ्याच्या ओल्याओल्या पडद्यांमधून येणाऱ्या वाऱ्याच्या थंडगार झुळका आपल्या अंगावर अनुभवत होता. महालात तो एकटाच होता. त्याला झोप लागू पहात होती. पण आत एकदम आलेल्या व्यक्तीला पाहून तो दचकलाच. आज हा स्वार एकदम आपल्यापर्यंत कसा आला हे त्याला कळलेच नाही.

स्वाराने एक बंद थैली नवाबाच्या हाती दिली. आणि ''साबने दिया है।'' असे म्हणून तो तेथून सूं झाला. तो आल्या मार्गाने एकदम का निघून गेला हे कळायच्या आतच तो आपल्या घोड्याला टाच देऊन निघूनही गेला.

नवाबाने लखोटा उघडला आणि आत असलेल्या कागदावरील मजकूर पाहून तो थरथरू लागला. त्याचे डोळे इंगुळले. मुठी आवळल्या गेल्या. त्याने नोकरावर आणि शिपायांवर आगपाखड सुरू केली. त्याचा तो थयथयाट पाहून वाड्यावरील सर्वच लोक हादरून गेले. एकाने धिटाईने ऐकविले. ''आपने धिरजसे और हुशियारीसे काम लेना चाहिए। '' त्याचे हे बोलणे योग्यच होते. नवाब खिडकीत येऊन दूरवर जाणाऱ्या रस्त्याकडे न्याहाळीत उभा होता. अजून एक दिवस होता. त्याला असे उघड आव्हान देणारा अजून कोणीच भेटला नव्हता. म्हणूनच घाबरण्यापेक्षा तो चिडला होता. त्याला काय करावे ते समजत नव्हते. त्याच्याजवळ पाचपंचवीस शिपाई होते. तरी त्याने भागणार नव्हते. भिवंडी, ठाणे, कल्याणहून फौज मागवायची तर काम सोपे नव्हते. पल्ला जवळचा असला तरी कोण्या दरोडेखोरासाठी त्यानं फौज आणणं आणि ती येणं हे दोन्ही अपमानास्पद वाटत होती. त्याने मनाशी काही निश्चय केला. आणि एका शिपायास जहागिरदार आणि पंडित बम्मनला बोलावून आणण्यास सांगितले.

नवाब, पंडित बम्मन आणि जहागिरदार यांची मसलत झाली. जहागिरदाराने आपणाजवळ असलेले वीस पंचवीस शिपाई तयार ठेवायचे ठरविले होते तर पंडित बम्मनने त्यास ''हुशियारीसे काम लो'' एवढाच सल्ला दिला होता. शहरचा मोठा चौकीदार पाचपंचवीस फौज बाळगून होता. त्याचा आश्रय घ्यावा असे ठरले. मग बडा चौकीदार वाड्यावर आला. त्याने नेहमीप्रमाणे, ''आप बहोत घबडाये हो, ऐसे लोग कभी बताके आते है क्या?'' असे म्हणून नवाबसाहेबालाच मूर्खात काढले होते. पण त्याच्या बोलाने नवाबसाहेब थोडा सुखावला होता. हळूहळू रात्र झाली तसा नवाबने एक नवाच निश्चय केला आणि त्याने दोन स्वार भिवंडीला पाठविले. तेथून त्याने शंभर शिपायांची एक पलटणच बोलावली आणि साहेबांपर्यंत बातमी पोचविली. आता तो निर्धास्त झाला होता. असलेली सारी संपत्ती, मौल्यवान जडजवाहीर त्याने सुरक्षित जागी ठेवले होते. ते कोणाच्याही हाती लागणार नाही याची त्याने व्यवस्था केली होती. मोठमोठ्या लोकांच्या मसलती घडविणारा नवाब या क्षुल्लक गोष्टीसाठी घाबरणार होता थोडाच!

पंडित बम्मन मात्र मोठा हुशार. कोठेही गोष्ट सांगायची नाही असे ठरूनही त्याने अनेक व्यापारी, कष्टकरी, सूत कापड गिरणीवाले आणि गावातली अन्य माणसे यांना येणाऱ्या संकटाची जाणीव दिली. पंडित बम्मन खरा मनातून सुखावला होता. नवाबाचे



अत्याचार आणि मुख्य म्हणजे मुलींचा व्यापार त्याला अजिबात आवडत नसे. नवाबाचा बंदोबस्त झाला तर त्याला हवाच होता. पण तो सत्तेकडून व्हायला हवा होता. दरोडेखोरांकडून नव्हे आणि 'दरोडेखोरांची काय ताकद असणार?' असा विचार करून तो मनाशी म्हणाला होता ''काय उपयोग या केवळ दरोड्यांचा? चारजणांचे खून अन् अत्याचारात भर'' पण घोटीचा दरोडा त्याच्या कानावर आला होता. तोच दरोडेखोर असेल तर नवाबाची ताकद अजमावल्याशिवाय ऱ्हायचा नाही. हेही त्याने मनोमन जाणले होते.

दुसऱ्या दिवशीच्या रात्री काय होणार याकडे नवाबाचे लक्ष होते. तो सायंकाळपासूनच वाड्यात चकरा मारीत होता. सारे शिपाई जय्यत तयारीत होते. शिपायांची संख्या वाढलेली होती. पण अजून भिवंडीहून कोणीही आले नव्हते.

* * *

रात्र झाली. किट्ट अंधार. घरातील दिव्यांचा प्रकाश फक्त बाहेर डोकावित होता पण गावात आज जागोजाग टेंभे पेटविले होते. रात्रीच्या पहिल्याच प्रहरात घोड्यांच्या टापांचे आवाज ऐकू येऊ लागले. सारे सावध झाले होते. पण स्वार गावात येताच त्यांनी इशारतीचा टेंभा हलविला. भिवंडीहून पन्नास जणांची फौज आली होती. शहराची नाकेबंदी करण्यात आली. मोर्चे बांधण्यात आले. आता मात्र नवाबसाहेब पूर्ण निर्धास्त होते. आता येणार कोण होते? भरपूर हत्यारे, दारूगोळा बरोबर घेऊन भिवंडीहून फौज आली होती. त्याच्याही फौजेजवळ सुमारे पंधरा एक बंदुका सज्ज होत्या. रात्र वाढत गेली. मध्यरात्र झाली. टेंभ्यांच्या प्रकाशात जोरात गस्त चालू होती. 'सर्व ठीक' आरोळ्या इशारा करीत होत्या. मध्यरात्र संपून आता सूर्याकडे रात्रीचे डोळे लागले. पहिला कोंबडा आरवला. अखेर फटफटले. पण कोणीच आले नाही आणि नवाबखानला आणखीच राग आला. कोणीतरी त्याचा घोर अपमान केल्यासारखे वाटू लागले. त्याने खालच्या मानेने भिवंडीची फौज मागे पाठवून दिली. आणि त्याने नित्याप्रमाणे सावधानतेचा इशारा दिला. पाचसात गस्तकरी मागे ठेवून फौज निघून गेली होती.

नवाबाचा संपूर्ण दिवस आळसात आणि आपल्या झालेल्या क्रूर चेष्टेच्या विचारातच गेला. संध्याकाळ झाली तसा त्याने आपल्या रंगमहाली सुरईचा मांड घातला. मनसोक्त काजूगराची मदिरा त्याने प्राशन केली आणि दोन मुर्ग्यांचे मांस भक्षण केले. तो जेवण उरकून पान जमवत होता. तोच त्याच्यावर फडक्यात बांधलेला एक गोटा आदळला. त्याने त्वरेने उठत तो गोटा उचलला. फडक्यात बांधलेल्या गोट्याच्याबरोबरच एका कागदावर काही मजकूर लिहिलेला होता. तो मजकूर पाहून त्याची मदिरा उतरली. त्याने पुन्हा आरडाओरड सुरू केली. त्याने सर्वांना सज्ज राहावयास सांगितले. आता गेलेली फौज परत येणेही शक्य नव्हते. तरी नवाबाने सर्व शहरात मोक्याच्या जागी पलिते पेटवून ठेवण्याची व्यवस्था केली.

कालच्या प्रकाराच्या बातम्या शहरात पसरल्या होत्या. शहरवासी भयभीत होऊन आता पुढे काय होते याचा विचार करीत होते. हळूहळू दिवस सरला. रात्र झाली. गूढता वाढू लागली.

नळदुर्गाच्या जंगलातून चांगले शंभर सव्वाशे स्वार साऱ्या तयारीनिशी निघाले होते. त्यांच्या चार तुकड्या व्यवस्थित तयार करण्यात आल्या होत्या. तुकडीचे प्रमुख नेमून देण्यात आले होते. आज मोहिमेचे प्रमुखपद गोविंदरावांनी स्वतः घेतले होते. कुशल सेनानीच्या थाटात ते आपल्या स्वारांना सूचना देत होते. नेहमीच्या युक्तीप्रमाणेच संपूर्ण शहापूर त्यांनी चारी बाजूंनी वेढले. हळूहळू चारी टोळ्या पुढे पुढे सरकत होत्या. पण प्रत्येक नाक्यावर कोणी ना कोणी तरी आहेच हे लक्षात येताच आपल्या बंदुकांना अन् तलवारींना जोर चढला. गोविंदरावांच्या तुकडीने तर जी मुसंडी मारली तो थेट नवाबाच्या वाड्यावर. पण वाडा कडेकोट बंदोबस्तात बंद आहे हे लक्षात आले आणि गोविंदरावांनी दिसेल त्याला ठार करण्याची आज्ञा दिली. एकच गर्दी झाली. कापाकाप, ठाय ठी, ओरडाओरडी, खिंकाळ्या, किंकाळ्या, आवाज आसमंतात भरून दाराआडून पाहणाऱ्यांच्या काळजाचे ठाव घेऊ लागले. आतापर्यंत तिकडे वाळ्याने जहागिरदारास ठार करून त्याचा फौजफाटाही संपवला होता आणि तेही गोविंदरावांच्या मदतीला धावले, पण वाड्याचा दरवाजा उघडण्यात गोविंदरावांना अजून यश आले नव्हते. गोविंदरावांनी मग लक्षाच्या थाटात गर्जना केली, ''नवाब बाहेर नीघ नाही तं तुझ्या सगट समदा वाडा जाळून टाकणार.'' दोन तीन वेळा असे दरडावूनही नवाब दरवाजा अडवून आहे हे लक्षात येताच मोठ्या प्रयासाने एक मोठा ओणका पाचपंचवीस जणांनी धरला आणि धावत जाऊन दरवाजाला ठोस द्यावयास सुरुवात केली. तो काय झाले ते कळावयाच्या आतच एकदम दार उघडले गेले आणि एकदम ओणक्यासह दहाबाराजण आत लोटले गेले. अन् ओणका खाली आदळला. आतून पाचसात बंदुका कडाडल्या होत्या त्यामुळे पाचसात जण प्राणास मुकले होते. ओणका खाली पडल्याने चारपाच जणांचे पाय जायबंदी झाले होते. तोच मागून जोरात फैरी झाडण्याचा आवाज आला आणि गोविंदराव आणि वाळ्याची तुकडी अडचणीत सापडली. आतून फैरी झाडीत होते तर पाठीमागूनही आवाज निघत होते. गोविंदरावांनी मग निर्वाणीचा इशारा दिला. आणि मग असलेल्या सर्वांनी कोठेकोठे दडून जोरात निशाणेबाजी सुरू केली. आतले दोन तीन कोलमडले. पण तेवढ्यात वरच्या मजल्यावरून वार होऊ लागले. आज बंदुकांच्या फैरी झाडूनही अजून यश येत नव्हते. इतक्यात अडकून पडलेले लक्ष्याचे टोळीवाले दौडत आले आणि जोरात नेमबाजी सुरू झाली. बाहेर शहराच्या एका बाजूला लक्ष्याची अन् रामाची फौज केवळ दोन दोन हवालदारांनी तटवून ठेवली होती. त्यांचेजवळ नामी बंदुका होत्या. त्याचबरोबर जवळ जाणाऱ्या शिपायांवर एकदम कुठल्याशा लहान हत्यारातील गोळीचा प्रहार होई अन् तो खिंकाळी ठोकून कोसळे. असे दहाबारा लोक आतापर्यंत गेले होते. आजपर्यंत लक्ष्याला असा अनुभव आला नव्हता. तो मनोमन अतिशय चिडला होता. म्हणूनच तो वाड्याकडे येताच कोणताही विचार न करता तो



गोविंदरावांच्या पुढे वाड्यात शिरलाही. त्याने दिसेल त्याला गोळी घालावयाला सुरुवात केली. अनेक स्त्रियांच्या आर्त किंकाळ्या वाड्याबाहेर ऐकू येत होत्या. गोविंदरावांना त्वेष आला आणि तेही तीरासारखे आत घुसले आणि त्यांना नवाब सापडला. तो त्यांना दाराआडून गोळी घालणार तोच गोविंदरावांनी एका झेपेसरशी त्याची बंदूकच ओढली होती. हातातली बंदूक पडताच तो धावू लागला. तो पुढे आणि गोविंदराव मागे अशी स्थिती झाली. अखेर गोविंदरावनी आपला निशाणा बरोबर टिपला. नवाबाच्या मांडीत गोळी खोलवर गेली होती. त्याने एकदम मागे वळून पाहिले आणि तितक्याच जोराने गोविंदरावांवरच हल्ला केला. आणि तो आत कोठे तरी हरपला होता. गोविंदरावांनी तो पळत असतानाच दुसरी गोळी सोडली पण नवाब ती गोळी झेलायला तेथे नव्हताच. नवाब पळून जाताच अन्य चार शिपाई शरण आले.

सबंध वाड्याची छाननी झाली. अमाप संपत्ती मिळाली पण त्याचबरोबर वीसपंचवीस बंदुका मिळाल्या. लक्ष्याने याच गोष्टींवर अधिक भर दिला होता. सर्वांना एकत्र करून समाधानाने आपल्या शिपायांची मोजदाद केली. गोविंदरावांचे पंचवीस लोक ठार झाले, पण या मोल देण्यानेही अजून नवाब सापडला नव्हता. लक्ष्याचे डोळे गरगरत होते. त्याला आपले लोक गेले याचेच दुःख अधिक होते. तर गोविंदरावांना तो नवाब सापडलाच पाहिजे असे वाटत होते. युद्ध म्हटले की आपल्याकडचे काही संपणारच हे गोविंदरावांना कळत होते. लक्ष्याला मात्र ते सहन होत नव्हते. शरण आलेल्या शिपायांकडून सर्व होती नव्हती ती संपत्ती बाहेर काढण्यात आली. संपूर्ण वाडा खाली झाला. हव्या त्या सगळ्या वस्तू बाहेर काढण्यात आल्या होत्या. आता जास्त वेळ काढण्यात अर्थ नाही असे लक्ष्याला वाटत होते. पण गोविंदराव ऐकेनात आणि मग संपूर्ण वाडा जाळून टाकायचे ठरले आणि वाडा पेटला. एक वाडा पेटताच गोविंदरावांचे लोक गढीकडेही गेले. गढीही पेटली. वाड्याला गोविंदरावांच्या शिपायांनी कडे टाकले होते. तळातल्या तळघरांच्यावर चार-पाच ठिकाणी एकदम आगी लावल्या होत्या. त्यामुळे नवाबसाब पटकन बाहेर येण्याची शक्यता होती म्हणून हे कडे टाकलेले होते. आणि तसेच घडले. ज्वालांपासून बचावताना नवाबसाहेबानी आग्नेयेकडील गुप्तमार्गाचा अवलंब केला होता. पण हाय! तेथेही गोविंदरावांचे सैनिक होते. नवाब खुरडत खुरडतच तेथपर्यंत आला. त्याने आतूनच बाहेर उभे असलेले शिपाई पाहिले आणि एक वेध घेतला पण नेमक्या त्याच वेधाने एक शिपाई गेला, तरी नवाब सापडला आणि नवाब संपला. मोहिम पूर्ण झाल्याचे समाधान गोविंदरावांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. आपल्या सर्व माणसांची प्रेते आणि घोडी बरोबर घेऊन चांगला दिवस उगवण्याच्या बेतास स्वार कसारा घाटाच्या बाजूला अंतर्धान पावले.

शहरातील आग विझविण्याचे प्रयत्न निष्फळ ठरले होते. सागवानी लाकडात सुबक बांधलेला नवाबसाहेबांचा वाडा अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडला होता. शहरवासी शांतपणे गगनाला भिडणाऱ्या ज्वाला निरखित होते. रात्री होणाऱ्या गोळीबार अन् कापाकाप यांची भीती आता दूर पळाली होती.

घाटात दूर पळून गेल्यावर आपल्या साथीदारांचे सार्थक करण्यात आले. गोविंदराव यांनी साथीदारांच्या घरोघर मोठा ऐवज पोचविण्याची जबाबदारी वाळ्यावर टाकली. कोणीही उपाशी राहता कामा नये हा त्यांचा कटाक्ष होता. पण त्यापेक्षा त्यांनी दिलेला निरोप फारच रोमांचकारी होता. ''त्यांच्या बायका पोरांली सांगा तुमचा बापय दरूडेखोर नव्हता, तो स्वराज्यासाठी लढत व्हता. त्याचं सार्थक झालं हाय!'' या सगळ्याच गोष्टी लक्ष्याला नवीन होत्या. त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले. एका दरोडेखोराचा स्वराज्याचा सैनिक बनला होता. गोरगरिबांचा धनी बनला होता.

* * *

गेले चार-पाच महिने सतत मोहिमा करून ठाणे सुभ्यात अन् नासिक परिसरात त्यांनी भरपूर गोंधळ उडविला होता. आत्तापर्यंत वीसएक मोहिमा यशस्वीपणे पार पाडल्या होत्या. वर्षभरातली ही शेवटचीच मोहीम होती, मग सारेजण आपल्या घरोघर पावसाळ्यातील कामांकरिता जाणार होते. जमिनी तयार करावयाच्या होत्या. आपण कोठे कामावर गेलो आहोत असे सांगून कित्येक शिपाई घर सोडून आले होते. दऱ्याडोंगरांच्या अवघ्या परिसरातून शे-दीडशे लोक प्राणांची बाजी लावण्यासाठी गोविंदरावांबरोबर आले होते. त्यांच्या पोटाचा प्रश्न गोविंदरावांनी सोडविला होता. स्वराज्याचे प्रेम त्यांना दिले होते. कोणाची तरी अन् त्यात गोऱ्या साहेबाची चाकरी करण्यापेक्षा आपल्या माणसाची साथ करणं अनेकांनी पसंत केलं होतं. गोरासाहेबही लष्कराची भरती करीतच होता. त्याचा पोलिस, शिपाई, सोजिर होणं या स्वाभिमानी वनराजांनी पसंत केलं नव्हतं म्हणूनच गोविंदरावांना त्यांना पावसाळ्याकरिता परत घरी पाठवायचे होते. जमतील त्यांचे संसार स्वाभिमानाने उभे करावयाचे होते. धारातीर्थी पडणारांचीही जपणूक करावयाची होती. अवघा दऱ्याखोऱ्यांचा हा प्रदेश या अशा दरोडेखोरांविषयी अज्ञात होता. तरी दरोडेखोरांविषयी मजुरांना, शेतकऱ्यांना, गोरगरिबांना अजिबात भीती वाटत नव्हती. उलट आपला कोणीतरी वाली आहे असेच त्यांना जाणवू लागले होते. त्यांची कर्ज फिटू लागली होती. त्यांची वेठबिगारी संपू लागली होती. त्यांची तांबड आई, त्यांना मिळू लागली होती. ते हरवले होते. पण हे सारे दरोडेखोरी का करतात हेच त्यांना कळत नव्हते. या दरोडेखोरांविषयीचा सुगावा कोणालाही लागत नव्हता. छोटी संस्थाने, जहागिऱ्या, देशपांडे वतनं अजून चालू होती. त्यामुळे एकसंध सत्तेशिवाय दरोडेखोरांचा तपास घेणं शक्य नव्हतं. दरोडेखोरांच्या चाललेल्या कारवाया बघितल्या की हा कोण्या जहागिरदाराचा उठाव आहे की काय असे वाटत होते.

दरोडेखोरांचा गोरे द्वेष्टेपणा गोऱ्यासाहेबापर्यंत पोहोचला होता. पण दरोडा पडलेल्या गावात जाऊन काहीच सुगावा लागत नव्हता. कोणाला मारून, फोडून काढूनही कोणीही काही सांगत नव्हते. उलट दरोडेखोरांविषयी सहानुभूतीच निर्माण होत होती. दरोडेखोरांनी कोणालाही त्रास दिला नव्हता. मारझोड केली नव्हती. आपला कार्यभाग उरकून ते पसार होत असत. हे सारे गोऱ्या साहेबाच्या लक्षात आले होते. त्यांनी कल्याणच्या सुभेदाराला, जव्हारच्या राज्याला, ठिकठिकाणच्या जहागिरदारांना आणि अन्य वतनदारांना खलिते पाठवून बंदोबस्त करावा म्हणून सांगितले होते. पण त्यांना गेल्या पाच महिन्यात अवाक्षरही समजलं नव्हतं. महाराष्ट्रातील गोऱ्यांच्या वर्तुळात चिंता निर्माण झाली होती.

गोविंदरावांना हेच हवे होते. गोविंदराव मनातून प्रसन्न होत होते. हळूहळू ताकद वाढत होती. हळूहळू जबाबदारी वाढत होती. हळूहळू समाधानही वाढत होते.

मिळालेल्या संपत्तीतून मोठा ऐवज सर्वांना देऊन गोविंदरावांनी सर्वांना प्रेमाचा निरोप दिला होता. लक्ष्या, वाळ्या आपल्या आवडत्या अळंगावर वसतीसाठी जाणार होते. त्यांचे सहा महिने फारच मजेत गेले होते. गोविंदरावांसारखा दोस्त त्यांना मिळाला होता. दरोडेखोरांचे स्वराज्याच्या चळवळीत रुपांतर झाले होते. म्हणूनच त्याचे बलदंड अधिक नेटाने अन् हुशारीनं काम करीत होते. गोविंदरावांनी घेतलेल्या प्रत्येक निर्णयात त्याला माणुसकीचा ओलावा दिसे आणि मग त्यांच्या निर्णयापुढे त्याचे काहीच चालत नसे.

वैशाख सुरू होताच सारे घरोघर परतले होते. मग शेतांच्या राबण्या सुरू झाल्या होत्या. खाचरांची तयारी सुरू झाली होती. घरात आनंद मावत नव्हता. शेताच्या कामात तो उफाळून येत होता. कोणाच्या पोरांची तर कोणाच्या पोरींची लग्ने निघत होती. गोविंदरावांना, रामा किरवाला मोठ्या आनंदानं बोलविलं जात होतं. घरे नव्याने बांधली जात होती. नीट शेकारली जात होती. पांघरणे घातली जात होती. बायका सजत होत्या, पण त्याचबरोबर गावोगाव निराधार गरीब कुटुंबास मदतही होत होती. दुवा मिळत होता.

वैशाखाची धामधूम संपते ना संपते तो सारे घाट, गड, जंगल काळ्याकुट्ट मेघांनी भरून आलं. ''पानी आला'' असे म्हणत उभं डांगाण पावसाच्या स्वागताला सिद्ध झालं. मीठ, मिरची, मसाला, जमेल तसे धान्य भरून ठेवण्याचा सपाटा सुरू झाला. अन् मग पावसाला सुरुवात झाली. धो, धो मुसळधार पाऊस आला. डोंगर, दऱ्या, गड, रान न्हाऊन निघू लागले. तो गोविंदरावांचं मनही न्हाऊन निघालं. ते एकदा वाळ्या, लक्ष्याची भेट घेऊन आले अन् मग स्वतःही शेताच्या कामाला लागले. गावकऱ्यांना त्यांना शेतावर पाहतांना मोठा आनंद झाला.

शेताशेतातून काळेकुट्ट लंगोटीबहाद्दर लोखंडी देह कामात दंग होऊ लागले. इरणी दिसू लागली. सारं कोकण घाटाखालचं अन् डांगाण घाटातलं पडत्या पावसात आनंदानं काम करू लागलं. शेताशेतातून मंजुळ ओव्या ऐकू येऊ लागल्या. मोरांचं मेमाटणं सुरू झालं. मोरांचे राननाच पाहून दरीदरीतून लपलेले काही वाघही हरखून गेले.

सबंध महिनाभरात दरोडा न पडल्यानं शेठ सावकारांनी सुटकेचे निःश्वास सोडले. नेमलेल्या पोलिस अधिकाऱ्यांनी अन् वतनदारांनी रिपोर्ट केले ''ऑल ओखे.''

पाऊस सुरू होऊन पंधरा तीनवार झाले. तो भाताची रोपे तरवरून आली. चांगली वीत-वीत झाली. पाऊस पडतच होता. डांगाण हिरवं कंच झालं होतं. पण खाचरं अजून तुडुंब भरली नव्हती, वाहिली नव्हती. पाणी पडत होता. खाचरं नक्कीच भरतील असं

वाटत होतं. करता ज्येष्ठ संपून गेला. आषाढाचे आठदहा दिवस गेले आणि खाचरे तुडुंब भरली. गाळ झाला अन् आवण्यांना सुरुवात झाली. गुडघा गुडघा गाळात उभे राहून मुठी मुठी भातांनी आवण्या सुरू झाल्या. पातीमागं पात लावली जात होती.

**राम राम म्हनू आवण्या करीताना**
**राम राम म्हणू भाता रोपा धरीताना**
**राम राम म्हणू राम कौसल्याबाईचा**
**याच्या बरूबरी झाला निर्भाव देहीचा**
**राम लक्ष्मण दोघीचं दोघं जन**
**भरत शत्रगून अंजेनीचा पहेलवान**
**मुठी मुठी रोप जसा रामाचा ना नांव**
**येकाच रोपाचा व्हता पोताभर भात**
**भात ना भात बाई खाला जानकी रामाना**
**रामाच्या नावाना आलं वरच येंगूना**

मुखातून ओव्या बाहेर पडत होत्या. सगळं रान कसं तृप्त तृप्त वाटत होतं.

राधाबाईंनी वर खेचून बांधलेलं लुगडं चापलं चोपलं दिसत होतं. त्यांची फडकी डोकं आवळून पाठीमागं पडली होती. डोईवर इरणं होतं. पळसाच्या पानांचं बांबूच्या कामट्याचं. नाकातली पिवळीजर्द नथ मोत्यांच्या साजानं अन् मधल्या लाल खड्यानं मन आकर्षून घेत होती. लोंबकळत होती. डाव्या हातात भाताच्या रोपांची मूठ घेऊन उजव्या हातानं त्या भाताची रोपं लावीत होत्या. एकाग्र मनानं. आज कितीतरी वर्षांनी त्या आवण्यासाठी खाचरांत शिरल्या होत्या. किस्ना त्यांच्या बरोबरीनं लंगोटी लावून अन् अंगात कुर्ता अडकवून डोक्यावर इरणा ठेवून त्यांना मदत करीत होता. मूठ मूठ रोपं आणून तो आपल्या आईला देत होता. विठीनं दुसरी पात धरली होती. रखम्या तिच्या मधेमधे लुडबुडत होता. मधूनच विठीला सूचना देत होता. ''अरं अरं इठे हेर, बाई कशा गोडवाणी लावल्यात हेर, आन तूह संमद गाळात माखतंय हेर'' मग विठी चिडत असे अन् फिस्कारत असे. ''कारं तुला काय करायचा महा कसाय हुंदी'', मग रखमा डोळे मिचकावून हसायचा. मध्येच त्याने किस्नाचे लक्ष तुरुतुरु धावणाऱ्या खेकडीवर वेधून घेतले अन् मग गपकन तिच्यावर पंजा ठेवून म्हणाला, ''आता कशी गावली!'' त्याचे हळूच लक्ष विठीकडे गेले होते. मग विठी त्याच्याकडे पाहत नाही असे हेरून बाईच्याबरोबर भाता लावू लागला अन् हळूच किनऱ्या आवाजात तिनं ओव्यांची लकेर सुरू केली. तिची ती लकेर राधाबाईंच्या कानात गेली अन् त्यांच्या स्मृती जागृत झाल्या. त्याही म्हणू लागल्या–

**सीताला सासुरवास आडवा लई लोट**
**सीतालानं बोलतो पाप्या दारातून उठ**
**सीताला सासुरवास आडवा लई पानी**
**सीता न बोलली पाप्या दारातून जाई**



**सीताला सासुरवास केला केसकेशी**
**वाटून काय दिली सगळा देशदेशी**
**सीताला सासुरवास केलाई बहू बहू**
**वाटून कायी दिला सगळ्याली गुहु गुहू**

तेव्हढ्यात त्यांच्या कानावर शब्द आले, ''किस्ना, कोना रं तुझ्या आयला सासुरवास केला.'' हे शब्द ऐकताच राधाबाई कावऱ्याबावऱ्या झाल्या. अन् रखम्या, ठकी, गोविंदराव अन् किस्ना सगळेच जोरात हसायला लागले. मग राधाबाई हरखून उसन्या फणकाऱ्यानं म्हणाला, ''हा, आपुनी करायचा नही आन दुसऱ्याचा देखत नही.'' तसे गोविंदराव धोतर वरपर्यंत खेचून खोचीत गाळात उतरले, तसा रखम्या पुढं होत त्यांना भाताची रोपं देऊ लागला आणि गोविंदरावांनी भाताची आवनी सुरू केली. राधाबाईंचं मन खुदकन हसलं, ''रतनगडाचं जहागिरदार म्हन भाताच्या आवण्या करतात!'' ती हळूच पण गोविंदरावांना ऐकू जाईल अशा आवाजात म्हणाली. तसे गोविंदरावांनी राधाबाईंकडे पाहिले. त्यांच्या चेहऱ्यावर स्मित झळकले. ''हा आता घरच्याचीच मानसं खोचून बोलाया लागली तवा दारच्याचं काय चुकनार. पर रामाला सुदिक वनवास चुकला न्हाई. बररं किस्ना.'' तशा राधाबाई खळखळून हसल्या.

रात्री किस्नानं अन् रखम्यानं आणलेल्या पाचपंचवीस भल्या मोठ्या खेकड्याचं कालवण राधाबाईंनी आपल्या हातांनी रांधलं. रात्रीचं जेवण मग सरस झालं. खेकड्या तोडतांना किसन्यानं सहज विचारलं, ''बा, किती लोक झालं आपलं? उजूक कवाशीक निंगायचं?'' पण त्याचे प्रश्न मध्येच तोडत राधाबाई म्हणाल्या, ''सरवणाच्या महिन्याला काय पोथीबिथी लावा मारवतीच्या देवळात.'' गोविंदरावांच्या ह्ये लक्षात आलं. त्यांनी राधाबाईंकडे पाहिलं अन् म्हणाले, ''लावू ना पांडवप्रताप''. त्यांनी आपल्या किस्नाकडे सकौतुक नजरेनं पाहिलं. स्वाभिमान वाटला. आपलेच विचार त्याच्या डोक्यात घोळताहेत हे पाहून त्यांचं मन संतोषलं.

* * *

रात्री नीजानीज झाली. वाड्यावर सामसूम झाली तरी गोविंदराव सचिंत बसले होते. त्यांच्याकडे पाहत राधाबाईंनी विचारलं, ''कंचा इचार करता? समदं ठिक व्हईन, दमानं.'' ''अरं त्या व्हईल पर निस्त दरुडं घालून का जमाताय. गावागावातून पाटील उठले पायजेत आन् त्यानी वसूल दियाचं साफ नाकारलं पायजे. त्ये उठले आन् त्येंची जूट झाली न मंग तो गोरासाह्यब वठणी व येईल'' गोविंदराव बोलले. तशी राधाबाईंनी गोविंदरावांच्या मनात काय चालले आहे हे ओळखलं. मागच्या श्रावणासारखे ते रात्रीची रपेट सुरू करणार, गावोगावच्या पाटलांना विश्वासात घेणार अन् मागचाच अनुभव पुन्हा येणार ह्ये जाणून त्या म्हणाल्या, ''काय कोनाकडं जायाचं नही. ज्येला पर्वा असन त्यो येईन आपल्या संगट,

आपुनी हूनच त्येंचाकडं जायाचं नही.'' त्येंच्याकडं जाऊन कितीक लोक तुमच्याकडं आलं? व्हाईना, मग उजुक त्येंच्याकडं जायचं न्हाई. ह्या पाटील अन् मोठं लोक येनार न्हाईत. गोरगरीबच तुमच्यासंगट येत्याल. शिवरायाचं न्हायका आपल्याली ठाव.'' ''तुमाली ह्या शानपन कोना दिलं!'' भावपूर्णतेने पाहत गोविंदराव म्हणाले. कितीतरी वेळ ती दोघे गप्पा मारीत होती. मग गोविंदरावांनी कोणतासा मनाशी विचार केला आणि मग ते गाढ झोपी गेले.

श्रावण सुरू झाला. मारुतीच्या देवळात गोविंदराव पांडवप्रताप वाचू लागले. गावचे सगळे बापय माणूस पोथीला येऊन बसू लागलं. रात्री कधी भजन व्हायचं, भजनात लोक रंगून जायचे. पंचमी झाली, पौर्णिमा झाली, पोळा झाला. सारा श्रावण निघून गेला. पावसाचा जोर हळूहळू कमी झाला. भातं खाचरातून डुलू लागली. नागल्या दाणे धरू लागल्या. सगळं डांगाण फुलून गेलं. म्हशी, गाया, दुबते देवू लागल्या, तशी शेतंही दुधावर आली. अवघ्या डांगाणाचं गोकूळ झालं आणि गोविंदराव आणि त्यांचे साथीदार यांच्याही हालचाली सुरू झाल्या. पुन्हा मोहीम आखली जाणार होती. लोक जमणार होते. डोंगर दऱ्यातून घोडे चौखूर उधळणार होते. दरोडे पडणार होते. कष्टकरी लोकांचा दुआ मिळणार होता. पण गोविंदरावांना काही वेगळं करायचं होतं. त्यासाठीही प्रयत्न होणार होते.

●●●



# तीन

कॅप्टन सीकसचा तळ भंडारदऱ्यानजीक पडला होता. त्याच्याबरोबर सुमारे दोन हजार सैन्य होते. त्यात गोरे सोजिर अवघे पन्नास होते. महार, मराठे, कोळी, भिल्ल, ठाकर, मुसलमान या जाती-जमातींचा भरणा त्याच्या सैन्यात अधिक होता. त्याच्या छावणीवर आज विजयोत्सव साजरा होत होता. चांदणी रात्र होती. मधल्या विस्तीर्ण मैदानाच्या भोवती असलेल्या झाडाझाडात टेंभे लावले होते. मध्यभागी मोठी आगटी पेटविली होती. मोठ्या हंड्यामधून मांस शिजण्याचा वास येत होता. मद्याचे रांजण भरलेले होते. विलायती दारूला कमतरता नव्हती. परंतु मोहाच्या, काजूच्या, फणसाच्या दारूचा मात्र चांगलाच उग्र दर्प येत होता. एका बाजूला दहाबाराच राहुट्या उभारलेल्या होत्या. उन्हाळ्याचे दिवस असल्याने राहुट्यांची फारशी गरज नव्हती. एका मोठ्या राहुटीच्या समोर एका खुर्चीत कॅप्टनसाहेबांची स्वारी बसली होती. उंच गोरापान. हिरवट घारे डोळे. डोक्याची हॅट काढल्याने आतले चिपकून बसलेले केस. कसलेला बांधेसूद देह आणि भव्य कपाळ अन् सौम्य हासरी मुद्रा यामुळे कॅप्टनसाहेब मोठे शूर अन् प्रेमळ दिसत होते. आज त्यांच्या चेहऱ्यावर नेहमीपेक्षा जास्त स्मितरेषा होती. दोन महिन्यापासून ज्या रतनगडच्या मागे ते लागले होते तो गड आजच सर झाला होता. त्यावरच्या गोविंदराव खाडे नावाच्या किल्लेदाराला, जहागिरदाराला त्याने शरण आणविले होते. हा सगळा मुलुख आता पूर्णपणे इंग्रज सरकारच्या ताब्यात येणार होता. कॅप्टन सीकसने होळकरांचा सगळा मुलुख ताब्यात घेऊन मोठी कामगिरी बजावली होती. त्याचा आनंद त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. या डांगाण भागाला सर करतांना त्याला रामजी भांगरेचा चांगलाच उपयोग झालेला होता. त्यामुळे कॅप्टन सीकस रामजी भांगरेवर चांगलाच खूष होता. रामजी भांगरेला त्याने आज खास निमंत्रण देऊन आपल्या शेजारच्या खुर्चीवर बसविले होते.

कॅप्टनच्या शेजारी खुर्चीवर बसण्याचा अजब अनुभव रामजी भांगरेला मिळाला मात्र आणि त्याला स्वर्गीय सुख प्राप्त झाल्यासारखे वाटले. तो आज भलताच खूष होता. त्याने आपल्याबरोबर चिचोंडीच्या ठाकर टोळीला खास कांबडवणा करण्यासाठी बोलावून

आणले होते. कॅप्टनसाहेब आपल्याशी आपल्या भाषेत बोलतो याचे रामजीला कौतुक वाटे. यामुळेच त्याच्या मनात त्याच्याविषयी फारच आपुलकी निर्माण झाली होती. कॅप्टनसाहेबांनी आपल्या असिस्टंटला, ल्युकीनला बोलावले. तो एक सुंदर चांदीचे तबक घेऊन बाहेर आला. त्यात खास चांदीच्या मोठ्या गमतीदार सुरईत इंग्रजी मदिरा होती. सुबक कुसरीच्या घाटदार पेल्यात कॅप्टनसाहेबांनी स्वतः मदिरा ओतली आणि त्याने ती रामजीच्या पुढे करीत म्हटले, ''रामजी, टुमी मोटा काम खेला. आमी खूष.'' आणि असे म्हणून रामजीच्या हाती पेला देत त्याच्या खांद्यावर आपल्या उजव्या गोऱ्यापान पंजाचा दाब देत कॅप्टनसाहेब मोठ्याने हसला. रामजी भांगरेची छाती फुगली. मग कॅप्टनसाहेबांनी त्याच्याबरोबर मदिरा घेतली. ''भांगरेसाब, टुमी आजपाशून चाळीश गावचा जमादार झाला. टुमाला ऑर्डर हुकूम देतो'' असे म्हणून एक उत्तम सोजिराचा पोशाख त्याने रामजी भांगरेला दिला. रामजीने एखाद्या राजदरबारातील जहागिरी ज्या नम्रतेने अन् मुजरा ठोकीत स्वीकारावी तशी जमादारकीची वस्त्रे आपल्या हाती घेतली. त्याच्याबरोबर आलेल्या जातभाई साथीदारांनी ''रामजी भांगराकी ऽ'' ''जोय'' ची आरोळी ठोकली. रामजी भांगरेने सोजिराच्या थाटात कॅप्टनसाहेबाला सॅल्यूट ठोकला आणि कॅप्टनसाहेब भलतेच खूष झाले. मग फौजेने उत्तम मांस भोजनावर ताव मारला. आज रामजी भांगरे मोठ्या रूबाबात कॅप्टनसाहेबाबरोबरच जेवत होता. त्याने कॅप्टनसाहेबाला आग्रह केलेला कॅप्टनसाहेबाने उत्तम प्रतिसाद देऊन मान्य केला होता. जेवणे होताच रामजीने इशारा दिला आणि ढोलियाने हात उंचावून नाचाचा इशारा दिला. मग ठाकरगड्यांची एक टोळी त्या आगटीच्या भोवती फेर धरून उभी राहिली. कॅप्टन सीकस चकित होऊन पाहत होता. त्याने अजून अशा प्रकारचे नृत्य पाहिलेच नव्हते. तो लक्षपूर्वक पाहू लागला आणि दुसऱ्या क्षणाला ढोलक्याने आपल्या ढोलावर थाप मारली आणि ठाकरगड्यांच्या उड्या सुरू झाल्या. नाच रंगू लागला तसा एका गायक्याने उंच स्वरात शब्द सुरू केले–

**रंगाण रंगाण ऽऽ हे**
**मातीचं रंगाण ऽऽ हे**
**येई रं रंगणात**
**आजूच पायी दिला ऽऽ हे**
**आजूच नाच केला ऽऽ हे**
**धुळवडा उठईला ऽऽ हे**
**गंगणाला गेला ऽऽ हे**
**चंद्रसूर्या झाकोळला ऽऽ हे**

गाणं सुरू होताच कॅप्टन सीकसने मोठ्या आत्मियतेने एका ठाकर गड्याला जवळ बोलावून गायक्या काय म्हणतो ते ऐकले आणि तो अधिक प्रसन्न झाला. तो उठला आणि रिंगणाच्या दिशेने चालू लागला. रामजी भांगरेला तो काय करतो हे समजेना. कॅप्टन सीकस रिंगणात शिरला आणि त्याने नीट निरीक्षण सुरू केले. आपल्या हातावर तो ठेका



देऊ लागला. गाण्याचे शब्द ऐकू येत होते –

**डोंगरी क नगरी ऽऽ**
**काटी पिवळी रं ऽऽ**
**इद्याचा भार झाला ऽऽ**
**खाली बाई लवली रं ऽऽ**
**गावची सुपारी मला मूळ ऽऽ**
**इठून आजूबा किती दूर ऽऽ**

असे म्हणताना सगळ्या गड्यांनी एकदम एक गिरकी हवेत घेतली, आणि मग मात्र कॅप्टन सीकसला राहवेना. त्याने पण आपल्या भोवती गिरकी घेतली आणि तोही त्यांच्याबरोबर ठेक्यावर उड्या घेऊ लागला. त्याच्या उड्या पाहून सगळ्यांना हासू फुटत होतं. पण सर्वांना कौतुकही वाटत होतं. ल्युकीननं मग रामजीचा हात धरला आणि बळजबरीनं रिंगणात घेऊन गेला. मग कितीतरी सोजिर, शिपाई मोठ्या उत्साहाने आणि भान हरपून ठेक्यात उड्या मारू लागले तसे ढोलियालाही उत्साह आला आणि जणू होळी पौर्णिमाच आहे असा भास डांगाणच्या डोंगरदऱ्यांना झाला. सारे रान उजळले. दुरून रतनगड मात्र हे सारे खंतावलेल्या अंतःकरणाने पाहत होता. त्याच्या डोळ्यात अश्रू दाटले होते. भंडारदरा गावात मात्र कोणी म्हातारी धाय मोकलून रडत होती. तिच्या वेदनांना आर्त स्वर आणि रतनगडाचे अश्रू मात्र त्या जल्लोषाच्या नादात कोणालाच ऐकू येत नव्हते, दिसत नव्हते. पण त्याची खंतही कोणाला वाटत नव्हती. गुलामगिरी लाभल्याचा आनंदच जणू सर्वांच्या अंतःकरणात ओसंडून वाहत होता की काय? असा प्रश्न नियतीला पडला होता

* * *

संततधार पावसानं रतनगडाचं त्रिकोणी शिखर चिंब झालं होतं. किल्ला हिरवागार दिसू लागला होता. त्या हिरव्याजर्द रंगातून डोंगराला पडलेलं एक भगदाड दिसत होतं. आरपार. नथ नसल्या नाकावरच्या छिद्रासारखं. इथेच होती ती अभेद्य तोफ, कॅप्टन सीकसनी उद्ध्वस्त केलेली. किल्ल्याच्या भोवताली दाट झाडी होती. मधूनच पाण्याचा एक भरगच्च प्रवाह जोराने खळखळत वाहत होता. ही अमृतवाहिनी. प्रवरा या रतनगडात उगम पावलेली. या नदीच्या खोऱ्यातील गावांसाठीच भांगऱ्याची बंडखोरी आणि आता रामजी भांगरेवर जमादार म्हणून याच पेहरा भागाची जबाबदारी टाकली गेली होती. अमृतवाहिनी डोंगरातून खळाळत येऊन मध्येच गडप झाली होती. तेथे मंदिर होतं. अमृतेश्वराचं. सुबक. देखणं. बाजूला समोर सुंदर पुष्करिणी. त्यात सर्वतीर्थाचं पाणी एकत्रित झालेलं. भोवताली निरनिराळ्या देवतांच्या मूर्ती. अमृतेश्वराचं मंदिर प्राचीन. पिंडीतली शाळुंका उचलली की आत ही अमृतवाहिनी मग त्या मंदिरातून तीर्थाच्या रुपानं ती परत बाहेर पडते. शाळुंकेच्या खाली ते अमृत. त्या अमृताचं रक्षण करण्यासाठी वळवळणारे शंकराच्या गळ्यातील

पिवळेजर्द नागराज. हे अमृत मध्यरात्री वाहत असे. देवाचं राज्य गेलं तसं अमृत संपून गेलं. मग दूध वाहू लागलं. ही दुधाची धार मध्यरात्री बाहेर पडे. पाण्यातून दूध वाहू लागे. कोणे एकेकाळी गवळण अनाथ पोरगी गायांना चरावयास घेऊन जात असे. तिच्या सर्व गायी खाट्या असत. तिच्या कळपात खाटी झालेलीच गाय आणून घालीत असत. मग सगळ्या खाट्या गायी तिच्या या सेवेने प्रसन्न झाल्या आणि त्यांनी तिला सांगितलं, तू रोज रात्री या प्रवरा नदीवर आपला घडा घेऊन येत जा. रात्री दुधाच्या धारा निघतील, त्या तू भरून घेत जा अन् विकत जा. गवळणीसाठी अमृतवाहिनीने दुधाच्या धारा दिल्या. ती रोज रात्री उठे, घागर घेई आणि दूध आणावयास जाई. मग सकाळी ती ते दूध विकावयास जात असे. तिने आणलेले दूध सर्वांच्या दुधापेक्षा गोड असे. मग सगळे लोग तिचेच दूध विकत घेत असत. मग मधूनच लोक तिला विचारीत, ''यव्हढा दूध कह्याच आनती रं?' तुझ्या तं साऱ्या गाया खाट्या आह्यात'' पण ती काहीच उत्तर देत नसे. तिने मग गायींनाच विचारले, ''लोकांना काय सांगावे?'' पण गायींनीच तीस या बाबतीत गुप्तता पाळावयास सांगितले. तेव्हा तिला प्रश्न पडला, ''आता काय करावे?'' लोकांना मात्र ती नक्कीच काही तरी चेटूक करीत असावी असा संशय आला. एके रात्री ती अशीच गडबडीने निघाली होती. एका म्हातारीने मधेच हटकून तिला विचारले, ''तुह्या क त यकयबी गाय नाही अन् तू यव्हढा दुबता कुठून आनतीस रं?'' तेव्हा तिने गडबडीने उत्तर दिले, ''एक गाय प्रवरा माय'' त्या म्हातारीने सगळे ऐकून घेतले अन् लोकांना सांगितले. लोकांनी तिचा नेमका शोध घ्यावयाचे ठरविले. तीन-चार पोरांनी तिचा पाठलाग करावयाचे ठरविले. रात्री गवळण आपला घडा घेऊन निघाली. तिच्या मागेमागे लपत-लपत तीन-चार पोरेही गेली. ती नदीवर आली. तिने घागर भरली. त्यावेळी दुधाच्या धारा नदीत वाहत होत्या. ती घडा घेऊन बाहेर येते तोच दुधाच्या धारा गडप झाल्या. सकाळी तिने पाहिले तर घडा पाण्याने भरलेला. मग ती रडू लागली. गायांना वाचा फुटली. ''अगं मुली, पूर्वी सर्वच दुधाने भरून वाहत असे पण लोकांचे पाप वाढले आणि दूध बंद होऊन पाणी वाहू लागले. तू भाकड जनावरांची सेवा करतेस म्हणून तुझ्यासाठी दोन धारा का होईना नदीत निर्माण झाल्या, पण तूही ते लोकांना सांगितले अन् लोकांनी तुझा पाठलाग करून हे रहस्य पाहिले. आता दुधाच्या धारा सुटणार नाहीत. तू दिलेले वचन पाळले नाहीस, त्याचे हे फळ तुला मिळाले. तरी या नदीचे पाणी अमृतासारखे गोड लागेल पण लोकांचे पाप वाढत गेले तर ती गोडीही कमी होऊन जाईल.'' मग त्या गवळणीने ही सर्व हकीकत सर्व लोकांना सांगितली आणि लोकांनी या अमृताची पूजा सुरू केली. प्रत्यक्ष शिवशंकराने दिलेले हे अमृत म्हणून हे अमृतेश्वराचे स्थान. साऱ्या डांगाणचं हे दैवत. परंपरेनं वर्षानुवर्षे यांची पूजा असे. पूजेसाठी श्रावण महिन्यात ऐन पडत्या पावसात अकोल्याहून पुराणिकबुवा धर्माधिकारी, दशग्रंथी, वेदशास्त्रसंपन्न, सत्शील ब्राह्मण येत असत. आताही आषाढ महिना संपून श्रावण महिना सुरू झाला अन् जमादार म्हणून अधिकार मिळविलेल्या रामजीच्या मनात अमृतेश्वराला अभिषेक करावा असं आलं. त्याने अकोल्याच्या पुराणिकबुवा धर्माधिकारी यांना स्वतः



भेटून त्यांना निमंत्रण द्यायचे ठरविले.

* * *

रामजी भांगरे आपल्या दारात आलेला पाहताच पुराणिकबुवांच्या कपाळाला आठी पडली. शक्यतो ती लक्षात येऊ न देता पुराणिकबुवांनी विचारले, ''आज सरकार वाट चुकलेले दिसतात! एरवी गरीब ब्राह्मणाकडे आपलं येणं झालं नसतं!'' ''असं कसं म्हनता पुराणिकबुवा? अव तुमी आमच्या अम्रितेश्वराचं पूजारी. त्येच्या छायेत आमी वाढतुय. तुमच्या बिगर त्यो बाबा कोपन आन आमची पेहरामाय रूसन ना.'' रामजीने नम्रपणे उत्तर दिले. त्याच्या लक्षात आले की पुराणिकबुवा काहिसे रागावले असावेत. ''तसं नव्हे. गोऱ्या साहेबाच्या मांडीला मांडी लावून बसणारे आपण आणि आम्ही शुल्लक! मराठ्यांनी आम्हाला वर्षासन देऊन नेमलेलं यःकश्चित पुजारी! म्हणून म्हटलं ...काय काढलंत आज?'' ''सोमवारी अभिषेक करीन म्हणतो अम्रितेश्वराला. त्येच्याच किरपेना हे जमादारपद मिळालं.'' असं भांगरे बोलताच पुराणिकबुवा कडाडले, ''त्याच्या कृपेनं नव्हे रामजी तुमच्या कर्तबगारीनं!'' तसा रामजी भांगरे जरा चपापला. त्याच्या लक्षात आलं, पुराणिकबुवांना आपण साहेबाला मदत करणं आवडलेलं नाही. पण त्याने हसण्यावारी नेत विचारलं, ''मंग येन्हारना तुमी आमी वाट पाहतो तुमची.'' मग पाणी अन् दूध पिऊन रामजीने पुराणिकबुवांच्या पायावर डोके ठेवले आणि तो पुन्हा आपला घोडा उधळीत परतला.

आपल्या नावानं अभिषेक होणार हे ऐकून रामजीची पत्नी सीताबाई हरखून गेली. सोमवारी तिने आपल्या गडीमाणसांना लक्षबेल आणायला सांगितले. हंडाभर दूध जमा करून ठेवलं. ठरल्याप्रमाणे पुराणिकबुवा आले. अमृतेश्वराच्या देवळात दूध, दही, तूप, पाणी यांनी अभिषेक सुरू झाला. मंत्रोच्चार सुरू झाले. रामजी आणि सीताबाई बाहेर जोडीनं देहभान हरपून प्रसन्न डोळ्यांनी पाहत होत्या. त्यांची मुलगी रुक्मिणी डोळे मिटून अमृतेश्वराला आळवीत होती. आठ-दहा वर्षाची पोर पण अतिशय भक्तीभावाने पूजन करीत होती.

अभिषेक पात्रातून महादेवाच्या शाळुंकेवर संततधार चालू होती. रुद्राचे मंत्रोच्चार चालू होते, पण आज अजूनही पूर्वीसारखं प्रसन्न वातावरण वाटत नव्हते. पुराणिकबुवांचं मन प्रसन्न नव्हतं. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते. अश्रूंच्या वाहत्या धारा सांगत होत्या, ज्या महादेवाच्या साक्षीनं गोब्राह्मण प्रतिपालक श्री छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची शपथ घेतली, त्याच दैवतावर परक्यांच्या हातात सत्ता जाऊन चाकरी मिळाल्याच्या आनंदानं अभिषेक! आणि आपणही आपली पुण्याई त्याच्यामागे उभी करावी? त्यांनी मनोमन अमृतेश्वराला प्रार्थना केली. अभिषेक आटोपून ते बाहेर आले. रामजीच्या हातावर तीर्थप्रसाद देताना ते म्हणाले, ''रामजी हा प्रसाद भक्षण करा. देव अमृतेश्वर तुम्हाला सद्बुद्धी देवो.'' पुराणिकबुवांच्या पायावर डोके ठेवून रामजीने प्रसाद भक्षण केला. रामजीच्या

बायकोने एक वेळ पुराणिकबुवांकडे पाहिले आणि नमस्कार केला. पुराणिकबुवांनी तोंड भरून आशीर्वाद दिला. मग रुक्मिणीनेही नमस्कार केला. पुराणिकबुवा पुटपुटले, ''इष्टवर प्राप्तीरस्तु.'' तिने भाबडेपणाने विचारले, ''बुवाजी काय म्हनलं?'' पुराणिकबुवांना तिच्या भाबडेपणाचे क्षणभर हसूच आले आणि त्यांनी स्पष्टीकरण केले, ''अगं, म्हणजे चांगला नवरा मिळो'' तसे रामजी, सीताबाई अन् बुवा हसले, रुक्मिणी गोरीमोरी झाली.

पुराणिकबुवा आपली पूजा आटोपून परत निघाले तेव्हा दोन प्रचंड पिवळ्याजर्द नागराजांनी पिंडीवर छाया धरली होती. रामजी भांगरेच्या मनात विचारांचे काहूर माजले होते. पुराणिकबुवांनी ''सद्बुद्धी दे'' असे का म्हणावे? पुराणिकबुवांसारखा साधा सरळ पुण्यवंत माणूस चिडला का? आपलं खरंच काही चुकलं का? असे कितीतरी विचार त्याच्या मनात दाटून येत होते. क्षणभर त्याला हताश वाटलं पण पुन्हा त्याने अमृतेश्वराला साष्टांग दंडवत घातला अन् मनात येणारे विचार झटकण्याचा प्रयत्न केला. पुन्हा परतताना त्याच्या मनात सारखे असेच विचार घोळत होते.

* * *

हिरजी नायकाच्या सुभेदारीच्या काळात, गोविंदजी, मनाजी आणि वाळोजी या तीन बंडखोरांनी उठाव केला होता. वाळोजीकडे असलेले अधिकार हिरावून घेतले होते. हिरजीचे वडील जावजी याने हे कारस्थान केले होते. जावजीने राजूर सुभ्याची सुभेदारी स्वतःकडे घेतली होती. पण स्वतःच्या काही अनुयायांकडूनच तो ठार झाला. मग त्याचा मुलगा हिरजी नाईक याचेकडे सुभेदारी आली होती. वाळोजी भांगरेच्या घरात फक्त पाटीलकी आली होती. या वाळोजीने हिरजी नाईकास खाली खेचण्याचे प्रयत्न केले होते. पण त्याचा पाडाव करण्यात आला होता. पण त्याचा मुलगा रामजी भांगरे हा सगळा अन्याय मनात ठेवून होता. त्याने परंपरागत नेमलेल्या सर्व अधिकाऱ्यांवर सूड उगवला होता. बंडखोरीचे रक्त त्याच्या नसानसातून खळाळत होते. पण त्याचबरोबर डांगाण परिसरातील पेहरा भागावर त्याचे विलक्षण प्रेम होते. म्हणूनच त्याने हिरजी नाईकास जवळ जवळ आपल्या बंडखोरीनंच नेस्तनाबूत केलं होतं. पण गोविंदराव मात्र त्याचेबरोबर अत्यंत प्रेमाने वागले होते. ते त्याचे मित्र होता. पण त्यांचा ही बंडखोरी सोडून देण्याचा सल्ला मात्र त्याने कधीच मानला नव्हता आणि अखेर कॅप्टन सीकसने चढाईचे धोरण स्वीकारले. ही आपल्याला नामी संधी आहे असे वाटून त्याने सर्व सत्ता उलथून टाकण्याचा निश्चय केला होता. त्याच्या मनातील सूडाच्या भावनेने हिरजी नायकाला कॅप्टन सीकसपुढे शरणागती पत्करावी लागली होती. पण त्याचबरोबर डांगाणातला किल्ला न् किल्ला उद्ध्वस्त होत होता. याचे दुःखही मधूनच त्याच्या मनाला त्रस्त करीत असे. पण त्याच्या मनातील सूड त्याला गप्प बसू देत नसे. त्याने कॅप्टन सीकसचे लक्ष रतनगडाकडे जाऊ नये असा खूप प्रयत्न केला. पण तो गोरा साहेब ऐकतो थोडाच! त्याने हट्टाने रामजी भांगरेस रतनगडाच्या



बाबतीतही मदत करावयास लावले आणि अखेर रतनगड सोडून रामजीचा मित्र गोविंदराव खाडेस कॅप्टन सीकसपुढे हात बांधून दर्शनास यावे लागले. रामजी भांगरेच्या म्हणण्यानुसार अन् गोविंदराव खाडेचे शौर्य पाहून कॅप्टन साहेबांनी गोविंदरावांस पोलिस अधिकारी म्हणून नेमावयास संमती दिलीही होती, पण गोविंदरावांनी ती लाथाडली यात त्याचा काहीच दोष नव्हता. अनेक लोकांनी रामजीच्या म्हणण्यानुसार नोकऱ्या स्वीकारल्या होत्या. त्याच्यासारखे तीन जमादार एकट्या पेहेरा, मुळा अन् आढळा म्हाळुंगीच्या खोऱ्यांसाठी नियुक्त केले गेले होते. त्यासाठी आणखी काही पोलिस अधिकारीही होते. त्याचप्रमाणे लोकांची मने दुखावली जाऊ नयेत म्हणून देशपांडे, देशमुख, जहागिरदार यांना तनखे चालू ठेवण्याची जबाबदारी देखील कॅप्टन सीकसने घेतली होती.

विचार करता रामजीला एकदम कॅप्टन सीकसची आठवण झाली होती. कॅप्टन सीकस त्याला किती दिलदार माणूस वाटला होता. त्या दोघात किती जवळीक निर्माण झावली होती. त्याने रामजीस किती सन्मानाने वागविले होते. अवघा पेहरा भाग त्याच्याकडे विश्वासाने सोपविला होता. जी आपुलकी पेशव्यांना अन् होळकरांनी रामजीला किंवा वाळोजीला दाखविली नव्हती ती कॅप्टन सीकसने त्याला दाखविली होती. म्हणूनच तो कॅप्टन सीकसवर अतिशय खूष होता. त्याने प्रामाणिकपणे आणि नेटाने सरकारची चाकरी करावयाचे ठरविले होते. आपल्या कारकिर्दीत आपल्या पेहरा भागातील कोळ्यांचे अजिबात हाल होऊ नयेत असे त्याला वाटत होते. त्याने आपल्या सर्व योजना मनाशी आखल्या होत्या आणि त्याप्रमाणे तो वागणारही होता.

त्याच्या मनातील विचार कोठल्या कोठे पोचले होते. जेव्हा तो घरी आला तेव्हा तो भानावर आला.

* * *

नुकतीच विजयादशमी होऊन गेली होती. विजयादशमीच्या निमित्ताने रामजीने आपल्या भागातील सगळ्या पाटलांना बोलावले होते – शेणितचे धोंगडे पाटील, कातळापूरचे ढगे आणि सद्‌गीर कानडे पाटील, तेरूंगणाचे कोकतारे पाटील, केळुंगणाचे मधे आणि पिचड, कोहंडीचे परते, वाकीचे संगमिरे, शेलविहीऱ्याचे दुटे पाटील, साम्रदाचे हांडे पाटील, घाटघराचे खडके पाटील, मुरशेताचे असवले, वारंघुसचे घाणे आणि भुसनारे पाटील, चिचोंडीचे मधे ठाकर पाटील, मधे कोळी पाटील, बोटनर पाटील कानडे, मुतखेळाचे इदे कोळी आणि हापसुले कानडे, आंबेवंगणाचे खेताडे अन् धांडे पाटील, पेणशेताचे कोळी पदमिरे आणि सद्‌गीर पाटील, कोळटेंभ्याचे बुळे पाटील, रणदखुर्दाचे बडे पाटील, रणदबुद्रुकचे कोरडे अन् पाटेकर पाटील, मान्हेऱ्याचे कोकदरे, गभाले अन् कानडे पाटील, लाडगावचे धोंगडे पाटील, कोदनीचे बांबेरे पाटील, पाभुळबंडीचे जाधव, लेंडे पाटील, भंडारदऱ्याचे खाडे पाटील, माळेगावचे सुकटे पाटील अन् लोहकरे पाटील, टिटवीचे मुंढे पाटील,

दिगंबराचे आवारी पाटील, गुहिऱ्याचे शिनवणी अन् वासारे, देवगावचे भांगरे पाटील, उडदावण्याचे गिऱ्हे पाटील, पांधऱ्याचे झडे पाटील, शिंगणवाडीचे पोकळे ठाकर, पिंपकरण्याचे पिचड पाटील, बारीचे खाडे पाटील, अेकदऱ्याचे भांगरे पाटील, शेंडीचे भांगरे पाटील, रतनवाडीचे पांढरे अन् झडे पाटील. पण पंधरावीस गावचे पाटील आले होते. बाकीच्या पाटील मंडळींनी सणाचे निमित्त सांगून पुढे भेटण्याचे आश्वासन दिले होते. रामजीला मनातून या गोष्टीचा थोडा रागच आला होता, पण त्याने तो दाखवला नाही.

आलेल्या पाटलांनी रामजीला खूष करण्यासाठी प्रयत्न केले होते. कोणी उपरणे, कोणी फेटा, कोणी धोतर, कोणी सोन्याचं, चांदीचं कडं, कोणी आपल्याकडील चांगली गाय असे काहीना काही घेऊन आले होते. रामजी भांगरेला सन्मानपूर्वक भेटी दिल्या होत्या. रामजी भांगरेने आपल्या खुर्चीवर बसून त्या ऐटदारपणे स्वीकारल्या होत्या. पाटील नम्रपणे समोर अंथरलेल्या घोंगड्यावर बसले होते. मग विचारपूस झाली होती. गप्पा रंगल्या होत्या. गोऱ्या साहेबाचं यथेच्छ गुणगान झालं होतं. रामजीने सर्वांना पुरणपोळीचे जेवण दिले होते. रामजीच्या पाहुणचाराने पाटील मंडळी खूष झाली होती. सहजच गोविंदराव खाड्यांचा विषय निघाला होता. पाटलांनी आपणाकडे गोविंदराव येऊन गेल्याचं सांगितलं होतं. गोविंदरावांच्या मनात गोऱ्यांविषयीचा राग कायम आहे हे रामजी भांगरेच्या लक्षात आलं होतं. रामजीने गोविंदराव आपल्याविषयी काही म्हणत होतेका हे खोदून विचारलं होतं, पण कोणाकडून त्याला काहीच कळत नव्हतं. त्यामुळे गोविंदरावांविषयीचं प्रेम कायम होतं. पण एव्हढ्या पडत्या पावसात गोविंदरावांनी पाटील लोकांची भेट का घ्यावी हे त्याच्या लक्षात येत नव्हते. रामजी आणि गोविंदराव यांचा तसा स्नेह होता. गोविंदरावांची आपण एकदा भेट घ्यावी असे रामजीच्या सहज मनी आले, पण आपण त्यांच्या भेटीला जाण्यापेक्षा त्यांनीच आपल्या भेटीस यावे असे रामजीच्या मनात आले होते. पान सुपारी, विडा घेऊन पाटील निघून गेले होते. रामजीच्या मनात गेले दोन-तीन दिवस हेच विचार घोळत होते. त्याने सर्व पाटलांना सूचना दिल्या होत्या, ''औंदा सायेबाचा पह्यलाच वसूल हाये. संमद्यांनी नेटानं दियाचा. वसूल माप झाला त मी पह्यतोच पर नही झाला तं मंग त्यो व्यवस्थाशीर वसूल व्हया पाजेल.'' पाटलांनी माना डोलावल्या होत्या. ही सगळी व्यवस्था झाली होती तरी अजून अन्य पाटील मंडळी त्याला भेटली नव्हती आणि गोविंदरावांविषयीचे विचार त्याच्या मनातून गेलेच नव्हते.

* * *

खांद्याला चामड्याची थैली अडकवून सुऱ्या न्हावी आला. त्यानं ''सरकार, सरकार'' असे म्हणताच रामजीच्या शिपायानं त्याला बसायची खूण केली होती. सुऱ्या न्हावी रामजीच्या बलुत्याचा न्हावी. तो त्याच्यासाठी थेट राजूरहून यायचा. आला म्हणजे मग पायली दाणे घेऊन जायचा. जाताना बारा गावच्या बातम्या सांगून जायचा. कधी



रामजीची झोप उडवायचा. कधी रामजीला खळखळून हसवायचा. रामजीची तोंड भरून स्तुती करायचा अन् त्यांच्या शत्रूच्या गोटातल्या बातम्या तिखटमीठ लावून सांगायचा. रामजी भांगरे सुऱ्या न्हाव्याची आतुरतेने वाट पाहायचा. सुऱ्या न्हावी म्हणजे मोठा गमतीदार माणूस. बोलतांना हळूच डावा डोळा मिचकावून आपल्या मिस्कीलपणे बोलण्याला धार आणावयाचा. कधी वस्तऱ्याला धार लावता लावता आपले लांब गरूडनाक उडवून एखाद्या लावणीची लकेर मारायचा, 'हाती जरीचा रुमाल । नाही दारूचा सुमार । माथी नथ मोडली । घरी जाची लजा मला वाटली ।।' ही लावणी बहुदा त्याच्या फारच आवडीची होती. ती तो मोठी घोळवून घोळवून वस्तऱ्याला धार लावताना आळवी. अशी लावणी तो म्हणू लागला की समजावं आज काही तरी सनसनाटी बातमी तो ऐकविणार. बारा गावातल्या कोणत्या पोरी वयात आल्या येथपासून तो कोण घरघुंशी झाली अन् कोणाची काय काय लफडी चालली आहेत हे सुऱ्या न्हाव्याला पक्के ठावूक असे. म्हणूनच त्याला गिऱ्हाईक चांगलं होतं. रामजी देखील यामुळेच अतिशय उत्सुकतेने वाट पाहत असे.

त्याचा आवाज ऐकून रामजीनं आतूनच त्याला जोरात बसावयास सांगितले. मग बाहेर येऊन जातीनं त्यांनी सुऱ्याची चौकशी केली. ''काय रं सुऱ्या काय म्हन्तो? तुझा धंदा पानी? घरची संमदी खुशाल हायेत?'' तसा सुऱ्यानं तत्परतेनं मान हलविली. आपली थैली बाजूला ठेवून त्यानं घोंगडीवर नीट मांडी ठोकली. हिऱ्याला सरकारांसाठी गरम पाणी आणायला सांगितलं. मग फरशी काढून आणलेल्या पाण्यातून चार थेंब फरशीवर टाकून त्यानं वस्तरा घासायला सुरुवात केली. वस्तरा घासला जात असतांना त्याची लकेर सुरू झाली. तसे रामजी भांगरेच्या लक्षात आले. ते मोठ्या उत्साहाने सुऱ्याच्या पुढे बसले. मग सुऱ्यानं एकदा सरकार नीट बसले की नाही हे पाहिले आणि डाव्या हाताचा अंगठा व तर्जनी यांनी रामजीचे डोके आपल्याला हवे तसे फिरवून त्यांनी उजव्या हाताने त्यांच्या डोक्याला पाणी लावायला सुरुवात केली. मग नीट हातात त्यांचा चेहरा पकडून त्याने वस्तरा टेकवला अन् वस्तरा मोठ्या तन्मयतेने फिरवायला सुरुवात केली. रामजी भांगरेला राहवले नाही. मान तशीच ठेवून त्यांनी सुऱ्याला विचारले, ''का रं काय नवी भानगड?'' ''आं, तुमाली समजला नही?'' सुऱ्यानं आश्चर्याने विचारले. ''का, का, काय झालं?'' डोळे ताणून रामजीने विचारले, तसे सुऱ्याने वस्तरा हातात तसाच ठेवून सांगायला सुरुवात केली- ''दसऱ्याच्या राती घोटीत सक्रूशेटवर लयना मोटा दरुडा पडला. पाच पंचवीस मानुस व्हतं पन असं दानगं आन पार त्या सक्रूला खल्लास करून टाकला.'' ''असं!'' रामजीनं एकदम गंभीर होत विचारलं. ''तर, संमदा ऐवज नेला ना, आन पुढं तं लय इचित्र वं'' ''काय, काय?'' रामजीने आणखी आश्चर्याने विचारले, ''अवं त्याच्या पाक समद्या चोपड्यांची बाह्यर आनून आन होळी केली आन त्येली जो धरला आन तसाचं त्या होळीत टाकला'' असे मोठ्या आवेशाने सांगताना त्याचा वस्तरा नकळत रामजीच्या डोक्यावर दाबला गेला. तसा रामजी भांगरे ओरडला, ''अरं, अरं काय मला मारतोस का काय?'' तशी न्हाव्यानं मोठी जीभ बाह्यर काढली आणि तो पुन्हा सांगू लागला, ''सरकार पाटील

जसं दंबुक घेऊन आलं,'' सुऱ्या बंदुकीला दंबुक म्हणत असे. ''तसा त्येलीच समद्यांनी पकाडला आन ठिवला खांबाला पका आवळून आन त्या चोपड्यांची काळी राख पार त्येच्या तोंडाली दिली फासून. अव पार जसा शिमग्याचा स्वांग!'' सुऱ्या जणू काही आपण ते स्वतःच पाहिलं आहे अशा थाटात सांगत होता. ''असं! बरं मंग!'' रामजीने त्याला पुढे सांगायला होकार भरला. ''मंग एका दरूडंखोरानं समद्या गावकऱ्याली सांगाला का म्हन तुमचा समदा कर्ज माप हाये. सावकाराचं समदं कागद जाळून टाकलं हाये''. ''असं! अरं वा! काय म्हनावा या दरूडेखोरांली, देव मानसं म्हनावा का काय? खरंच असा झाला मंतो का काय?'' रामजीने आपली प्रतिक्रिया व्यक्त केली. ''तर, खोटा सांगतो क काय? अवं त्या हिरजी पाटलांनच सांगातला नव्ह. तो सवता ग्येला घोटी कं काल त आला. त्येच्या कं ग्येलतो तवाच त्येना सांगला.'' ''असं!'' रामजीला या गोष्टीचं मोठं नवल वाटलं. त्याला दरोडेखोरांच मोठच कौतुक वाटलं होतं. त्याच्या वडीलांनी जावजी अन् हिरजीच्या विरुद्ध बंड केलं होतं तेव्हा दरोडे घातले होते. पण हा अनुभव त्याला वेगळा होता. सावकाराच्या चोपड्यांशी या दरोडेखोरांना काय करायचं आहे हे त्याच्या लक्षात येत नव्हतं. सुऱ्यानं मग दाढी संपवली. डोकी, दाढी होता होता त्याने कितीतरी बातम्या रामजी भांगऱ्याला सांगितल्या होत्या. पण रामजी मात्र या एकाच बातमीचा विचार करीत होता. त्यामुळे सुऱ्या न्हावी एकटाच बोलत होता. मग सुऱ्या न्हावी तेथेच जेवण बिवण उरकून थैलीत दाणे घेऊन निघाला तोपर्यंत त्याने गावात चार दोन ठिकाणी डोकी दाढ्या करताना चर्चेला विषय करून देऊन तो दुपारी निघून गेला.

* * *

रामजी भांगरेनं मग राजूरपासून सर्व पाटलांना भेटून सावध राहावयास सांगावयाचे ठरविले. त्याप्रमाणे त्याने स्वतःच आपली मोहीम सुरू केली. आपल्याबरोबर दोन शिपाई घेऊन तो निघू लागला. गावोगाव जावं, पाटलाची भेट घ्यावी, त्याचा पाहुणचार घ्यावा. प्रत्येक गावात गेला की पाटील त्याला उत्तमप्रकारे पाहुणचार कही. दारूची बैठक होई. मग मांसभक्षण होई. गावातल्या बऱ्या मंडळींच्या शिवारातून फेरफटका होई. जाता जाता टंच पोरीही रामजीच्या डोळ्यातून सुटत नसत.

रामजीनं ज्या हेतूनं सगळ्या पाटील मंडळींची भेट घेतली होती तो त्याचा हेतू सफल झाला होता. त्याला गोविंद खाडे पाटलांकडं काही बोलला काय? त्याच्या मनात काय चाललं आहे? घोटीत पडलेल्या दरोड्याचा त्याच्याशी काही संबंध आहे का? तसा असेलच तर त्याने असे दरोडे का टाकावे? अशा कितीतरी प्रश्नांची उत्तरं त्याला हवी होती. त्या सर्वच प्रश्नांना नकारार्थी उत्तरे मिळाल्याने त्याच्या मनातील गोविंदरावांविषयीचं वादळ शांत झालं आणि मग तो पाटील मंडळींच्या घरच्या पाहुणचारात रमला होता. त्याने पोलिस अधिकारी म्हणून जम बसविण्यास या फेरीचा चांगला उपयोग करून घेतला होता.



त्यामुळेच त्याला समाधान झाले होते.

कॅप्टन सीकस मुंबईत होता. त्याला त्याने खास आपल्या दोन स्वारांना पाठवून एकंदर परिस्थिती ठीक असल्याचं कळविलं होतं. आपल्या हाताखालील हवालदार व शिपाई यांना त्यानं कामं वाटून दिली होती. आपल्या अखत्यारीतील व्यवस्था त्याने चोख लावली होती. त्याच्या या रिपोर्टानं राजूरला कुलकर्णी नेमला जाणार होता. कुलकर्णी, पाटील आणि तो असे तिघे मिळून या भागात व्यवस्था ठेवण्याचे काम करणार होते.

आता त्याने त्याच्यासारखेच जमादार म्हणून जे नेमले गेले होते, त्यांच्या भेटी घेण्याचंही ठरविलं होतं. त्यांच्याशी मैत्रीचे संबंध जमवायचे होते.

त्याच्या डोक्यात अनेक कल्पना घोळू लागलेल्या होत्या. जणू मिळालेल्या जहागिरीतील लोकांचे पित्याच्या वात्सल्याने पालन करावे तसा तो आपल्या अधिकारातील गावांचा विचार करीत होता.

तो जेव्हा जेव्हा परगावाहून परत येत असे तेव्हा सीताबाई त्यांना खोदून खोदून घडला वृत्तांत विचारीत असत. मग रामजीला तो वृत्तांत सीताबाईला सांगावाच लागे. वृत्तांत ऐकून सीताबाई अगदी खूष होऊन जात. त्यांना आपल्या नवऱ्याची दृष्ट काढून टाकाविशी वाटे. त्याच्या रूबाबाने तिला मूठभर मांस चढे. मग चार बायात बोलताना या सगळ्याची उजळणी होत असे. रामजी वृत्तांत सांगू लागला की रुक्मिणी कान टवकारीत असे. तिचे कोवळे मन अप्रत्यक्षपणे या सर्व गोष्टींचा विचार करीत असे.

पण का कोण जाणे तिच्याही मनात गेले चार-पाच महिने सारखा विचार येत असे. आपल्या बाबांनी गोऱ्यासाहेबाला मदत का केली? तिच्या आईनं तिला कितीतरी वेळा शिवाजीराजांविषयी गोष्टी सांगितल्या होत्या. हे सगळं राज्य त्या शिवाजी महाराजांचं होतं मग आपल्या बाबांनी गोऱ्याला मदत करून हे राज्य गोऱ्या साहेबाला का देऊन टाकलं? आपले बाबा एव्हढे स्वार्थी आहेत का? एव्हढे दुष्ट आहेत का ते? त्यांना अधिकार नाही मिळाले म्हणून त्यांनी आपलं राज्य दुसऱ्याच्या घशात घातलं? मग त्या कोवळ्या मनाला उगाच आपल्या बाबांचा राग येई. मग पुन्हा बाबांना मिळालेला मान, त्यांचा रूबाब, त्यांना सारे सरकार सरकार म्हणत, लवून भजून मुजरा करीत हे सारं आठवायचं अन् पुन्हा तिचं मन अभिमानाने भरून यायचं. असे उलट सुलट विचार तिच्या मनात भरून येत असत. मग सहज गोविंदराव खाडेंविषयी तिच्या मनात विचार येत असत. ते तिच्या बाबांचे मित्र असून ते बाबांसारखे का वागले नाहीत? त्यांनी किती स्वाभिमानाने लढा दिला हे आठवायचं अन् मग तिला त्यांच्याविषयी अभिमान वाटायचा. कधी कधी ती आपल्या आईला खोदून खोदून विचारी, ''बाई, का रं गोविंदराव खाडे आपल्या बाबावानी पोलिस अधिकारी का न्हाईत?'' तिचा मार्मिक प्रश्न ऐकून सीताबाई म्हणत, ''त्येली सायबाची चाकरी न्हाई करायची.'' ''का बरा?'' रुक्मिणी विचारी. तशी तिचे प्रश्न टाळण्याच्या उद्देशाने सीताबाई म्हणे, ''येरीच.'' मग रुक्मिणीचे समाधान होत नसे आणि ती उगाच विचार करीत बसे.

* * *

शेंडी गाव तसं फारसं दूर नव्हतं. अर्धापाऊण तासाचा घोड्याचा रस्ता, पण दाट झाडीतून वर यावं लागायचं. तरीसुद्धा गोविंदराव खाडे जवळजवळ वर्षभरात फिरकला नव्हता. रामजी भांगरेचे आणि त्याचे संबंध तसे चांगले होते, पण गोऱ्या साहेबाला मदत करण्याचं धोरण अवलंबून रामजीने गोविंदरावांचे मन उद्ध्वस्त केले होते. तरीसुद्धा रामजीला आपण हाताशी धरले तर त्याचं बंडखोरपणा पुन्हा सत्ता उभी करावयासही उपयुक्त ठरू शकेल हे गोविंदराव खाडे जाणून होते. म्हणूनच आज दुपारी उन्हं कलली आणि गोविंदरावांनी मनाशी काहीतरी विचार करून घोड्याला टाच दिली. पण तो फारसा वेगाने चालला नव्हता. खाचरा-खाचरातून डोंगर उतरणीला राव चालली होती. कोणी जमिनीवर अंथरलेला पालापाचोळा पेटवून देत होते तर कोणी राब करण्यासाठी पालापाचोळा, गवत, झाडांच्या डांगल्या तोडून आणित होते. भाजऱ्या रानांचा वास सुटला होता. त्या वासानं रानातल्या बेडक्या, खेकडे लांब बिळात पळत होते. रानारानातून राबणारे गोविंदरावांचा मोहरा उलट दिशेने पाहत होते. गोविंदरावही जाताजाता राबणाऱ्या लोकांची जातीने विचारपूस करत निघाले होते. वारनघुशीच्या नाल्याजवळ त्यांना जावजी भेटला होता. जावजीला पाहताच गोविंदराव खाली उतरले. जावजी तसा वयाने वृद्ध. कितीतरी घडामोडी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलेला. गोविंदराव जवळ येताच त्याने मोठ्या आपुलकीने विचारले, ''का रं, गोविंदराव आज इकिल्या बाजुनी कुड रं?'' ''चालो येरीच'', गोविंदरावांनी असे उत्तर देताच जावजीने काहिसा विचित्र चेहरा करून विचारले, ''गोविंदराव तुमी येरीच कुटं जाईल?'' त्याच्या प्रश्नाचे उत्तर द्यावेच लागणार हे लक्षात येऊन गोविंदरावांनी सांगितले, ''चालो रामजी भांगऱ्याला भेटाय.'' ''आं! काय दम पडना कां काय? का आख्या डांगानातयेक बी सिपाई गांवना?'' गोविंदरावांनी जावजीचे मन ओळखले होते. फारशी चर्चा न करता त्यांनी उत्तर दिले, ''लई दिसाचा मैतर हाये. भेटाया नकु?'' तसे जावजीने सुनावले, ''हां हां भेटा जावा, पर जरा जपून.'' तशी होकारार्थी मान हलवून गोविंदरावांनी पुन्हा घोडे पिटाळले. समोर करवंदीच्या जाळ्याचं रान होतं. अवघ्या डांगाणात सर्वदूर इथे काहीशा दाट जाळ्या पसरल्या होत्या. गोविंदराव दौडत होते. शेंडीगाव आता जवळ आलं होतं. एक घाट यंगून गेलं की शेंडी पलिकडच्या डोंगर उताराला. गोविंदराव दौडत होते आणि अचानक विस्मयाने ते थबकलेच. समोरच्या छोट्याशा टेकाडाआडून एक मुंगूस जोरात जिवाच्या आकांताने दौडत येत होतं. गुबगुबीत अंगाचं, लाल तोंडाचं आणि गेंदेदार शेपटाचं. ते लांबड मुंगूस असं घाबरून का पळतंय म्हणून त्यांची नजर सहज त्याच्याकडे गेली. दहा-दहा, बारा-बारा वर्षांच्या दोनचार मुली हातात पळसाच्या पानाच्या द्रोणात काळीभोर करवंदे घेऊन तोंडात एखादे चघळत आणि उजवा हात उंचावत मुंगसाच्या पाठमागून पळत होत्या. पुढची मुलगी फारच चुणचुणीत होती. धारदार नाक, पाणीदार डोळे, अंगरेखले अवयव आणि त्यावर उभारवट्याचं हिरवंगार लुगडं. अंगात घातलेली खणाची चोळी आणि उगाच अडकवली फडकी. पाठीमागे बुचडा बांधून लोंबकळत ठेवलेले बरेच केस. कपाळी कुंकवाचा टिकला, बेदरकारपणे मुंगसाच्या पाठीमागून ती पळत होती. रस्त्यात कोणीतरी थांबून ही शिवाशिव पाहत आहे याचे भानही तिला नव्हते. ''आरं आरं, मुंगूस असं गावणार नाही'' हे शब्द तिच्या कानावर येताच ती दचकली. आता कुठे तिचं लक्ष गोविंदरावांकडे गेले होते. त्यांना पाहताच त्या साऱ्या पोरी भांबावून गेल्या. रुक्मिणीला, त्या चुणचुणीत मुलीला हा स्वार परिचयाचा वाटत होता. पण तिच्या अजून लक्षात येत नव्हते आणि मग तिला एकदम स्मरले. हे गोविंदराव खाडे तर नाहीत? आणि ती एकदम उत्सुकतेने पण लाजऱ्या नजरेने त्यांच्याकडे पाहू लागली. गोविंदराव त्या मुलीकडेच कौतुकाने पाहत होते, ''नाव काय रं तुझं?'' ''रुक्मिणी''. रुक्मिणीने उगाचच आपल्या हातातील करवंदाकडे पाहत उत्तर दिले. ''रुक्मिणी! अरं वा! कुनाची रं!'' गोविंदरावांनी विचारले. ''रामजी जमादाराची?'' पोरीनं मोठ्या ठसक्यात अभिमानानं उत्तर दिलं. ''वा! वा! रामजी भांगऱ्याची तू? आरं आमी तुमच्याच घरी निंगालो. वळाखला काय मला?'' रुक्मिणीने उगाचच आठवल्यासारखे केले आणि मग उजव्या हाताची तर्जनी नाकासमोर धरीत आत्मविश्वासाने उत्तर दिले ''गोविंदराव जागिरदार!'' गोविंदराव खळखळून हसले. ''अरं वा पोरी तू पका ध्यान धरलास हां, आर केवडी मोठी झाली रं तू. आवंदा लगीन कराया हवं.'' तशी ती उगाचच लाजली आणि तिन्ही पोरी घोड्यासमोरून खुसखुसत पळून गेल्या. तसे गोविंदरावांना मनापासून हसू आले. पळून जाणाऱ्या अवखळ मुलींकडे कौतुकभरल्या नजरेने पाहत गोविंदरावांनी घोड्याला टाच दिली. घोडा दौडू लागला. घाटातून जाताना दाट रानाच्या छायेत त्यांच्या मनात त्या चुणचुणीत रुक्मिणीविषयीच विचार होते. रुक्मिणी आणि किस्ना यांचा जोडा सहज त्यांच्या अंतःचक्षूसमोर उभा राहिला. त्यांचं मन हरखलं. आपल्या एकुलत्या एक मुलाच्या लग्नाचे विचार त्यांच्या मनात घोळू लागले. रानच्या राजाला सहजतेनं मारणाऱ्या किस्ना राजासाठी चपलगतीनं पळत जाणारी रुक्मिणीसारखी हरणीच त्यांना योग्य वाटली आणि क्षणभर आपण कोणत्या कामाला चाललो हेही ते विसरले. भोवताली करवंदीच्या जाळ्या पिकल्या काळाभोर करवंदांनी भरून गेल्या होत्या.

* * *

शेंडीगाव नजरेस आले तसे गोविंदराव भानावर आले. आपण उगाच विचार करीत बसलो हे मनात येऊन त्यांना हसू आले. गेल्या वर्षभरात रामजीत आणि त्यांच्यात कितीतरी दुरावा निर्माण झाला होता. सहज खुल्या दिलानं आणि लांबचं पाव्हणं म्हणून एकमेकांचे मैतर बनलेले रामा-गोविंदा आज एक स्वराजवंचित म्हणून तर दुसरा स्वराज्यासाठी तडफडणारा म्हणून एक प्रकारे एकमेकांच्या विरुद्धच होते. रामजीची ही फितुरी अन् परधार्जिणीवृत्ती गोविंदरावजींच्या मनाला विदीर्ण करणारी झाली होती, पण तरीसुद्धा अजून त्याचा चांगुलपणा जागृत करून आपण त्याला स्वराज्याभिमुख करू शकू असे गोविंदरावांना वाटत होते. म्हणूनच त्याच्याशी पुन्हा चांगले अन् सलोख्याचे संबंध प्रस्थापित करावयास गोविंदराव धजावले होते.

रामजी भांगऱ्याने जमादार झाल्यापासून आपल्या शेजारचे एक मोठे चावडीवजा घर घेऊन तेथे बैठक घातली होती. आपली ''ती'' खुर्ची तेथे ठेवली होती आणि बसायला चांगले जाजम टाकलेले होते. आपल्याकडे कोणी साहेब आलाच तर त्याला द्यायला म्हणून आणखी एक खुर्ची त्याने मुद्दाम बनवून घेतली होती. गोविंदराव आले तेव्हा तो आपल्या खुर्चीत बसून चिलीम पित होता. हिऱ्या जवळच उभा होता. घोड्याच्या टापांचा आवाज येताच रामजींनी हिऱ्याला कोण आलाय ते पाहावयास सांगितले. हिऱ्यानं बाहेर पाहिले तसा तो टुणदिशी उठलाच. त्याने पळत येऊन रामजीस सांगितले, ''अवं सरकार, सरकार,'' रामजीने अगदी बेफिकीरीने तेव्हढ्यात एक दम मारला होता. हिऱ्या सरकार, सरकार म्हणतोय हे ध्यानात येताच त्यांनी त्याच्याकडे पाह्यले तसा हिऱ्या पुन्हा म्हणाला, ''सरकार, सरकार, अवं गोविंदराव खाडे आलं.'' त्याचं वाक्य पुरं व्हायच्या आतच रामजी भांगरे ताडकन उठला अन् तो दरवाजात आला, तेव्हां गोविंदराव घोड्याच्या खालीच उतरत होते. रामजी पुढे झाला. त्याने गोविंदरावांना उरभेट दिली, मग हाताला धरून आत नेले. हिऱ्याला खुर्ची मांडावयास सांगितली आणि मग दोघेही बसले. रामजीने मोठ्या आदराने विचारले, ''काय गोविंदराव, वाकडी वाट करून आलात? आमची सय झाली म्हणायची!'' गोविंदरावांनी रामजीचा स्वर ओळखला आणि ते म्हणाले, ''वाकडी वाट आमी न्हाई केली. आमचं चालणं सरधोपट. पर म्हनलं आपलं रामजी यव्हढं मोठं जमादारसाहेब झालं आपली सय काढत्यात का न्हाई पघावा! पर आपला सांगावा सुदिक न्हाई. तवा म्हनलं आपन लहान मानसं आपूनीच येवा भेटाया.'' मग मात्र रामजी थोडा वरमला. मग हिऱ्याला त्याने फर्मावले, ''अरं पानी बिनी काय आनसील क न्हाई? आन् घरला सांगून यी, जरा चांगलं-चुंगलं करा म्हनावं.'' ''अरं अरं मी आपलं निस्त भेटाया आलु. म्हनलं भेटावा आन जावा.'' गोविंदराव म्हणाले. ''अरं मंग जा ना, पर तुमच्या वह्यनीला ईचारून जा मंजी झाला. त्येनी जा म्हनलं त जा आन न्हाई म्हनलं त ऱ्हा.'' तसे गोविंदरावांचे काहीच चालेना. ते हसून म्हणाले, ''तुमी आम्हाला पार वाघरातच पकडलं म्हणा की.'' तेव्हढ्यात हिऱ्यानं पाण्याचा तांब्या आणला. गोविंदरावांनी चूळ भरली. घटाघटा चार घोट पाणी घशाखाली ओतले. मग रामजीने पुन्हा चिलीम पेटवली आणि गोविंदरावांना देत विचारले, ''काय गोईंदराव खरा काय काम आनला. काय गुतागुत हाये काय?'' ''न्हाई. पर म्हनलं आपलं येव्हढ्या दिसाचं नातं आन येरीच एकमेकापून लाम ऱ्हायचं. तवा आपुनच यकदा जाऊन येवा मंजी मंग बरा.'' मग रामजीने सुस्कारा सोडला. मग हवापाण्याच्या गप्पा सुरू झाल्या.

बोलता बोलता रामजीने सहज म्हणून पडलेल्या दरोड्यांच्या संदर्भात विषय काढला. गेल्या चार महिन्यात पंधरा-वीस दरोडे पडले होते. सबंध कोकणचा भाग हादरला होता. त्याच्या साऱ्या बातम्या रामजी भांगरेच्या कानावर आल्या होत्या. दरोड्यांचा विषय निघाला तसे गोविंदराव सावध झाले. त्यांनी रामजीला सुताचाही थांग लागू दिला नाही. रामजीने मात्र कॅप्टन सीकसने आपल्याकडे दरोड्यांविषयी चौकशी केली होती. आपल्या भागात एकही दरोडा पडला नाही अन् पडणार नाही हे आपण कसे कळविले हे सांगितले. गोविंदराव खाडेंनी त्याला माना डोलविल्या होत्या.

रामजी भांगरे हे सारे मोठेपणाने सांगत होता आणि मग बोलता बोलताच त्याने गोविंदरावांना विचारले, ''गोईंदराव, तुमच्याबद्दल कॅप्टन सीकसचं लई चांगलं मत हाये. तुमी म्हना, अजुकबी तुमाली सायबाची चाकरी करता ईल,'' तसे गोविंदराव चमकले. आणि रामजी भांगऱ्याला त्यांनी सांगितले, ''एकडाव उपाशी मराया लागलं तरी चालन पर गोऱ्या सायबाची चाकरी मंजी आईला परघरी पाठविण्यासारखं हाये पघा.'' तसा रामजी कडाडला, ''ह्ये सांगायसाठी तुमी इड आला असाच ना? पर शिरीमंत पेशवं हात जोडून शेनी गोऱ्या सायबाला शरण आलं त्येंच काय झालं? अव आपल्या मंदी एक दिलजमाई नाही त मंग सर्व राज्य कसं टिकायचा? आन मी मंतो राजा कोनबी आसला तरी परजा सुखात असल्या मंजी झालं. अन परजेला कसं सुख द्यायचं त्या मायबाप कंपणी सरकारला चांगला कळाताय.'' तेव्हढ्यात रामजी भांगरेची बायको सीताबाई तेथे आली. त्यांनी दोघांचा चाललेला वादविवाद पाहिला तसे मध्येच हटकून त्या म्हणाल्या, ''अवो तुमाला जे काय करायचा ते तुमी करा आन गोईंदरावना जे करायचा आसन त्या त्येली करू द्या उगा भांडताय येरीच?'' तसे गोविंदरावांनी हसण्यावारी नेत म्हटले, 'अवं भांडण नाय वह्यनी ह्य आपलं येरीच, गप्पां.'' मग विषय बदलण्यासाठी गोविंदराव म्हणाले, ''अरं वह्यनी तुही पोर दिसली व्हती. काय पोर हाय का ईज!'' सीताबाईला बरं वाटलं. ''कुठं दिसली?'' तिनं विचारलं. 'करवंदीच्या रानात मुगसाच्या मांग पळत निंगाली व्हती.'' ''असा! त्ये कह्याली कोनला म्हाईत अवं एखाद्या दिसी हातपाय मोडून बसायची पोर.'' तसे रामजी म्हणाला, ''बरं बरं टंगडं बिंगड मोडाया ती का ह्या हाये? अवं ती रामजी भांगऱ्याची पोर हाये!'' मंग गोविंदरावांनी विचारलं, ''पोरगा दिसत नाही कुठं?'' ''असंन येरीच खेळत गुरांक'' सीताबाईने उत्तर दिले.

मग गोविंदराव अन् रामजी त्यांच्या घरी आले. दोघांना औरसचौरस पीढे मांडले गेले. रामजीने गोविंदरावांस हात धुण्यास भांडे सारले. गोविंदरावांनी हात धुवून भांडे सारले तो पुढ्यात भरलेली ताटं आली. डाळ, भात, भजी, कुरड्या, पापड्या, सांडगे आणि पुरणाची पोळी अन् गुळवणी असे गच्च ताट भरून समोर पाहताच गोविंदरावांनी विचारले, ''काय र वयनी अरं आज काय मुक्काम कराया लावण्याचा इच्चार हाये क काय?'' ''मुक्काम करावं असं काय हाये? हाये आपलं गरिबाचं. आमी काय जागिरदार न्हाई.'' सीताबाई हसत हसत बोलल्या. तसे गोविंदरावांनी छद्मीपणाने रामजीकडे पाहिले. म्हटले, ''हा! जागीरदारच पर गमावल्या जागिरीचा. नावाचं राजं आन खाया खेकडी भुजं तसा आमचा.'' तशा सीताबाई गंभीर झाल्या. आपलं बोलणं चुकलं की काय असे वाटून त्यांना थोडे शरमिंद्यासारखे झाले. पण विषय पुढे लांबलाच नाही. कारण तेव्हढ्यात दारातून पळतच रुक्मिणी आली अन् घरात गोविंदराव जेवायला बसलेले पाहून अगदीच लाजली अन् आत पळाली. तसे गोविंदराव मुद्दामच म्हणाले, ''का रं रुक्मिणी लागलं का मुंगुस

हाती.'' दारा आडूनच रुक्मिणीने उत्तर दिले ''नाही.'' मग सीताबाईनं तिलाच गुळवणी आणि सार वाढायला सांगितले. ती वाढायला आली तशी धडपडली पण सावरून पुढे होत तिनं रामजीच्या पानात वाढायला सुरुवात केली तसे रामजी म्हणाले, ''अरं अरं, अदुगर गोईंदरावला ठिव'' मग तिने आपला मोर्चा गोविंदरावांकडे वळवला तसे गोविंदराव हसत म्हणाले, ''अरं वा पोरीला थाट कराया याया लागलं रं वयनी.'' तशी सीताबाई म्हणाल्या, ''काय सून करून घेता का काय मह्या रुक्मिणीला?'' तशी रुक्मिणीने धूम ठोकली. तिला आपला चेहरा कशात लपवावा असं झालं. गोविंदराव आपल्याला मागणी घालायलाच आले आहेत असा विचार तिच्या मनात येऊन ती लाजू लागली, मनोमन खुलून गेली. गोविंदरावांनी उत्तर दिले, ''आता रामजीनं आमा गरिबा घरी त्यांची यकुलती यक पोर दिली त सुन करून घ्येया मी यका पायावं तयार हाये.'' तसा रामजी खळखळून हसला अन् म्हणाला, ''छा, तुमच्याकढं कोन देतं व्हं पोरीला.'' हे शब्द कानी पडताच सीताबाई अन् आत कोपऱ्यात दडलेली रुक्मिणी ही कान टवकारून ऐकू लागली. ''राज गेलेल्या जागिरदाराकडं सून म्हून देना पक्षी जागीरी मिळवू सकन असं त्येचं पोर हाये त्येची बायकू म्हून दिऊ बा.'' हे म्हणताना त्याने चेहऱ्यावर उसने गांभीर्य आणले होते. मग मात्र सगळेच खळखळून हासले. सीताबाई पुन्हा वाढायला आल्या तसे गोविंदरावांनी विचारलं, ''अरं, अरं वयनी तुमी कशा पाय आल्या, मही पोर कुठाय?'' तशा सीताबाई मोठ्या ठसक्यात म्हणाल्या, ''हा अजुक लगीन हुयाच हाये, तवर पोर आमची हां!'' तसा रामजी मात्र गंभीर झाला आणि त्याने गोविंदरावांना विचारले, ''मंग कवाची तीथ धरता?'' ''अवो इक्ति घाई नगं, अजूक व्हऊ द्या पोरांली मोठं'' गोविंदराव म्हणाले. ''पर शब्द पक्का नव्हं?'' रामजीने विचारले. ''अवं थांबत बसलो हायो. गोविंदरावचा शब्द हाये त्यो.'' आणि एकदम रामजी आणि गोविंदराव अगदीच मोकळेपणाने बोलू लागले. दिव्याची वेळ झाली म्हणून आत रुक्मिणीने दिवा पेटवला. दिव्याच्या प्रकाशात सर्वांचे चेहरे अन् मनं देखील उजळून निघाली. मग एकदा घरातच रामजीने चिलीम जमवली. चिलमीचे चार झुरके घेऊन गोविंदराव उठले तसे रामजीने त्यांचा मनगट धरून म्हटले, ''बसावं रातच्यारात मुक्काम करूनच जावा'' तसे गोविंदराव म्हणाले, ''आता आज मुक्काम नकु. किस्नाच्या आईला हा कारभार सांगाया पाजेल.'' मग सीताबाईनं रुक्मिणीला पुढं घातलं. रुक्मिणी पुढं झाली आणि तिनं गोविंदरावांच्या पायावर डोकं ठेवलं. तिच्या गालांवर पांगारा फुलला होता. गोविंदरावांनी आपल्या हातीचं सोन्याचं कडं काढलं अन् पोरीच्या हाती चढविलं. तशी सीताबाईनं आपल्या पोरीची अलाबला घेतली. रामजीचं मन भरून आलं. त्यानं आपल्या पोरीला पोटाशी धरले. तसे गोविंदराव म्हणाले, ''अरं, अरं, लगीच काय मी घिऊन निंगालो क काय तुमच्या पोरीली. पघा मंजी तुमचीच तीथ धरायची घाई. तीथ कंची इचारीत व्हता'' असे म्हणत त्यांनी रामजीचे खांदे धरून त्यांचे समाधान केले. काही वेळापूर्वी एकमेकांच्या विचारांचं भांडण लावून देणारे दोन शिपाई, एकदम एकत्र झाले होते. स्नेहाच्या दोन धाग्यांचे सूत जमले.



* * *

रामजी भांगरेंचा निरोप घेऊन गोविंदराव निघाले. त्यांच्या मनात आशेचा किरण पालवला होता.

घरी आल्यावर त्यांनी जेव्हा ही बातमी आपल्या राधाबाईंना सांगितली तेव्हा राधाबाईंनाही आनंद झाला होता. किस्नाला जेव्हा हे समजले तेव्हा तो उगाचच विचारात पडला होता. लग्न म्हणजे काय? हा विचारच अजून त्याच्या मनाला शिवला नव्हता.

दसरा-दिवाळी केव्हाच उरकून गेली होती. रामजी भांगरेने सर्व पाटील मंडळींना केव्हाच वसूलीचे हुकूम दिले होते. तसा वरून हुकूमच आला होता. या वर्षी पाऊसपाणी भरपूर झाला होता आणि तसे वसूल होणे फारसे अवघड नव्हते. रामजी भांगरेचा चोख व्यवहार अन् व्यवस्था पाहून राजूरला खास कुलकर्णी नेमला गेला होता. राजूर तर्फाची व्यवस्था का कोण जाणे पण अहमदनगरहून सुरू झाली होती. वास्तविक अहमदनगर शहर अजूनही तसे मुसलमानांच्या वर्चस्वाखालीच होते. पण साहेबाचे आता चांगलेच वर्चस्व निर्माण झाले होते. कुलकर्ण्याने सगळ्या गावांची इनामे, वतने, कागदपत्रे तपासून पहावयास सुरुवात केली होती. आता पोलिसांची एक तुकडी चांगली एकवीस जणांची रामजी भांगरेच्या हाताखाली काम करण्यासाठी येणार होती. रामजी भांगरेचा गावागावातून रूबाब वाढत होता. यावर्षी विजयादशमीच्या निमित्ताने रामजीला पुष्कळच भेटी आल्या होत्या.

कुलकर्णी आणि जमादार यांनी गावच्या पाटलाला बोलावून घ्यावे, त्याला कागदपत्रे आणावयास सांगावित, त्याच्याबरोबर गावातील आवश्यक लोकांना बोलवावे आणि गावची चोख व्यवस्था लावून द्यावी असा कार्यक्रम चालू होता. आतापर्यंत दहा-पंधरा गावे त्यांनी हातावेगळी केली होती. काही ठिकाणी पाटीलकीची वतनं बदलली होती. जागोजाग पोलिस पाटील नियुक्त करावयाचे ठरले. पण हे सगळं होता होता पाचसात वर्षे जाणार होती. कॅप्टन सीकसने या भागात चांगलेच लक्ष घातले होते. कॅप्टन सीकस कुशल सेनाधिकारी होता. त्याला हा भाग ताब्यात घेणे फारच जड गेले होते. नासिक, ठाणे या जिल्ह्यांच्या सीमारेषेवर असलेला भाग अनेक सत्तांनी आणि वतनांनी वेढलेला होता. गडकोट अतिशय अवघड होते. म्हणूनच या तीन भागात अशांतता निर्माण करण्याच्या दृष्टीने हा भाग अत्यंत सोयीचा आहे हे त्याच्या चांगले लक्षात आले होते. तशाच गेल्या वर्षापासून दरोड्यांचे जे प्रमाण कोकणात होते त्याचा या भागाशी संबंध असावा अशी सहजच त्याच्या मनात शंका निर्माण झाली होती. त्यामुळेच त्याने या भागात चोख व्यवस्था असावी असे म्हटले होते. त्याला पूर्ण साथ देणारा रामजी त्याला भेटला होता. त्यामुळे तसा तो निर्धास्त होता. हिरजी नाईक हा या सुभ्याचा सुभेदार होता. आता तो पूर्णपणे शरण आलेला होता आणि त्याच्या काही हालचाली दिसत नव्हत्या. त्याचे वडील जावजी मात्र चांगले लढवय्ये असले तरी तेही फार उशीरा मराठी सत्तेत सामील झाले होते. त्यामुळे

आता पुन्हा तो डोके वर काढण्याची शक्यता दिसत नव्हती. रामजी भांगरे हळूहळू काम पुढे रेटीत होता, पण त्याच्या वाढत्या रूबाबाबरोबरच त्याची छानछोक आणि गुलहौशीपणा वाढला होता. या डोंगरदऱ्यामध्ये जणू सर्व सत्ता त्याच्या हाती आली होती. आता सारे पाटीलही त्याच्याशी मोठ्या सहकार्याने वागू लागले होते. त्याला त्या गोविंदरावांची भीती वाटत होती, तोही आता त्याचा झाला होता.

* * *

दिवाळी संपून काही दिवस झाले असतील नसतील तोच कोकणात दरोडेखोरांनी धुमाकूळ घालायला सुरुवात केली होती. आता ठाणे जिल्हा सोडून कुलाबा भागातही दरोडेखोरी वाढत चालली होती. या वर्षात आतापर्यंत चार-पाच मोठमोठे दरोडे पडले होते. बातम्या रामजीपर्यंतही पोचल्या होत्या. रामजीला कॅप्टन सीकसची अनेकवार पत्रं येत आणि प्रत्येक पत्रातून दरोड्याविषयीची पृच्छा असे. रामजीने पुन्हा याही वर्षी इकडे कोणताही दरोडा नसल्याचे सांगितले होते. त्यामुळे तो स्वतः तरी अत्यंत खूष होता. त्याला आपल्या मुत्सद्देगिरीचे अन् साहेबाशी असलेल्या संबंधाचे कौतुक वाटे. त्यामुळे दरोडेखोरांचीच काय पण कोणाचीच इकडे येण्याची छाती नाही असे त्यास वाटत होते. त्यामुळेच तो बिनदिक्कतपणे डांगाणात राज्य करीत होता. दिवस जात होते. डांगाणात कसं सुतासारखं सरळ राज्य चाललं होतं. यावर्षीच्या जत्रा-यात्राही व्यवस्थित पार पडल्या. उन्हाळ्याचे दिवस आले. लग्नकार्ये होऊ लागली. रामजी भांगरे लग्नातला मोठा मान घेऊ लागला. नवरा नवरीला आशीर्वाद देऊ लागला. निरनिराळ्या देवतांप्रमाणे आता रामजीपुढेही जत्रा होऊ लागली होती. रामजी खूष होता.

एवढ्यात त्याला तमाशाचे वेड लागले होते. धर्मार्थ म्हणून जसा तो पैसा उधळी तसाच तो तमाशावरही उधळी. त्यांनी आपल्या करमणुकीसाठी एक खास तमासगीर मंडळी डांगाणात आणून ठेवली होती. त्याच्याजवळ चार गुलहौशी पाटीलही जमा झाले होते. त्याच्या शिपायांनाही शिकार अन् खाणे-पिणे याशिवाय दुसरा धंदा नव्हता. ते रामजीची वारेमाप स्तुती करीत. रामजीला आपण या डांगाणचे राजेच झालो असं वाटू लागलं होतं. बोकड, कोंबड्या पडत होत्या. दारूच्या बैठका होत होत्या. तमाशातून उत्ताण लावणीच्या स्वरांबरोबर अन् शेवंतीच्या घाटदार नृत्याबरोबर दारूची झिंग चढत होती. रामजीच्या रात्री जात होत्या. पावसाळा आला तरी त्याला पर्वा नव्हती. गावच्या मारुतीच्या मंदिरात चाललेले टाळ, मृदुंग आणि अभंगाचे आवाज त्याला ऐकू येत नव्हते. कधी कधी तो आपल्या शिपायांना घेऊन दोन-दोन दिवस जंगलात शिकारीलाही जात असे.

सीताबाईला मात्र याची चिंता वाटू लागली होती. तिने एकदा गोविंदरावांनाही सांगावा धाडला होता. गोविंदरावांनी काळजी करू नका म्हणून सांगितलं होतं.

गोविंदरावांना हेच सारं हवं होतं. पावसाळा आला तसे गोविंदराव आणि त्यांचे साथीदार पुन्हा आपापल्या ठिकाणी परतले. यावर्षीची मोहीम गत वर्षापेक्षा फारच यशस्वी झाली होती. गोऱ्या साहेबाला पार या मोहिमेनं हादरवलं होतं. अमाप संपत्ती मिळाली होती. टोळीची संख्या दोनशे-अडीचशेपर्यंत गेली होती. आता या टोळीच्या चार टोळ्या करायचा असा विचारही पक्का झाला होता. चार टोळ्या करून आता मावळ, कोकण, पठार आणि नासिक भागात एकदम हाहाःकार उडवून देता येणार होता. यावर्षी जवळजवळ पन्नासएक माणसांना मुकूनही दोन-अडीचशेपर्यंत म्हणजे चांगली संख्या जमत होती. हळूहळू डांगाण भागातली एकेक दोन-दोन पोरे पारखून गोविंदरावांनी आपल्या ताब्यात आपल्या साथीला घ्यायची ठरविली होती. आणि तशी त्यांना मिळत होती. पोटाचा प्रश्न सुटला की लष्कर वाढते हा त्यांचा विचार अगदी तंतोतंत अनुभवास येत होता. आता वाळ्याचा अन् लक्ष्याचाही रूबाब वाढला होता. गोविंदरावांच्या सहवासात ते सारे खुशीत होते. गावोगावचे कितीतरी लोक या दरोडेखोरांवर खूष होते. दरोडेखोरांच्या जीवनातही स्वराज्याचे स्वप्न ते पाहत होते. जमेल त्यावेळी गोविंदराव त्यांना शिवाजी महाराजांची आठवण देत असत. त्यांच्या विषयीचे प्रसंग सांगत असत. मग ते पुलकित होऊन जात असत. जे मरत होते त्यांच्या मरणातून सूडांच्या भावनेने पेटलेले त्याच्या कुळीचे तरणेबांड येऊन मिळत होते. पुढच्या वर्षीची मोठी योजना घेऊनच सारे परतले होते. म्हणूनच गोविंदराव रामजीच्या बाबतीत निर्धास्त होते. जव्हार, कल्याण, ठाणे, माहिम, कुलाब्यातील काही भाग, मावळ यातील शूर अन् असंतोषी शिपाई, सरदार, जहागिरदार यांना स्वातंत्र्यासाठी उठवावयाचा विचार गोविंदरावांच्या मनात होता. त्याप्रमाणे या सर्वच भागात दरोडेखोरांविषयी पूर्ण सहानुभूती, आपुलकी होती. यावर्षी एकेका गोऱ्यासाहेबाचा काटा काढण्याचा निर्णयही गोविंदरावांनी घेतला होता. सगळ्याच गोष्टी घाईने करणे आवश्यक होते.

* * *

पावसाळा सुरू झाला पण पावसाळाच होता तो. नावाला. महामूर पावसाच्या या प्रदेशात अजून ढगही फिरकले नव्हते. शेताच्या राबांची कामे संपवून सारे त्या वरुणराजाची वाट पाहू लागले होते. तसे गोविंदराव थोडे उद्विग्न झाले होते. आता दुष्काळ पडणार की काय असे त्यांना वाटत होते. त्यामुळेच त्यांच्या मनात चिंता निर्माण झाली होती. मोठा परिसर आता त्यांच्याकडे डोळे लावून सहानुभूतीने पाहत होता. असा दुष्काळ पडला तर मग काय करावयाचे असा विचार गोविंदरावांच्या मनात येत होता.

रामजी भांगरे मात्र अजून त्याच्याच नादात होता. पाऊस पडो न पडो त्याची नोकरी, पगार अन् असलेला पैसा त्याला काहीच कमी पडणार नव्हते. तरी सीताबाई त्याला अधूनमधूनच या परिस्थितीची आठवण करून देऊ लागली होती. म्हणूनच रामजी निदान काही प्रमाणात तरी भानावर येऊ लागला होता. त्याने प्रजेकडे लक्ष दिले पाहिजे असे सीताबाईंचे सांगणे असे.

विजयादशमीचा दिवस म्हणजे रामजी भांगरेच्या 'भेट' समारंभाचा दिवस ठरून गेला होता. तो पोलिस अधिकारी झाल्यापासून गेली तीन-चार वर्षे सतत हा कार्यक्रम होता. दरवर्षी हा कार्यक्रम विस्तारत होता. चाळीस गावातील पाटील मंडळी आता या कार्यक्रमाला जातीने उपस्थित राहणार होती. त्यांच्याबरोबर गावोगावचे हजारो कोळी, ठाकर, कानडी या समारंभात भाग घेणार होते.

आज पहाटेपासूनच रामजी भांगऱ्यांचा दरबार सजू लागला होता. त्याच्या चौकीसमोर रात्रीच मोठा मांडव उभारला होता. वीस-एकवीस शिपाई, भंडारदऱ्याचे खाडे पाटील, उडदावण्याचे परगणे पाटील गिऱ्हे, रतनवाडीचे पांढरे, झडे आणि गोविंदरावांच्या मर्जीतला खास सेवक रख्म्या कार्यक्रमाच्या तयारीसाठी जातीने उपस्थित होते. दरबारच्या खांबाखांबाला पळस, पिंपळ, आंबा, औदुंबर यांच्या डांगल्या बांधल्या होत्या. लांब लांब दाट वनवेली पताकांसारख्या शोभून दिसत होत्या. झेंडूच्या गेंदफुलांनी मंडपात हंड्या झुंबरे तयार केली होती. गावोगावच्या गावकऱ्यांना बसण्यासाठी निरनिराळे खांब खुणेसाठी उभे करण्यात आले होते. गवताच्या पेंढ्या आणि आंब्याचे डगळे बांधून त्या मेढी सुशोभित केल्या होत्या. मंडपात सुशोभित जाजमावर दोन बाजूला औरसचौरस गाद्या अंथरल्या होत्या. मंडपाचे प्रवेशद्वार पूर्वाभिमुख होते. प्रवेशद्वारासमोर आत माती ओढून चौथरा तयार केला होता. त्या चौथऱ्यावर खास रामजीची खुर्ची ठेवण्यात आली होती. ही खुर्ची म्हणजे रामजीचे सिंहासन होते. पानसुपारीची तबके तयार करण्यात आली होती. मंडपाच्या मागच्या बाजूला रामजीच्या चौकीआड समारंभाचा भंडारा शिजून तयार होता. डाळभात आणि पिवळीजर्द नुक्ती, वालाच्या घुगऱ्या असा मोठा फक्कड बेत लोकांची वाट पाहत होता.

सकाळ झाली. सूर्यनारायणाचे आगमन पूर्वक्षितिजावर झाले. पिवळीजर्द किरणे रामजीच्या सिंहासनाच्या पायथ्याशी येऊन जणू जमादारसाहेबांच्या खुर्चीला अभिवादन करीत होती. किरणांबरोबरच गावोगावच्या पाटलांच्या गाड्या, घोडे येऊन थडकू लागले होते. रामजीचा हवालदार येणाऱ्या प्रत्येक पाटलाचे स्वागत करीत होता. मंडपातल्या गादीवर त्याला नेऊन बसवित होता. परगणे पाटील आणि खाडे पाटील हेही गावोगावच्या पाटलांना आग्रहपूर्वक आपापल्या जागी आणून बसवित होते. गावोगावचे पाटील आज सजून धजून आले होते. कोणी मुंडासे, कोणी जरीकाठी उपरणे, कोणी कोरी कोरी पैरण, तर कोणाचे तलम धोतर, रंगीबेरंगी वेळूच्या काठ्या पाटलांच्या हातात चमकत होत्या. काहींनी आपल्या जवळच्या परंपरागत बंदुका, तलवारी घासून पुसून आपल्याबरोबर मोठ्या रूबाबात आणल्या होत्या. काही पाटील गावकऱ्यांच्या टोळ्याटोळ्यांनी येत होते. आपल्याबरोबर आलेली टोळी खाडे पाटलाच्या स्वाधीन करून परगण्या पाटलाबरोबर पाटील मंडळी जात होती.

* * *



रामजी भांगरे आज पहिल्या कोंबड्यालाच उठला होता. सीताबाई आणि रुक्मिणी आणि त्यांचा आठदहा वर्षांचा छोटा रघुजी मोठ्या उत्साहाने पहाटपासून धडपडत होते. रामजीने आजच पहाटेच सुऱ्या न्हाव्याला बोलाविले होते. सुऱ्या न्हाव्याने त्यांची चकचकीत श्मश्रू केली होती. मग सीताबाईंनी दोन मोठी घंगाळे उष्णोदकाने भरून दिली होती. खास चंदनाचा पाट मांडला होता. केतकी, सोनचाफा, हिरवा चाफा यांची फुले आणि कणसे सीताबाईंनी कालपासून पाण्यात भिजून ठेवली होती. ते सुगंधित पाणीही उष्णोदकात घालण्यात आले होते. सूर्योदयाबरोबर रुक्मिणीने आपल्या पित्याला खास उटणे लावून मर्दन करून न्हाऊ घातले होते. रामजी भांगऱ्याचा उग्र चेहरा प्रसन्न दिसत होता. रामजीने आपला पोशाख मुद्दाम नवा शिवून आणवला होता. थेट गोऱ्या सोजिराच्या थाटात पोषाख परिधान केला होता. हिरव्यागार पोषाखाबरोबर कॅ. सीकसने लावलेले चांदीचे पदक उठून दिसत होते. चांगला तळहात रुंदीचा काळाजर्द पट्टा रामजीने आपल्या कमरेला बांधला होता. पट्ट्याला मोठेसे बक्कल होते. पट्ट्याला जंब्याची मूठ शोभून दिसत होती. तीवर पितळी चांदण्या चमकत होत्या. कमरेला म्यान अडकविली होती. खांद्यावर जमादाराचे बिल्ले दिसत होते. खांद्यावरच्या कातडी पट्ट्याने कमरेवरच्या पट्ट्यातून शेपूट बाहेर काढले होते. हिरव्या कॉलरवर काळातुकतुकीत चेहरा सहज छाप पाडणारा होता. डोक्याला तांबडा जरीकाठी फेटा तुरेदार बांधला होता. रामजी साहेबांची हॅट घालणे पसंत करीत नसे. तुरेदार फेटा कोंबड्याच्या तुऱ्यासारखा उठून दिसत होता. वरचा तुराही मोठा रूबाबात हालत होता. फेट्याखालच्या कानाच्या पाळ्यावर मोत्याच्या भरभक्कम बाळ्या झोकात हालत होत्या. पोशाख परिधान करून झाल्यावर मग सीताबाईंनी त्यांना पाट मांडला. त्या पाटाशेजारी आणखी पाट मांडला होता. छोट्या रघुजीसाठी. मग सीताबाईंनी पाच सवाष्णींना बोलावून आणले. देवापुढल्या घटाभोवती उगवलेल्या धान्यातील चार कोंब तबकात घेतले. तबक सजविले. पंचारतीची तयारी केली आणि रामजी भांगरेच्या काळ्या तुकतुकीत कपाळावर भडक तांबडा कुंकुमतिलक शोभून दिसू लागला. सीताबाईंसह पाच सवाष्णींनी ओवाळले. रामजीने प्रत्येकाच्या ताटी चांदीचे रुपये टाकले. रामजीबरोबर रघुजी संस्कार घेत होता. रामजी भांगरा मग देवदर्शन घेऊन निघाला. त्याने पायात सुबक जोडे परिधान केले होते. मांडवाच्या दिशेने चालू लागला. पायऱ्या उतरत असतानाच एक स्वार आला. त्याने खाली उतरताच लवून मुजरा केला आणि गोविंदराव आजच्या समारंभाला येत असल्याचे कळविले. रामजी भांगरे एकदम चकित झाला. मनोमन त्याला स्वतःचाच अभिमान वाटला. त्याने हिऱ्याला बोलावून आपल्या खुर्चीशेजारी आणखी खुर्ची आणून ठेवायला सांगितले. हिऱ्याला सूचना देताना एकदा सहज त्याच्या मनात विचार आला सगळ्या पाटील मंडळीत गोविंदरावांना बसवावं. पण त्याच्या मनाला पटेना. सगळ्या पाटलांसारखे गोविंदराव नाहीत हे त्याचे मन त्याला बजावीत होते.

* * *

मांडवात आता सर्व गावचे पाटील जमले होते. सबंध गावातलं दोनएक हजार माणूस तरी आता आलं होतं. मांडव आणि समोरचं पटांगण फुलून गेलं होतं. रामजीचं त्याकडे लक्ष गेलं आणि त्याला मोठं समाधान मिळालं. बंडखोर म्हणून प्रसिद्ध असलेल्या हेटाळल्या गेलेल्या एका बंडखोराला त्याच हिरजी नायकाच्या सुभ्यातले चाळीस गावचे लोक लवून मुजरा करण्यासाठी समोर जमले होते. शेकडो लोक त्यांचे वैभव पाहण्यासाठी जमले होते. मंडपाच्या प्रवेशद्वाराजवळ आज शिंगाडे उभे होते. रामजीच्या हाताखालचे सारे शिपाई रांगेने उभे होते. रामजीला सलामी देण्यासाठी हवेत बार काढणाऱ्या बंदुकाही सज्ज होत्या. रामजीला कार्यक्रम सुरू करावा असे वाटत होते, पण का कोण जाणे तो अजूनही गोविंदरावांची वाट पाहात होता. तोच गोविंदराव आले. त्यांच्याबरोबर आणखी दोनचार घोडेस्वार होते. त्यात गोविंदरावांचा उमदा पोर किस्नाही होता. घोडी मांडवाच्या प्रवेशद्वाराजवळ येताच रख्म्या पुढे झाला. त्यानी किस्न्याला उतरविले. नंतरच्या दोन स्वारांनी घोड्यावरून आणलेला ऐवज घेतला आणि ते मांडवात जाऊन परगण्या पाटलाने दाखविलेल्या जागी बसले. गोविंदराव पायउतार होऊन रामजीपर्यंत आले. रामजीने त्यांना कडकडून मिठी मारली. आज पहिल्यांदाच या कार्यक्रमाला गोविंदराव आले होते. ते दरवर्षी कळसाईचा डोंगर चढण्याच्या तयारीत मग्न असतात. मग रामजीने मंडपात प्रवेश करावयास सुरुवात केली. दुतर्फा उभ्या असलेल्या शिपायांच्या रांगामधून रामजी एक एक दमदार पाऊल टाकू लागला आणि शिंगाड्याने गगनभेदी शिंग फुंकले. कळसुबाईच्या डोंगरावरील कळसाईला, दरीत कोसळत्या प्रवरेला अन् जवळच्या घोरपड्या आईला, रतनगडाच्या पायथ्याशी असलेल्या अमृतेश्वराला व टाकेदाच्या सर्वतीर्थाला शिंगाच्या या प्रदीर्घ गर्जनेने साद घातली. भोवतालच्या दऱ्याखोऱ्यातून प्रदीर्घ गर्जनेचे प्रतिध्वनी उमटले. रामजी भांगरे चालत हरोता. लंगोट्या लावलेले, गुडघ्यापर्यंत धोतर कसलेले, मुंडासे बहाद्दर, खांद्यावर घोंगडीनिशी उजवा हात उंचावून, ''रामजी भांगरे की जय'' अशा घोषणा देत होते. रामजी भांगरेने मंडपात प्रवेश करताच ''ठोऽऽ ठोऽऽ ठोऽऽ'' बंदुकांची फैर झडली. शत्रूच्या काळजाचा भेद घेऊन शत्रूला आकाशात पाठविणाऱ्या बंदुका आकाशाचा वेध घेऊन शत्रूची चाकरी करणाऱ्या रामजीला अभिवादन करीत होत्या. डोळ्यात प्राण आणून उंबऱ्यात उभ्या असलेल्या सीताबाईच्या मनात अभिमान मावत नव्हता. तिचे डोळे आनंदाने ओघळत होते. रुक्मिणीची नजर मात्र वेगळेच काही शोधीत होती. रामजी आत गेले. जमलेल्या पाटील मंडळींनीही त्यांचा जयजयकार केला. पाठोपाठ गोविंदराव होते. गोविंदरावांचा किस्ना होता. परगण्या पाटलाने किस्नाला पाटलांच्या गादीकडे नेले. किस्नाबरोबर रामजीचा रघुही धावला होता. रामजीने गोविंदरावांना सायबासाठी खास तयार केलेल्या खुर्चीकडे जाण्याचा इशारा केला व स्वतः उजवा हात उंचावून त्याने सभेला बसण्याची अनुज्ञा दिली. सर्वांना उद्देशून तो म्हणाला, ''तुमी संमदे आमच्यासाठी आलात, आमाला आनंद वाटला. पर तुमी आमच्या नही आपल्या सुब्यासाठी यकमोहरी जमलात. आपल्या समद्यांच्या सुकदुकाची जिम्मेदारी आमच्यावर आहे. काळजीच सोडून द्या. तो अमृतेश्वर आपणा



सर्वाचा म्हादेव. त्येची आपणा समद्यांव किरपा हाये. ''बोला हर हरऽऽ'' ''म्हादेव!'' प्रतिसाद मिळाला. ''आज गोविंदराव बी आपल्या सभंला आले. आमाली आनंद वाटला. त्ये आपलंच हायती.'' तसा परगण्या एकदम ओरडला, ''रामजी भांगरे कीऽऽ'' ''जोय!'' ''गोविंदराव खाडे की'' ''जोय!'' प्रतिसाद उमटले. खुद्द रामजीनेही प्रतिसाद दिला होता. मग रामजी भांगरे आपल्या खुर्चीत स्थानापन्न झाला. सूर्य बराच वर आला होता. हिरव्यागार मांडवावर, उंच उंच डोंगरावर सूर्याचं तेज फाकलं होतं. रामजीच्या सभेमध्ये सूर्यदेव प्रगटला होता. नेहमीप्रमाणे भेटीचा कार्यक्रम सुरू होणार होता. गोविंदराव खाडे पुढे सरसावले. त्यांच्या बरोबर आलेल्या स्वारांना खुणावले. ते स्वार हातात भरल्या पाट्या घेऊन उभे होते. गोविंदरावांनी पाटीवरची कापडे काढली आणि रामजीचे डोळे विस्फारले. गोविंदरावांनी मोत्याचा कंठा त्यांच्यासाठी आणला होता. कंठ्याच्या मध्ये तांबूस रत्न उठून दिसत होते. गोविंदरावांनी स्वतःच्या हातांनी रामजीच्या गळ्यात कंठा घातला. रामजींना नववस्त्र देवविली आणि दुसरी पाटी त्यांच्या पायाशी ठेवून दिली. पाटी चांदीच्या रुपयांनी शिगोशिग भरली होती. रामजी भांबावला काय करावं, बोलावं ते त्याला सुचेना. गोविंदरावांनी ही भेट कशासाठी आणली त्याला कळेना. गोविंदराव बोलू लागले, ''माझ्या भावांनु आपलं रामजी भांगरा गोऱ्या सायबाचं चाकर असलं तरी ते आपलं हायती. आपलं राजं हांयती. त्यांच राज या डांगाणावर चालावं असा मी कळसाईला मांगना मागतो.'' रामजीने उठून एकदम त्यांचे हात हाती घेतले. पुन्हा एकदा सर्वांसमोर कडकडून भेट झाली आणि सभेतून जयघोष झाला ''गोविंदराव खाडे की जोय!''

गोविंदराव खाड्यांनी आपला हेतू बरोबर साध्य केला होता. चाळीस गावच्या पाटलांसमक्ष रामजीचं अंतःकरण फुलवून रामजीच्या अंतःकरणात सहजच स्वराज्याचा मंत्र फुलविला होता, पण त्याचबरोबर अंतःकरणाच्या एका कोपऱ्यात रामजी सायबाचा चाकर असल्याची बोचही निर्माण केली होती. रामजी जात्याच बंडखोर आहे हे गोविंदरावांनी हेरलं होतं. त्याला आपलं व्याही करायचं ठरवून आपलसं केलं होतं आणि आता त्याचं राज्य तेच आपलं राज्य असे सांगून त्याचं मनच हिरावून घेतलं होतं. रामजी गोविंदरावांवर बेहद्द खूष झाला होता.

मग एकेक पाटील उभे राहू लागले. दरसालप्रमाणे आपण आणलेले नजराणे नजर करू लागले. गेल्या दोन-तीन वर्षात जी पिळवणूक वाटत होती ती गोविंदरावांच्या शब्दाने एकदम बदलून गेली होती. आता प्रत्येकजण खुल्या दिलानं आपली भेट रामजीला नजर करीत होता. परगण्या, पांढऱ्या, झड्या, खाडे, बांडेरे, गिऱ्हे, कोरडे, पट्टेकर, लेंडे, गभाले, कौकतारे, दुटे, हांडे, खेताडे, कडाळी, हपसुले, पोकळे, लोहकरे, सद्‌गिर, मधे, इदे अशा साऱ्याच पाटलांनी मोठ्या अहमहमिकेने नजराणे आणले होते. आपला पाटील उठला की त्याच्या गावचे लोक रामजी भांगरेचा जयजयकार करीत. सूर्य माथ्यावर चढत होता आणि एकेकाच्या भेटी झडत होत्या. प्रत्येकाची भेट स्वीकारतांना रामजी स्मित हास्य करून विश्वासाचा हात उंचावित होता. भेटी संपल्या आणि रामजीने जवळच तबकात

मांडलेले विडे पाटलांच्या हाती स्वतः फिरून द्यायला सुरुवात केली. विड्याबरोबर चांदीचा रुपया होता. सर्व पाटलांना विडे वाटून झाल्यावर गोविंदरावांना काय द्यावं हा त्याच्यापुढे मोठा प्रश्न होता. त्याने खसकन आपल्या बोटातील अंगठी काढली आणि प्रेमभराने गोविंदरावांच्या बोटी घातली. पुन्हा एकदा रामजीचा अन् गोविंदरावांचा उदेकार झाला. रामजीकडून अंगठी स्वीकारतांना गोविंदराव हळूच म्हणाले, ''रामजी तुमी आमाली अंगठी देऊन आमच्या स्वराज्याचं वचन देताहात.'' रामजी शहारला होता, पण काही बोलू शकला नाही. रामजीने किस्नाला जवळ बोलावून त्याला विडा दिला होता. किस्नाने पटकन रामजीच्या पायावर डोके ठेवले. रामजीने या छोट्या जहागिरदाराला पोटाशी धरले. त्याच्या तरतरीत चेहऱ्याकडे भरल्या डोळ्यांनी पाहत असतांना त्यांच्या मनी आलं ''कसा उमदा नवरा हाये माझ्या रुक्मिणीला!''

✲ ✲ ✲

आणि भेट संपली. भंडाऱ्याच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. मांडवापुढच्या मैदानात पंगती धरल्या होत्या. पळसाच्या पानाच्या पत्रावळी मांडल्या गेल्या. ओंजळी ओंजळींनी बुंदी, ओगराळ्यांनी वालाच्या घुगऱ्या, डाळ, भात पंगती धरल्या गेल्या. पाटील मंडळींच्याबरोबर रामजी, गोविंदराव, किस्ना अन् रघुजी, परगण्या, रखम्या सगळे बसले. हर हर महादेवचा जयघोष झाला आणि मंडळी जेवायला बसली. यथेच्छ जेवण झालं आणि मग एकेका गावची मंडळी रामजीचा निरोप घेऊन निघाली. संध्याकाळच्या शिलंगणाच्या कार्यक्रमासाठी. प्रत्येकाला गावी पोचायचं होतं. थोड्या वेळानी गोविंदरावही निघाले. गोविंदरावांनी सहजच रुक्मिणीला हाक मारली. रुक्मिणी लाजलाजून चूर झाली होती. गोविंदरावांशेजारचा त्यांचा मुलगा किस्ना तिचा नवरा होणार होता. गोविंदरावांच्या पायावर डोकं ठेवताना सहजच तिची नजर किस्नाच्या पायाकडे गेली. पटकन पाया पडून ती आत पळाली. सारेच हसले. किस्नाची मात्र चांगलीच पंचाईत झाली होती. सीताबाईंनी किस्नाला डोळे भरून पाहिलं. शब्द देऊन तीन वर्षे उलटून गेली होती. या वैशाखात लग्न व्हायला पाहिजे असा सीताबाईंनी शब्द टाकला तसा किस्ना घोड्याला घास द्यायचा म्हणून बाहेर पळाला. गोविंदराव व रामजी हसले. किस्ना रुक्मिणीच्या लग्नाचा मुहूर्त वैशाखात निश्चित झाला.

आणि गोविंदराव, किस्ना, रखम्या, परगण्या पाटील अशी सारीच मंडळी निघाली तेव्हा माथ्यावरून सूर्य कलत होता.

✲ ✲ ✲

यावर्षी करावयाच्या महत्त्वाच्या कामांपैकी महत्त्वाचे काम गोविंदरावांनी पार



पाडले होते. विजयादशमी दिवशी रामजी भांगरेला वश करण्यात त्यांना पूर्ण यश मिळाले होते. डांगाणातील पाटील मंडळींचा दृष्टिकोन बदलला होता. साहेबाची सत्ता उलथून टाकण्याची शक्यता बळावत होती. तरी अजून खूप तयारी व्हायला हवी होती. नासिक, पुणे, मावळ, जव्हार, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी यातील सर्वच डोंगराळ भागातून मोठा उठाव व्हायला हवा, तशी परिस्थिती मात्र अद्याप तयार झाली नव्हती. गेली तीनचार वर्षे कोकण भागात नुसता धुमाकूळ घालूनही साहेबाच्या हाती काही लागले नव्हते. हेच भाग्य होते. दरवर्षी विजयादशमीच्या रात्री मोठा दरोडा पडत होता पण या विजयादशमीच्या दिवशी वेगळ्याच गोष्टी होणार होत्या. आज चार टोळ्या करून मोहिमा आखण्याचे ठरले होते. भाग वाटून घ्यायचे ठरविले होते. टोळी मोठी झाल्याने सरकारच्या ध्यानात येऊ नये म्हणून या सगळ्या कारवाया चालल्या होत्या. रामा किरवा, गोविंद खाडे, वाळ्या अन् लक्ष्या यांनी आपापसात चार टोळ्या करावयाचे ठरविले होते. प्रत्येकाच्या मर्जीतले अन् उपयुक्त असे लोक टोळीतील एकूण लोकांच्या संमतीने निवडले. प्रत्येकाच्या वाट्याला साठसत्तर लोक आले. एव्हढे लोक पुरेसे होते. गोविंदराव खाडेंनी आपल्याकडे कोकणभाग घेतला. रामा किरवानं डांगाण, संगमनेर, नगर जिल्हा हा भाग घेता, कारण त्याचे नगर जिल्ह्यात संगमनेर व मावळा भागातील भिल्ल जमातीशी चांगले संबंध होते. वाळ्याने मावळ भाग घेतला. भीमाशंकरपर्यंतच्या भागात त्याच्या चांगल्या ओळखी होत्या. त्याला त्या भागाची पूर्ण माहिती होती अन् लक्ष्या ठाकरानं नासिक जिल्हा सांभाळावयाचे ठरले आणि झाले. मोहिमा आखल्या गेल्या. शक्य तो एकाचवेळी चार भागात दूर दूर दरोडे पडण्याच्या योजना आखल्या गेल्या. सर्वांनी रामा किरवा अन् परगण्या पाटील यांचेकडे सांगावा पाठवावा असे ठरले आणि त्याचबरोबर डोंगर दऱ्यातून पाणथळ जागा आणि लपण अशा जागा शोधून नीट ठरविण्यात आल्या. त्याची माहिती सर्वांनी एकत्र बसून घेतली. परवलीचा नवा शब्द ठरला. 'साहेब' अन् मग जो तो आपापल्या उद्योगाला लागला. घोडी दौडू लागली. दरोडे पडू लागले. शेठ सावकार, जुलूम करणारे पोलिस अधिकारी, वतनदार यांना वठणीवर आणण्याचे काम सुरू झाले. जबरदस्तीने वसूल माफ करण्याकरिता भाग पाडले जाऊ लागले. आणि तो वस्तुतः सावकारांच्या घराघरांतून आणला जाऊ लागला. ठरलेली मोहीम अगदीच यशस्वी होत होती.

एकदम कोकण, मावळ, नासिक, नगर या चार भागात दरोडे पडले की साहेब त्रस्त होई. दरोडेखोरांच्या बंदोबस्तासाठी गोऱ्या साहेबाने फतवे काढले. जातीने खास सोजिर पाठविले. पण कोणालाही सूतसुद्धा सापडेना. शेवटी कॅप्टन सीकस, जनरल स्मिथ, कॅप्टन माकिनटोश यांनी जातीने या भागात दौरा करावयास सुरुवात केली. पण त्यांनी ज्या भागात जावं नेमकं तेथून जवळच्याच भागात दरोडे पडावेत अन् शिकारीकरिता चार चार दिवस माची बांधून बसावं तरी शिकार सापडू नये. आणि माच्याच्या मागच्याच बाजूने वाघाने शेळी, गाय, बैल, माणूस पळविल्याची बातमी यावी तेव्हा जशी एखाद्या शिकाऱ्याची स्थिती होते तशी स्थिती कॅप्टन सीकस आणि इतर गोऱ्या लोकांची झाली.

जेथे जेथे ते जात तेथे त्यांचा पाहुणचार चांगला होई. पण फक्त पाहुणचारच होई. अन्य माहिती काहीच मिळत नसे. मात्र एक धागा अलिकडे कॅप्टन सीकसला लागला होता. अकोले परिसरातील डांगाण भागात असे दरोडे पडले नव्हते. अन् हा भाग तर या चारही मुलखांच्या सीमेवर होता. पण या भागाचा जमादार रामजी भांगरा मात्र ठामपणे उभा होता. त्याने रिपोर्ट पाठवून दिला होता. आपल्या भागात काही करण्याची कोणाची हिम्मतच होणार नाही अशी ग्वाही त्याने आपल्या पत्रातून दिली होती. पण त्याचबरोबर कोकणात कोठेतरी या सर्वच दरोडेखोरांचे ठाणे असावे असा अंदाजही व्यक्त केला होता आणि असा धागा सापडूनही गोऱ्या साहेबांना काहीच सापडत नव्हते. साध्या दरोडेखोरांनी आपली झोप उडवावी हे पाहून गोरे अधिकारी चरफडत होते.

दरोडे पडत होते. भाग लुटले जात होते. कधी कधी तर सरकारी खजिन्यावर गदा येत होती. शेठ सावकारांचा वर्ग आता बराचसा सावध झाला होता. तो आपला ऐवज पांगवून पांगवून चार ठिकाणी ठेवू लागला. दरोडेखोर आले की शरणागती पत्करू लागला. आपल्या हाताने आपण साऱ्या चोपड्या दरोडेखोरांच्या हाती देऊ लागला. दरोडेखोरही सरावले होते. ते रीतसर चार सहा तास अगोदर पत्र धाडीत असत आणि त्या पत्रानुसार धाडी घालीत असत. मग दरोडेखोरांचे काम सोपे होई. रातोरात ते व्यवस्थित काम उरकून पुन्हा आपल्या लपण्याच्या जागी येऊन बसत. हानी कमी होऊ लागली. अन् दुआ जास्त मिळू लागला. रयतेच्या मनात दरोडेखोरांविषयी पूर्ण आदर असल्याने आडल्या नडल्याला गोरगरिबांच्या घरात शिरून आपण दरोडेखोर आहोत हे सांगितले की लपायला जागा मिळेच पण जेवणाखावणाची व्यवस्था होत असे आणि त्याची वाच्यताही कोठे होत नसे.

असे दरोडे टाकता टाकता केव्हा वैशाख जवळ आला ते कळले नाही. या वैशाखाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. या वैशाखात गोविंदरावाच्या किस्नाचे लग्न होते. आणि सर्व लोकांनी आपल्या सर्व इतमामासह हजर राहावयाचे ठरविले होते.

वैशाखाचे दिवस आले तसे शेवटचा दरोडा घालून सारे परत येऊ लागले. नव्याने प्रत्येक टोळीत काही लोक आले होते. त्यांचा सर्वांशी परिचय होणे आवश्यक होते. शेवटचे आठदहा दिवस सर्वजण एकत्र जमले. प्रत्येकाने जणू दिग्विजयच केला. चार भागात एकदम हाहाःकार उडवून दिला होता. भरपूर संपत्ती भरपूर सहानुभूती अन् भरपूर सोबती घेऊन सारे जमले होते. आठ दिवस मोठ्या मजेत खर्च करून सर्वजण आपापल्या गावी गेले. लग्नाचा सांगावा येणार होता. आता सर्वांना सरावच झाला होता.

वर्षातील पाच महिने दरोडेखोरी करून उरल्यावेळी सारेच लोक सरळ कृषीकर्म करीत असत. साहेबाविषयी समाजात शिरून गरळ ओकून लोकमत अनुकूल करण्याचा प्रयत्न करीत असत. त्यामुळे वर्षातून काही ठिकाणी पडणारे दरोडे लोक विसरत असत. आणि गोऱ्यासाहेबाच्या मनातही उठावाची शंका येत नसे. या सर्व आखण्या केवळ गोविंदरावांच्या होत्या. ते कुशलतेने सर्व गोष्टी करीत

✻ ✻ ✻



पुन्हा आपापली घरगुती कामे घरगुती कामे सुरू झाली. जमिनी तयार होऊ लागल्या. सोयरिकी जुळू लागल्या. वाजंत्र्या वाजू लागल्या. जेवणाच्या पंगती उठू लागल्या. गाव गाव लग्नाच्या गडबडीत वर्षभराचा शीण विसरून गेला. गोविंदरावही आपल्या किस्नाच्या लग्नाच्या कामाला लागले. त्यांना ब्राह्मणाकडे जाऊन मुहूर्त पहावयाचा होता.

गेल्या तीन चार वर्षात रामजी भांगरेनी आपल्यासारखेच जमादार म्हणून नेमलेल्या सात आठ जमादारांशी मैत्री जमविली होती. खास मेजवानीसाठी ते एकत्र जमत असत. पण रामजी भांगरेचा रूबाब काही औरच असे. तो गोऱ्यासाहेबांच्या खास मर्जीतला होता. त्याच्यामुळे गोऱ्यासाहेबाला या भागात किल्ले घेणं जमलं होतं. पण एव्हढंच कारण नव्हतं. तर तो बंडखोर असल्याने त्याचा दबदबा अधिक होता. रामजी भांगऱ्याची प्रथा पाहून या जमादार लोकांनी देखील 'भेट' प्रकार सुरू केला होता. या भेट प्रकाराने त्यांना भरपूर संपत्ती तर मिळेच परंतु त्यांना एखाद्या राजासारखा सन्मान मिळत असे. आपणच जणू या परिसराचे राजे आहोत असे त्यांना वाटत असे.

मूळणेर, आणि आढळा-म्हाळुंगी परिसरातील जमादार थेट त्याच्या प्रमाणे वागण्याचा प्रयत्न करीत असत. अन्य लोक थोडे अलिकडे दडपले गेले होते. त्यांच्या अखत्यारीतील भागात मोठमोठे दरोडे पडले होते आणि काय घडलं आहे याची चौकशी करून झाल्या गोष्टीची हकीकत कळविण्यापलिकडे काहीच करता आलेले नव्हते. त्यांच्या भागात दरोडे पडण्याला त्यांना साहेबाने जबाबदार धरले होते. त्यांना कडक हुकूम काढले होते. त्यांनी पण वेळोवेळी रामजी भांगरेंना सल्ला विचारला होता. पण रामजी भांगरे त्यांना एवढेच म्हणे, ''आपल्यात हिम्मत पायजेल का मंग कोणी येत नाही.'' त्याच्या भागात एकही दरोडा पडला नसल्याने त्याचे म्हणणे त्यांना ऐकून घेण्यापलिकडे दुसरा उपायच नव्हता.

गोविंदरावने मुळणेर आणि आढळा-म्हाळुंगी खोऱ्यातील जमादारांना रामजीप्रमाणे आपलेसे केले होते. गोविंदराव खाडेंचे त्यांच्याकडे अधूनमधून जाणे येणे असे. आता गोविंदरावांचा अन् रामजीचा व्याहीपणा जमला आहे हे कळल्यापासून तर गोविंदरावांविषयीचा अधिकच जिव्हाळा त्याच्या मनात निर्माण झाला होता. गोविंदरावांनी त्याच्याही 'भेट' प्रकरणाला उत्तेजन दिले होते. त्यांच्यातील अस्मिता जागृत करण्यात गोविंदरावांना यश लाभले होते. त्यांच्या भागातील अनेक पाटील मंडळी गोविंदराव खाडेंच्या नात्यातील असल्यामुळे आपुलकीत अधिक भर पडली.

रुक्मिणी अन् किस्ना यांचे लग्न म्हणजे सर्वांना एकत्र करण्याची नामी संधी आहे असे गोविंदरावांना वाटत होते. त्याचा ते जास्तीत जास्त फायदा घेणार होते. म्हणूनच सर्वांचेच लक्ष आता या लग्नाकडे लागले होते. या लग्नाच्या निमित्ताने मराठेशाहीतील सर्व वतनदार बोलवायचा विचार गोविंदरावांनी केला होता.

रामजी भांगरे अधिकारावर आल्यापासून त्याच्या घरात हे पहिलेच कार्य होणार होते. या निमित्ताने गोऱ्यासाहेबाला परत बोलविण्याचा विचार होता. त्यादृष्टीने त्याने हालचाली करावयाचे ठरविले. असे लग्न अवघ्या डांगाणात कधीच झाले नसेल असे लग्न करावयाचे

त्याने ठरविले होते. सगळ्यांचे डोळे दिपवून टाकायचे आणि 'सरकार'वर आपली छाप पाडावयाची असा विचार चालू होता. लग्नाच्या निमित्ताने उभ्या डांगाणाला जेवण घालावयाचे असे ठरविले होते.

गोविंदरावांनी आणि त्यांच्या अन्य साथीदारांनी मात्र आणखी एक वेगळीच योजना आखली होती. आणि पूर्ण यशस्वी करण्याचा निर्धारही त्यांनी केला होता.

लग्न ठरून तीन वर्षे होऊन गेली होती तरी अजून विधीपूर्वक 'मांगना' झाला नव्हता. म्हणूनच आज गोविंदरावांनी रामजींकडे 'मांगना' मागण्यास येणार असल्याचे कळविले. सांगावा घेऊन स्वार गेला तेव्हा सीताबाई अन् रुक्मिणी घरातच होत्या. स्वार येताच त्याने रामजींना अभिवादन केले आणि गोविंदरावांचा निरोप सांगितला. लगबगीने उठून रामजींनी घरी येऊन सीताबाईंना निरोप सांगितला. सीताबाईंनी सांगावा आणणाऱ्या स्वाराला दोन घास खाऊन जाण्यास सांगितले. स्वाराचे तोंड गोड केले आणि स्वार उलट सांगावा घेऊन निघाला.

सीताबाईंची तयारी जोरात सुरू झाली. त्यांनी आपल्याकडील एका शिपायाला चिचोंडी, भंडारदरा, रंधा, मुरशेत, मुतखेल, रतनवाडी अशा जवळजवळच्या गावी जाऊन पाटलांना अन् पाटलीणबाईंना निरोप घेऊन बोलवावयास सांगितले. गावात सगळ्या आयाबायांनाही सांगण्यात आले. लग्नाचे एकेक विधी म्हणजे बायकांची गाणी म्हणण्याची पर्वणी. पाचदहा गावचे पाटील येणार म्हणून रामजींनी चोख व्यवस्था करायची ठरविली. आपल्या घरापुढे पुरेसा मांडव घालावयास सांगितले. त्याला आंब्याचे पाच ढगळे बांधून सुशोभित करण्यास सांगितले. बैठका वगैरे गोष्टी टाकण्याची जबाबदारी त्यांनी अन्य शिपायांवर सोपविली.

दुसऱ्या दिवशी ठरल्याप्रमाणे गावोगावचे पाटील, पाटलिणी अन् आणखी काही गाणी म्हणणाऱ्या पोरी पायाच्या गाडीने सूर्य उगवला तोच रामजींच्या घरी हजर झाल्या. रामजींचे घर बायकांनी भरून जाऊ लागले. रामजींची चावडी किंवा चौकीही माणसांनी भरून गेली. एका बाजूला जमलेल्या माणसांसाठी डाळभाताचा स्वयंपाक तयार होत होता. रामजींकडची सर्व तयारी परिपूर्ण होती. सर्व लोक गोविंदरावांच्या माणसांची वाट पाहत होती.

गोविंदराव, राधाबाई, गावातल्या आयाबाया, मोठी आई, किस्ना अन् पन्नासपाऊणशे माणूस गाड्या जुंपून कोणी घोड्यावर स्वार होऊन नटून थटून रामजी भांगऱ्यांकडे निघाले. गाड्या असल्यामुळे वेढ्यावर यावं लागलं. चांगला सूर्य वर आल्यावर मुलाकडची सगळी माणसं 'मांगन्या'साठी रामजींकडे आली. रामजी सामोरे झाले. त्यांनी पुरुषमाणसांना आपल्या चौकीत नेले. बायकामाणसं घरात गेली. हातपाय धुऊन, गुळपाणी देऊन झाल्यावर सारे लोक मांडवात आले. एका बाजूला मांडव बायकांनी पार फुलून गेला होता. सीताबाई, आयाबाया, अन् राधाबाईंच्या आयाबाया एकमेकींच्या समोर बसल्या. सीताबाई अन् राधाबाई मात्र अगदी जुन्या ओळखीने बहिणी-बहिणीप्रमाणे सगळ्याच आयाबायांची विचारपूस



करीत होत्या. बापयमाणूस गप्पात रंगून गेले होते. आज रामजी आणि गोविंदराव पाटील मंडळीत जाजमावर टाकलेल्या गाद्यावरच बसल्यामुळे सर्वांना मोठे बरे वाटत होते. अवतीभोवती पटांगणापलिकडे डोंगरा-डोंगराला डोंगरची काळी मैना फुलून गेलेली दिसत होती. करवंदीच्या जाळ्यांनी काळ्या खडीचं हिरवं पातळ परिधान केलेलं होतं.

* * *

आज परगण्या पाटलानं पुढाकार घेतला. त्याने गोविंदरावांना सांगितले, ''गोईंदराव पोरीला 'मांगना' घाला''. मग गोविंदराव उठून उभे राहिले ''रामराम, रामजी भांगऱ्याला आमची विन्ती हायेक त्येंची पोर रुक्मिणी मह्या किस्नाला द्येवा'' तसा परगणे पाटील रामरावाला म्हणाला, ''काय रामजी, गोईंदरावचा तुमच्या पोरीला मांगना हाये दियाची काय? त्येली पोरगी पसंत हाये''. तसे रामजी भांगरे उठून उभे राहिले. राम राम करून म्हणाले ''मही पोर रुक्मिणी गोईंदरावाच्या पोराला किस्नाला दिली.'' तसा परगणे पुन्हा उठला. त्याने सगळ्या लोकांना विचारले, ''काय पावनं रामजीची पोर गोईंदरावाच्या पोराला दियाची समद्याली मंजूर हाये.'' तसे सगळे म्हणाले, ''मंजूर मंजूर! मग फोडा सुपारी.'' मग बापय माणसात सुपारी कतरली गेली. लग्न पक्कं झालं. पुन्हा परगण्या पाटील उठला. अन् म्हणाला, ''देण्याघेण्याचा आपसात ठरवा. अन् 'पेन' चा दिवस बोला.'' तसे रामजी म्हणाले, ''देण्याघेण्याची आमची काय अट नही.'' त्यावर गोविंदराव उत्तरले ''रामराव , मागत्यान ते आमी द्येला समजा.'' मग पुन्हा परगण्याने 'पेना'चा दिवस विचारला. गोविंदरावांनी आपल्या लोकांशी विचारविनिमय करायला सुरुवात केली.

* * *

इकडे सर्वांना शुभशकुनाचा गंधटिळा लावायला सुरुवात झाली. तिकडे बायकांमध्ये गाणी रंगात आली होती -

**मह्या बाईला मांगना आमा कोनावाची देई**
**तिच्या जाऊन पूस मानावाची घेई**
**बाईला मांगना आलं दडत लपत**
**गवळण माही उभी चंदन सोफ्यात**
**बाईला मांगना मुंगी पैठणीचं राजं**
**आन शिंगी स्वार झाला मह्याबाई तुझं आज**
**बाईला मांगना गल्यागल्यानी झालं थवं**
**गवळण माझी ढगामंदी ईज लवं**
**मह्या बाईला मांगना जव्हारीचा राजा**

**बाप लेकी म्हन लेकी अवल सोना माझा**

दुसरीने सुरुवात केली –

**मोठं माझ घर दळण लागतं पायली**
**बंधुराया लेक देव ती पद्यली**
**भाऊना क्येला येही म्या केला उमतीचा**
**बंधुराया माहा कौळा कोंभ शेवंतीचा**

तिसरी म्हणाली –

**मैनाला मांगना शेळूच्या मुलकाचं**
**चुलत्यानी बोली केली वाळतोड कुलपाचं**
**मैनाला मांगना घाटाखालली टाकळी**
**चुलत्याची बोली क्येली सरीखालली साकळी**

हे गाणं चालू असतानाच गोविंदरावांकडच्या आयाबायांमधून मोठ्या आईने फटकारले अन् एकदम खसखस पिकली –

**राज हौसना केला येही मीतं मांगत नही काही**
**मीतं मांगते थोडा थोडा नवरदेवाला कंठी कडा**
**कंठी कड्याचा सोना फिका मह्या कंगण्या जोग रूपा**
**कंठी कड्या चाईल्या गळ्या मीतं मांगते बोंडबाळ्या**
**कंठी कड्याचा झाला भार मीतं मांगते चंद्रहार**
**बोंडबाळ्याचं दांड रुंद येला हिराई शेलू दंड**
**हिराया शेलूची काळी दशी मीतं मांगते गायी म्हशी**
**गाय म्हशीचं दूध खरं मीतं मांगते हाती घोडं**
**हाती घोड्याव नवरी बसं साऱ्या नगरीमंदी फिरं**
**राज हौसान केला येही मीतं मांगत नही काही**

त्यावर रुक्मिणीच्या मैत्रिणींपैकी एका सासुरवाशिणीने तिला चिडवायला सुरुवात केली –

**मह्या बापानी मला दिले मला दिले गं**
**मला कळित नाही केले नाही केले गं**
**बाप कशाला लोभी झाला लोभी झाला गं**
**बाप पैस्याला लोभी झाला लोभी झाला गं**
**मह्या आईनं मला दिले मला दिले गं**
**मला कळित नाही केले नाही केले गं**
**आई कशाला लोभी झाली लोभी झाली गं**
**लुगड्याला लोभी झाली लोभी झाली गं**

असे म्हणत भाऊ अंगठीला, बहीण चोळीला अशी सर्वांनी लग्नापाठीमागचा हेतू



उघडा करीत रुक्मिणीला डिवचले. रुक्मिणी लटक्या रागाने त्यांचेकडे पाहात होती. अशी कितीतरी गाणी झाली. सर्वांना हळदीकुंकू दिले गेले.

इकडे गोविंदरावांनी पेनचा (साखरपुड्याचा) दिवस निश्चित केला. एक दिवसापुढचाच दिवस निश्चित झाला होता. मग मांगन्याची बैठक संपली. पत्रावळी पडल्या. जेवणं झाली. रुक्मिणी वडिलधाऱ्या मंडळींच्या पाया पडली. किस्नाही सर्वांच्या पाया पडला. आणि लोक फिरले. रुक्मिणी मनोमन हरखून गेली होती. जाता जाता किस्नाने हळूच तिच्याकडे कटाक्ष टाकला. ती त्याच्याकडेच उत्सुकतेने पाहात होती. नजरानजर झाली आणि तिने आपल्या ओंजळीत आपला चेहरा लपवीत किस्नाला हृदयात साठविले. पौर्णिमेचा चंद्र उगाचच एखाद्या पांढऱ्याशुभ्र ढगांच्या आड लपण्याचा प्रयत्न करून चांदण्याचा आस्वाद घेणाऱ्या लोकांना वेडावतो आहे असे किस्नाला वाटले. किस्ना पुढे गेला असेल अशा कल्पनेने तिने आपले हात बाजूला केले तोच पुन्हा डोळे डोळ्यांना भिडले. ती खुदकन् हसली, लाजली. किस्ना वेडावल्यासारखा पाहातच राहिला. रख्म्या हे सारे पाहात होता. त्याने हळूच किस्नाचा हात धरीत म्हटले, ''किसनराव! चाला हिताच मुक्कामाला नही ऱ्हायाचं.'' रुक्मिणी पळालीच.

* * *

मग ठरल्याप्रमाणे एक दिवसाआड रामजीकडील सर्व मंडळी गोविंदरावांकडे जमा झाली. गोविंदरावांनी रामजीपेक्षा चोख व्यवस्था लावली होती. रामजी अन् अन्य पाहुणे मंडळी ती व्यवस्था पाहूनच चकित झाले. पेनासाठी एव्हढा मांड गोविंदरावांनी करावा याचे त्यांना आश्चर्य वाटत होते. गोविंदरावांनी ही संपत्ती कोठून आणली हा प्रश्न सहज काहींच्या मनात किंचित काल डोकावला. मग पेनाचा कार्यक्रम सुरू झाला. पेनाचा कार्यक्रम फारच सोपा होता. सगळ्या बोल्या मनोमनच झाल्या होत्या. आता केवळ एक विधी म्हणून 'कुंकू मागण्याचा' विधी करावयाचा होता. जहागिरदाराच्या वाड्यावर भव्य मंडप पडला होता. त्या मंडपात साखरपुड्याची बैठक बसली होती. गोविंदरावांनी रुक्मिणीच्या हातात चांदीचं ताट पेढ्यांनी भरून दिलं. मग सगळ्यांना पेढे वाटण्यात आले. गंधटिळा, मळवट भरला गेला आणि त्याचवेळी परगण्या पाटलानं सर्वांच्या समोर पुन्हा एकदा बोली स्पष्ट केली, ''गोईंदरावाच्या इतमामानं दियाचं आहे. आन रामजीना लगीन काढून दियाचं आहे. मंजूर.'' तसे सर्व लोकांनी माना डोलावून म्हटले, ''मंजूर मंजूर'' याहीवेळी बायकांनी गाण्याची चढाओढ सुरू केली होती.–

**साकाराचं पुड गंगापलिड यव्हारी**
**साकाराचं पुड तिच्या मामाच्या देवारी**
**हौस मला मोठी बारीच्या येह्याची**
**केला मनाचा इचार लेक नंदाला देयाची**

**मैनाला मांगना दोह्यादारी झाली दाटी**
**कंबरी कोऱ्हा शेला चुलता इचा पान वाटी**
**लहान नवरी गादीवरी उभी राहे**
**गवळण माझी वाट मामावाची पाहे**

अशी कितीतरी गाणी झाली आणि मोठा साग्रसंगीत साखरपुडा झाला. मग जमलेल्या पाहुण्यांना डाळ, घुगऱ्या, बुंदीचे जेवण झाले. लोक आपापल्या गावी निघाले.

* * *

दुसऱ्याच दिवशी रामजी भांगरे, गोविंदराव खाडे, परगण्या पाटील अन्य एकदोनजण स्वतः अकोल्याला निघाले. अकोल्याला पुराणिकबुवांना विचारून ते उत्तम मुहूर्त शोधून काढणार होते. लग्नाची जमवाजमव करायला निदान पंधरा दिवस तरी हवे होते. पंधरावीस मैलाचा टप्पा ओलांडून पुराणिकबुवा धर्माधिकारींच्या वाड्यावर गोविंदराव खाडे, रामजी भांगरे हजरे झाले. पुराणिकबुवा धर्माधिकारी या दोघांना एकत्र पाहून चकित झाले. त्यांना घडल्या गोष्टीची कल्पना नव्हती. त्यांनी हसत हसत विचारले, ''आज चंद्र सूर्य एकत्र कसे?'' तसे रामजींनी पुढे होऊन सांगितले, ''आपल्या विचाराने तीथ काढाया आलो. आमची पोर रुक्मिणी गोविंदरावांच्या पोराला दिली आहे. लग्न कसं झोकात झालं पाहिजे.'' पुराणिकबुवा धर्माधिकारींनी त्यांना आत बोलावून बसायला चटई अंथरली. स्वतः मृगाजिनावर बसून त्यांनी पंचांग उघडले. रामजींनी पुराणिकबुवांच्या पुढे सुपारी ठेवली. आणि वाकून नमस्कार केला. पुराणिकबुवा धर्माधिकारींनी विचारले, ''मुलीचे नाव काय? '' तसे रामजी उत्तरले ''रुक्मिणी'' आणि मुलाचे नाव तसे गोविंदराव उत्तरले ''किस्ना''. धर्माधिकारी प्रसन्नपणे हसले आणि म्हणाले, ''कृष्ण-रुक्मिणीच्या विवाहाला मुहूर्त कशाला पाहिजे? अरे कोणताही मुहूर्त धरा. शुभासाठी करावयाच्या कामातून शुभच निष्पन्न होणार.'' त्यावर गोविंदराव म्हणाले, ''मगतर बरंच झालं. पण तुमच्या मतानी चांगला मुहूर्त काढून द्या.'' पुराणिकबुवांनी गांभीर्याने मुहूर्त पहावयास सुरुवात केली. वैशाख वद्य नवमीचा गोरज मुहूर्त पुराणिकबुवांनी काढून दिला. अजून पंधरावीस दिवस अवकाश होता. रामजी अन् गोविंदरावांनी पुराणिकबुवांना जातीनं लग्नसमारंभास हजर राहण्याचं निमंत्रण दिलं. त्यांना सुपारी दिली आणि चांदीच्या रुपयाची लहान थैली गोविंदरावांनी पुराणिकबुवांच्या पुढे ठेवली. पुराणिकबुवांनी विचारले, ''अहो हे काय?'' ''दक्षिणा'' पुराणिकबुवांनी मग दोघांनाही दूध, सुपारी दिली. आणि मोठ्या प्रेमाने निरोप घेऊन गोविंदराव आणि रामजी माघारी फिरले. आता दोघांनाही आपापल्या उद्योगाला लागायचं होतं. निरोप द्यायचे होते. मूळं धाडायची होती. लग्नाची सगळी जमवाजमव करायची होती. दुसऱ्या दिवशी गोविंदराव आणि राधाबाई स्वतः जातीने सुपारी घेऊन कळसाईला गेले. किस्नाही बरोबर होता. कळसाईला सुपारी देऊन गोविंदरावांनी किस्नाचं लग्न ठरल्याचं आईच्या कानावर घातलं. किस्नाने कळसाईला दंडवत घातला मग



नाशिकच्या बाजारात जाऊन बस्ता बांधायचा ठरलं. गोविंदराव, रामजी आणि शेपन्नास माणूस मिळून नासिक शहरात लग्नाचा बस्ता बांधायला गेले. पैठणी, पितांबर, हिरवा शालू, जरीफेटे, करवती, धोतरे, अंगरख्याला मलमल, विहिणींना पातळे, आजीचीर, उपरणे असे कितीतरी प्रकार त्यांनी एकमेकांच्या पसंतीने खरीदले. खरेदी करीत असताना गोविंदराव भराभर पैसे काढीत होते. त्यांनी कोठेही कमी पडू दिले नाही. बस्ता झाला आणि सराफाच्या पेठेत जाऊन कंठी, कडा, येळा, तोडे, वाक्या, नथ, कर्णफुले, असे कितीतरी प्रकारचे दागिने असा सगळा साज खरेदी करून स्वाऱ्या डांगाणीत परतल्या. दुसरे दिवशीपासून स्वतः बोलावणी करायला सुरुवात झाली. गोविंदरावांनी मनाशी ठरविल्याप्रमाणे कोकणातील वतनदार, जहागिरदार, किल्लेदार अशा सर्व अधिकाऱ्यांना जातीने जाऊन निमंत्रणे दिली, तर अनेक ठिकाणी त्यांनी परगण्या पाटलाला पाठविले. आपल्या दरोडेखोर मित्रांना त्याने ठरलेल्या योजनेप्रमाणे यायला सांगितले तर रामजी भांगऱ्यांनी आपल्या सगळ्या पाटील मंडळींना आणि आपल्या प्रेमातील संबंधातील सातआठ जमादारांना आवर्जून बोलाविले. आपल्या खास नातेवाईकांना गावोगाव जाऊन सुपाऱ्या दिल्या. गोविंदराव आणि रामजी दोघांनीही वाजंत्री, मांडव, टेंभे यांची संपूर्ण जबाबदारी परगण्या पाटलावर सोपविली होती. होती. माहेरवाशिणींना मूळं धाडली गेली होती. सासुरवाशिणी कामाला लागल्या होत्या. रामजी भांगरेंनी जानोसवाडा उत्तम प्रकारे सजविला होता. डांगाणातले नेहमीचे खास स्वयंपाकी जमा केले होते. अकोल्यातून, राजूरातून कढया, पातेली, पोहोचली होती. अशी सारी तयारी झाली.

वैशाख वद्य अष्टमीच्या दिवशी किस्ना खाडेच्या लग्नाची हळद होती. राधाबाईंनी हळदीची तयारी केली होती. शेजारगावच्या आणि गावातल्या शेपन्नास बायका हळदीच्या कार्यक्रमाला जमल्या होत्या. हळद दळण्याचा कार्यक्रम सुरू झाला तसं हळदीच्या गाण्यांना उधाण आले. जात्याला लेकुरवाळे हळकुंड बांधले आणि किनऱ्या आवाजात ओव्या बाहेर पडू लागल्या–

**पाची दळती हळद हळद जात्यात माह्येना**
**लगीन मैनाचं निंगाल मह्या भावाचा मांगना**
**भाऊ केला येही बाप म्हनं नकु बाई**
**आताच्या भावजया मान राखायच्या नही**
**भाऊ केला यही केला म्या चालीचा**
**बंधुराया माझा कोळा कोंभ शेवंतीचा**

इकडे सीताबाईंचीही हळदीची धांदल उडाली होती. नवऱ्या मुलीला मोठ्या हौसेनं हळद लागत होती. हळदी नटताना रुक्मिणीची कांती सुवर्णमय होत होती.

**हळद लाविती कोन कोन**
**नवऱ्या बाळीची बहेन**
**हळद लाविली कोना कोना**

**नवऱ्या बाळीच्या चुलतीना**
**हळद लाविली कोनी कोनी**
**गावच्या पाटील बाईंनी**
**हळद येवढ्या आंगी फुलं**
**कसं सोन्या जोगं खुलं**

नवरा-नवरीला हळद लागली आणि मग रामजी भांगरेंनी वऱ्हाडाला मूळ धाडलं. वाजंत्रीची तयारी शिवेवर ठेवली. नवमीच्या दिवशी तिसऱ्या प्रहरी वऱ्हाड शिवेला आलं. गावोगावच्या बैलगाड्या, घोडी, कितीतरी वऱ्हाड गोविंदरावांकडचे रामजी भांगऱ्यांकडे चालले होते. शिवेवर येताच शिंगाड्याने शिंग फुंकले. वाजंत्री झडू लागली. आणि वाजत-गाजत वऱ्हाड मारुतीच्या देवळापुढच्या मांडवात दाखल झाले. मारुतीचे दर्शन घेऊन नवरामुलगा आला. व्याही, विहिणी सर्वांनी स्वागत केले. मग एकच धावपळ उडाली.

अकोल्याला पुराणिकबुवांना घेऊन यायला गेलेला स्वार पुराणिकबुवांना घेऊन परत आला होता. मग सर्वांना गंधटिळा लावण्यात आला. गंधटिळा झाल्याबरोबर दोन्हीकडील बायकांनी गाणी गायला सुरुवात केली. ''धवलेरी'' असताना एकमेकांना टोमणे देणे, एकमेकांचे उणे-अधिक काढणे सुरू झाले. कोणी म्हातारी म्हणू लागली,

**अहो अहो विहीणबाई**
**आमचा म्हनना लई नाही**
**आमचा म्हनना आहे थोडा**
**आमच्या मुलीला पायी तोडा**

इकडे मांडवात हळूहळू निमंत्रितांच्या स्वाऱ्या येऊ लागल्या. गोविंदराव अन् रामजी त्यांचे स्वागत करण्यासाठी उभे राहिले. परगण्या पाटलाने मांडवाची व्यवस्था चोख ठेवली होती. मखमलीच्या चांदोब्याने मांडव सुशोभित केला होता. आंब्याच्या डहाळ्यांनी मांडव फुलून गेला होता. निमंत्रितांना बसण्यासाठी गाद्यागिरद्या टाकल्या होत्या. कदाचित गोरासाहेब येईल म्हणून खास खुर्च्याही मांडल्या होत्या. डांगाणातील दोनतीन हजार माणूस जमले होते. परगण्या पाटलाने खास टेंभ्यासाठी शंभर माणूस नियुक्त केले होते. त्यासाठी चंद्रज्योतीचं तेलही मागवलं होतं. पुराणिकबुवांनी लग्नविधीची गडबड उडविली होती. पुराणिकबुवांच्या अस्तित्वानं अवघं डांगाण भारावून गेलं होतं. त्यांनी सवाष्णीकडून शकुनाचे सगळे प्रकार करवून घेतले होते. तेवढ्यात थोडका वेळ काढून गोविंदराव व रामजींना देवक बसवायला बोलाविलं होतं. सगळे सोपस्कार कसे यथासांग होत होते. लग्नघटिका जवळ येत होती. संध्याकाळ होत होती. परगण्या पाटील टेंभ्याच्या गडबडीत होता. आणि तेवढ्यात पाच घोडेस्वार दौडत दौडत आले. रामजी सामोरे गेले. पुढे बसलेला गोरा सोल्जर धाडदिशी खाली उतरला. कॅप्टन सीकसने आपला प्रतिनिधी खास खलिता व आहेर देऊन पाठविला होता. तरीसुद्धा कॅप्टन सीकस आला नाही हे रामजींच्या मनाला खटकल्याशिवाय राहिले नाही. पण त्याचे यथास्थित स्वागत करून रामजींनी त्याला



मांडवातल्या खुर्चीवर बसविले. गोविंदरावांनी बोलाविलेले सारे मानकरी हजर झाले होते. त्यांच्यासाठी खास दिवाणी बैठक तयार केली होती. लोडतक्क्याला टेकून मानकरी आणि खास निमंत्रित बसले होते. गप्पा रंगल्या होत्या. राज्य गेल्यानंतर गोविंदरावांनी लग्नाचा एवढा बडेजाव का करावा? आपणा सर्वांना एवढ्या इतमामाने का बोलवावे? याचा उलगडा त्यांना होत नव्हता. तरी देखील होळकर, नाईक, मुकणी, गिऱ्हे, परते, परगणे, ठाणे, जिल्ह्यातील किल्लेदार अशा लोकांना गोविंदरावांनी मनात हेतू ठेवून बोलाविले असावे हे त्यांच्या ध्यानी आले होते. आणि अशा विषयाची चर्चाही मांडवातल्या कुजबुजीत ऐकू येत होती. मांडवात रख्म्या जातीने हिंडत होता. जमलेल्या लोकांना अत्तरे लावण्याचे काम त्याच्याकडे दिले होते. कोण काय बोलतात, कोणाची प्रतिक्रिया काय आहे हे समजून घेण्यासाठीच त्याची आयोजना होती. अंधार पडला अन् टेंभे पेटले. बोहल्याची माती पुराणिकबुवांनी तयार करायला सांगितली.

बोहल्याची माती मांडवात येऊन बोहले तयार होऊ लागले. तोच बायकांच्या समूहातून सहज लकेर उमटली

**लहान नवरी हिची कुकाची पावूला**
**गवळणीच्या माझ्या मामा घालती बहुला**
**बहुल्याची माती वजवती बेलदार**
**गवळणीचा माझ्या मामा इचा शिलेदार**
**बहुल्याची माती वजवती हातोपाती**
**गवळणीच्या माझ्या नवरीचे मामा किती**

बोहलं तयार झालं आणि पुराणिकबुवांनी मुलामुलीच्या मामांना मोठ्याने पाचारण केलं. किस्नाचा मामा किस्नाला घेऊन मांडवात आला तशी सारी मंडळी उठून उभी राहिली. किसनरावांनी आपला हळद भरला पाय बोहल्यावर ठेवला आणि अंतरपाट धरला गेला. मुलीच्या मामानेही रुक्मिणीला खांद्यावर आणले आणि रुक्मिणी माळ घेऊन उभी राहिली. दोघांच्याही डोक्याला बांधलेली बाशिंगे त्यांचा चेहरा दिसून देत नव्हती. बाशिंगांना लावलेल्या आरशामधून टेंभ्याची किरणे चकाकत होती. पुराणिकबुवांनी ''मंगल'' म्हणावयास सुरुवात केली. तोपर्यंत पाहुण्यांची गर्दी दाटतच होती. परगण्या पाटलाने व रख्म्याने तांदळाच्या अक्षता वाटण्याची चपळाई केली होती. टेंभ्यांच्या प्रकाशात सारा मांडव उजळून निघाला होता. वरमाया आपल्या फडक्या सावरीत हातात अक्षता घेऊन सावधपणे उभ्या होत्या. त्यांच्या नाकातल्या नथा त्यांचा रूबाब दाखवीत होत्या. कोणी हिरवा, कोणी मोरपंखी, कोणी तांबडा, कोणी गुलाबी अशा कितीतरी प्रकारचे शालू परिधान केले होते. सोने, चांदी, रूपे दागिन्यांनी बायका नुसत्या भरल्या होत्या. मोठ्या तत्परतेने आपल्या साजशृंगाराला सांभाळीत एकीकडे कोण कोण मांडवात आलंय याची चौकशी करीत बायका अक्षता फेकीत होत्या. सीताबाई व राधाबाई एकमेकींजवळ उभ्या राहून भरल्या नजरेनं आपल्या पोरांचं कौतुक पाहत होत्या. ''मंगल' संपली आणि सनईचौघडा, शिंगाडे,

डफ, नगारे, ताशे यांचा एकच बहुगलबलाट झाला. रुक्मिणीने किस्नाला वरले होते आणि पुराणिकबुवा धर्माधिकारी लज्जाहोमाच्या आणि इतर विधीच्या कार्यक्रमात गढून गेले.

इकडे टेंभ्यांची धावपळ सुरू झाली होती. सहस्त्रावधी पत्रावळी रांगेत सजल्या होत्या. सारं वऱ्हाड जेवायला बसलं होतं. खास निमंत्रितांच्या वेगळ्या रांगा तयार केल्या होत्या. त्यांचा थाट काही औरच होता. वऱ्हाडी माणसं यथेच्छ जेवत होती. जेवणं आटोपली तशी सारी माणसं पुन्हा मांडवाच्या दिशेनं गोळा झाली. आहेराची तयारी झाली. एकेकाचे आहेर होऊ लागले. प्रत्येकाचं नाव ओरडून जाहीर होऊ लागलं. आहेरांच्या राशीच्या राशी पडत होत्या. मानकऱ्यांच्या नावाबरोबर खुर्चीत बसलेला गोरासाहेब काहीसे टिपून घेत होता. त्याच्या बरोबरच्या लोकांशी मधूनच तो काही तरी बोलत होता. हे सारे आटोपता आटोपता मध्यरात्रीचा सुमार झाला होता. अजून मानपान घ्यायचे होते. गोविंदराव खाडेंनी साऱ्या निमंत्रितांना फेटे, उपरणी बांधली होती. रामजी भांगरेंना त्यांनी खास पोशाख चढविला होता. तिकडे राधाबाईंही विहीणीच्या मानापानात गुंतल्या होत्या. गोविंदरावांनी कशाकशाला म्हणून कमी ठेवले नव्हते. त्यांचे दातृत्व पाहून सारे प्रसन्न होते. पुराणिक बुवांनाही गोविंदरावांनी भरपूर दक्षिणा देऊन खूष केले होते. मग परगण्या पाटलाने उभे राहून जोरात विचारले, ''गोविंदराव खाडेंनी बोलीप्रमाणे देज दिला का?'' तसे गोविंदराव भर सभेत कडाडले, ''परगणे पाटील, व्याह्यांना विचारा, काय कमी पडलं त अजूनबी देतो म्हणावा.'' तसे रामजी दिलदारपणे उभे राहिले अन् म्हणाले, ''गोविंदराव आमाला समद मिळालं'' आणि त्यांनी उलट प्रश्न केला, ''गोविंदराव लगीन योग्य झालं का?'' तसे गोविंदराव म्हणाले, ''रामजी आमाला सारं पावलं'' तेवढ्यात गोविंदरावांनी जाणीवपूर्वक हातातील थैली खळखळवीत जमलेल्या वऱ्हाडाला म्हटले ''पावणं आमची चूक झाली आमी रामजींच्या गोऱ्या सायबाला काईच दिलं नाही.'' असे म्हणत ते थैली घेऊन गोऱ्या सायबाकडे गेले. गोऱ्या सायबाने उभे राहून थैलीचा स्वीकार केला. गोविंदरावांचा हात हाती घेऊन त्याने गोविंदरावांना हस्तांदोलन केले. तरी गोविंदरावांनी त्याला अभिवादन केले नाही. जमलेल्या साऱ्या वऱ्हाडी माणसांना क्षणभर गोविंदरावांविषयी आदर वाटला. टेंभे जळत होते. लग्न आटोपले होते. गोविंदरावांच्या वऱ्हाडाने जाण्याची तयारी सुरू केली होती. बांधाबांध सुरू केली होती. बरीच रात्र झाली होती. लोक आत पेंगू लागले होते. रामजींनी गोऱ्या साहेबाची झोपण्याची व्यवस्था केली होती. गोरा साहेब चौकीत जाऊन पहुडला होता. सीताबाई आपल्या पोरीशी हितगुज करीत होत्या.

* * *

तेवढ्यात एकदम सभोवतालून बंदुकांची फैर झडली. मांडवाच्या चारी बाजूंनी घोड्यांच्या टापांचे आवाज जवळ जवळ येऊ लागले. एक हल्लकल्लोळ झाला. काय करावे कोणासही सुचेना. तसे गोविंदराव एकदम ओरडले, ''आया बहिणीनु घरात जावा'' तशा



सर्व बायका सीताबाईंच्या आणि सापडेल त्या घरात पळाल्या. शेजारचे घरही बायकांनी भरून गेले. घरात एकच गोंधळ उडाला. बायकांबरोबरची लहान मुले एकदम रडून गोंधळ करू लागली. कोणाचा कोणास मेळ लागेना, सर्व पुरुषमंडळी सावध झाली होती. बरीच मंडळी वाट मिळेल तिकडे अन् त्या घरात, त्या बाजूला जाऊन लपत, टेंभेवाले पळू लागले होते. तरी काही टेंभेधारी मात्र जागीच उभे होते. परगण्याने टेंभेवाल्यांना ओरडून सांगितले, ''पळू नका रं'' त्याचवेळी शे-दोनशे स्वारांनी पुरुषमाणसांना बंदुका सावरायलासुद्धा वाव दिला नव्हता. गोरा साहेब बाहेर धावतच आला होता. त्याने त्याची खास रायफल सज्ज केली होती. त्याचे पाच साथीदारही त्याच्याबरोबर होते. गोऱ्या साहेबाने बाहेर येताच एक बार काढला मात्र तोच त्याच्या पाठीवर नळी टोचली गेली. ''खबरदार उजुक बार काढशील तं'' तो लक्ष्या होता. आलेल्या स्वारात कोणाचाही चेहरा दिसत नव्हता. सर्वांनी आपले चेहरे व्यवस्थित गुंडाळले होते. कोणास काही कळणे शक्यच नव्हते. अनेक निमंत्रित, नातेवाईक पुरुषमंडळींना कंप सुटला होता. कोणीही पुढे जाण्यास धजत नव्हता.

एवढ्यात रामजी कुठूनसा आपली बंदूक पेलित आले. मोठ्या त्वेषाने समोरच्या स्वारावर तो धावून गेले, पण त्याचवेळी त्यांचीही गत त्या गोऱ्या साहेबासारखीच झाली. मग लक्ष्याने ओरडून सांगितले, ''समद्यांनी बंदुका खाली टाकून द्या, काय, रामजी जमादार तूच काय रं? आन ह्योच काय तुझा गोरा सायब? गड्यानु जाळून टाका यांली.'' लक्ष्याच्या तोंडातून हुकूम सुटला तसे सारेच हादरले. होळकर, नाईक कोणीच काही बोलत नव्हते. त्यावर एकवार सर्वांवर नजर फिरवून लक्ष्या ओरडला, ''आरं हाये कोनाची हिमत त या म्होरं. न्हाई त आमी काय सांगतो त्ये करा. या रामजी भांगऱ्याला अन् या गोऱ्या सायबाला आन् त्येच्या साथीदारांली या झाडाना बांधा'' कोणी पुढे धजावेना. मांडवातले सगळे लोक माना खाली घालून उभे होते. मग स्वारातलेच काही लोक पुढे सरसावले. त्यांनी रामजी भांगरेला धरून झाडाकडे न्यावयास सुरुवात केली तसे गोविंदराव पुढे धावले. त्यांच्या हाताला हिसडा मारून रामजीला न्यावयास सुरुवात केली, पण गोविंदराव पुन्हा गरजले, ''तुमाली काय पायजेल त्ये सांगा, आमी समदं देया तयार आहोत.'' तेव्हढ्यात पुराणिकबुवा धर्माधिकारी दरोडेखोरांच्या पुढ्यात उभे राहिले आणि त्यांनी दरोडेखोरांना आवाहन केले, ''तुम्हाला काय पाहिजे असेल ते आम्ही आमच्या हातांनी देतो परंतु या शुभ घडीला कोणाचे प्राण घेण्याचा तुमचा विचार असेल तर तसे करू नका. तुम्हाला महादेवाची आणि कालीमातेची आण आहे.'' तसे रामजीला खेचून नेणारांनी लक्ष्याच्या चेहऱ्याकडे पाहिले. लक्ष्याने गोविंदरावांच्या चेहऱ्याकडे पाहिले आणि गोविंदरावांनी काही सुचविले. तसा लक्ष्या कडाडला, ''देवबाप्पा तुमची आज्ञा असन त आमी कौनलायबी मारनार नही पर आमची एक अट असं. या गोऱ्या सायबानं आन रामजी भांगऱ्यानं हात बांधून आन गुडघे टेकून आम्हाला शरण येवा. आन् आमा संमद्यांच्या जेवणाची व्यवस्था करावी. आमची जेवणं व्हयी पोहोत काय दगाफटका होनार न्हाई येची जिम्मेदारी गोईंदरावना घ्येवी. आन आमची जेवण व्हयी पोहोत नवरा नवरीला मह्या ताब्यात द्येवा.'' दरोडेखोरांची

इच्छा लक्षात घेऊन पुराणिकबुवांनी गोविंदरावांकडे अन् रामजीकडे पाह्यलं. गोविंदरावांनी आणि त्यांनी रामजीला सर्वांच्या जीवासाठी आपण एकवेळ शरण जाणे अयोग्य नाही असे समजावून सांगितले. रामजीस तयार केले. गोऱ्यासाहेबाचा काही इलाजच नव्हता. दोघांचेही हात बांधण्यात आले. ते गुडघे टेकून लक्ष्याच्या पुढे बसले. लक्ष्याने आपल्या बंदुकीचा एक बार हवेत काढला. तसे सारे एकदम कंठात प्राण आणून आता पुढे काय होणार हे पाहू लागले. लक्ष्याने त्या दोघांभोवती दोन फेऱ्या मारल्या अन् तो कडाडला, ''आपल्या लोकांली असा शरण येया लावतांना लाजा वाटल्या नाहीत अन् आज ती पाळी तुह्यावर आली. थूः तुह्या जिंदगीवर. या गोऱ्या सायबाचं पाय चाटितोस. अरं मांडवावर बग कसं आपलं समदं मानूस माना खाली घालून उभी आह्यात. त्येंच्या या परसंगाला, अरं तुझ्यासारकं सर्प जिम्मदार हायेत. ह्या गोऱ्या सायबाला सवता घिऊन येऊन त्येच्या ताब्यात संमद राज्य देनारं निमकहराम! थू!'' हे ऐकत असतांना रामजी भांगरा मनोमन संतापत होता. हात तोडून त्या दरोडेखोराला कंठस्नान घालावे असे त्याला वाटत होते. पण तो हताश झाला होता. त्याने आज लाचारीने सर्व दरोडेखोरांच्या अटी खुद्द गोऱ्यासाहेबासमोर मान्य केल्या होत्या. पण त्याचेच कशाला इंग्रज सरकारचा प्रतिनिधीही त्या दरोडेखोरांसमोर हात जोडून उभा होता. मग गोविंदरावांनी परगण्याला सर्वांच्या जेवणाची उत्तम सोय करायला सांगितली. डाळभात भरपूर तयार होता. बुंदीही दोन दिवस पुरेल एव्हढी शिल्लक होती. जणू ठरवून स्वयंपाक करून ठेवला होता. किस्ना आणि रुक्मिणीला लक्ष्याच्या स्वाधीन केले तेव्हा किस्ना पूर्ण संतापला होता. थोड्याच वेळात लक्ष्याने त्याची आस्थेवाईकपणे चौकशी केली. तेव्हढ्यात किस्नाच्या हे पाहुणे कोण हे लक्षात आले आणि निमूटपणे तो तेथे उभा राहिला. आणखी पंधरावीस मिनिटात पत्रावळी पडल्या. पाने वाढली तरी पंगत मात्र बसेना. तसे गोविंदरावांनी चौकशी केली. लक्ष्याने फर्माविले, ''रामजी भांगरा समद्याली वाढाया येईल.'' रामजी उठून वाढायला गेला. लक्ष्या चौफेर नजर फिरवून म्हणाला, ''जारं.'' लक्ष्या गोऱ्यासाहेबावर नजर ठेवून होता. हा सगळा प्रकार गोऱ्यासाहेबाला असह्य झाला होता. तसे तो एकदम काही हालचाल करणार होता तोच लक्ष्याने त्याला फर्माविले, ''सायबा, हलशील नं हितून जीता जाणार नाही. अरं तू लग्नाला आलास म्हून सोडला, न्हाइतं हितच मुडदा पाडला असता रं.''

सर्वांची जेवणं झाली आणि मग सर्वांनी लक्ष्याजवळ उभ्या असलेल्या किस्ना अन् रुक्मिणीला आहेर केले आणि निघायचे ठरविले. निघताना लक्ष्या पुन्हा सायबाकडे पाहात म्हणाला, ''अरं सायबा, जा तुझ्या सायबाला सांग म्हणावा दरुडेखोरानं सायबाला शरन येया लावलं आन् इथं दरुडं घालून रामजीला पाया पडाया लावून चालेत.'' आणि मग दुसऱ्या क्षणी पुन्हा हवेत बंदुकीचे बार झाले. घोडी पळाली. पळणाऱ्या घोड्यांकडे रामजी अन् गोरासाहेब हताशपणे पाहत होता. रामजीनं नंतर उगाच जात्या दरोडेखोरांवर गोळीबार करण्याचा निष्फळ प्रयत्न केला होता.

* * *



आज ठरवल्याप्रमाणे लक्ष्या, वाळ्या, रामा किरवा आपल्या सर्व फौजेला घेऊन राजूरवर चाल करून गेले होते. राजूरच्या आनंदशेठवर त्यांनी दरोडा टाकला होता. हा आनंदशेठ सगळ्या डांगाणाला कर्ज देत असे. सगळ्या डांगाणातील अनेक जमिनी त्याच्याकडे गहाण होत्या. त्या शेठ सावकाराला कोणत्याही राजसत्तेने कधीही जबर शिक्षा दिली नव्हती. ती शिक्षा आज त्या सावकाराला मिळाली होती. त्याच्या साऱ्या चोपड्या जाळल्या गेल्या होत्या. आनंदशेठचा त्याच्याच चोपड्यांच्या होळीत केव्हाच आनंद झाला होता. लक्ष्या, वाळ्या, रामा किरवा यांनी आपली कामगिरी अगदी फत्ते केली होती. गोविंदराव आपल्या जात्या फौजेकडे कौतुकभरल्या नजरेने पाहात होते.

दरोडेखोरांना जेवणावळीखेरीज काहीही द्यावे लागले नाही. पुराणिकबुवा धर्माधिकारी जाणाऱ्या टोळीकडे अभिमानाने पाहात होते. मनात ते म्हणत होते, दरोडेखोरांजवळ देखील इमान आहे. ते इमान आम्हा प्रतिष्ठितांजवळ नाही.

दरोडेखोरांचे विघ्न टळताच बांधाबांध सुरू झाली. पूर्व दिशा उजळली होती. सारेच भांबावून गेले होते. पुराणिकबुवांनी पुढाकार घेऊन मुलीच्या बोळवणुकीची तयारी केली. सीताबाई रडत होत्या. त्यांना साऱ्या बायका साद घालीत होत्या. गोविंदरावांनी गाड्या घोडी सज्ज केली. गोविंदरावांनी एकदा रामजी भांगऱ्यांना मिठी मारली. रामजी आता सावरला होती. गोविंदरावांनी त्यांना सर्व पाहुण्यांनिशी वरातीला येण्याचे निमंत्रण दिले. किस्ना आणि रुक्मिणी यांनी पुन्हा एकदा वडीलधाऱ्या माणसांना नमस्कार केला आणि गोविंदरावांनी चलण्याचा इशारा दिला. गाड्या निघाल्या. घोडी दौडू लागली. सीताबाईंनी रुक्मिणीला पोटाशी धरून राधाबाईंनी विनवले. राधाबाईंनी त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. गोविंदराव सर्वांचा निरोप घेऊन आपल्या वऱ्हाडासह निघाले. सीताबाई किस्ना आणि रुक्मिणीच्या गाडीकडे भरल्या डोळ्यांनी पाहात होत्या. त्यांच्या गालावरून अश्रू ओघळत होते. वऱ्हाड गावची शिव ओलांडेपर्यंत वाजंत्र्या वाजत होत्या. जणू सर्वांच्या भावना दडपून टाकण्यासाठी त्यांची योजना.

वऱ्हाड निघून गेले आणि मग रामजींचा मांडव उदास दिसू लागला. त्या उदासीनतेत भर घालीत होता, रात्री झालेला अपमान. गोरासाहेब चरफडत होता. त्याचा थोर अपमान झाला होता.

* * *

गोऱ्या साहेबाने रामजी अन् त्याच्यासारख्या अन्य जमादारांना एकत्र केले. ते बिचारे लग्नासाठी म्हणून आले होते. गोरा गुरगुरला, ''टोमी ये रॉबर्सचा बंदोबस्त नाई करून शेकटे, टोमचा अधिकार आमी काढून का घेऊ नाही?'' पुन्हा थांबून तो भग्नपणे म्हणाला, ''आमी रिपोर्ट करणार. त्या रास्कलना आमच्या हात बांधला, आमाला त्येच्यासमोर गुडघे टेकून उभा केला, ये आमचा कंपनी सरकारच्या इनसल्ट असटे आमी गप्प बसणार नाही.''

त्याचे ते बोलणे म्हणजे ‘अपनी गलीमे कुत्ता शेर!’ सारखेच वाटत होते. तरी ही सारी जमादार मंडळी तत्परतेने त्याच्यापुढे उभी होती, त्यांना तो आपला आणि आपल्या सरकारचा अपमान वाटला होता. तोच राजूरहून काही लोक धापा टाकीत रामजींकडे आले. त्यांनी आनंदशेठवरील दरोड्याची सर्व हकीगत सांगितली. त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली होती. त्यांचा सारा अहंकार, अभिमान त्या गोऱ्याच्या साक्षीने दरोडेखोरांनी धुवून नेला होता, गोरा साहेब अधिक लाल लाल झाला, तो कडाडला, ‘‘ओ! धिस इज टू मच! रामजी भांगरा आमी ये बेअर करू शकत नाही. तुमच्या समोर ते येऊन टोमी काय करू शेकट नाही. आमी रिपोर्ट करणार!’’

साहेबाच्या बोलण्याचा रामजीच्या मनावर चांगलाच परिणाम झाला. तो मनातून चांगलाच संतापलाय तो दरोडेखोरांवर संतापला होताच, परंतु त्याहीपेक्षा ते साहेबावर आणि त्याने प्रत्यक्ष परिस्थिती पाहूनही केलेल्या वक्तव्यावर ते अधिक चिडले. पण आता हातातून सारे बाण सुटले होते. त्यांनी बंडखोरी केली तर ती ‘ना घर का ना घाट का’ अशी त्यांची अवस्था झाली असती. निःसहायपणे ते आपल्या इतर सहकाऱ्यांकडे पाहात म्हणाले, ‘‘साहेब आमी परत या भागात दरोडेखोरांना येऊ देणार नाही, आमी सावध नसताना आबगीच येऊन त्येंनी आमाली घेरला. पुन्हा असा व्हनार नाही.’’ साहेबाने त्यावर काहीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही.

रामजींनी मग घाईघाईने त्याच्या खाण्याची व्यवस्था केली. त्याला उत्तमपैकी सस्याचे मांस खाऊ घातले. मोहाची शुद्ध दारू पिऊन साहेब अन् त्याचे साथीदार तर्र झाले. खूष झाले. रामजी अन् त्यांच्या सहकाऱ्यांनी साहेब आणि त्याच्याबरोबर आलेल्या स्वारांना वाटे लावले. नंतर सारेच गंभीरपणाने विचार करू लागले. त्यांना दरोडेखोरांची भीती वाटत होती. त्यापेक्षा आपले अधिकार गेले तर काय? याची अधिक भीती वाटत होती. त्यांनी एकत्रितपणे मनोमन काही निश्चय केला आणि मग आपल्या सहकाऱ्यांना रामजींनी आदरपूर्वक निरोप दिला.

रामजींना आज गोविंदरावांकडे वरातीसाठी जायचे होते. त्यांचे बरेच पाहुणे त्या कार्यक्रमाकरिता त्यांनी ठेवून घेतले होते. सीताबाई काल रात्रीच्या प्रकाराने घाबरल्या होत्या तरी त्यांना त्या दरोडेखोरांविषयी एक कोडेच पडले होते. हे दरोडेखोर त्यांना विचित्र वाटले होते. त्याही सकाळपासून आपले जागरण वगैरे बाजूला ठेवून वरातीच्या तयारीला लागल्या होत्या. त्यांच्याबरोबर आज फारशा आयाबाया यायला तयार नव्हत्या पण त्यांनी त्यांची समजूत घालून त्यांना तयार केले.

संध्याकाळी गाड्या घोडी सज्ज झाली, रामजींचे वऱ्हाड वरातीला निघाले. आता रात्रभर वरात नाचवायची होती. आपल्या एकुलत्या एक पोरीचे काय काय कोडकौतुक होते ते त्याला पाहवयाचे होते. कालच्या प्रकाराने थोडीशी उद्विग्नता आली होती तरी दरोडेखोरांचा विचार त्यांनी मनातून काढून टाकला होता. आता त्यंना आपल्या पोरीची वरात दिसत होती. ते त्यात मोठ्या उत्साहाने भाग घेणार होते. त्यांच्याबरोबर शेपन्नास



माणूस वरातीसाठी घेऊन निघाले होते.

* * *

ते आपले वऱ्हाड घेऊन बारीला आले तेव्हा गोविंदराव स्वागताला सिद्धच होते. गोविंदरावांनी उत्तम वाजंत्री खास मागविली होती. गोविंदरावांची तयारी पाहून रामजी भांगरे थक्क झाले. मनोमन सुखावले. आपल्या पोरीच्या वरातीसाठीची सारी तयारी पाहून त्यांना आपल्या मुलीचे सार्थक झाले असे वाटत होते. वऱ्हाड आले तसे गोविंदरावांनी त्यांची उतरण्याची चोख व्यवस्था केली. सारा गाव माणसांनी फुलून गेलेला दिसत होता. दोन–चारशे घोडी झाडा–झाडांना बांधली होती आणि अनेक अनोळखी माणसे वरातीच्या कामात गढून गेली होती.

वरातीच्या अगोदर पाहुण्यांचा जेवणाचा कार्यक्रम होता. वरात म्हणजे बोकड्याची जत्रा होणार होती. मोठमोठ्या कढयातून खमंग मसाल्याचा वास येत होता. दूरवर आडोशाला बोकड अन् कोंबड्यांचे अवशेष दिसत होते. दारूचे हंडे भरून तयार होते. थोड्या वेळाने गोविंदरावांनी पाहुण्यांचे मानपान केले. सर्वांची जेवणाची तयारी झाली तशी दारूसाठी बैठका झाल्या. आपापल्या बरोबरीच्या लहानथोर माणसांना दारूचा आग्रह झाला. गोविंदरावांनी जातीने आपल्या खास निमंत्रितांना आणि रामरावांना आग्रह करून दारू दिली होती. दारूने खूष झालेले सगळे पाहुणे मग खमंग जेवणावर तुटून पडले. परगण्या, गोविंदराव, रामा किरवा, रामजी भांगरा स्वतः हिंडून सर्वांना आग्रह करीत होते. लक्ष्या ठाकर नाचायची तयारी करण्यात गुंगून गेला होता. पहिली पंगत झाल्यावर खास लोकांची पंगत बसली. आग्रहाची सीमा झाली. शाकाहारी लोकांसाठी डाळभाताचे अन् बुंदीचे जेवण केले होते. काही आयाबाया सोडल्या तर त्या जेवणाकडे कोणाचे लक्षच नव्हते. गोविंदरावांच्या निमंत्रितांना राहून राहून एकच प्रश्न सतावित होता या सगळ्या कार्यात धावून धावून काम करणारे हे अनोळखी कोण? रामजंना काही लोकांच्या ओळखी पटल्या पण हे लोक लग्नाला नव्हते आणि वरातीला कसे? हा प्रश्न त्यांच्या मनाला उगाचच सतावित होता. वरातीचा सोहळा पाहून मात्र रामजी कालचा सगळा प्रसंग विसरून गेले होते.

जेवणं झाली आणि वरातीची गाडी सजली. बैलगाडीवर करवल्यांच्या मेळ्यात बाशिंग बांधलेले किस्ना अन् रुक्मिणी बसली. मारुतीच्या देवळापासून वरात निघायची अन् गावात उगाच दहा पावले चालून येऊन पुन्हा मारुतीच्या देवळातच ती थांबायची. बैलांच्या दहा जोड्या बैलगाडीपुढे सजवून लावल्या होत्या. त्यांच्यापुढे लेझीमवाले, मग टिपरीवाले, मग नाच करणारे असे लोक तयार झाले. वरात गावातून फेरी मारताना फारशी रंगणार नव्हतीच.

वरात सुरू झाली आणि दहा–पंधरा मिनिटातच शकुनाची मिरवणूक झाली आणि वरात मारुतीच्या देवळापुढे आली. मग पहिल्यांदी नेहमीप्रमाणे नाचायला प्रारंभ झाला.

प्रत्येक वरातीत नाच झालाच पाहिजे असा संकेत बांबूच्या कामट्यांवर फडकी गुंडाळून तयार केलेल्या घोड्यावर स्वार होऊन एक पुरुष आला. तोंड रंगविलेला, विशिष्ट प्रकारचा सोगा सोडलेला फेटा बांधलेला. मग ढोलाच्या तालावर नाचू रंगू लागला. त्याच्या पाठोपाठ स्त्री वेशधारी एक पुरुष अंगविक्षेप करीत नाचत आला. डोक्यावर हंडा घेऊन तो नाचत होता. त्याने पुरुषाला विचारले–

**आयठणी पैठणी मुलुख मैदानी**
**किधर तांडा पडे ऽऽ हो ऽऽ**
**काशी ऽऽ राम ऽऽ जी?**

मग पुरुषाने उत्तर दिले–

**आयठणी पैठणी मुलुख मैदानी**
**बारी तांडा पडे ऽऽ हो ऽऽ**
**काशी ऽऽ राम ऽऽ जी**

मग पुन्हा नृत्याला सुरुवात झाली. घोडे नाचत नाचत पुढे जाई, पुन्हा मागून तीच लकेर येई. त्याला पुन्हा तेच उत्तर दिले जाई असा नाच जवळपास तासभर झाला. मग लेझीमीची पोरे रिंगण करून उभी राहिली. ताल, ठेका बदलला आणि लेझमीचे डाव रंगू लागले. बैठक झाली, जोडी झाली, उडी झाली, गिरकी झाली असे कितीतरी डाव मध्यरात्रीपर्यंत चालले होते.

दारूचा आग्रह पुन्हा पुन्हा होत होता. रात्र जागली जात होती. पोरे दमली तशी ठाकर लोकांचा कांबडवणा उभा राहिला. रिंगणात तरुण, प्रौढ सुमारे शंभर माणूस उभे राहिले. ढोलियाचा ठेका बदलला आणि ढोलियाने हात उंचावून इशारा देताच पाय उचलून पडला आणि त्याचवेळी ढोलियाच्या शेजारून आवाज उमटला–

**डोंगरी कळसाबाई ऽऽ**
**दुधाना ना नाली बया ऽऽ**
**पिंताबरी नटली बया ऽऽ**
**दागाना फुलली बया ऽऽ**
**डोंगरी कळसाई ऽऽ**

टेंभे उंचावले गेले. लोकांनी मनोभावे कळसाईला वंदन केले. गाण्याचा आवाज ऐकून रामजी मात्र चमकले होते. त्यांना आवाज ओळखीचा वाटला. तो लक्ष्या ठाकर होता. रामजींनी डोळे फाडफाडून पहावयास सुरुवात केली पण त्याचा चेहरा त्यांनी पूर्ण पाहिलेलाच नसल्याने त्यांच्या लक्षात येईना. रामजी उठून लक्ष्याच्या बाजूला चालू लागले तोच लक्ष्याने दुसरे गाणे सुरू केले –

**दाराच्या कडला सीता गुंफी मोतीहार**
**''उघड सीता दार**
**मला पाहुंदी मोतीहार''**



**''कसा उघडू मी दार?**
**दारी लक्ष्मण दीर''**
**''सीता येऊ दे मला**
**हार घालीन तुह्या गळा''**
**''कसा येऊ देऊ मी तुला?**
**दारी लक्षेमण पाहेना''**
**''सीता उघड कवाडा**
**तु गं माहा हात डावा''**
**''कसा उघडू कवाडा?**
**दारी लक्षेमण उजवा''**
**दाराच्या कडाला सीता गूंफी मोतीहार–**

रामजी लक्ष्याजवळ येऊन उभे राहिले. त्यांचा संशय वाढत होता पण खात्री पटत नव्हती. तसे ते मुद्दामच लक्ष्याला ऐकू जाईल अशा बेताने पुटपुटले दरोडेखोर...! लक्ष्या खरोखरीच चमकला. त्याने एकवार रामजींकडे पाहिले अन् म्हणाला, ''याहीबा अरं तुमी नाचाया पायजेल'' आणि त्यांचा हात धरून त्याने त्यांना रिंगणात ओढले. रामजींचा इलाज चालेना. ते रिंगणात येऊन नाचू लागले. त्यांच्या पाठोपाठ परगण्याला लक्ष्याने आत ढकलले तसा परगण्या आणि रामजी नाचू लागले आणि लक्ष्याने तान मारली–

**सखा ना मारवती ऽऽ**
**बाई रिंगणात आला ऽऽ**
**कसा झ्याप ना मारी का ऽऽ**
**चंद्र सूऱ्यापासी ग्येला ऽऽ**
**चंद्र सूऱ्या हात लाईला ऽऽ**
**असा लंकाला जाळीला ऽऽ**
**असा राबत मारीला ऽऽ**
**सीताला सोडीला ऽऽ**
**असा आंजेलीचा बाळ ऽऽ**
**आज रंगणी नाचला ऽऽ**

नाचताना देखील रामजींचे मन पूर्ण गोंधळले होते. त्यांच्या मनात काहूर माजले होते. हे दरोडेखोर असतील तर त्यांचा गोविंदरावांशी संबंध काय? झालेल्या दरोड्यात गोविंदराव सामील होते का? अशा एक ना अनेक शंका त्यांच्या मनात घोळत होत्या. दुसऱ्याच क्षणी ते स्वतःचे निराकरण करीत होते. गोविंदरावांचा अन् दरोडेखोरांचा काय संबंध असणार?

नाचता नाचता रात्र सरली. पूर्व उजळली. कितीतरी पाहुणे जागीच लुटकले. गार वाऱ्यावर अनेकांना डाराडूर झोप लागली होती. सकाळ झाली तरी सगळे जागवले. वरात संपली होती. आता सगळी पाहुणे मंडळी परत जाणार होती. काकणबाशींग उतरण्याचा

कार्यक्रम व्हायचा होता. पुन्हा जेवणावळी होणार होत्या. आयाबाया, बापयमाणूस सगळेच लगालगा कामाला लागले. दुपारपर्यंत सगळे कार्यक्रम उरकले आणि रामजी पुन्हा पोरगी घेऊन निघाले. गोविंदरावांनी सगळी पाहुणे मंडळी वाटे लावली. लग्न झालं.

✻ ✻ ✻

रामजींची मनःस्थिती द्विधा झाली होती. एकीकडे दरोडेखोरांनी सर्वांसमोर त्यांचा केलेला अपमान त्यांच्या डोक्यात घर करून बसला होता. त्याचबरोबर गोविंदरावांचा त्या दरोडेखोरांशी संबंध होता का? असा प्रश्न त्यांच्या मनात घोळत होता. तर दुसरीकडे गोऱ्या साहेबाने 'तुमचे अधिकार काढून घेतले पाहिजेत' असे त्यांचे मन दुखविले होते.

गोविंदरावांना लग्नामधून जे साधावयाचे होते ते पूर्णतः साधले गेले आहे असे त्यांना वाटत होते. रामजी भांगरे जोडला गेले होते. आता त्यांचा गोरा धार्जिणेपणा बंद होईल अशी त्यांना खात्री वाटत होती.

पावसाळा जवळ आला. लोक जोरात कामाला लागले होते. गोविंदरावांनी मुलीला आणायला 'पाटी' पाठविली. पोरगी आली. किस्नाचा संसार सुरू झाला. गोविंदरावांनी किस्नावर शेतीची जबाबदारी सोपविली. किस्ना लहान होता तरी समजदार होता. रुक्मिणी चुणचुणीत अन् समजदार होती. राधाबाई खुशीत होत्या. त्यांना मनाजोगी सून मिळाली होती. पावसाकडे सर्वांचे डोळे लागले होते.

पाऊस सुरू झाला. संततधार भात शेते जिवंत होऊन वाहू लागली. इरण्यामधून पाणी झरू लागले. सारी पृथ्वी निर्मळ झाली. चिंब झाली. तसे हळूहळू रामजींच्या मनातील शंकांचे वादळ कमी होऊ लागले. आता पावसाळा संपेपर्यंत डांगाण रानातच गर्क होणार होते. रामजींनीही अलीकडे स्वतःच्या शेतीकडे लक्ष द्यायला सुरुवात केली होती. आता ते नोकरी करीत होते. त्याचा पगार मर्यादित होता. अधिकाऱ्याच्या बाबतीतही हुकमाची तामिली करावी लागते की काय अशी शंका त्यांना वाटत होती. शेतात कामे करून घेताना रामजींच्या मनात येत असे. खरंच आपल्या वडिलांचं आणि आपलं चुकलं का? आपण आपल्या हातांनी गोऱ्या साहेबाला आणले का? आपण आपल्या हातांनी आपल्यात भांडणं करून आपला देश गमावला का? असा विचार करता करता त्यांचा कितीतरी वेळ जात असे. संततधार पाऊस कोसळणं चालूच असे.

✻ ✻ ✻

शेते डोलू लागली, भातखाचरे दुधावर आली. डांगाण आनंदलं. श्रावण, भादव उलटून गेले. मग पाऊस थांबला तसा आलं भात घरात घेऊन येण्यासाठी खळी लागू लागली. रामजी भांगरे सावध झाले. त्यांनी झाला अपमान गिळून टाकला. आपल्या



लोकांना प्रेमाने जिंकण्याचा विचार मनात घोळू लागला. त्यांनी गावोगाव फिरणे सुरू केले. पाटील मंडळींना विश्वासात घेऊन चौकशी सुरू केली. गावोगावच्या लोकांना आपुलकीने ते विचारू लागले. आपल्या हाताखालच्या लोकांना त्यांनी लोकांशी कसे वागावे याच्या सूचना दिल्या.

दसरा आला. विजयादशमीच्या 'भेटी'चा कार्यक्रम करण्याची तयारी झाली. नेहमीच्या इतमानाने भेटीचा कार्यक्रम पार पडला. गोविंदरावांनी तोच उत्साह दाखविला. रामजींचे मन पूर्वीप्रमाणेच सुखावले. रामजींच्या मनातील शंका फिटली. या कार्यक्रमाच्या निमित्ताने गोविंदरावांनी आणखी पुढचे पाऊल टाकले होते. ते म्हणाले होते, रामजी भांगऱ्यांसारखे मुत्सद्दी लोक मनावर घेतील तर स्वराज्याला वेळ लागणार नाही. रामजी भांगरा हाच डांगाणचा राजा. पाटील मंडळींनी माना डोलाविल्या.

रामजी भांगऱ्यांनी आपल्या मनातील विचार आपल्या सहकाऱ्यांना बोलून दाखविले. त्यांच्या मनाचा अंदाज घेतला. त्यातले बहुतेक सर्वच साहेबाच्या वक्तव्यावर नाराज होते. असलेल्या वीस-एकवीस शिपायांवर बंदोबस्त पाहणे शक्य नव्हते. तंटे बखेडे, वसूल, दरोडे अशा कितीतरी बाबी त्यांना पहाव्या लागत होत्या. प्रत्येक हालचालीकडे साहेबाचे लक्ष असे. साहेबाची फेरी झाली की चार-दोन अन्य लोकांना साहेब आपलेसे करी त्यामुळे या जमादारांवर त्याची जरब राही.

दिवाळीचा दिवस. मोठी दिवाळी म्हणजे आनंदी आनंद. दिवाळीचा सोहळा चालू होता. रामजी भांगऱ्यांकडे त्यांचा जावई पाहुणा आला होता. सीताबाई खुशीत होत्या. रामजी गडबडीत होते. दुपारी जेवण उरकून रामजी अन् किस्ना उगाच शेताकडे शेतं पाहायला गेले होते. तोच एक स्वार साहेबांचा लखोटा घेऊन आल्याची वर्दी एका शिपायाने येऊन दिली. रामजी भांगरेंनी बेफिकिरीनेच लखोटा पाहिला. त्यांच्या कपाळावर आठ्यांचे जाळे पसरले. खुद्द साहेबाकडून त्यांना जरबेचा हुकूम आला. रामजी भांगराही दरोडेखोरांचा बंदोबस्त करू शकत नसेल तर त्याचे अधिकार का काढून घेऊ नयेत? अशी भाषा लखोट्यात होती. पण पुढे समंजसपणाने रामजींचे मन सुखावले होते. रामजींनी लक्ष घातले आणि ठरवले तर रामजी सहज दरोडेखोरांचा बंदोबस्त करू शकेल असे म्हटले होते.

लखोटा वाचून होताना ते लाल झाले होते. त्यांनी साहेबाचीच शिवी हसडली, ''रास्कल!'' अन् त्याने बेफिकिरीने त्या शिपायास जायला सांगितले. त्यांचे बंडखोर मन त्यांना गप्प बसू देईना. मग दिवसभर त्यांच्या मनात तेच विचार घोळत राहिले. लखोट्याला काय उत्तर पाठवावे.

रात्री त्यांना बराच वेळ झोप येईना. तशी सीताबाईंनी काळजीने त्यांची विचारपूस केली. तिला झाला प्रकार कळल्यावर ती काहीशी गंभीर झाली. मग तिने सहज म्हणून रामजींना, आपल्या हुकूमाप्रमाणे आम्ही जास्तीत जास्त वागण्याचा प्रयत्न करू, मात्र पगार अन् शिपाई वाढविले पाहिजेत, असे कळवायला सांगितले. रामजींनाही तो सल्ला पटला.

त्यांनी साहेबाला उलट लखोटा पाठवला.

साहेबाने शिपाई पाठवून तीसपर्यंत शिपाई नेमण्याची मुभा दिली, पण रामजींचा किंवा त्यांच्या कोणत्याही सहकाऱ्यांचा पगार मात्र पाठविला नाही. साहेबाने आपले म्हणणे मानले नाही तर साहेबाने केवळ जबाबदारी मात्र आपल्यावर अधिक टाकली हे रामजींच्या लक्षात यावयास वेळ लागला नाही. रामजींच्या लखोट्याने जादू केली होती. सर्वच जमादारांना शिपाई वाढवून पाठविले होते. पगार मात्र कोणाचाही वाढविला नाही.

वर्ष संपत आले तरी दरोडा पडला नाही. कोकणात दूरवर कोठेतरी दरोड्याच्या बातम्या येत होत्या. तशाच बातम्या पुणे सुभ्यातून, नासिक सुभ्यातूनही येत होत्या. सारे जमादार त्यामुळे खुशीत होते. साहेब मात्र दर महिन्याला मुद्दाम चौकशी करीत होता. पण प्रत्येक जमादार मोठ्या अभिमानाने आपल्याकडे दरोडा पडला नाही असे लिहून पाठवित होता. आपल्याकडे आता दरोडा पडणार नाही याची खात्री वाटू लागली होती.

वर्षभराचा वसूल यावेळी रामजींनी अगदी गोडीगुलाबीने सर्वांच्या अडीअडचणी लक्षात घेऊन वसूल केला होता. पाटील आणि गावोगावचे मोठे जमीनदार यांचेकडून रामजींनी मोठ्या गोडीने अधिक वसूल करून गावोगावची वसूली पूर्ण केली होती. त्यामुळे रामजींविषयी लोकांमध्ये वेगळीच जाणीव निर्माण होऊ लागली. आजपर्यंत रामजी म्हणजे सरकारचा पोलिस अधिकारी वाटत होते. सरकारचे हुकूम पाळणारे. आता ते आपले आहेत असे लोकांना वाटू लागले होते.

जमादारांनी सर्व वसूल कुलकर्ण्यांच्या मदतीने नाशिकला पोहोच केले होते. आता पुढच्या वर्षीपर्यंत सारेच निर्धास्त झाले होते. तोच त्यांना धक्का देणारी बातमी त्यांच्यापर्यंत येऊन आदळली.

पुण्याहून मुंबईकडे वसूल घेऊन जाणाऱ्या गोऱ्यासाहेबाला दरोडेखोरांच्या प्रचंड तुकडीने घाटात गाठले होते. वेळ दुपारची होती. चार घोड्यांच्या बग्गीतून खजिन्याची पेटी जात होती. पुढे मागे असे एकूण पंचवीसतीस स्वार बंदुकधारी होते. घाटातून त्यांची बग्गी अडखळत कशी तरी उतरत होती. स्वार धिम्या गतीने चालले होते. तोच मागून पुढून बाजूने बंदुकधारी स्वार कड्यावरून घाटात चढताना दिसले. साहेब हुशार होता. त्याने लगेच 'फायर'ची आज्ञा दिली. पाचपंचवीस बंदुकधारी एकदम भोवताली चढून येणाऱ्या टोळीवर आग ओकू लागले पण दरोडेखोर सावध झाले होते. झाडाझाडातून, दगडधोंड्यामागे दडत लपत त्यांनी एकच भडीमार सुरू केला. शिपाई दीर्घ किंकाळी ठोकून उन्मळून पडू लागले. एका पाठोपाठ एक आर्त किंकाळ्या ऐकू येऊ लागल्या. तरी गोरासाहेब आपली बग्गी पळवित होता. दरोडेखोरांकडचेही कोणी मरत होते. आपल्याकडचे लोक मरताहेत हे लक्ष्याला सहन होत नसे. त्याने धावत जाऊन गोऱ्यासाहेबाच्या बग्गीवर मारा केला. पुढचे दोन घोडे त्याच्या गोळीने अचूक जखमी झाले आणि बग्गी कोलमडली तसा गोरा साहेब घोड्यावर स्वार होऊन पळू लागला. त्याच्या पाठोपाठ दोन तगडे स्वार धावत होते. मागे वळून गोऱ्याने केलेल्या निशाणांना चुकवित होते. अखेर या दोनही स्वारांनी त्या घोड्याला लोळवले. हा गोरासाहेब एवढा चपळ कसा, याचे गोविंदरावांना आश्चर्य वाटत होते. अखेर गोविंदरावांनी अचूक निशाणबाजी केली होती आणि गोऱ्या साहेबाच्या मस्तकातून गोळी शिरली होती. गोरा तडफडत गतप्राण झाला.



लक्ष्या आणि गोविंदराव गोऱ्याला ठार करून परतले तेव्हा आनंदाला पारावार राहिला नाही. पण दरोडेखोरांचे पंधरा लोक ठार झाले होते आणि दहा लोक जखमी झाले होते. गोऱ्यासाहेबाकडचे मात्र निरोप सांगायला देखील कोणी शिल्लक राहिले नव्हते. खजिना अमाप होता. वर्षभराचा गोऱ्यांनी वसूल केलेला वसूल दरोडेखोरांच्या हाती पडला होता. रिकाम्या पेटाऱ्याला पंचवीस स्वारांचे अन् गोऱ्या साहेबाचे मुडदे रक्षणार्थ ठेवून दरोडेखोर केव्हाच लंपास झाले होते.

खजिना अजून कसा येत नाही असे पाहून मुंबईहून खास तुकडी निघाली होती त्यांना रिकामी पेटी अन् सव्वीस प्रेते तेव्हढी बरोबर न्यावी लागली.

ही बातमी कानावर आली तेव्हा का कोण जाणे पण रामजींना त्या दरोडेखोरांच्या मर्दुमकीचे कौतुक वाटले. असा मोठा दरोडा आजपर्यंत पडला नव्हता. दरोडेखोरांचा असा विचार करताना त्यांच्या डोळ्यासमोर पुनःपुन्हा आपल्या मुलीच्या लग्नातील प्रसंग आठवत होता. दरोडेखोरांनी आपणाकडील लूट कशी केली नाही? या प्रश्नाचे उत्तर त्यांना मिळाले नव्हते, म्हणूनच त्यांच्या मनात पुन्हा गोविंदरावांविषयी विचार आला आणि त्यांनी सहजच त्यांना समजलेली बातमी गोविंदरावांच्या कानावर घालावयाचे ठरविले. त्यांनी घोडा गोविंदरावांच्या दिशेने वळवला.

अचानक रामजी आलेले पाहताच राधाबाई थोड्या गडबडल्याच. किस्नाने पुढे होऊन त्यांची विचारपूस केली. रामजींनी गोविंदरावांची चौकशी केली. गोविंदराव कामानिमित्त घोटीला गेल्याचे समजले. त्यांना यायला सात-आठ दिवस लागतील असे राधाबाईंच्या बोलण्यात आले. रामजींनी झालेल्या दरोड्याची इत्यंभूत हकीगत राधाबाईंना सांगितली. राधाबाई मनातून हसल्या होत्या. पण रुक्मिणी, किस्ना अन् राधाबाई यांचेकडून त्यांना थांग लागला नव्हता. नवीन बातमी, रामजी आजा होणार असल्याची, मात्र मिळाली अन् त्यांच्या मनातील दरोड्याचे विचार संपले. ते आनंदातिशयाने निघाले.

●●●

# चार

गेली पाच वर्षे दुष्काळाने हैदोस घातला होता. कधी ओला, कधी कोरडा, कधी आभाळाला भोक पडावं, तर कधी आकाशाकडं पहावं लागावं. भातं कधी जोरात यायची पण पुढं पाऊसच पडत नसे आणि भातं वाळून जायची. कधी पेरलेलं भात उगवतच नसे. मागच्यावेळी तर पावसानं कहर केला. डांगाणातली भातखाचरं वाळून गेली. सह्याद्रीची उंच टोकं एकदम उतरायची. आलं पाणी वाहून जायचं. आलं पाणी आपल्याबरोबर खाचरातली माती वाहून न्यायचं. आठ महिने पुरणारं पीक सहा महिन्यात संपू लागलं. गावोगावचे पाटील पार वैतागून गेले. कोणी कोणाला पुरवायचं. आभाळ फाटलं काय करणार? हरिश्चंद्राचा हरिश्चंद्र, रतनगडाचा अमृतेश्वर, डोंगरीची कळसाई, तळ्यावरची घोरपड्याई, टाकेदावरचा म्हादेव अन् राम सर्वच दैवतं रुसली. त्यांना प्रसन्न करण्याचे प्रयत्न झाले. चालले होते. निसर्गानंच त्यांची पूजा टाकली. माणूस कोठवर पुरा पडणार? कंदमुळावर जगणं झालं. पाण्याचाऱ्यासाठी गुरे लांबलांब फिरू लागली. ठाकर कंदमुळं पाहण्यासाठी कंबर कंबर खोल खोदीत जाऊ लागले. खेकडीच्या धावातून हात जाऊ लागले. पाणी जास्त झाला तरी पंचाईत. पानी आला नाही तरी पंचाईत. रान पाखरे, रानजनावरे आपल्या जागा भराभर बदलू लागली. कधी कोठे वाघ निघेल अन् कधी कोठे जनावर निघेल भरोसा राहिला नाही. महामूर रान दाट. त्यात एक का अनेक नानाप्रकारचे प्राणी त्यांच्या सान्निध्यात डोंगराच्या पोटाला कोळी, ठाकर, कानडे यांची वस्ती. त्यांची अवस्था तशीच झाली. प्रसंगी भुरट्या चोऱ्या होऊ लागल्या. रान जनावरांना आपल्यावर कधी गदा येईल त्याची भीती असे. डांगाणातून कोकणात अन् कोकणातून डांगाणात अशी त्यांची भटकंती सुरू झाली पण ते सह्याद्रीच्या कुशीत कशीबशी तग धरून होते.

गेल्या पांच वर्षात खायलाच नाही धड तर सरकारचा वसूल कोण अन् कसा भरणार? जमादार, कुलकर्णी यांची पंचाईत झाली. उघड्या डोळ्यांनी आपल्याच माणसांकडे उपासमारीच्या बदल्यात वसूल मागण्याची पाळी येई. रामजी आणि त्यांच्यासारखे अन्य जमादार पार वैतागले होते. शेवटी रामजींनी गेल्या वर्षी स्वतःच्या अधिकारात करच माफ केला. त्यांचे अनुकरण दोन जमादारांनी केले. सारे डांगाण सुखावले पण साहेब दुखावला. साहेबाला रामजी भांगऱ्यांची एकेक कारवाई आता लक्षात येऊ लागली होती. त्यांचेच अनुकरण अनेक अन्य जमादार करतात हेही सायबाच्या लक्षात येऊ लागले होते. पण दुष्काळ आहे असे समजल्याने साहेब जरा दुर्लक्षच करून होता, परंतु त्याने वसूल केला नाही तरी दोन दोन महिन्याचे पगारही कापायलाही कमी केले नाही. रामजी भांगऱ्यांना त्याचे फारसे वाईट वाटले नाही. तरी ते मनातून साहेबावर चांगलेच उखडले होते. राहून राहून त्यांना आपण साहेबाला मदत केली याचा पश्चात्ताप होत होता. पण तितकेच ते साहेबाच्या हुकुमाची तामील करीत होते तरी या वर्षी त्यांनी वसूल माफ करून आपले बंडखोर मन पुन्हा सिद्ध केले होते.

गेल्या पाच वर्षात डांगाणात दरोडा पडला नाही, पण कोकण, मावळ अन् नासिकचा भाग काही सुना गेला नाही. डांगाणात दुष्काळ आहे याची काळजी दरोडेखोरांना होती. डांगाणातच काय पण जेथे जेथे दुष्काळ दिसला तेथे तेथे दरोडेखोरांनी फारच मोठी कामगिरी केली होती. तेथल्या लोकांना पाटलाच्यामार्फत मोठाच पैसा पुरवला होता. सावकाराची धान्य कोठारे खुली करून द्यायला लावली. गावागावातून वसूल द्यायचा नाही म्हणून ताकीद दिली. कोणाला छळले जाऊ लागले म्हणून श्रीमंत सावकारांचे खजिने रिते होऊ लागले होते. साहेब कावत होता. गावागावातून होणाऱ्या या गोष्टीची नोंद साहेबाला होती, पण गेली दहा वर्षे चाललेल्या या दरोडेखोरांच्या कारवाया त्यांना बंद करता आल्या नव्हत्या. ''रॅट इन द माऊंटन'' त्यांना फारच छळत होते. त्यांना नेमलेल्या पोलिस अधिकाऱ्यांचाच संशय येऊ लागला होता. दरोडेखोरांना त्यांचे सहाय्य असावे असे वाटत होते. या जमादारांचा बंदोबस्त करता येईल पण महाराष्ट्रातल्या या चारपाच जिल्ह्यात चाललेल्या या कारवायांप्रमाणे आता मिरज, सांगली, सातारा, कोल्हापूर या भागातही अनुकरण सुरू झाले होते. खानदेशातही त्याचे पडसाद उमटू लागले होते. शिवाय या दरोडेखोरांविषयी लोकांच्या मनात पूर्ण सहानुभूती निर्माण झाली होती. ज्या लोकांना हाताशी धरून दरोडेखोरांना नेस्तनाबूत करण्याचा प्रयत्न करावा त्या त्या लोकांना धडा शिकविला जात असे, गोऱ्या साहेबाला मदत करायलाही कोणी तयार होत नसे.

* * *

एकेका साहेबाची फजिती होत होती. प्रवास करताना दरोडेखोरांना कोठे कोठे तोंड द्यावे लागेल हे कळत नव्हते. दरोडेखोरांची नजर फक्त गोऱ्या सोजिरांवर असे. त्यामुळे गोरासाहेब चांगलाच पिसाळला होता. त्याने आपल्या लष्करी कौशल्याचा उपयोग करून योजना आखायला सुरुवात केली होती पण त्याहीपेक्षा फार मोठी उपयुक्त गोष्ट त्यांनी केली. फादर लोकांना या समाजावर सोडले. फादर मंडळी निरनिराळ्या ठिकाणी जाऊन आपापली देवपूजा करू लागले. त्यांचे मिशन सुरू झाले. वसूल लोक देत नाहीत असे

कळताच आपणच चार पाटलांना हाताशी धरून आपणच वसूल माफ करण्याचा प्रयत्न करू असे सांगून वसूल माफ करून टाकणे, रंजल्या गांजल्या लोकांना धन आणि धान्य आणि दवा देऊन आपलेसे करणे एवढेच नव्हे हिंदू धर्मातील जातीभेदाचा, वर्णभेदाचा फायदा घेऊन विद्वेष भडकावून देणे आणि आपल्या धर्माची संख्या वाढविणे अशा गोष्टी सुरू झाल्या. जेथे जेथे फादर जात तेथे ते धार्मिक कामास आलेले असल्याने गावात त्यांचेविषयी आदरभावना व्यक्त केली जात असे. गोऱ्याचा गोरेपणा, प्रेमळपणा अन् गोड बोलणे अन् वागणे सामान्यातील सामान्य माणसालाही आपल्याबरोबर घेणे या सर्व गोष्टींनी हळूहळू पाटील, गावोगावचे रंजले लोक सायबापुढे लोटांगण घालू लागले. त्यांच्याद्वारे अनेक गोष्टी जमू लागल्या. गोऱ्यासायबाविषयी सहानुभूती निर्माण होऊ लागली. जणू आपल्या रक्षणासाठी परमेश्वरानेच सायबाला पाठविले असा समज काही त्यांच्या मांडीलामांडी लावून बसणारी मंडळी करू लागली!

शहराशहरातून मोठ्या भागातून या देशातील लोकांना सज्ञान करण्याच्या योजना आखावयास सुरुवात केली आणि हळूहळू साहेबाला या देशातील लोकांचे संरक्षण मिळू शकले.

हा मार्ग लांबचा आहे हे साहेबाच्या लक्षात येत होते. दरोडेखोरीच्या निमित्ताने आपल्या सत्तेलाच सुरुंग लावला जात आहे हे न कळण्याइतका साहेब मूर्ख नव्हता म्हणूनच या दरोडेखोरांचाच बंदोबस्त केला पाहिजे हे सरकारने मनावर घेतले. या दरोडेखोरीच्या बातम्या थेट वरच्या सायबापर्यंत पोहोचल्या होत्या.

अलिकडे साहेबाने रामजी अन् त्यांच्यासारख्या जमादारांवर फारच करडी अन् बारीक नजर ठेवली होती. त्यांच्यातीलच काही जमादारांनी साहेबापर्यंत जे पोचविले होते त्याची शहानिशा करण्याचा प्रयत्न साहेबाचा सुरू झाला होता. रामजी भांगऱ्यांच्या हे लक्षात आले होते. त्यात त्यांनी यावर्षी स्वतःच कर माफ केला होता. पण सुदैवाने पावसाळा सुरू झाला तेव्हा वेळेवर पाऊस झाला होता अन् अगदीच वेळेवर सुरू झाल्याने सगळे डांगाण हरखून गेलं. खाचरं जिवंत झाली. कष्ट सुरू झाले. कष्टाला फळे येण्याची स्पष्ट चिन्हे दिसू लागली तसा आनंद झाला. रामजींनी वसूल माफ करून सर्वांची मने जिंकली होती. गोविंदराव खाडेंविषयी रामजींना बराच सुगावा लागला होता. पण त्यांनी त्यांना त्याचा कधी पत्ता लागू दिला नाही. एका दृष्टीने गोविंदराव करतात तेच बरोबर आहे असे त्यांना आता वाटू लागले. त्यांनी वसूल माफ केल्यावर गोविंदराव जेव्हा त्यांना धन्यवाद देण्यास आले तेव्हा आपले मनातील पश्चात्तापाचे विचार स्पष्ट बोलून दाखविले होते. काही झाले तरी गोविंदराव त्यांचे जुना मित्र आणि व्याही होता. त्यांनी मुद्दामच पडत्या पावसात एकदा गोविंदरावांची जाऊन भेट घेतली. औंदा पिकं बरोबर येणार म्हणून दोघांनीही समाधान व्यक्त केले होते. रामजींच्या आपण होऊन येण्याने गोविंदरावांना अगदी आश्चर्य वाटले होते. गोविंदरावांनी दुष्काळाच्या वेळी केलेले कार्य रामजींच्या चांगलेच लक्षात होते. पण रामजींना राहून राहून एकच गोष्ट खटकत होती, गोविंदराव आपल्यावर एवढा



जीव टाकतात पण आपल्यापासून दरोडेखोरांविषयीची माहिती चोरून का ठेवतात? गोविंदरावांची अन् त्यांच्या दरोडेखोरांची माहिती त्यांना आपल्या मुलीकडून समजली होती, पण गुप्तता राखण्याची मुलीने घातलेली शपथ त्यांनी प्रामाणिकपणाने पाळली होती. गोविंदराव अन् दरोडेखोर यांची मजल पाहून रामजींना अलिकडे स्वतःची घृणा वाटू लागली होती, पण गोविंदराव अजून त्यांच्याजवळ काहीच गोष्ट काढीत नव्हते. त्यामुळे आपण होऊन त्यांना कसे विचारावे असा प्रश्नच रामजींना पडला होता. म्हणून ते भेटायला जाऊन फक्त हवापाण्याच्या गप्पा मारूनच परत फिरले होते. ज्या अदबीने अन् पश्चात्तापाने ते बोलत होते त्यावरून गोविंदरावांनी मात्र त्याची मनःस्थिती ओळखली होती. पण त्यांनी देखील रामजी स्वतःहून बोलत नाही म्हणून, मूग गिळले होते. पावसाळा उत्तम झाला. पांच वर्षांचे दुर्भिक्ष्य फिटले. डांगाण समाधानी झाले.

* * *

नवरात्र आलं. घट बसले. माळा चढू लागल्या. घटाभोवतीचे धान्य उगवू लागले. पाचव्या माळेला ठाकरांनी कांबडवण्याचे रिंगण धरले. कांबडवणा रंगला. दसरा आला. विजयादशमीच्या दिवशी कळसाईला, घोरपड्याआईला लोकांची गर्दी उसळली. कळसाईच्या पुढे स्वाभिमानी पाचशे लोकांनी लोटांगण घालताना कळसाई प्रसन्न झाली.

पाऊस भरपूर झाल्याने अन् योग्यवेळी योग्य प्रमाणात पडल्याने सर्वच शेतकरी आनंदात होते. पाटील मंडळी निश्चिंत झाली होती. रामजी भांगऱ्यांचा या वर्षीचा 'भेट' कार्यक्रम जोरदार होणार होता. गेल्या पाच वर्षात केवळ उपचार म्हणूनच तो झाला होता. जोरदार तयारी चालली होती. भव्य मंडप टाकला होता. दुष्काळानंतर प्रथमच चांगले पीक पहावयास मिळत होते म्हणून भात पेंढ्यांच्या मुळी प्रत्येक खांबाला बांधल्या होत्या. आंब्याचे डगळे झेंडूच्या माळांनी मांडव सुशोभित केला होता. मांडवात उच्चासनावर तीन-चार खुर्च्या मांडल्या होत्या. समोर गाद्या, लोड टाकले होते. रामजी भांगरे आज फारच खुशीत होते. गेल्या पाच वर्षात त्यांना वसुलीसाठी फारच यातायात करावी लागली होती. गतवर्षीचा वसूल माफ केला. आता साहेबाची प्रतिक्रिया काय होणार हे त्यांना अद्याप कळले नव्हते. आज पुन्हा पूर्ववत भेटीचा कार्यक्रम होणार होता. आपल्या राज्यावरची अवकळा गेली असेच त्यांना वाटत होते. त्यांनी उत्तम पोशाख परिधान केला पण आज सर्वांनाच आश्चर्य वाटेल अशी गोष्ट केली होती. नेहमीचा सोजिराचा पोशाख त्यांनी परिधान केला नव्हता. मखमली अंगरखा, डोक्याला तांबडा जरी गोंड्यांचा फेटा मोठा रूबाबदार होता. कमरेला जरीकाठी उपरणे बांधले होते. त्याला तलवारीचे म्यान अडकविले होते. पायात चढाव चढविले होते. हातात सोन्याचे कडे होते, तलम धोतर परिधान केले होते. सीताबाईंनी कपाळी कुंकवाचा तिलक रेखला होता. मिशा पिळदार होत्या. रामजी आज विशेष रूबाबदार अन् प्रसन्न दिसत होते.

सूर्य कासराभर वर आला होता आणि भेट कार्यक्रम सुरू झाला. गोविंदराव कार्यक्रमाला जातीने हजर होते. शिंगाड्याने शिंग फुंकले. बंदुकांचे बार उडाले. रामजी भांगरे आपली मंद दमदार पावले टाकीत रूबाबात आपल्या आसनावर बसले. त्यांच्याबरोबर असलेले गोविंदराव दुसऱ्या खुर्चीवर बसले आणि गोविंदरावांनी पुन्हा उभे राहून कार्यक्रमाला सुरुवात केली. त्यांचे बोलणे चालू होते तोच–

पाच–सात स्वार दौडत आले. त्यात एक गोरा सोजिर होता. मंडपाच्या प्रवेशद्वाराशी स्वार थांबताच रामजींनी लगबगीने आपल्या शिपायांना पहावयास सांगितले. त्यात एक गोरा सोजिर आहे असे कळताच रामजींनी त्याचे उठून स्वागत केले. त्याला बसावयास खुर्ची दिली. गोऱ्या सोजिराने मंद स्मित केले. विचारले, ''हा काय चालला आहे?'' रामजींनी तत्परतेने उत्तर दिले, ''भेट.'' गोरा सोजिर पुन्हा मंद पण मिश्किलपणे हसला. मग भेटीचा कार्यक्रम पुन्हा सुरू झाला. एका पाठोपाठ एक पाटील येऊन रामराम करीत असे. मग तांदूळ, मेंढी, शेळी, गाय, सोन्या–चांदीची एखादी वस्तू अशा कितीतरी प्रकारच्या भेटी पाटील देत असत. लोकांनी अशा अनेक प्रकारच्या भेटी आणल्या होत्या. भेटीचा कार्यक्रम आटोपल्यावर जेवणावळ झाली. साहेबासाठी स्वतंत्र कोंबडीचा खाना शिजविण्यात आला. अस्सल मोहाची दारू अन् कोंबडीचा खाना खाऊन गोरा सोजिर अगदीच खूष झाला. त्याच्या बरोबरीचे शिपाईही खूष झाले. गोविंदराव हे सारे पाहून खिन्न होत होते. त्यांच्या मते रामजींनी गोऱ्यासाहेबाच्या पुढे–पुढे करण्याचे काही कारण नव्हते. गोविंदराव खिन्नपणे एका जागी बसून हे सारे पाहत होते. सर्वांची जेवणे झाली आणि सारे पाटील विजयादशमीच्या आपापल्या कामासाठी निघून गेले.

गोरा सोजिर निघाला तसे त्या पाठोपाठ गोविंदरावांनी आपला घोडा सोडला. त्यांच्या डोक्यात काही योजना घोळत होती. गोविंदराव दौडत होते. गोरा आता कोठून कसा जाणार हे त्यांना माहीत होते. घरी येताच त्यांनी विजयादशमीनिमित्त जमलेल्या आपल्या साथीदारांना योजना सांगितली. विजयादशमीचा कार्यक्रम आटोपला. जेवणे झाली. पंचवीस जणांची एक टोळी गोऱ्या सोजिराच्या दिशेने सुसाट दौडत गेली.

* * *

विजयादशमीचा 'भेट' कार्यक्रम होऊन चार–सहा दिवस झाले असतील तोच एक स्वार दौडत रामजी भांगऱ्यांकडे आला. त्याने सलाम करून एक लखोटा रामजी भांगऱ्यांच्या हाती दिला. लखोटा वाचत असतांना शब्दाशब्दागणिक रामजी लालबुंद होत होते. त्यांच्या डोळ्यात अंगार पेटला होता. त्यांनी साहेबाच्याच भाषेत शिवी हासडली ''रास्कल'' आणि ते जोरजोरात फेऱ्या मारू लागले. मधूनच मुठी आवळी आणि आपल्याच हातावर मुठी आपटून घेई. त्यांना काय करावे ते सुचत नव्हते. त्यांनी बराच वेळ विचार केला. स्वार अजून येथेच आहे हे त्यांच्या ध्यानातही येत नव्हते. मग मनाचा निश्चय करून ते आत गेले. आत देवाजवळ जाऊन देवाला कळसाईचा उदेकार करून टिळा कपाळी लावून बाहेर येताच त्यांनी आपला निरोप त्या स्वाराला ऐकवला, ''सायबाली सांग म्हणावं हा 'भेट' कार्यक्रम चालूच राह्यला पायजेल. मी बंद करनार न्हाई.'' स्वाराने मान डोलावली, ''आन त्या सायबाला सांग म्हनावं हा रामजी आपली चाकरी करीत असला तरी या रानचा राजा, धनी हाये, त्येली अटकाव करायचा न्हाई.'' रामजींनी पुन्हा फर्मावले. मग स्वाराला कसेबसे जेवण घालून रामजींनी वाटे लावले. स्वारास जाताना परत एकदा बजावले, ''ह्या सांगला तसाच सायबाला सांग.'' स्वाराने मान हलवली आणि तो निघून गेला. रामजींची बडबड चालूच होती, 'तुह्या बायली, आमाली भेट बंद कराया सांगतू. तुह्या बापाचा राज काय रं? अरं म्या ह्या राज तुह्याकं दिलं!'' मग त्यांचं मन अंतर्मुख झालं. आपण केलं हे चुकलं हे त्यांना मनोमन पटलं. त्यांच्यासारख्या इतर जमादारांना हाच हुकूम आहे काय हे त्यांच्या लक्षात येईना. मग त्यांनी घोड्यावर मांड ठोकली. घरी सीताबाईला त्याने कसेबसे जाऊन येतो म्हणून सांगितले आणि निघालेच.

प्रत्येकाकडे त्यांना असाच लखोटा आलेला दिसला. रामजी चांगलेच संतापले. दारूच्या चढतीबरोबर त्यांच्या रागाचा पारा चढत असे. सर्वांच्याच अधिकारावर गदा आली होती. सर्वांनाच राग आला होता. त्यांच्या विश्वासातल्या प्रत्येकाने, ''रामजी तुमी करान तसा'' असं आश्वासन दिलं होतं आणि रामजी मनातून सुखावले होता. ''आता यउंदी त्या साहेबाला'' असे मनाशी म्हणत ते तीन दिवसांनी घरी आले. सीताबाईंनं विचारलं ''काय झालं?'' त्यांनी सीताबाईंना झाली हकीकत सांगितली. सीताबाई म्हणाल्या, ''गोविंदराव वागलं त्याच खरा. आपुनी उगा त्या सायबाला लय डोक्याव घेतला. त्येला त्येची जागा समिंदरापलिकडं हाये ह्या दावायचं पाजेल.'' सीताबाई खरं म्हणजे राजकारणाच्या बाबतीत कधीच बोलत नसत. पण क्वचित त्या बोले तेव्हा लाख मोलाचं बोले. रामजींना हा जणू कौल मिळाल्यासारखाच झाला. दुपारचे जेवण व्हायचे होते. ते आटोपून ते बाहेर येऊन बसले. तोच त्यांना घोड्याची दौड ऐकायला आली. त्यांचे कान टवकारले गेले. ह्यांच्या पुढ्यात तोच चार दिवसापूर्वीचा स्वार उभा होता. चार दिवसांनी तो लखोटा घेऊन आला होता. लखोटा वाचला अन् रामजी पुरेच उखडले. ''भेटीचा कार्यक्रम कायद्यात बसत नाही काय. अरं कायद्याच्या! तुझं कायदा आता समदं डांगलीला टांगतु बग! त्या सायबाली'' स्वार ऐकत होता. थरथरत होता. आता रामजी आपल्यालाच मारतात की काय असे त्याला वाटत होते. रामजी लखोटा वाचून पूर्ण होताना बोलले, ''चांगला झाला रं, त्या सायबाला असाच व्हया लागत व्हता.''

* * *

विजयादशमीच्या दिवशी गेलेल्या साहेबाला गोविंदरावांच्या तुकडीने घाटात बरोबर गाठले होते, त्याला अन् त्याच्या स्वारांना बेदम मारले होते, अन् गोऱ्या सोजिराला

घोड्याला उलटा बांधला होता. बाकीच्यांचे पाय घोड्याच्या पोटास खाली आवळून बांधले होते. कोणालाही घोड्यावरून उतरता येणे शक्यच नव्हते. पुढच्या गावात गेल्यावर त्यांची फजिती पाहून सारेच हसले होते. दरोडेखोरांनी केलेला हा प्रताप साहेबाने ऐकला तेव्हा त्याची रामजी भांगरेंबद्दलची खात्रीच पटली होती. रामजी भांगरेंशी या दरोडेखोरांचा काही संबंध असावा अशी शंका त्याला जमादारांपैकीच एकाने बोलून दाखविली होती. साहेब रामजींवर चांगला चिडला होता. झाल्या प्रकाराने संपूर्ण खापर त्याने रामजी भांगरेंच्या माथी फोडले होते आणि त्याचा स्पष्ट उल्लेख आजच्या लखोट्यात केला होता. रामजींनी संतापानेच उत्तर दिले, ''आरं जा म्हनावं 'भेट' नही बंद करनार! माझ्रा भावबंद मला भेट देत्यात त्येचा बापाचा काय जाताय? म्हनं कायद्यात बसत नाई, अरं कायद्याच्या! आमचा खाऊन आमच्या उरावं व्हय रं?'' मग त्यांनी स्वारास दरडावले. ''जा त्येली जाऊन सांग म्हनावा रामजी ऐकाया तयार नही. त्येला म्हनावं माहा राजीनामा मंजूर कर नही त मला सा महिने रजेवं जावं लागन.'' स्वार निरोप घेऊन गेला.

साहेबानी रामजींचा पगार वाढविला नाही. राजीनामा मंजूर केला नाही. त्यांना हवी असलेली सहा महिन्याची रजाही दिली. रामजींसारखे इतर जमादारही असेच कचाट्यात सापडले. त्यांनाही तीच वागणूक मिळाली. एकूण साहेबही मनातून चांगलाच चिडला होता. रामजींच्या सर्वच गोष्टी फेटाळल्या गेल्या. त्यांच्या अंतःकरणात संतापाचा डोंब उसळला. साहेब आपली दखल घेत नाही असे पाहताच रामजी संतापले. त्यांनी आपल्यासारख्या आठ जमादारांना एकत्र केले. त्यांच्या पगाराची हमी घेतली. शिपाईही त्यांच्या बाजूला आले आणि त्यांनी बंड पुकारले.

रामजींच्या या सर्व कारवायांवर गोविंदरावांचे बारकाईने लक्ष होते. गोविंदराव वेळोवेळी येऊन रामजींना साहेबाविरुद्ध चेतावणी देतच होते. अखेरीस त्यांचे प्रयोग यशस्वी झाले होते. आज तमाम आठ जमादार एकदम गोऱ्या साहेबाविरुद्ध बंड थोपटून उभे होते. रामजींचे बंडखोर मन पुन्हा बंड करून उठले होते. रामजींना समजुतीने आपल्याकडे ओढले पाहिजे असे गोविंदरावांच्या मनी होते.

रामजींनी पहिली गोष्ट ठरवली. सर्वांनी सरकारी वसूल करावयाचा पण पाठवायचा नाही आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी त्याप्रमाणे कार्यवाही केली. वैशाख संपला तरी वसूल आला नाही हे पाहून साहेब चिडला होता. त्याने स्वार पाठवले होते. पण ''यावर्षी वसूल माफ केला आहे असे कळवा'' असा निरोप रामजींनी आणि त्यांच्या जातभाई जमादारांनी धाडला आणि गोरा साहेब चिडला होता.

* * *

पावसाळा जवळ येत होता. शेतांच्या कामांना सुरुवात होणार होती. रामजींनी आपल्या पक्षाच्या लोकांना एकदा एकत्र करावयाचे ठरविले. सर्वांना निमंत्रणे गेली.



रामजींनी सर्वांच्या सेवेची जय्यत तयारी केली. वैशाख वद्य नवमीचा दिवस होता. सारे एकत्र जमणार होते. रामजींनी मोठा मांडव दिला होता. एक वेगळीच भेट होती. मांडवाला प्रत्येक खांबाला मोठे टेंभे लावले होते. दारूची कसर ठेवली नव्हती. हंड्याहंड्यातून बोकड शिजत होते. एकेक तुकडी येऊ लागली. रामजी स्वतः पुढे होऊन प्रत्येकाला आलिंगन देत होते. त्यांच्या साथीदारांना आदराने बसवित होते. आज रामजी भांगरे जमादार नव्हते; ते बंडखोर रामजी भांगरे होते. त्यांचे प्रेम पाहून हाताखालचे शिपाई आश्चर्यचकित झाले होते. त्यांनी त्यांच्या निष्ठा रामजींच्या चरणी केव्हाच वाहिल्या होत्या. गेली दहा-अकरा वर्षे इंग्रज कंपनी सरकारचे इमानाने काम पाहणारे शिपाई त्याच सरकारवर हत्यार उपसण्यासाठी, त्यांचे राज्य उलथून टाकण्यासाठी क्रांतीची मशाल हाती घेऊन उभे होते. रामजी भांगरेंना आपला तो काळ आठवत होता. रामजी भांगरे त्यावेळी प्रथमच साहेबाला भेटले होते. कॅप्टन सीकस स्वतः म्हणाला होता, ''रामजी आमी टोमाला हा राज्य मिळवून देणार. टोमी इथले जमादार. हा मुलूख टोमचा होणार.'' रामजींना स्वतःचाच अभिमान वाटला. होळकरांनीही जे रामजींच्या किंवा त्यांच्या वडिलांच्या बाबतीत केले नव्हते, ते खुद्द साहेब करणार होता. रामजींनी म्हणूनच आपली निष्ठा, केवळ सूडापोटी साहेबाच्या चरणी वाहिली होती. या स्वराज्यासाठी जीवाच्या बाजीने लढणाऱ्या आपल्या मित्राच्या वाटाही रामजींनी गोऱ्या साहेबाला दाखविल्या होत्या. स्वतःला अधिकार मिळणार या आशेने साता समुद्रापलिकडील साहेबाला त्यांनी आपल्या घरात मानाचे स्थान दिले होते. प्रत्यक्ष शिवछत्रपतींच्या राज्याशी त्यांनी विद्रोह केला होता. पण आज त्यांना ते सारे आठवून स्वतःचीच कीव वाटत होती. त्यांच्या पश्चात्तापाला पारावार राहिला नव्हता. म्हणूनच ते आज आपली चूक भरून काढण्यासाठी आपल्या सहकाऱ्यांनीशी सज्ज झाले होते. ते इंग्रजी सत्तेविरुद्ध या सह्याद्रीच्या कुशीत बंड पुकारणार होते. या सह्याद्रीने या साता समुद्राकडून, पश्चिमेकडून येणाऱ्या सोजिरांना अडविण्यासाठीच ठाण मांडले नाही का? ही कळसाई, हा हरिश्चंद्र, हा अमृतेश्वर आपणाकडे स्वराज्याचे मांगणे मागत आला असे त्यांना वाटले आणि ते शहारले. इंग्रज सत्तेविरुद्ध अंतर्बाह्य पेटले.

एकेक जमादार करता करता आठ जमादार जमा झाले. त्यांचेबरोबर त्यांचे साथीदार शिपाई होते. सुमारे शेसव्वाशे लोकांची सशस्त्र फौज जमा झाली. कानात प्राण आणून सारेजण रामजी काय सांगणार ते ऐकू लागले. रामजींनी बोलायला सुरुवात केली तसे सारे सावरून बसले. ''शिपाई गड्यांनो, आपण सारे या रानचं वाघ. रानच्या वाघाला रानात मोकळा ऱ्हाया आवडतां. आजपतुर आपुनी सायबाची चाकरी केली. आपल्या लोकांली आरण घालून दिला आन सायबाली राज दिला, पर सायब इमानदार ऱ्हाईत. अरं मह्या गड्यानु हा अमृतेश्वर, त्यो हरिचंदर, ती कळसाई आपल्याला सांगतीया का महा मुलुक. सायबाच्या ताब्यात का म्हून आपुनी ऱ्हायाचं? इथलं राजा आपून - आपून या समद्या देवांची मुलां. आजपतुर चुकलं असन पर आज आमी सावध झालू. रानचं राजं त्ये रानचं राजं. आता आमी त्या सायबाचं आयकनार नही.'' रामजींनी हे बोलणे सारे शिपाई

भान हरपून ऐकत होते. येवढ्यात घोड्यांच्या टापांचा प्रचंड आवाज येऊ लागला. किमान चारपाचशे स्वार असावेत असा तो आवाज होता. घोडी दौडत होती. त्यांच्याच दिशेने येत होती. रामजींच्या अन् त्यांच्या अन्य साथीदारांच्या मनी आले की साहेबाला आपल्या योजनेचा सुगावा लागला असावा. रामजींनी इशारा केला, सूचना दिल्या आणि सगळ्यांनी लपण शोधले. बंदुका सरसावल्या. मांडवाचे टेंभे तसेच जळत होते. दौडत येणाऱ्या तीनशे स्वारांना त्यांचे भानही नव्हते. आता स्वार जवळ पोचले होते, कोणी काही बोलत नव्हते. इतक्यात जवळ येतांना गोविंदरावांनी आरोळी ठोकली ''हर हर मह ऽऽ देव!'' अन् रामजी मनातच खजील झाले. आपण उगाचच घाबरलो असे त्यांना वाटले. त्यांनी गोविंदरावांचा आवाज ओळखला होता. पण गोविंदरावांबरोबर एवढे स्वार कसे? ते हळूच पुढे आले. त्यो त्यांना लग्नाच्या दिवशीचेच दरोडेखोर दिसले. त्यातला त्यांना गुडघे टेकावयास लावणारा गोविंदरावांबरोबर होता. रामजींनी बंदूक सरसावली. आता रामजी चांगले टप्प्यात आले होते. तोच गोविंदराव ओरडले, ''अवं रामजी अरं आमी शत्रु नही, आमी मैतर आहोत.'' रामजी वरमले. तमाम शंभर सव्वाशे स्वार व हेर आले. आता तेथे प्रचंड फौजच दिसत होती. अजून दरोडेखोर आपले चेहरे दाखवावयास तयार नव्हते. गोविंदराव कडाडले, ''अरं माझ्या भावानु आज पोहोत तुमी सायबाची चाकरी केलीत पर आपला देस आपला व्हया पायजेल. ह्या तुमाली पटलाय रं आता तुमी शंभर न्हाईत आता आपुनी पाचशे आह्यात. अरं त्या शिवबानं पांचपन्नास सोबत्यांच्या जीवानं स्वराज्य मिळवलं आन आपुनी तं पाचशे आह्यात. आपुनी त्या गोऱ्याचं मुस्कं बांधून आन त्येली आपल्या म्होरं लोटांगण घालाया लावू. आरं आज धा वरीस आमी दरूडं मारतुया पर तुमच्यासारखा बंड कराया कोन धजला नाही. आज रामजी भांगरा तुमच्या समद्यांच्या जीवावं बंड करून उठला. आमाला लय आनंद झाला. आरं, ह्ये ह्या म्हादेवानं दिलेलं राज हाय. त्येची इच्छा आसन तं आपन कायबी करू. अरं बघता काय बोला ''हर हर महऽऽदेव!'' त्यांच्या गर्जनेत गर्जना मिसळल्या. ''अरं तुमाली कबुल असल तं हे दरूडं घालणारं सव राज्याचं शिपाई आपलं पटकं उघाडतील. बोला हाये कबूल?'' ''कबुल कबुल!'' असंख्य ध्वनी उमटले. सह्याद्रीच्या कडेकपारीतून त्याला प्रतिसाद मिळाला. रानात प्रतिध्वनी उमटले. मग सर्वांनी पटके सोडले. लक्ष्याने रामजींना मिठीच मारली. रामजी भांगरेही भावनाविवश झाले. गोविंदराव बोलत होते, ''आरं हे दरूडंखोर लुटारू न्हाईत. ह्या सव राज्याचं सैनिक आह्यात. आता उघडं उघडं बंड करायचं हाये. ह्या समदं गडी आता आपलं आह्यात. आता काय कोनाची छाती हायें आपल्याला जितायची अन् ह्या गडाला खिंडार पाडायची.'' गोविंदरावांचा हात एकदम रतनगडाकडे गेला होता. गडाचं नथ नसलं नाक दिसत होतं. गोविंदराव बोलले, ''बोला रामजी भांगरा की'', ''जोय!'' सर्वांच्या मुखातून बुलंद आवाज निघाले. मग लक्ष्या ठाकर बोलू लागला ''आरं ह्या समद्या सह्याद्रीच्या दऱ्यादऱ्यातून आपलं मानूस हाये त्ये समदं आपल्या बाजूनं लढन. कोळी, ठाकर, वारली, कातकरी, भिल्ल, मराठी समदं यकमोहरी लढाया लागलं त मंग त्यो सायेब काय करतोय?'' सगळे भारावून ऐकत होते.



* * *

गोविंदराव रामजी भांगरेंच्या हालचालीवर नजर ठेवूनच होते. त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना एकत्र करावयाचे ठरविले हे त्यांच्या सुनेने अचूक त्यांना येऊन सांगितले होते. त्याचवेळी अशी मोठी फौज उभारावयाचा निर्णय गोविंदरावांनी घेतला होता. त्यांना एकच भीती वाटत होती, लक्ष्या ठाकरावर रामजी भांगऱ्यांचा राग होता. तो कसा काढता येणार? पण सारं काही त्यांच्या मनाजोगं होत होतं. त्यांच्या मनात राहून राहून पेशव्यांचा विचार येत होता. पेशव्यांनी पळपुटेपणा केला नसता तर मराठ्यांची गादी, महादेवाचं राज्य देशोधडी गेलं नसतं. तरी गोविंदराव हताश झाले नव्हते. त्यांनी गेली दहा वर्षे अविरत प्रयत्न करून एवढी मोठी फौज उभी केली होती. लक्ष्या अन् वाळ्यासारख्या दरोडेखोरांना स्वराज्याचा मंत्र दिला होता आणि आजपर्यंत ज्याने स्वराज्याविरुद्ध बंडखोरी केली त्यालाच त्यांनी इंग्रजांविरुद्ध उभा केला होता. आज त्यांची उमेद फारच वाढली होती. पाचशे माणसांच्या जीवावर आपण स्वराज्याची पुनर्उभारणी करू असे त्यांना वाटत होते.

सारं वातावरण फुलून गेलं होतं. ताकद वाढली होती. शस्त्र मिळविली होती. पैसा मिळविला होता. लक्ष्यानी पुन्हा जोरात आरोळी ठोकली, ''माझ्या भांवानु आरं तुमच्या पोटाची काळजी करू नका. आता तुमच्या पोटाची जिम्मेदारी मह्यावर हाये. तुमी फकस्त या गोईंदराव आन रामजी भांगऱ्यांच्या मांग उभे ऱ्हा रं. मंग अस पांचविसा सायब येऊं द्यां आमी त्येची खांडुळी करू. अरं या दऱ्यात, रानात आपला जलम ग्येला हाये. हितला जनावर, झाड झाड आपल्याला वळाखतात त्ये आपल्या मांग उभं ऱ्हायतील. बोला ''हर हर म्हादेव!'' बसल्या सभेतील सारी माणसं एकदम चमकली. रामजींची लेक – गोविंदरावांची सून लगबगीनं येत होती. तिच्या हातात पंचारती होती. तिच्या पाठोपाठ सीताबाई, राधाबाई, सुरंगा, परिगा येत होत्या. साऱ्यांच्या नजरा तिकडे गेल्या आणि सारे भारावून गेले. रुक्मिणीने पुढे होऊ रामजींच्या माथी टिळा लावला अन् गोविंदरावांचा पोरगा ओरडला, ''रामजी भांगरा कीऽ'' ''जोय'' पाठोपाठ आवाज घुमला अन् मग एकापाठोपाठ एकेकाला पंचारतीने ओवाळणे सुरू झाले, तसे बाकी शिपाई ओरडले ''आमच्या म्होरक्याला पूंजलं आमाली मिळालं.'' सगळ्यांच्या डोळ्यात पाणी चमकलं. जणू स्वातंत्र्य सूर्याची पाचशे किरणे स्वातंत्र्यप्राप्तीच्या ईर्षेने पेटून पारतंत्र्याच्या अंधार साम्राज्यावर झडप घालायला सिद्ध झाली होती. सीताबाई म्हणाल्या, ''तरं मह्या भावानु जेवल्या बिगर कोणीं जायाचं नाही.'' अन् पुन्हा भारावले. सीताबाई त्या अंधारात टेंभ्याच्या प्रकाशात जणू प्रसन्न कळसाईच वाटत होती. पंच पतिव्रता या पाचशे स्वराज्य सैनिकांना आशीर्वाद देण्यासाठी तेथे अवतरल्या होत्या. या सह्याद्रीच्या कुशीत हरिश्चंद्र, अमृतेश्वर, कळसाई, घोरपड्याई यांच्या आशीर्वादानं स्वातंत्र्याचे धगधगते श्वास उमटत होते. नवजीवन नवी दिप्ती उजळीत

होते. जणू स्वराज्योत्सुक रान फुलांनी सह्याद्री बहरला होता. एका मेलेल्या सत्तेच्या चितेतून पुनर्जीवन उजळले जात होते. डांगाण पेटले होते. कोकण पेटले होते.

* * *

मग रामजी भांगरेंचे आतिथ्य सुरू झाले. मोहाच्या दारूचे हंडे रिकामे झाले. मोठ्या आगटीभोवती पंगती पडल्या. स्वतः गोविंदराव, लक्ष्या, रामजी, रामा किरवा, परगण्या पाटील अन् वाळ्या कोळी अशी मंडळी आग्रह करून वाढत होती. किस्ना विचारपूस करीत होता. त्या सर्वांच्यामधून हिंडताना तो जणू स्वातंत्र्याचे उमलते फुलच वाटत होता. रुक्मिणी त्याच्या बरोबरीने पंगतीतून हिंडत होती. रघुजी उगा मधे लुडबुडत होता. पुन्हा एकदा ''हर हर महाऽऽदेव'', ''पुंडलिक वरदा हारी विठ्ठल'ची अन् ''कळसाई माताकी जोय'' च्या गर्जना झाल्या. दारूच्या अन् मादक अन् वीररसाबरोबर चटकदार मांस साऱ्या शिपायांना तृप्त करीत होते. एकमेकांना आग्रह चालला होता. गोविंदराव अन् रामजीसुद्धा मुद्दामच सर्व जमादारांना आग्रहपूर्वक जेवावयास वाढीत होते.

जेवणं झाली आणि लक्ष्याला कांबडावण्याची लहर आली. मोठे रिंगण पडले. ढोलिया सजला. आज सारेचजण रिंगणात मोठ्या उत्साहाने घुमत होते. ढोलियाने थाप दिली अन् लक्ष्याने आरोळी ठोकली आणि जमिनीवर पाय पडून गिरक्या सुरू झाल्या. लक्ष्या आज फारच रंगात आला होता. तो धरतीमातेला भावपूर्णतेने विनवित होता. त्याच्या अंगात मातृभूमीच्या स्वातंत्र्याचे जणू वारेच संचारले होते –

**धरती तू माते ऽऽ**
**रुसवा ना धरी जो ऽऽ**
**तुझ्या पाया मी पडितो ऽऽ**
**तुला कपाळी लाईतो ऽऽ**
**धरती तू माते ऽऽ**
**रुसवा ना धरी जो ऽऽ**

रात्र केव्हा संपली ते समजलेच नाही. मग सकाळी बरीच खलबते झाली. गडागडांवर पुन्हा मोर्चे बांधावयाचे ठरले. पावसाळ्याची कामे संपली की दरोड्यांच्या योजनेबरोबरच गावागावातून उघड आव्हान देऊन गोऱ्या साहेबाला पाय ठेवू द्यायचा नाही याचा निश्चय झाला.

* * *

वैशाख संपला, पाऊस सुरू झाला. संततधार सुरू झाली. अमृतेश्वर, हरिश्चंद्र, घोरपड्याई ह्यांना आभाळाचा अभिषेक सुरू झाला. खाचरं जिवंत झाली. सारे मन लावून कामाला लागले.



जमादारांच्या गावांगावांतून बंडाची बातमी हळूहळू पसरली होती. विशेषतः पाटील मंडळी साहेबांवर खूष झाली होती. काही पाटील मात्र अजून साशंक होते. रयतेच्या मनांत दरोडेखोरांविषयी प्रेम होतेच. बंड कितपत यशस्वी होते याकडे अनेकांचे लक्ष लागले होते. काही बंड मध्येच विझू नये म्हणून इच्छा करीत होते तर गोविंदराव आणि रामजी यांना बंडात यश मिळून स्वराज्य मिळावे अशी देवाजवळ मनोमन प्रार्थना करीत होते.

कॅप्टन सीकसचा नाशिकला तळ होता. भव्य चिरेबंदी इमारतीच्या एका दालनात त्यांची मसलत होती. कॅप्टन सीकस म्हणजे कर्दनकाळ. इंग्रज असूनही तो पक्का सह्याद्री बनला होता. होळकरांची सत्ता हस्तगत करतांना त्याला नासिक, त्र्यंबकेश्वर, पाचपट्टा, बितानगड, कळसुबाई, अळंगा–कळंगा, घाटघर, त्या खालचे कापीव कडे, रतनगड, हरिश्चंद्रगड, कोंबडा किल्ला, पाबर किल्ला असे कळसुबाईच्या परिसरातील सगळे गड पूर्ण अवगत झाले होते. पण त्या खेरीज, अंजनेरी, धारगड, रायगड, बहुलगड, सोनगड, प्रतापगड, आड, सामने, अंजली, हरिहर, हर्षगड, भास्करगड हा गडाचा पट्टाही पाठ होता तर जुन्नर अन् मुरबाडला जवळ असलेले ठाणे परिसरातील किल्ले हडसर, चावंड, शिवनेरी, बहिरगड, जीवधन, मच्छिंद्रगड, गोरखगड, सिद्धगड या शिवाय कुलाबा, ठाणे जिल्ह्याचा सबंध कोकण भाग त्याला ज्ञात होता. ठाणे जिल्ह्यात जव्हारला कोळ्यांचे राज्य होते तर इकडे नासिक भागात होळकरांचे अधिपत्य होते. शिवनेरी आणि जुन्नर भागात पेशव्यांचा ताबा होता. ठाणे कुलाबा जिल्ह्यात मुसलमान सत्ता अस्तित्वात होती तरी आता तिचे अवशेषच राहिले होते. ही सारी सत्ता हस्तगत करतांना त्याला खूप खस्ता खाव्या लागल्या होत्या. प्रत्येक गड ताब्यात घेताना त्याला भरपूर मोल द्यावे लागले होते आणि याच भागात विशेषतः दरोडेखोरांनी डोंगर, गड, दऱ्या, रान, लपण यांचा उपयोग करून लुटालूट चालविली होती. कोकण भागात दरोडे पडतात म्हणून तिकडे बंदोबस्त करावा तर नासिक भाग होरपळून निघतो आहे आणि तिकडे बंदोबस्तासाठी धावावे तर एकदम जुन्नर भाग पेटतो आहे. मध्येच संगमनेर, बेलापूर, राहुरी या परिसरात कोठे दरोडे पडू लागतात. गेल्या पाच वर्षात तर दरोडेखोरांनी त्यांना उसंत खाऊ दिली नव्हती. सगळी प्रजा हळूहळू दरोडेखोरांना सहानुभूती दाखवू लागली होती. दरोडेखोरांनी दुष्काळात जळून जाणाऱ्या लोकांना जीवन दिले होते. त्यांचे अश्रू पुसले होते पण त्याचबरोबर अनेक ठिकाणच्या वसूलीची वाट लावली होती. अनेक सावकारांच्या तिजोऱ्या म्हणजे रिकामी बोळकी झाली होती. इंग्रज ज्या ज्या ठिकाणी जातील, ज्यांचा उपयोग करून घेतील त्यांना छळण्याचे सत्रच दरोडेखोरांनी सुरू केले होते. जगावर राज्य मिळविण्याची आकांक्षा बाळगणारी इंग्रजी सत्ता या दरोडेखोरांमुळे त्रस्त झाली होती. ह्या दरोडेखोरांची आता त्यांना लाज वाटू लागली होती.

* * *

आपल्या हातात सत्ता येताना इंग्रज सरकारने एकमेकांना संपर्क तुटून वेगळेपणाची भावना रयतेत निर्माण व्हावी म्हणून जिल्ह्यांची रचना करतांना अत्यंत खबरदारी घेतली होती तरी कारवाया थांबत नव्हत्या. या सर्व परिसराला आपल्यापुढे लोटांगण घालावयास लावणारा कॅप्टन सीकस. पण तो चक्रावला होता. धरणीकंपाचे हादरे बसावेत पण त्याचे मूळ कोठे आहे ते समजू नये तसे या दरोड्याच्या बाबतीत झाले होते. तरी हळूहळू त्याला कुणकुण लागू लागली होती. रामजी भांगरे आणि त्यांच्यासारख्याच आणखी काही जमादारांच्या परिसरात दरोडे पडतच नव्हते. रामजी भांगरेंशी त्यांचा काही संबंध असावा काय? असा प्रश्न कॅप्टनसाहेबांच्या मनात घोळत होता आणि 'भेट' बंद करा असा हुकूम दिल्यानंतर रामजींनी जी अरेरावी केली होती त्यामुळे कॅप्टन सीकसचा चांगलाच संशय बळावला होता. त्यांच्या साथीदारांनीसुद्धा मुद्दाम दरोडेखोरी चालविली असावी असा त्याने कयास बांधलाही होता. पण रामजी भांगऱ्यांच्या मुलीच्या लग्नप्रसंगी रामजी भांगरेंना शरण यायला लावणारे दरोडेखोर भांगरेंचे हस्तक कसे असतील? हा विचार येऊन त्याचा चांगलाच गोंधळ झाला होता. रामजी रामजींनी घेतलेली सहा महिन्याची रजा अन् त्याचबरोबर मागितलेली पगारवाढ या गोष्टींनी त्याच्या सर्व विचारांना फोडणी बसली होती. दरोडेखोरांचा माग काढून त्यांच्याशी टक्कर देण्यास त्यांच्याजवळ एकच उत्तम माणूस होता. त्याच्यावर काम सोपविण्याचा विचार त्याच्या मनात येत होता पण आपल्या बरोबरीच्या माणसावर हे दरोडेखोरी खोडून काढण्याचे काम कसे द्यावे असाही विचार त्याच्या मनात येत होता. कॅप्टन सीकसने तळ ठोकून किल्ले जिंकले होते. पण या दरोडेखोरांना पकडणे अन् त्यांचे पारिपत्य करणे हे त्याच्या प्रकृतीलाही आता सोसविणारे नव्हते. त्यासाठी उमदा तरुण अन् खराखुरा मुत्सद्दीच हवा होता. म्हणूनच त्याच्या समोर दुसरे नांवच येत नव्हते. कॅप्टन माकिनटोशच हे काम करू शकेल म्हणून त्याच्या मनात आज सकाळपासून त्याचे नांव घोळत होते.

याच विचारात, आपल्या दालनात कॅप्टन सीकस फेऱ्या मारीत होता. त्याने आज काही जमादारांना थेट नासिकला भेटायला बोलावले होते. त्यांचीच तो वाट पाहत होता आणि त्याचे हे विचार चालू असतानाच जमादार आले. त्यांनी कॅप्टनसाहेबांना नम्र सॅल्यूट ठोकला आणि अदबीने ते त्याच्यासमोर त्याने दाखविलेल्या खुर्चीवर बसले. आपल्याला आज कॅप्टनसाहेबाने जातीनिशी का बोलावले हे त्यांच्या ध्यानात आले नव्हते. त्यांनी आतापर्यंत प्रामाणिकपणात कसूर केला नव्हता पण गेल्या चार वर्षांत त्यांच्या भागात दरोड्यांनी ऊत आणला होता. नुकताच पावसाळा संपला होता. सबंध पावसाळाभर कोठेही दरोडा पडल्याचे ऐकिवात नव्हते. त्यामुळे दरोड्याचा विषय नसेल हे त्यांच्या मनी होते. गतवर्षीचा वसूलही त्यांनी चोख पाठविला होता. मग कॅप्टनसाहेबांनी आपल्याला का बोलावले? त्यांना काहीच कळत नव्हते. कॅप्टन साहेबांनी त्यांना खास चहापान केले आणि मग सावकाश हवापाण्याच्या गप्पा झाल्यावर कॅप्टन मुख्य विषयाकडे वळला. 'रामजी भांगरा आमचं ऐकत नाही असा आमी ऐकतो.'' साहेब बोलला. साहेबाला खूष करण्यासाठी ही नामी संधी आहे हे लक्षात येताच एक जमादार पुढे सरसावला. मराठा असूनही साहेबाशी अत्यंत एकनिष्ठ असणारा हा जमादार मग सांगू लागला, ''साहेब मला त पुढचा कडका लागलाय.'' ''अशा? खाय खाय?'' साहेबाने उत्सुकतेने विचारले. ''रामजी भांगऱ्याने समदं दरोडेखोर एकमोहरी जमवलं आन आपलं काही जमादार बी त्येंली सामील झालंत म्हनतात. आन त्येनी दरूडं मारून राज लुटायचं ठरवलंय.'' त्याला अपुरी माहिती मिळाली होती तरी ती त्याने साहेबापर्यंत पोहचविली.

कॅप्टनसाहेबाच्या चेहऱ्यावर स्मितरेषा उमटली. आपण केलेला कयास अगदी बरोबर होता हे त्याच्या लक्षात आले होते. त्याला हवी असलेली नेमकी माहिती त्याच्या या इमानदार जमादारांनी दिली होती. अन्य जमादारांनी त्याला पुष्टी जोडली होती. कॅप्टन सीकस त्यांच्यावर बेहद खूष झाला होता. पण त्याने मनाशी कोणतासा निर्णय केला. इमानदार जमादार खाना खाऊन निघून गेले.

* * *

हरिश्चंद्र, रतनगड, पाचपट्टा (विश्रामगड), अळंगा-कळंगा, गोरखगड, झाडगड आणि घाटाघाटातील गडद्यांमधून मोर्चे बांधायला सुरुवात झाली होती. मोर्च्यांना कायमस्वरूपी रक्षक नेमून त्यांचे जवळ तीस-तीस लोकांच्या तुकड्या ठेवण्यात आल्या. गोविंदराव आणि रामजींच्या सल्ल्याने दोनशे लोक वगळता सर्वांची नीट सोय लावून टाकली होती.

विजयादशमीपासून कामाला जोरात सुरुवात झाली होती. गोविंदराव, रामजी आणि रामा किरवा हे गावोगावात फिरून पाटलांना विश्वासात घेणार होते तर लक्ष्या, वाळ्या आणि परगण्या पाटील प्रचंड दरोडेखोरीची कामे करणार होते. निरनिराळ्या मोक्याच्या दऱ्यातून वाटावाटांवर चौक्या तयार केल्या होत्या. सात लोकांना हेरगिरी करण्याचे काम देऊन त्यांना भाग वाटून दिला होता.

दिवाळीपर्यंत सर्व व्यवस्था चोख झाली. जागोजागी धान्याचे साठे करून ठेवण्यात आले. एकत्र येऊ शकतील असा गड म्हणजे रतनगड. म्हणून रतनगड मुख्य ठाणे करण्यात आले. केवळ सांगावा सर्वांना पोचविण्यासाठी पाच-सात जणांची नेमणूक करण्यात आली. अनेक पाटील विश्वासाने रामजी आणि गोविंदरावांच्या मागे उभे राहिले. लक्ष्याने आपल्या जमातीत चांगले स्थान मिळविले होते. त्याने आपल्या टोळींत सुमारे शंभर ठाकर जमा केले होते. तर डोंगरदऱ्यातले रामजी अन् गोविंदरावांचे सर्व जातभाई एकवटले होते.

फक्त कोकणातला खाड्यांच्या किनाऱ्याचा काही भाग इंग्रज लोकांच्या वर्चस्वाखाली होता. बरेच लोक इंग्रज सरकारशी एकनिष्ठ झाले होते. पुणे परिसरातील अनेक गावे इंग्रजांच्या येरझारांमुळे, त्यांच्या वागणुकीमुळे प्रभावित झाली होती. नासिक, पुणे, ठाणे परिसरातील डोंगरदऱ्याचा भाग मात्र एकवटला होता. म्हणूनच आता मोठ्या मोहिमा आखावयाच्या ठरविल्या होत्या. हे सर्व व्यवस्थित चालण्यासाठी पैसा भरपूर होता.

पैसा नव्हता तरी जनतेची सहानुभूती आता अपार मिळाली होती. जनतेला आता वसूल भरावा लागणार नव्हता, फक्त पाटलाची पंचायत चालण्यापुरताच वसूल करावयाचा असे ठरले.

दिवाळी संपली आणि दरोड्यांना सुरुवात केली. दिवाळीपर्यंत एकही दरोडा पडला नाही. त्यामुळे सगळेच निर्धास्त होते. दरोडेखोरांचे त्राण संपले असे अनेकांना वाटू लागले होते. पण तेवढ्यात सर्वांच्या कानावर शिरुरच्या घेलाशेठ सावकारावरच्या दरोड्याची बातमी पडली. त्याच दिवशी सिन्नरच्या अमृतशेठ सावकारावर दरोडा पडला आणि पाठोपाठ दुसऱ्याच दिवशी कर्जतच्या गोऱ्या साहेबाच्या कचेरीवर हल्ला झाल्याचे वृत्त आले आणि एकदम हाहाःकार उडाला.

* * *

लक्ष्याने स्वतः कोकणात जाऊन गोऱ्या साहेबाला छळण्याचे ठरविले होते. त्याने दोनशे लोकांच्या स्वारानिशी लांबची दौड मारली. रातोरात तो त्या घाटात पोहचला होता. दुसरा दिवस उजाडताच घाटात दोनशे लोक दडी मारून बसले होते आणि मध्यरात्रीच्या सुमारास गोऱ्या साहेबाच्या चौकीवर छापा घालण्यात आला. लक्ष्याने आपली पाच माणसे गमावली तरी गोऱ्या साहेबाची चांगलीच धिंड काढली. नाक कान कापून त्याला गाढवावर उलटे बांधले होते. त्याच्या दोन्ही पायात जंबियाने भोसकले होते, तोंडाला काळे फासून सारी कचेरी लुटली होती. पाचपंचवीस हजार मोहरांचा ऐवज गेला होता. पंधरा शिपाई ठार झाले होते. दुर्दैव असे की एक गोरा सोजिर आणि सुमारे वीस पंचवीस शिपाई त्यांच्या हातातून निसटले होते आणि पळून गेले होते.

दुसऱ्या दिवशी सारा गाव पळून पळून थकलेल्या गाढवावरील प्रेत पाहून हबकले होते. एका पाठोपाठ पंधरा शिपायांची उद्ध्वस्त प्रेतं पाहतांना हृदयाचा थरकाप होत होता.

दोन दिवसात सुमारे लाख दीड लाखाचा ऐवज मिळाल्याने बरीच काळजी दूर झाली होती, शिवाय हत्यारे मिळाली होती. काही दारूगोळा मिळाला होता त्यामुळे गोविंदराव, लक्ष्या, वाळ्या, रामजी, रामा किरवा सारेच मोठ्या आनंदात होते. पुढची मोहीम आखली जात होती.

तीन ठिकाणी पडलेल्या दरोड्याने अवघ्या परिसरात भीतीचे वातावरण पसरले होते. दरोडेखोरांविषयी सारख्या सूचना कोणाकडून तरी येत होत्या. लोक घाबरत होते.

लागोपाठ दरोडेखोरीला सुरुवात झाली. जंगलात वणवा पेटला की सारे रान जसे क्रमाक्रमाने अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडते तसे चौफेर दरोडे पडत होते. इंग्रजांचे शिपाई दरोडा पडला की मोठ्या तुकडीनिशी त्या ठिकाणी पोहोचत पण त्यांचे प्रयत्न असफल होत होते. काय करावे कळत नव्हते. गोरासाहेब चांगलाच तरफडत होता.

इकडे रामजी भांगरेंनी चांगलीच क्रांतीकारी योजना आखली होती. त्यांनी वर्षाचा



वसूल देऊन इंग्रज सरकारला अंधारात ठेवायचे ठरविले होते पण सरकारचे गेल्या वर्षभरात काही उत्तर नव्हते. त्यांनीच लखोटा पाठवावयाचे ठरविले आणि लखोटा घेऊन जाणाऱ्या स्वाराबरोबर पाचसात उत्तम स्वार देऊन त्यांनी आपला वर्षभराचा वसूल त्यांचेबरोबर दिला. आता हा वसूल संगमनेरमध्ये नेऊन पोचवायचा होता. स्वार गेले. गोरा सोजिर महसूल अधिकारी होता. त्याचेकडे तो लखोटा आणि वसूल पाठविला होता.

लखोटा हातात घेऊन त्या गोऱ्या सोजिराने या सर्व शिपायांवर करडी नजर ठेवण्याचा इशारा आपल्या शिपायांना दिला पण लखोटा वाचतांना त्याचा चेहरा उजळला होता. त्याने त्या सर्व शिपायांना सोडून दिले. वसूल जमा करून घेतला.

रामजी भांगरेंनी आपल्या सर्व साथीदार जमादारांना वसूल पाठवावयास सांगितले होते. गेल्या वर्षभरात त्यांना पगार मिळाला नव्हता. वसूलाच्या एक अष्टमांश एवढा पगार होत असे. सर्वांनी गोऱ्या साहेबांसमोर सपशेल शरणागती पत्करून वसूल पाठविला होता. आपला पगार त्यातून कापून घेऊन उरला वसूल साहेबांच्या हाती पडल्याने साहेबही अगदी खूष होऊन गेला होता. गोऱ्या साहेबांपर्यंत ही बातमी पोहोचली तेव्हा एकीकडे प्रचंड प्रमाणात पडणारे दरोडे अन् वसुलीसह शरणागती अन् अजीजीने आपल्या नोकरीचे रक्षण करण्याची प्रार्थना पाहून गोरा साहेब चक्रावला. त्याने एकदा या सर्व जमादारांना भेटण्याचे निमंत्रण दिले. प्रत्येक जमादाराने आपल्या मुख्य कचेरीत येऊन आपापल्या अधिकाऱ्याची भेट घ्यावी असा निरोप त्याने आपल्या शिपायांबरोबर पाठविला. रामजींना ती अपेक्षा होतीच. रामजी आणि त्यांचे साथीदार पंधरा-पंधरा दिवस आपापल्या जागी तळ ठोकून होते. निरोप मिळताच लगोलग सर्व जमादार आपापल्या अधिकाऱ्यांना भेटावयास गेले होते. त्यांचे चांगलेच आदरातिथ्य झाले. या सर्वांचा रिपोर्ट वर साहेबाकडे गेला आणि साहेबाने आपल्या लेफ्टनंटला सर्वांकडे जाऊन प्रत्यक्ष पाहणी करून यावयास सांगितले. रामजींचे सर्व अंदाज बरोबर ठरत होते. गोरा साहेब अडकत होता. त्याच्या फौजा गोंधळत होत्या, दरोडे पडत होते.

चार महिन्यात लागोपाठ पंधरावीस दरोडे पडले होते. आतापर्यंत चार गोऱ्या साहेबांना मोक्ष मिळाला होता. पण त्याचबरोबर आपल्याच देशातली शेसव्वाशे माणसे मेली होती. त्याचे शल्य गोविंदरावांच्या मनाला बोचत होते तरी साहेबाला आपली चार माणसे गेल्याचे दुःख अधिक होते.

* * *

रामजी-गोविंदजींची टोळी आज जय्यत तयारीनिशी जमलेली होती. गोऱ्या साहेबाची रामजी भांगरेंकडे आज भेट होती. गोरा साहेब पाचपन्नास शिपायांसह येणार होता याचा सुगावा रामजी गोविंदजींना अगोदरच लागलेला होता. त्यांचा बंदोबस्त करून साहेबाला त्याची जागा दाखवून देण्याचे त्यांनी ठरविले होते. आज त्यांनी सुऱ्या न्हाव्याला बोलावून

घेतले होते. रामजींची पाचशे मंडळी आज करवंदीच्या जाळ्या-जाळ्यातून दबा धरून बसली होती. कोणी दोर घेऊन बसले होते. कोणी बंदुका सरसावल्या होत्या. कोणी वरच्या कड्यावर ठाण मांडले होते. मोठमोठे दगड त्यांनी लोटण्यासाठी तयार ठेवले होते. रामजी अन् गोविंदजींनी सर्वांना नीट सूचना देऊन ठेवल्या होत्या. काही लोकांनी पोत्यात आग्या अन् खाजऱ्याची बोंडे भरून ठेवली होती. सगळे सुमारे पन्नासपाऊणशे स्वार असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी त्वरित खाली दौड केली आणि रामजी गोविंदरावांना सांगितले. गोविंदरावांनी सर्वांना ओरडून इशारा दिला. सारे तयार झाले. दोर सरसावले गेले. आठ दहा ठिकाणी दोरांची तयारी होती. जाळीमधून काही दिसणे शक्यच नव्हते. लेफ्टनंट साहेबाला काही समजणे शक्यच नव्हते.

आतापर्यंत त्याने पाचसात जमादारांच्या भेटी घेतल्या होत्या आणि त्याचे आदरातिथ्य फारच उत्तम झाले होते. त्याने तसे रिपोर्टही कॅप्टन सीकसकडे केले होते. त्यामुळे कॅप्टनसाहेबांना बंड नसल्याची बरीचशी खात्री पटली होती पण तरीसुद्धा रामजी भांगरेंकडे जाताना त्याने पूर्ण खबरदारी घ्यावयास सांगितले होते. त्यांची पूर्वीपासूनच बंडखोरवृत्ती त्याला माहीत होती. ती बंडखोरवृत्ती जर खरोखरीच उफाळून आली असेल तर तो भेटायला गेलेल्या माणसांना दगा दिल्याशिवाय राहणार नाही. कॅप्टन सीकसबरोबर काम करून लेफ्टनंटसाहेब जरी अनुभवी बनले होते तरी त्यांच्याही पोटात धास्ती होतीच म्हणून त्यांनी कॅप्टनसाहेबांना पंचवीसतीस शिपाई घेऊन जाण्याची अनुमती दिली होती. तरीसुद्धा आग्रहाने पन्नासपाऊणशेची तुकडी घेऊनच ते निघाले होते.

स्वार दौडत होते. पहिले दहा स्वार फारच जोरात असल्याने त्यांच्यात अन् मागच्या लोकांत बरेच अंतर पडले होते. घाटातून जाताना वळणे असल्याने अगदी मागच्या वळणावरचे लोकही दिसणे शक्य नव्हते. ते दहा स्वार टोकाचे वळण ओलांडणार तोच दोन दोर असे काही फेकले गेले आणि समोरच्यानेही ते असे अचूक करवंदीतून आवळले की येणारी घोडी पटापट दोराला अडथळून गुडघ्यात मोडत खालच्या उताराने खाचरात जाऊन आदळली. वरचे स्वार डोंगरावरून आदळत आपटत येणाऱ्या घोड्याप्रमाणे खाली खाचरात जाऊन पडले. डोकी, हात, पाय, पाठ अन् काय काय असे सडकले गेले की काय होते आहे हे कळण्याच्या आतच त्यांची शुद्ध हरपली. त्यातील एक होता लेफ्टनंट अन् दुसरा कोणी त्याच्या हाताखालील कोणी गोरा अधिकारी होता. आणखी एक काळा असे तीनजण क्षणातच सावरले. ते पटकन उठून उभे राहणार तोच जाळ्यांमधून बंदुका रोखून त्यांना निश्चल उभे राहण्यास सांगितले गेले. पुढे होऊन खास नेमलेल्या लोकांनी अंबाडीच्या दोऱ्यांनी त्यांची गाठोडी बांधावयास सुरुवात केली.

पाठीमागून येणारांचीही अशीच काहीशी गत होत होती. काहींवर वरून सुटलेल्या घोड्यांनी सूड उगवला होता तर काही आपल्या साहेबाप्रमाणेच दोरांना अडकून गाठूडी बनत होते. काही गोळ्यांनी जखमी झाले होते. पण त्यात एक गोष्ट मात्र घडली होती शेवटी लागून येणाऱ्या दहा अकरा जणांची एक तुकडी नक्कीच दगा आहे असे लक्षात येऊन



मागच्या मागे पसार झाली होती तरी त्यांच्यामागे पाठलाग करीत जाण्यात अर्थ नव्हता. रामजी गोविंदजींच्या हातात सुमारे पन्नास माणूस सापडले होते. त्यांची आता पूर्ण फजिती केल्याशिवाय सोडावयाचे नाही हे जणू ठरविलेच होते. पाचशे शिपायांनी वाघरात सापडलेल्या ससाप्रमाणे या सर्वांना पकडून अगदी मैदानात आणले. झाडा-झाडांना त्यांना करकचून बांधण्यात आले. त्यांची शस्त्रास्त्रे हस्तगत करण्यात आली. त्यांची घोडी मिळाली ती नीट बांधून ठेवण्यात आली. पाच-दहा घोडी लंगडतच होती. काही नाही तरी पन्नास हत्यारे मिळाली होती. त्यामुळे लक्ष्या ठाकर खूष होता. या सगळ्यांची फजिती करण्याचे काम त्याच्याकडेच होते. म्हणूनच त्यांनी आग्या अन् खाजऱ्याची बोंडे भरून ठेवावयास सांगितली होती.

पाटीभर शेण आणले अन् साहेबापासून सर्वांच्या तोंडात शेणाचे बोकणे भरावयास सुरुवात झाली. जो तोंड उघडत नसे त्याचे तोंड लाल करून टाकण्यात येई. खाज्या आणि खाजऱ्याची बोंडे बरोबर होतीच. खाजऱ्याची बोंडे त्यांच्या अंगरख्यात घातली गेली. प्रत्येकजण चऱ्हाटातल्या चऱ्हाटातच मासळीसारखा तडफडत होता. त्याच्या हालचालीबरोबर ती बोंडे हालत होती. त्यांच्या अंगाची आग आग होत होती. तोंडाला आग्या लावल्याने खाजव सुटत होती पण खाजवता येत नव्हते. साहेबासाठी तर खास सुऱ्याला बोलावून आणले होते. सुऱ्या न्हाव्याने साहेबाची तुळतुळीत चंपी केली. साहेबाचे डोके धरायला दोन शिपाई तत्पर होते. सुऱ्या न्हाव्याला कधी नव्हे ती संधी मिळाली होती. वस्तरा फिरविता फिरविता तो मध्येच साहेबाच्या टपलीत मारीत होता. साहेबाचे डोळे लाल लाल होत होते. पण काय करणार! तोंड उघडले रे उघडले की तोंडात शेण जात होते. लक्ष्याच्या डोक्यात एक कल्पना आली अन् त्याने प्रत्येकाचा एकेक हात सोडायला सांगितले आणि मग त्या हाताने जमेल तेथे खाजविण्यास सुरुवात झाली. सहस्र गांधीलमाशा एकदम चावाव्यात तसे एकेकाचे थोबाड झाले. लाल गोधडी परिधान केली आहे की काय असेच वाटत होते. साहेबाच्या चंपी केलेल्या डोक्यावर तेल, मीठ अन् तिखट चोळण्यात आले अन् त्यावर कडकडीत पाणी ओतले. त्याच्या डोक्यापासून पायापर्यंत आग आग झाली.

रामजी भांगरे साहेबाच्या समोर येऊन उभे होते. त्यांनी साहेबाला बजावून सांगितले, ''तुह्या त्या साहेबाला सांग म्हणावा हा मुलूख आमचा हाय. जर कवा यायचा प्रयत्न केला तर मग असं हाल व्हतील. आन मग जीव जाईल. जीव सुदिक नीट जानार नाही.'' रामजींच्या बरोबर ज्यांची भेट घेऊन लेफ्टनंट आला होता ते सारे जमादार रामजी भांगऱ्यांबरोबर पाहून गोरासाहेब सर्दच झाला.

मग शेसव्वाशे निवडक स्वार तयार झाले. त्यांच्याबरोबर वीस घोडी दिली. घोड्यांना एवढ्या वेळात दारू पाजून तयार केले होते. त्यावर दोन-दोन तीन-तीन गठूडी बांधण्यात आली. त्या घोड्यांना पुढे पिटाळत मागून व पुढून असे हे स्वार चालले होते. घाटापासून दूर नेऊन किर्र जंगलात त्यांनी त्या घोड्यांना सोडून दिले. घोडी दौडत होती. अनेक गठूडी आपली शुद्ध हरपून बसली होती.

रामजींचा आत्मा शांत झाला होता. गोविंदराव, लक्ष्या, रामा किरवा, वाळ्या सारे जमादार सारेच सुखावले होते. कोणत्याही दरोड्यापेक्षा अन् मेजवानीपेक्षा ही मेजवानी त्यांना मोठीच आवडली होती. आज रामजींनी आपले बंड उघड उघड पुकारले होते.

अगोदर पळालेली टोळी जीव वाचवीत घोड्यांच्या तोंडाला फेस येईतो पळत साहेबांपर्यंत पोचली. कॅप्टन सीकसने जेव्हा त्यांना आलेले पाहिले तेव्हा तो त्यांच्यावरच चिडला होता. काय होते ते पूर्ण पाहिल्याशिवाय तुम्ही का पळालात असा त्यांचा सवाल होता. त्याने लगेचच पन्नाससाठ जणांची दुसरी तुकडी पाठविली होती आणि ती तुकडी दौडत येत असतांना त्यांना अर्ध्या वाटेवरच ही गाठोडी सापडली. आता ही गाठोडी घेऊन साहेबाला तोंड कसे दाखवायचे हाच त्यांच्यासमोर प्रश्न होता. त्यात लेफ्टनंट साहेबाचे चांगलेच हाल झाले होते. काही केल्या अंगाची आग जात नव्हती. जवळ सापडलेल्या एका डबक्यात ते सर्वच यथेच्छ लोळले. थंडगार गाळाने त्यांना सुख वाटले. कसेबसे सारेच बचावले. जखमींना नीट दुसऱ्या घोड्यावर घेऊन उरली वीस घोडी नीट सावरून फौज कॅप्टन सीकसकडे रवाना झाली.

* * *

कॅप्टन सीकसने जेव्हा हे सारे पाहिले तेव्हा त्याची स्थिती तोंड ठेचल्या जाणाऱ्या सापासारखी झाली. त्याने आपल्या मुठी आवळल्या. तो मनात चरफडत होता. ज्या रामजी भांगरेंच्या मदतीने त्या परिसरातील सर्व गड सहजगत्या मिळाले होते, त्याच रामजी भांगरेंनी आज त्याला सहज अपमानित केले होते. फितूर आणि बंडखोर रामजींना आपण फाजील डोक्यावर बसविले असे त्याला वाटत होते आणि बंडखोर रामजींना आपण वेळीच संपविले असते तर किती बरे झाले असते असे त्याला राहून राहून वाटत होते.

रामजी, गोविंदजी यांच्या चाललेल्या कारवायाच दरोडेखोरीच्या होत्या. त्यांच्याकडे कोणतीही सत्ता कायदेशीर नव्हती. त्यामुळे त्यांच्याविरुद्ध युद्ध किंवा त्यांचा पाडाव करण्यासाठी मोठी फौज घेऊन जाण्यात काहीच अर्थ नव्हता. शिवाय त्यांच्यावर हल्ला करावयाचा म्हणजे नेमका कोठे करायचा हाही त्याच्यापुढे प्रश्न होता. त्यांच्याविषयीची तक्रार वरिष्ठांपर्यंत करणे त्याला लज्जास्पद वाटत होते, त्यांची अवस्था विहिरीत पडलेल्या कोल्ह्यासारखी झाली अन् काठाला शेळी तर येत नव्हती.

पुन्हा तो मनाशी विचार करू लागला. या सर्वांचा बंदोबस्त करायला हवा होता. पण आता दिवस थोडे राहिले होते. पावसाळा तोंडाशी आला होता. गप्प बसून केवळ योजना करण्याखेरीज दुसरा मार्ग नव्हता. तरी त्याने झपाट्याने हालचाली सुरू केल्या. त्याने या सर्व दरोडेखोरांच्या ठाण्यांचा तपास लावण्यासाठी खास बक्षीस ठेऊन आपल्या शिपायांना आवाहन केले. कोकण भागातील त्याच्या चाकरीतील शिपाई तयार झाले. तसे त्याने खास सवलती देऊन हेरगिरी करावयास पाठविले. त्याचबरोबर त्याने कॅप्टन माकिनटोश विषयी



जनरल स्मिथच्या कानी घातले. स्वतः त्याच्याशी बोलणे केले. दरोडेखोरांचे पारिपत्य करण्याची जबाबदारी आपल्यावर घेण्यात प्रथम त्याला कमीपणा वाटत होता परंतु नंतर सर्व प्रकार ऐकून त्यांचे पारिपत्य करण्याच विडाच उचलला. त्याच्याकडे अहमदनगर विभाग होता. त्याला आपला तळ हलवून जमेल त्या मार्गाने या दरोडेखोरांचे पारिपत्य करण्यास सुचविण्यात आले आणि कॅप्टन माकिनटोशने मनावर घेतले पण–

पावसाला सुरुवात झाली. दरोडे थांबले. संततधार पाऊस सुरू झाला. भात खाचरे जिवंत झाली. बंडखोरीने रामजींचे मनही फुलून गेले होते. डोंगर दऱ्या, भात खाचरे रानात मुक्तपणे पडणारा पाऊस अन् मुक्तपणे वाढणारी वनराजी उत्सुकतेनं रामजींच्या उत्साहाकडे, गोविंदरावांच्या कर्तबगारीकडे अन् लक्ष्या, वाळ्याच्या सरळ, निर्मळ, विचारांकडे अनिमिष नेत्राने पाहत होती. डांगाण खळाळत होते. आकाश उंचउंच शिवलिंगावर अभिषेक करीत होते. सह्याद्री गोड स्वप्न पाहत होता. साता समुद्रापलीकडील पाश्चिमात्यांनी आपल्यावर केलेल्या अन्यायाचा सूड उगवण्याचं! सह्याद्रीची अंगक्रांती पुलकित होऊन हिरवीगार झाली होती. रामजी, गोविंदरावजी, रामा, वाळ्या आन लक्ष्या सारीच पडत्या पावसात पुढच्या तयारीला लागली होती. त्यांना अमृतेश्वराची, हरिश्चंद्राची, कळसाईची, घोरपड्या आईची, भीमा शंकराची, टाकेदावरच्या महादेवाची स्वप्नपूर्ती करण्याचे वेड लागले होते. त्यांना मिळालेले साथीदार एकापेक्षा एकेक हिरे तर होतेच पण एकापेक्षा एक एकनिष्ठ होते. त्यांच्या स्वाभिमानाने फुललेल्या छात्या पाहून गोविंदरावांची छाती दुप्पट रुंदावत होती. त्यांच्या ह्या साथीदारांच्या जीवावर शिवछत्रपतींच्या राज्यावर झालेल्या अन्यायाचा सूड घेण्याचं स्वप्न ते पाहात होते. ती स्वराज्याची गादी त्यांना पुन्हा स्थापन करायची होती. ते ज्या वेळी हरिश्चंद्रावरून अन् रतनगडावरून शिवनेरीकडे पाही तेव्हा तेव्हा त्यांना एवढा एकच विचार मनात येत असे या शिवनेरीचे दुर्दैव कधी संपणार? प्रत्यक्ष महादेवाला हे पारतंत्र्य का? आपल्या धर्माचं अन् देशाचं रक्षण करण्यासाठी शिवाजीच्या रुपानं अवतार घेऊन स्वराज्याचं तोरण बांधलं त्या शिवाच्या सान्निध्यात स्वराज्याच्या निधड्या का व्हाव्यात? असे विचार त्यांच्या मनात येऊन लागले की त्याचं मन पेटून उठत होतं पण त्यांच्या या पेटत्या मनाला समाधानाची फुंकर त्याचे सारे साथीदार घालीत होते. त्यांच्यावर भिस्त ठेऊन त्यांनी स्वराज्याचे कंकण हाती बांधले होते. त्यांना दुःख होते ते या देशातल्या फितुरीचे, पळपुटेपणाचे अन् नाकर्तेपणाचे. त्यांना हे सारे दोष नाहिसे करून टाकायचे होते. आणि स्वराज्याचा धनी गादीवर नाममात्र बसून केवळ तनखा खात होता. राज्य मात्र दुसरे चालवित होते. म्हणून जटायूतीर्थाच्या साक्षीत त्यांनी स्वातंत्र्याचा श्वास घेतला होता अन् आज त्यांच्याभोवती त्यांच्याच विचारांनी पेटलेले पाचशे लढवय्ये उभे होते. लक्ष्यासारखा दरोडेखोरी करण्यात जन्म घालविलेला त्यांचा उजवा हात झाला होता अन् रामजींसारखा बंडखोर अन् प्रसंगी दुसऱ्याला जाऊन मिळालेले त्यांचे सवंगडी आता त्यांचे व्याहीच नव्हे तर खऱ्या अर्थाने डावा हात झाले होता. त्यांना जे गेल्या दहा वर्षात करता आले नव्हते ते अवघ्या एक वर्षभरात त्यांनी प्रत्यक्ष करून दाखविले होते.

आता बंडाची ठिणगी पडली होती. आता कधी युद्धास तोंड लागेल व कधी दगा होईल, तो कोणत्या प्रकारचा असेल. हे सांगता येत नव्हते म्हणूनच आता उसंत खाण्यात अर्थ नव्हता म्हणूनच पडत्या पावसातही आता ते जातीने कामाला लागले होते.

●●●



# पाच

कॅप्टन माकिनटोश संगमनेर-अकोल्याच्या सीमेवर येऊन पंधरा दिवस झाले होते. नेटीवांची दिवाळी जवळ आली होती. पण अद्याप माकिनटोशला फारसा सुगावा लागला नव्हता. कॅ. माकिनटोशने राजूरचा देशपांडा त्र्यंबकजी संताला मुद्दाम भेटायला बोलाविले होते. शहा आलम शहागाजीकडून वतन मिळालेला देशपांडा होळकरांशी, पेशव्यांशी अन् आता इंग्रजांशीही इमानाने वागत होता. कधी पुंडाई केली नव्हती. कधी बंडाळीत भाग घेतला नव्हता. वरून आलेल्या हुकुमानुसार त्याने आपले वतन चालूच ठेवले होते. दुपार टळून गेली होती. राजूरच्या देशपांड्याची बग्गी संगमनेरच्या दिशेने दौडत होती. त्र्यंबकजी देशपांड्याबरोबर इदोजी देशमुख बग्गीत होता. त्र्यंबकजी देशपांडा आणि इदे देशमुख ह्यांना कॅप्टन माकिनटोश तसा नवाच होता. पंधरावीस दिवसांपूर्वीच स्विफ्ट नावाच्या त्याच्या हेराकरवी विचारलेल्या माहितीचा खलिता त्र्यंबकजीने पाठविला होता आणि लगोलग कॅप्टन माकिनटोश संगमनेरला अकोल्याच्या शिवेवरील शिवारात मोठ्या फौजेनिशी दाखल झाला होता. बग्गी छावणीच्या प्रवेशद्वाराजवळ येताच चौकीदाराने पुढे होऊन त्यांना कडक सॅल्यूट ठोकला. त्र्यंबक देशपांड्याला हा सॅल्यूट फार आवडे. तांबड्या पगडीला जरीचा गोंडा शोभून दिसत होता. त्र्यंबकरावांनी बाराबंदी घातली होती. शुभ्र बाराबंदीवर जरीकाठी उपरणे अन् खाली सळई लाल काठाचे तलम धोतर, शुभ्र तांबड्या रंगातून त्र्यंबकरावांचा गोल चेहरा उठून दिसत होता. तसे त्र्यंबकरावचे वय फारसे नव्हते. पन्नास पंचावन्न वर्षांचा हा देशपांडा त्याच्या झुपकेदार मिशांनी विशेष ऐटदार दिसत होता. त्याच्या पाठोपाठ मोठ्या तांबड्या फेट्याखालचा काळाकभिन्न भरभक्कम देह खाली उतरला, हे इदे देशमुख होते. करवतकाठी धोतरावर त्यांनी शुभ्र अंगरखा घातला होता. कंबरेला करकचून उपरणे बांधले होते. पायात जाड वाहणा होत्या. कमरेला बांधलेल्या उपरण्याला म्यान केलेली तलवार अडकवलेली होती. हातात दांडगी काठी होती अन् खांद्यावर तलम घोंगडी घेतलेली होती. पाहणाऱ्याला त्यांचा वचक बसत होता. जोडी खाली उतरताच काळू त्यांना घ्यायला पुढे धावला. काळूने त्यांना अगदी लवून सलाम

केला. देशमुखाला बरे वाटले. आपल्या शामीयान्याबाहेर कॅप्टन माकिनटोश आराम खुर्ची टाकून त्याचा आवडता चिरूट ओढीत होता. दमदार पावले टाकीत येणारे देशमुख, देशपांडे पाहून तो ताडकन् उठला. त्याने पुढे होऊन त्र्यंबकरावचा हात हाती घेतला. पाठोपाठ देशमुखाचाही हात हाती घेतला. जणू आनंद ओसंडून वाहत आहे असे बोलके स्मित करून तो त्यांना ऐकू जाईल अशा शब्दात पुटपुटला ''घुड घुड ! घुड घुड! आनंद वाटला!! त्र्यंबकरावांनी उगाचच प्रत्युत्तरासाठी नमस्कार केला. तर इदे देशमुखानी आपल्या राकट शब्दात ''राम राम'' ठोकला. कॅप्टन माकिनटोशने त्याला हाताला धरून खुर्चीवर बसविले आणि देशमुख देशपांडे खूष झाले. कॅप्टन माकिनटोशने उत्तम प्रकारची फळे त्यांच्यासाठी खास आणवून ठेवली होती. त्यांच्यासमोर स्टूलवर ती फळे मांडून, काळू जाताच कॅप्टनसाहेबांनी स्वतः ती त्यांना पेश केली. फलाहार चालू असतानाच कॅप्टन माकिनटोशने हळूवारपणे विषय काढला, ''देशपांड्ये टोमचा खलिटा आमाला मिळाला. रामजी भांगरा राज्य करतो आमच्याविरुद्ध डिसपुट! वंड! त्येला आमी आमचा जमादार खेला. ।'' त्र्यंबक देशपांडे सावरला. इदे देशमुख देखील उगाच खाकरला.

साहेबाने आपल्याला एवढ्या आदरातिथ्याने का बोलाविले या प्रश्नाचे उत्तर त्यांना मिळाले. एकीकडे स्वराज्यासाठी बंडाचा झेंडा होता. आपल्या धर्माचा एवढेच नव्हेतर आपल्या देशाचा स्वाभिमानाने पुरस्कार करून स्वराज्य टिकविण्यासाठी हताश पण करारीपणाने प्रयत्न करणारा रामजी, गोविंदराव दिसत होते, तर दुसरीकडे सबंध भारतावर अधिसत्ता गाजविणाऱ्या इंग्रजांचा प्रतिनिधी बोलत होता. देशमुख देशपांडे प्रत्येक सत्तेशी इमान राखून होते. तरी त्यांचे मन रक्ताशी बेईमान होत नव्हते. प्रश्नार्थक मुद्रेने देशपांड्यांकडे माकिनटोश पाहात होता. अखेर त्र्यंबकजी देशपांडा बोलला. ''साहेब रामजी भांगरे कोळी. या रानावनात साऱ्या कोळ्यांचीच वस्ती. त्यांच्या जोडीला ठाकर, कानडी, खाली रानात वारली असे सारे वनवासींच राहतात. चार महिन्यांच्या पिकावर उभं वर्षं कसंबसं काढतात. त्यांच्या त्या उघड्या वाघड्या डोंगरावरून, दऱ्याखोऱ्यातून, राहीलं त्याचं राज्य तरी आपण त्यांच्या वाटे जाऊ नये'' देशमुखांनी देशपांड्यांच्या सल्ल्याला मान डोलावली, तसा कॅप्टन माकिनटोश उसळला, ''देशपांडे आमी टोमाला अशा सल्ला देयाला नाई बोलावला. बाय धिस टाईम, हाली त्यांची बस्ती कोटा आहे याची माहिती टोमाला अशेल तरं द्या. आमी राजूरला तळ हलविणार हाय. त्याची व्यवस्थासाठी टोमची आमाला हेल्प पाहिजे ती देणार खा नाई? आमी टोमचा तनखा चालू ठेवला. टोमचा जुना वतन असून मंजूर केला. तो अशा सल्ला देयाला नाई'' साहेबाचा अवतार पाहून देशमुख एकदा खाकरून बोलला, ''सायब, तुमी म्हणता ते खरा. पर आमी तुम्हाला मदत करील पण आमचंच भावबंद त्याली काय वाटन?'' कॅप्टन माकिनटोश कडाडला, ''देशमुख, टोमी वतनानं त्या गावचं राजं, खींग खींग! टोमाला त्येची काळजी नको.'' कॅप्टनसाहेबांचे हे भाषण ऐकत असताना त्र्यंबकराव मनोमन चिडला होता. लोकांच्या अंतःकरणात साहेबाविषयी तिळभरही सहानुभूती नाही हे त्याला माहित होते पण साहेबाला एकदा प्रत्यक्ष अनुभव आल्याशिवाय साहेबही



वठणीवर येणार नाही याचा विचार करून त्र्यंबकजी देशमुखाला म्हणाला, ''देशमुख, साहेब म्हणतात तर त्यांना राजूरला छावणी आणू द्या आपण त्यांची व्यवस्था करू पण साहेबाच्या मनी आलं ते तितकसं बरोबर नाही.'' साहेबाकडे पाहून त्र्यंबकजी म्हणाले, ''आम्ही तनखा तुमच्याकडून घेतो. इमान म्हणून आम्ही तुमच्याबरोबर राहू पण आम्हाला तुमच्या या कारस्थानात गोवू नका.'' त्र्यंबकजी काय म्हणतात हे साहेबाच्या ध्यानी आलं होतं. कॅप्टन माकिनटोश त्यावर उत्तरला, ''डोंट वरी अबाऊट इट मिस्टर संत आमी टोमाला काई धोका होऊ देत नाही. टोमच्याकडून आमची हीच अपेक्षा होती.''

छावणीला हुकूम सुटले. छावणी राजूरला जाणार हे समजताच अनेक सोजिर मनातून नाराज झाले होते. तरीसुद्धा हुकूमाप्रमाणे हालचाली करावयास हव्याच होत्या. कॅप्टनसाहेबांचा दरारा सर्वास माहित होता. मिटिंग आटोपताच कॅप्टनसाहेबाने मोठ्या आपुलकीने त्र्यंबक देशपांडे व इदे देशमुख या दोघांसाठी निरोप दिला आणि बग्गी पुन्हा राजूरकडे वळली. आज देशपांडे त्यांच्या वाड्यावर अकोल्यालाच थांबणार होते. त्यांचा अकोल्यात भव्य वाडा होता. देशमुखांनाही आपल्याकडेच मुक्कामाला ठेऊन घेतले.

त्यांच्या या हालचालीवर एक स्वार नजर ठेवून होता. कळस सोडून त्र्यंबकजी निघताच त्यांच्या बग्गीला स्वार आडवा झाला. स्वाराने अदबीने देशमुख देशपांड्यांना प्रणाम केला. इदे देशमुखांना स्वाराची ओळख होती. त्यांनी दरडावून विचारले, ''का रं बारक्या लई वाटत गाठलास?'' ''सरकार, गोविंदरावांनी पाठवला,'' तो म्हणाला. देशमुख कडाडले, ''आरं त्यं ग्हाईत होय. मग धरला यायाच, का वाटत?'' त्यावर त्र्यंबकराव म्हणाले , ''अरे संध्याकाळी वाड्यावर ये.''

संध्याकाळी बारक्या वाड्यावर गेला. तो त्र्यंबकरावांनी त्याला राजूरला पडणाऱ्या छावणीची संपूर्ण माहिती दिली आणि सावधगिरीचा इशारा घेऊन बारक्या घोडदौड करीत पसार झाला. रातोरात गोविंदराव आणि रामजींना त्याने छावणीची बातमी पोहोचवली.

पण कॅप्टन माकिनटोशच्या हेरानंही बऱ्याच गोष्टी मिळवल्या होत्या. कॅप्टन माकिनटोशला छावणी मांडायला कोणाचा तरी आधार हवा होता. चवताळलेल्या उघड बंड पुकारलेल्या शत्रूच्या प्रदेशातच तळ ठोकण्याची धाडशी कल्पना कॅप्टन माकिनटोशच्या मनात घोळत होती. दरोडेखोरांना पकडायचे असेल तर आपणही दरोडेखोरांइतके बेडर बनले पाहिजे. रात्रीचा दिवस केला पाहिजे. जंगलातलं उंदीर बनले पाहिजे हे तो जाणत होता. देशमुख देशपांडे निघून गेल्यावर त्याने आपल्या पेटंट लोकांना बोलाविले आणि अत्यंत उपयुक्त अशा सूचना दिल्या. कॅप्टन माकिनटोशने लवाजम्यानिशी दुसऱ्या दिवशी सकाळीच राजूरकडे कूच केले.

* * *

राजूरगाव छोटंसं टुमदार पण बाजारपेठच. गुजर, वंजारी, शिंपी, यांच्या आळ्या,

एक आळी मुसलमानांची. मेवामिठाईची चार दुकानं. कोळ्यांचा, कानड्यांचा शेपन्नास उंबरा, गुजर वंजारी सारे व्यापारी. डांगाण वर व्यापार त्यांचा. नासिकच्या बाजारपेठेत मोठा व्यापार. पाण्याचे मात्र दुर्भिक्ष्य. जवळच गावच्या भोवती बांधलेल्या तीन विहिरी. हजार दोन हजार वस्तीच्या गावाला त्या पाणी पुरवित असत. कळसुबाईच्या उतारावरचं हे गाव. माळरान. प्रवरेच्या कडेला पण प्रवरेपासून मैल दूर. श्रीरामचंद्राचं देऊळ. वतनदार देशपांड्याचं परंपरेने तेथे येणे जाणे. सपाट मैदानाकडे जाण्याचे राजूर म्हणजे मोक्याचं ठिकाण. अवघ्या चाळीसगाव डांगाणतलं. छोटेखानी शहरच. म्हणूनच कॅप्टन माकिनटोशने राजूरला ठाण मांडायचं ठरवलं होतं. राजूर म्हणजे मध्यावर. इकडे मैदानी प्रदेशाकडे पोचायला, नासिककडे जायला आणि अवघ्या डांगाणात जायला पायवाटाचे का होईना, पण भरपूर रस्ते.

नदीला थोडे जवळ राजूरच्या उत्तर भागात कॅप्टन माकिनटोशने आपली छावणी नीट खडक पाहून वसवली होती. ऐन थंडीचे दिवस होते. माळावरच्या वाऱ्याचा त्याला अंदाजा आला होता. म्हणूनच त्याने टेंट व्यवस्थित बांधून घेतले होते. योग्य जागा पाहून शे दोनशे लोकांच्या टेंटमध्ये एकेक मध्यभागी अशी मोठी आगटी त्याने तयार करविली होती. त्याची फौज हजार पंधराशेची असल्याने राजूरला जोडून दुसरे राजूर वसले आहे असाच पाहणाऱ्याला भास होत होता. राजूरच्या व्यापाऱ्यांना खास बोलावून घेऊन कॅप्टनने आपल्याला लागणाऱ्या वस्तू त्यांना जय्यत तयार ठेवायल्या सांगितल्या होत्या. बैल, घोडी यांची चोख व्यवस्था एका बाजूला केली होती. गाड्यांचा या भागात आता फारसा उपयोग नाही हे त्याला माहीत होते तरी लांब पल्ल्याच्या हत्यारांची काही वेळा आवश्यकता लागली अन् नेणे शक्य असले तर गाड्या तयार ठेवल्या होत्या. अजून पुण्याहून त्याने पाचशे फौज मागविली होती पण त्यांची व्यवस्था त्याने सध्यातरी संगमनेरलाच केली होती. परंतु अद्याप ती फौज पोचली नव्हती. नासिक घोटी किंवा जुन्नर भागातून एकदम फौज आणणेही त्याला धोक्याचे वाटत होते म्हणून त्याने त्यांना नगर भागातून संगमनेरला पोहचण्याचा सल्ला दिला होता. दरोडेखोरांचा त्याला बराच सुगावा लागलेला होता. तरी पुरा सुगावा लागलेला नव्हता. म्हणूनच तो अजून अत्यंत सावधगिरीने सर्व गोष्टी करीत होता. त्याने आपल्या छावणीच्या दृष्टीने सर्व सोयी चोख ठेवल्या होत्या. पाच-सहा वर्षापूर्वी राजूरला पडलेला दरोडा अन् रामजी भांगरेंकडच्या लग्नात घडलेला प्रकार त्याला आठवला आणि त्याचबरोबर सहा-सात महिन्यापूर्वी रामजी भांगऱ्यांनी लेफ्टनंटची केलेली अवस्था आठवली. तेव्हा त्याचं अंग शहारलं. त्यानं आपल्या छावणीभोवती लांब पल्ल्याची हत्यारे मुद्दामच रोवली होती. आपल्या शिपायांच्या त्याने दोन-दोनशेच्या नीट तुकड्या तयार करून घेतल्या होत्या. त्यांना साधारणतः परिसराचा नकाशा समजावून दिला होता. छावणीची चोख व्यवस्था झाल्याने त्याला पुष्कळ समाधान लाभले होते. राजूरमधल्या वंजारी भटक्यांना त्याने हाताशी धरले होते. वाटाडे म्हणून त्यांचा उपयोग त्याला होणार होता. पाच-सात पोरे त्याला चांगली मिळाली होती.

छावणी टाकून तीन-चार दिवस झालेले होते. अजूनही त्याला कोळी, ठाकर,



पाटील यांच्यात शिरण्यास तेवढीशी संधी मिळत नव्हती. शेवटी त्यांनी देशमुखाला बोलावून घेऊन चारसहा पाटलांना निमंत्रणे धाडली. त्यांना कोणताही दगा होणार नाही याचे वचन त्याने दिले होते. त्या पाटलांची मुद्दामच वेगवेगळी भेट घेतली होती. त्यांना मोठमोठी प्रलोभने दाखविली होती आणि त्याच्या मताप्रमाणे त्याच्या हाताला चार पाटील लागले होते. त्यांच्यावर भिस्त टाकून त्याने काही ठाकर, कोळी पोरे भरपूर पैसा देऊन मिळविली. त्यांना त्याने स्वतःच्या पंगतीला जेवायला बसवून त्यांचा विश्वास संपादन केला होता. त्या पाटलांना त्यानी पटवून दिले होते की, तो वसूल करायला आलेला नसून, वसूल बंद करून 'भेट' प्रकार कायमचा बंद करून गावगन्ना नीट व्यवस्था लावण्याचा त्याचा विचार आहे. पाटील मंडळींनी ही बातमी अन्य लोकांना सांगायला सुरुवात केली होती.

होता होता पंधरा दिवस गेले. कॅप्टन माकिनटोशच्या कानावर एक उत्तम बातमी आली. दरोडेखोरांची दोनशे लोकांची एक तुकडी नासिक भागात घाटातून दरोडेखोरीसाठी जाणार आहे. ही बातमी त्याने रामजींच्या गावातून मिळवली होती. त्याचा हेर या कामात नक्कीच यशस्वी ठरला होता. दुसऱ्या दिवशी रात्री त्या दरोडेखोरांना घाटात संपविण्याचा निश्चय कॅप्टनसाहेबाने केला होता.

* * *

काळ्यामिट्ट अंधारात दोन टेंभे लावून वेताळाच्या फेरीसारखे पुढे पुढे जात होते. घोड्यांच्या टापांचे आवाज दऱ्यांतील शांतता भंग करीत होते. त्या टापांना लांबून ऐकू येणाऱ्या भजनांचे सूर साद घालीत होते. दोन टेंभे असले तरी त्या मागोमाग शेदीडशे स्वारांची एक भक्कम टोळी चालली होती. शौर्यात कोणीही कमी नव्हते. त्यांच्या प्रत्येकाच्या पाठीला बंदूक अन् दारूबत्ती बांधलेली होती. प्रत्येकाच्या कमरेला जंब्या अन् तलवार लटकलेली होती. पाठीवर विशिष्ट पद्धतीची दोरांची गाठूडी टाकलेली होती. कोणीच कोणाशी बोलत नव्हते. करवंदाच्या जाळ्यातून घोडी बेडरपणाने दौडत होती. आता त्या घोड्यांना रात्रीची दौड करायची चांगलीच सवय झाली होती. उलट कदाचित दिवसाच चालायला ती अडखळत. आता आपल्या ओळखीच्या भागातून जाताना फारसे काळजी करण्याचे कारण नव्हते तरी कॅप्टन माकिनटोशची फौज राजूरला दाखल झालेली आहे हे त्यांच्या लक्षात होते. आज टोळीचा प्रमुख वाळ्या कोळी. त्याच्यावर फार मोठी जबाबदारी होती.

अर्धा घाट उत्तर बाजूने उतरून होतो न होतो तोच अचानक शे-दोनशे टेंभे रानात पेटून उठले. एकदम भूतांना नाच सुरू करावा तसे रान पेटले. सारे रान उजळले. जाळ्या आडून स्वार पुढे सरकत येत होते. वाळ्याचे लक्ष पेटलेल्या अंधाराकडे गेले मात्र दुसऱ्याच क्षणी, ''अरं बघता काय, गोऱ्या सायबानं श्याण खालं होय, उडवा यकायकाला!'' आणि स्वारांनी पटापट लपण शोधायला सुरुवात केली. पण सगळीकडून गराडा पडलेला त्यांच्या

लक्षात आला होता. गेल्या दहा वर्षात त्यांना असे कोणीही गाठविले नव्हते. बेदरकारपणे गावात घुसावे, गावाची नाकेबंदी करावी, सावकारांच्या घरात घुसावे, त्याला यथेच्छ चोपावे. त्याची जमेल तेवढी फजिती करावी अन् त्याची कागदपत्रं जाळून मोकळे व्हावे असा त्यांचा शिरस्ता होता. पण आता डाव अगदीच उलटला होता. आल्या प्रसंगातून कसेबसे निसटणे भागच होते. शे-दोनशे लोकांच्या पाठोपाठ किती शिपाई असतील याचा अंदाज लागणे शक्य नव्हते. रानात घोडी आडवीतिडवी सोडून सैरावैरा धावाधाव सुरू झाली. ''जय टाकेद'' एकच शब्द उच्चारला जात होता. वाळ्याने ''हर हर महाऽदेव!'' अशी आरोळी ठोकली आणि साऱ्या टोळीला स्फुरण चढले. ते दौडत सरळ टेंभ्याजवळ जाऊ लागले. रात्रीच्या अंधारामुळे निशाण चुकत होते. दौडत येणारी घोडी वेगाने येत असत अन् नेम धरून बंदूक चालविणारांवर तलवारीचे वार होत. मराठे, मुसलमान, वनवासी अशा विविध प्रकारचे लोक शत्रूच्या टोळीत होते. वाळ्याने जेवढ्यांना शक्य आहे तेवढ्यांना पळून जाण्याची आज्ञा दिली. तो ओरडला, ''अरं जमल तसं पळारं'' अन् आणखी दौड होऊ लागली. टेंभे अडवले जाऊ लागले तसे माकिनटोशचे सारे सैन्य गडबडले. त्यांना गोळीबार चालू असताना अशा प्रकारे कोणी अंगावर चालून येण्याची सवय नव्हती. या विचित्र प्रकाराने सारेच गोंधळले. तेवढ्यात कोणी ओरडले ''अरे दरोडेखोर खाली पळाले!'' तसे बरेच लोक खाली सरकताना टेंभ्यामुळे लक्षात येत होते. पण तेवढ्या कालावधीत वाळ्याने बरोबर सुटका करून घेतली होती. दगडा धोंड्यांच्या आडोशाने, वनराजीच्या उपकाराने सारी पळत सुटली होती. सुमारे तीन-चार तास कोण कोणाला मारत आहे काहीच कळेना. तेवढ्यात रोनाल्डने आज्ञा दिली, ''टेंभे, मधे या!'' त्याचा बुलंद आवाज आसमंतात घुमला आणि टेंभे मधे सरकू लागले. चारही बाजूंनी रोनाल्डची फौज मधे सरकत होती. फौजेचा जसजसा वरून, खालून बाजूने संकोच होऊ लागला तसे वाळ्याचे मधेच सापडलेले लोक हताश होऊ लागले. सुमारे पन्नास मातब्बर लोकांना पळता आले नव्हते. पन्नास स्वार मधे सापडलेले पाहून रोनाल्ड खूष झाला होता. आता त्यांना पकडणे शक्य होणार होते. चहूबाजूंनी पुढे पुढे सरकणाऱ्या फौजेतील किती लोक जगले, किती मेले हे सकाळशिवाय समजणार नव्हते. रोनाल्डचा साथीदार एकदम ओरडला, ''घोड्यावरचे स्वार शरण या, बंदूक फेकून द्या.'' क्षणभर हताशपणे मधेच सापडलेल्या लोकांना काय करावे हे समजेना. त्यापैकी कोणीच काही बोलेना. पुन्हा आवाज उमटला, ''बंदुका टाकून देऊन शरण या, नाहीतर सर्वांचे मुडदे पडतील.'' आणि काय झाले हे समजायच्या आत पन्नास स्वारांपैकी कोणीतरी ओरडले, ''अरं घाबरता काय? मेलोच आहोत तर मारून मरू, जय टाकेद.'' अन् विजेच्या चपळाईने स्वारांच्या बंदुका कडाडल्या आणि सारा आसमंत किंकाळ्यांना भेदून गेला. कोठून कोणाच्या किंकाळ्या येतात समजत नव्हते. येवढ्यात मागून आणखी गोळीबार होऊ लागला. साहेबाकडचे अनेक लोक छातीत, पोटात, मांडीत घुसलेल्या गोळ्यांनिशी खाली कोसळले आणि आता एका पाठोपाठ एक फक्त बंदुकांचे आवाज आणि किंकाळ्या उमटत राहिल्या.



पण आता वाळ्याच्या लोकांना फार काळ थांबणे इष्ट वाटत नव्हते. शेवटी मुसंडी मारून पळावे म्हणून वर डोंगराच्या टोकावरून कोणीतरी ओरडले, ''जय टाकेद आरं पळा रंऽऽ'' आणि शेवटी मुसंडी मारून सारे सुसाट पळत निघाले. मागून बंदुकांचे आवाज होत होते. पण त्याचबरोबर रात्र संपली होती. पूर्व दिशा उजळू लागली होती. रोनाल्डच्या ताब्यात अवघी दहा जिवंत डोकी सापडली होती.

पण फटफटत्या पहाटेचे ते दृष्य भयंकर होते. शेदीडशे माणसांचे मुडदे पडले होते. पाचपन्नास माणूस जखमी झाला होते. रोनाल्ड जातीने आपली माणसे हुडकण्यात गर्क झाला होता. सकाळ होताच त्याने पहिल्यांदा दोन स्वार राजूरकडे निरोप सांगायला पाठविले होते आणि त्याची मोजदाद चालली होती. त्याच्याकडील पन्नाससाठ माणूस मेलं होतं, पण वाळ्याकडील सुमारे सत्तरपंच्याहत्तर स्वार संपलं होतं, अन् दहा डोकी तर जिवंत होती. त्याच्या डोळ्यासमोर पडलेली प्रेते पाहून त्याच्या मनात एकच गोंधळ उडाला होता. ''आपण जगण्यात चूक केली आहे, आपल्या बांधवांना आता आपल्यापासूनच धोका नाही का?'' असं त्यांना वाटू लागलं होतं. मरून पडलेल्या लोकांची सार्थकेही आपल्याला करता येत नाही हे पाहून त्यांना वाईट वाटत होते. त्यांना झाडाला बांधून ठेवले होते. दरोडेखोरीला दरोडेखोरीच्या चालीनेच साहेबाने उत्तर दिले होते. साहेबाकडील मेलेल्या लोकांची दशा झाली होती. कोणाची तुटली मुंडकी धडाला केवळ धरून होती. कोणाची चार हात लांब पडली होती, कोणते मुंडके कोणाचे हे समजायलाही मार्ग नव्हता. अशी काहींची अवस्था झाली होती. त्यामानाने वाळ्याकडच्या लोकांना बंदुकीच्या गोळ्यांमुळे जखमा झाल्या नव्हत्या. अंगाला भोकेच काय ती पडली होती. रोनाल्डने दहाही जणांना घोड्याला बांधून घेतले आणि आपल्या सर्व शिपायांनिशी तो आपल्या छावणीच्या दिशेने चालू लागला.

कॅप्टन माकिनटोशला हे वृत्त समजले तेव्हा तो फारच संतापला होता. चारशे स्वार पाठवून फक्त दहा लोक हाती सापडले अन् पन्नास लोकांना गमवावे लागले. रोनाल्डने आपल्या माणसांची प्रेते बरोबर आणली होती. ती प्रेते पाहतांना छावणीतल्या प्रत्येक शिपायाच्या पोटात भीतीने गोळाच उठला होता. त्यांची सार्थके केल्यानंतर कॅप्टन माकिनटोश या दहा पाहुण्यांकडे वळला. त्याने त्यांना अगदी गोडीत विचारावयास सुरुवात केली. त्यांना आपल्या सैन्यात दाखल करून घेण्याचे आश्वासन देखील दिले, पण हे शिपाई कोणत्याही गोष्टीस राजी होत नाहीत असे पाहिल्यावर त्यांना मृत्यूची धमकी देण्यात आली. पण ह्या धमकीनेही त्यांच्यावर काहीच परिणाम झाला नाही. मग माकिनटोशने त्यांना गावकऱ्यांसमोर ठार करण्याचे मनी आणले.

सापडलेले दहाजण काय करतात हे पाहण्यासाठी दोन हेर केव्हाच राजूरमध्ये पोहोचले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी आपल्या गेल्या लोकांना घेऊन जाऊन त्यांचे सार्थक करण्यासाठी वाळ्या अन् त्यांचे सवंगडी आले. त्याचवेळी दोन स्वार तिकडे रवाना झाले होते.

लक्ष्याला जेव्हा ही गोष्ट कळली तेव्हा तो उभा पेटला. त्याला आत्ताच जाऊन कॅप्टन माकिनटोशला जिवंत पकडून आणून कळसुबाईसमोर बळी द्यावे असे वाटत होते. पण त्याने स्वतःला आवर घातला. घडलेला प्रकार पाहून आपण अत्यंत सावधगिरीने वागले पाहिजे हे गोविंदराव, रामजी, रामा, लक्ष्या अन् वाळ्या सर्वांच्याच लक्षात आले होते. त्यांनी हेरगिरीची जय्यत तयारी केली. तरी आपला सुगावा घेत, हे आपण आहोत तेथपर्यंत येतील म्हणून हा परिसर सोडून कोकणच्या दरीत जावे असा निर्णय ताबडतोब घेतला आणि पन्नास लोकांची फौज रतनगडावर ठेवून बाकी सर्वांसह ते कोकणच्या दरीकडे प्रयाण करण्याच्या विचारात होते. अजून राजूरला पाठवलेले हेर त्यांच्यापर्यंत पोहोचले नव्हते.

✻ ✻ ✻

राजूरला पाठविलेले हेर जेव्हा परत येऊन घडली हकीकत सांगू लागले तेव्हा गोविंदराव, लक्ष्या, वाळ्या, रामजी सर्वांचेच डोळे अभिमानाने पाणावले.

कॅप्टन माकिनटोशने दरोडेखोरांना चांगली दहशत बसविण्याचा विचार केला होता. त्याकरिता त्याने राजूरच्या चौकात त्या दहा लोकांना रांगेत एका लाकडास बांधले होते अन् गोळ्या घालून ठार केले होते. पण त्यांच्यापैकी कोणीही कॅप्टन माकिनटोशला शरण आला नव्हता. कोणीही शरण येत नाही हे लक्षात आल्याने कॅप्टन माकिनटोश मात्र फारच बेचैन होता. आपण टाकलेल्या डावाला बरेच मोल द्यावे लागले हे त्याच्या लक्षात आले होते. एवढा तुंबळ संग्राम करून शेवटी त्याच्या हाती काय आले होते? तो केवळ सत्तर पंच्याहत्तर दरोडेखोरांना ठार करू शकला होता. पण बंडाचे म्होरके त्याला सापडलेच नव्हते. त्यामुळे तो चरफडत होता. त्याच्या मनात योजनांचे वादळ माजले होते.

सरळ सरळ किल्ल्यावर जाऊन चढाई करावी तर आता सारेच दरोडेखोर सावध झाले होते.

रामजी, गोविंदजींच्या मनातही विचारांचे काहूर माजले होते. उघड बंड पुकारून किल्ले सोडून गेले तर रामजी अन् गोविंदजींच्या मनाला पटत नव्हते. पण लक्ष्या अन् वाळ्या मात्र वेगळ्याच विचाराचे होते. एकाजागी लढून आपल्याला सायबाचा नायनाट करता येणार नाही हे ते ओळखून होते. आपल्याजवळ असलेली फौज अन् सामग्री थोडी आहे. त्याच्या जीवावर असे लढणे शक्य नाही हे गोविंदरावांना पटणे सहजशक्य होते. अखेर त्या दोघांना लक्ष्याचेच म्हणणे मान्य करावे लागले अन् चार दिवस आता पूर्ण गप्प राहून येथील तळ पूर्ण हलवून खाली कोकणात जावा. शक्यतो किल्ल्यांवर जुजबीच साहित्य ठेऊन डोंगरदऱ्यातील गडदीतून लपावे अन् मगच कॅप्टनसाहेबाचे पारिपत्य करावे असे ठरले. रामा किरवाने या बाबतीत लक्ष्या अन् वाळ्याला चांगलीच साथ दिली होती. लक्ष्या अन् वाळ्याचे विचार त्याला चांगलेच पटले होते. त्यांच्या मनात योजना घोळत होती. ✻ ✻ ✻



मध्यरात्रीचा सुमार. कॅप्टन माकिनटोशच्या छावणीत अचानक घोड्याच्या टापांचे आवाज ऐकू येऊ लागले. तो स्विफ्ट होता. त्याच्या दौडीवरूनच हे लक्षात येत होते. त्याची दौड आता सर्वांच्या चांगलीच परिचयाची झाली होती. कॅप्टन माकिनटोशला तो येणे आज अपेक्षित नव्हते. आज नक्कीच काही विशेष बातमी स्विफ्टने आणली असावी म्हणून तो त्याच्याशी बोलण्यास अधिर झाला होता. कॅप्टन माकिनटोशने संकेत करताच स्विफ्ट त्याच्या समोरच्या खुर्चीत बसून बोलू लागला. त्याची एकेक गोष्ट ऐकताना कॅप्टन माकिनटोश सर्दच झाला.

स्विफ्ट पाचशे फौज घेऊन पुण्याकडून संगमनेरकडे निघाला होता. नगर भागातून तो अधिकाधिक प्रवास करणार होता. तरीसुद्धा मावळ भागातून जाणे त्याला क्रमप्राप्तच होते. नगर-पुण्याच्या सरहद्दीवर तळ पडलेला होता. प्रवासाने थकलेले स्वार गाढ झोपले होते. घोड्यांच्या फुरफुरण्याचा मधूनच येणारा आवाजच काय तो ऐकू येत होता. मध्यरात्र उलटून गेली होती. अचानक पलिकडच्या डोंगराआडून पेटत्या मशाली पुढे सरकू लागल्या आणि हा हा म्हणता त्या तळापर्यंत येऊन पोहोचल्या आणि एकाएकी रात्री बेसावध असतांना 'हर हर महा ऽऽ देव!'' आरोळी आली. सारेच एकदम गडबडून गेले. ते बंडखोरच होते. त्यांनी एकदम कापाकापीला सुरुवात केली. जागे होऊन पळण्याआतच शेसव्वाशे शिपाई कापले गेले. जो तो उठून स्वतःची हत्यारे सावरून आपला घोडा दौडत होता, जमेल तेवढा प्रतिकार सुरू झाला. तेव्हा गोऱ्याकडील सुमारे दोन-अडीचशे शिपाई ठार झाले होते. एकच घबराट झाली होती. एकदम आभाळ कोसळले की काय असे होऊन गेले किंवा एकदम चोहोबाजूनी आग लागावी तसे झाले. सारेच दौडत होते. अखेर उरले स्वार आपल्या साहित्यानिशी गाडीबैल घोडी घेऊन पसार झाले. बंडखोर जवळजवळ कोस दोन कोसापर्यंत पाठलाग करीत होते. अखेर ते पळाले. रातोरात तेथून घबराट होऊन पळाल्याने अजूनही कोणी नीट सावरले नव्हते. केव्हा एकदा समोर संगमनेर गाठतो असे झाले होते. साहेबाचे एवढे प्रचंड नुकसान अजून कधीच झाले नव्हते. दुसऱ्या दिवशी शेसव्वाशेची तुकडी तिकडे गेली, तो प्रेतांची अवस्था पाहून भोवळ येत होती. कोणाची डोकी, कोणाचे पाय बाजूला तुटून उडाले होते तर कोणाचे कोथळे बाहेर पडले होते. कोणाचे मेंदू बाहेर आले होते. कोणाच्या जीभा बाहेर लोंबत होत्या. कोणाच्या पोटऱ्यांच्या, मांड्यांच्या खापा बाहेर पडल्या होत्या. त्यात सकाळपासून घारी, गिधाडे, कावळे यांना मेजवानी मिळाली होती. ते आपल्या चोचींनी मृत शरीराच्या अधिकच चिंधड्या करीत होते. दोनशे घोडी, बंदुका अन्य साहित्य बंडखोरांनी पळविले होते. बंडखोरांकडील औषधालाही प्रेत तेथे दिसत नव्हते. कदाचित आपल्या लोकांनी आपल्याच लोकांना अंधारात मारले की काय, अशी शंका मनात येऊन अंगावर काटा येत होता. उद्ध्वस्त प्रेते उद्ध्वस्त छावणीच्या सान्निध्यात कायमची विसावली होती. कॅप्टन माकिनटोश ही सारी हकीकत ऐकतांना सर्द होऊन गेला होता तरी मनातून तो चांगलाच जळफळत होता. त्याने

केलेल्या हल्ल्याला सडेतोड उत्तर बंडखोरांनी दिले होते. एकच फटका पण जीवघेणा. दोनअडीचशे शिपायांची कत्तल करणारा, इंग्रजी सत्तेला हादरा देणारा, इंग्रजांना जे साधावयाचे होते ते साधण्यासाठी प्रचंड किंमत मोजावयास लावणारा, त्यात दुःखात सुख एवढेच की मृत्युमुखी पडलेल्यात जवळजवळ सर्वच शिपाई नेटीवांचे होते.

मग मात्र कॅप्टन माकिनटोशने पवित्रा बदलला. हल्ल्या प्रतिहल्ला करताना बंडखोर आपले प्रचंड नुकसान करतील हे त्याच्या ध्यानी आले होते. म्हणूनच त्याने वेगळाच विचार करावयास सुरुवात केली होती. दिवस जात होते. कॅप्टन माकिनटोशने देशमुख, देशपांडे, कुलकर्णी यांना विश्वासात घेतले. त्यांच्याशी आपला हेतू स्पष्ट केला. आपणाला या देशावर राज्य करायचे नसून आपणास सुराज्य निर्माण करावयाचे आहे हे पटवून दिले. हे सुराज्य निर्माण करताना अशा बंडखोर लोकांना आपण नेस्तनाबूत केले पाहिजे हेही त्याने पटवून देण्याचा प्रयत्न केला. परंतु देशमुख, देशपांडे, कुलकर्णी यांनी त्याच्या बोलण्याला फारसा प्रतिसाद दिला नाही. त्यांनी कॅप्टनसाहेबाला बजावले, ''आपण यावेळी ठाकर बंडखोरांचा नाद सोडून द्या. त्यांच्यामागे शत्रूसारखे लागू नका. ते राज्य करीत नाहीत. त्यांचे कोणतेही राज्य अस्तित्वात येऊ शकणार नाही तेव्हा त्यांचा नाद आपण सोडणे हेच बरे. निदान आपण त्यांच्यावर अशाप्रकारे हल्ले करणे श्रेयस्कर होणार नाही.''

देशमुख, देशपांडे, कुलकर्णी यांचा हा सल्ला कॅप्टन माकिनटोशने तंतोतंत पाळावयाचे आश्वासन दिले आणि विशेष म्हणजे लगेचच त्याने संगमनेरला आलेली फौज पुन्हा माघारी पाठवून द्यावयाचे ठरविले आणि तसे फर्मानही काढले. शिवाय आपण बंड सौम्य करण्यासाठी निश्चित काही करू असेही त्याने देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी अशा लोकांना सांगितले. आपण बंड थांबेपर्यंत कोणतीही कारवाई करणार नाही किंवा बंड करणारांचे समजुतीने समाधान करण्याचाच आपला प्रयत्न आहे असेही त्याने बोलून दाखविले. कॅप्टन माकिनटोशच्या या गोष्टीने सर्वांनाच समाधान झाले.

कॅप्टन माकिनटोश आता केवळ पाच-सातशे शिपायांची छावणी घेऊनच राजूरात राहणार होता. बाकीच्या सर्व शिपायांनाही त्याने पाठवून दिले.

त्याचे विचार अन् त्याच्या हालचाली कशा सौम्य होत चालल्या आहेत हे गोविंदराव, रामजी, रामा किरवा, वाळ्या अन् लक्ष्या यांच्या लक्षात येत होते. साहेबाचा नेमका हेतू काय आहे हे कळणे शक्य नव्हते. तरी गोविंदराव खाडेंना त्यात काही तरी गुप्त कारस्थान आहे असेच वाटत होते. त्यांचा कॅप्टनसाहेबाच्या कारवाईवर विश्वास बसणे शक्यच नव्हते. परंतु कॅप्टनसाहेबाच्या या नरमाईच्या धोरणाचा त्यांच्या टोळीतील अनेक लोकांवर अन् खुद्द परगण्या पाटलावरही चांगलाच परिणाम झाला होता. त्याने आपल्या साथीदारांशी तसे बोलूनही दाखविले होते. ''साहेबाला जर आपल्या वाट्याला जायचे नाही किंवा आपला मुलुख घ्यायचा नाही मग आपण हे बंड कशाकरिता करावयाचे'' रामजी भांगरेंचा मात्र भडका उडाला होता. साहेबाचे गोड बोलणे आपला निश्चित घात करील हे त्याने केव्हाच ओळखले होते. त्याला साहेबाच्या वागण्याचा चांगलाच अनुभव आला



होता. साहेब सापाची जात आहे, त्याच्या चालीवर कोणीही विश्वास ठेवू नये असे ते वारंवार बजावित होते.

कॅप्टन माकिनटोशने बोलल्याप्रमाणे खरोखरीच वर्तनाला सुरुवात केली होती. त्याने त्याच्याजवळ अगदी जुजबी सैन्य ठेवले होते. त्याने आता फादर डिसूजाला आपल्या छावणीकडे बोलावून घेतले होते. फादर डिसूजाच्या आगमनापासून छावणीचा रागरंग सगळा बदलून गेला होता. कॅप्टन माकिनटोश आणि त्याच्याबरोबरचे सारेच गोरे फादर डिसूजाबरोबर चिंतनात वेळ घालवू लागले होते. जंगलामध्ये शिकारीकरिता अन् वनविहाराकरिता जाण्यातच वेळ जाऊ लागला. फादर डिसूजाच्या म्हणण्याप्रमाणे कॅप्टनसाहेबाने स्वतःजवळ शेदोनशे स्वार वगळता सर्वांनाच पाठवून दिले होते. जवळपासच्या गावातून फेरफटका मारताना पाटीलमंडळींच्या पंक्तीला बसून जेवणे होत. पाटील मंडळींना उत्तम भेटी दिल्या जात. कॅप्टनसाहेबांनी गावोगावच्या मारुतीच्या मंदिरांना मदत करण्याचे सत्र सुरू केले होते. गावागावात जावे. भजनकऱ्यांची भजने ऐकावित. त्यांच्या दैवतांच्या देवळांना मदत करावी. गोरगरिबांच्या जमिनींची चौकशी करावी. त्यांना रोख मदत करावी. कर्जाची चौकशी करून त्यात सवलत मिळवून द्यावी. पेहरा भागातल्या, डोंगरदऱ्यातल्या त्या छोट्या-छोट्या गावातून कॅप्टनसाहेब जातीने भटकत होता. म्हाताऱ्यांची, दुखणेकऱ्यांची जातीने चौकशी करीत होता. आता गावागावात बंडखोरात सामील होऊन मरण पावलेल्यांची घरे त्याने हुडकून काढली होती. त्यावर मदतीचा वर्षाव सुरू केला होता.

हळूहळू साहेबाविषयी लोकांच्या मनात विश्वास निर्माण होऊ लागला. तरण्या पोरांना नोकरी दिल्याने पैसा मिळू लागला. जीवाला जीव देणारे लोक मिळू लागले. रामजी भांगरेंच्या बंडात जाण्यापेक्षा आपल्या जीवनाची कदर करणाऱ्या साहेबाविषयी प्रेम मनात उत्पन्न झाले. कॅप्टन माकिनटोशने एक एक माणूस मिळविण्याचा सपाटा सुरू केला. पावसाळा जवळ आला तरी कॅप्टन माकिनटोश बंडखोरांच्या कोठेच वाटे गेला नाही. बंडखोरांनी कोकणात, पुणे आणि नासिक भागात धुमाकूळ घातला होता. कोठे फारसा विरोध त्यांना होत नव्हता. मात्र एका भयंकर विषाची बाधा अलिकडे टोळीत स्वराज्य मिळविण्यासाठी आलेल्या लोकांमध्ये दिसत होती, ''साहेब आपल्याला कोठे प्रतिकार करतो? त्याची आपल्याला कोणतीच आडकाठी नाही. उलट आपला भाग सुधरावा असाच त्याचा प्रयत्न आहे. दरोडेखोरी करण्यापेक्षा सुखानं आपला संसार केला तर काय वाईट?'' गोविंदराव खाडे, रामा किरवा अन् रामजी भांगरा जीव तोडून त्यांच्या मनातील स्वराज्यमंत्र जागृत करण्याचा प्रयत्न करीत असत; पण समोर शत्रू नाही अन् रात्रीच्या अंधारात दरोडे पाडण्याशिवाय काम नाही; हे लक्षात येताच स्वराज्याचा जोश नाहिसा होऊ लागे. अशा विचित्र मनःस्थितीतच पावसाळा तोंडी आला आणि कड्याकपारीतून लपून दरोडे घालणारे सारेच दरोडेखोर, बंडखोर आपापल्या घरी जायला निघाले. गोविंदरावांनी अन् रामजी भांगऱ्यांनी पुढच्या आखितीपर्यंत आपल्या पेहरा मुळणेर, जुन्नर, सिन्नर अन् मुरबाड भागात आपले राज्य निर्माण करण्याची प्रतिज्ञा केली. बंडाचा झेंडा हाती घेतलेल्या

सर्वांच्याच मनात पुन्हा एकदा स्वराज्याचा कोंभ उगवेल आणि या भागातून हा गोरा साहेब हद्दपार झाला की आपल्याला स्वराज्याच्या सीमा वाढविता येतील हा विचार सर्वांच्या मनात घोळत होता. पावसाळा जवळ आला तसे कॅप्टनसाहेबांनी आपली उरलीसुरली छावणी संगमनेर मुक्कामी घेऊन जाण्याचे ठरविले होते. राजूरहून गोऱ्या साहेबाने आपली छावणी हलविलीही होती, हे वर्तमान बंडखोरांना येऊन पोहोचले होते.

* * *

पावसाला सुरुवात झाली. डोंगर झाडी उभे रान न्हाऊ लागले. भात खाचरे भरू लागली, हळूहळू ती जिवंत झाली. जिवंत झाल्या भात खाचरातून भाते डुलू लागली. डांगाण प्रसन्न झाले. बोडके डोंगर गर्द हिरवे झाले. धरणीमाता आनंदून गेली. तरी गोविंदराव खाडे सचिंत होते. कॅप्टन माकिनटोश पुढच्या मोहिमेचा विचार करीत होता.

दसऱ्याचा दिवस म्हणजे सर्व बंडखोरांनी एकत्र जमण्याचा दिवस. आज पाचशे माणूस जमणार म्हणून गोविंदराव अन् रामजी भांगरा कळसुबाईच्या पायथ्याशी जय्यत तयारी करीत होते. कळसुबाईच्या दर्शनाची अन् जेवणाची उत्तम तयारी झाली होती. हळूहळू एकेक स्वार करता करता शंभर, दोनशे, तीनशे आणखी पांच पन्नास स्वार जमा झाले अन् पुढे दर्शनाच्या वेळेपर्यंत वाट पाहूनही सुमारे शंभर स्वार आलेच नाहीत. गोविंदरावांच्या मनात चर्रर झाले. रामजींच्या मनात पाल चुकचुकली. मिरवणुकीपेक्षा त्या दोघांचे लक्ष स्वार का आले नाहीत याची चौकशी करण्यातच लागले होते. कोणी आजारी होता, कोणाचे काम सरले नव्हते. कोणाच्या घरी कसल्याशा अडचणी होत्या. कोणाच्या घरी घर पाहायला माणूस शिल्लक नव्हते. रामजी भांगरे काय उमगायचे ते उमगले. पण सांगितलेल्या कारणामध्ये कोणत्याही साथीदारावर साथ सोडल्याचा आरोप करता येणे शक्य नव्हते. मिरवणूक निघाली. कळसुबाईच्या शिखरावर कळसाईचे दर्शन झाले. चौफेर नजर टाकली अवघे डांगाण भरगच्च वनराजींनी बहरलेले नजरेत भरत होते. पश्चिमेकडे कड्याखाली कोकण पसरले होते. दूरवर मावळ भागात शिरणारे सह्याद्रीचे कापीव कडे दिसत होते. पट्ट्याकिल्ल्या पलिकडील त्र्यंबक नासिकचा भाग स्पष्ट दिसत होता. उल्हास नदीपर्यंत नजर पोहचत होती. ''हा सगळा भाग आपला रं! त्या भागात आपलं राज हवं!'' गोविंदजींच्या मनी आलं आणि त्याच क्षणी त्यांचं मन सचिंत झालं. दर्शन करून खाली येताच सोनं लुटण्याचा कार्यक्रम झाला. मग सगळी मंडळी जेवायला बसली. जेवतांना गोविंदराव बोलत होते, ''माझ्या भावानु, धा बारा वर्सात आपण घराभायेर पडून दरूडं घालतो. त्या गोऱ्यासाहेबाला आपण आपल्या मनगटाच्या बळावं पार हांदरवला. आता आपुनी बंड पुकारून बसलोय स्वराज्य मिळावणार का मंदीच भागुबाईवाणी पळून जानार? अरं आपन रानचं वाघ! मरू पर रानचं राजं म्हून जगू. बोला अन्नावर बसून आपून आन घ्येयाची आन त्या आम्रितेश्वराची, आपल्या हरिश्चंद्राची, आण टाकेदाची, आण कळसाईची, आण घोरपड्या आईची. आपुनी स्वराज्य मिळाल्याबिगर थामणार नाही. ह्या वर्साच्या आखितीपोहत आपला राज झाला पाजेल. कबूल?'' गोविंदरावांच्या मागोमाग रामजी भांगरे हात उंचावून ओरडले, ''कबूल कबूल!'' त्यांच्या स्वरात सर्वांनी स्वर मिळविले. किस्नाने आरोळी ठोकली बोला, ''हर हर महा ऽऽ देव!'' लक्ष्यानं मध्येच विचारले, ''गोविंदराव, मंजी दरूडं पाडायचं कामं बंद करायचं काय? खरा?'' गोविंदराव पुन्हा मोठ्या हुरूपाने बोलू लागले, ''गावागावातून फिरायचा, त्या लोकांली आपला राज सुरू झाला म्हून दरडून सांगायचा का समदा वसूल पाटलाकडं द्या म्हनायचा, पाटील नांदत नसल त त्येली नांदवायचा नाहीतं दुसरा पाटील निवडायचा, गडागडावर चौक्या उभारायच्या, किल्लेदार नेमायचं आन आम्रितेश्वराच्या आशिर्वादानं राज चालवायचं. पैकं मिळवाया आपल्याली दरुडं पाडावं लागल्यावर वसूल आन् यवस्था लागल्याव दरुडं पाडायचं नही. यक यक ठाणं आपल्या ताब्यात घेत जायाचं.'' आपलं स्वराज्याचं स्वप्न गोविंदराव अन् रामजी लोकांसमोर मांडत होते.

जेवणं उरकली अन् नव्या जोमाने मोहिमेला सारे स्वार निघाले. वडलांचा अन् सासऱ्याचा मनोदय किस्नाने ओळाखला होता. यावर्षी रामा किरवाबरोबर तरणाबांड किस्ना मोहिमेत पुढे सरसावला होता.

* * *

आणि दरोडे सुरू झाले. नासिक, पुणे, ठाणे, कुलाबा पुन्हा धास्तावले. भयंकर दरोड्यांनी व्यापारी, नेमलेले पोलिस अधिकारी, पाटील, कुलकर्णी आणि चौकी-चौकीवरचे गोरे अधिकारी घाबरून गेले. बातम्या कॅप्टन माकिनटोशपर्यंत येत होत्या. रामा किरवा अन् किस्ना वाळ्याच्या सोबतीनं दरोड्याची कामं चोख सांभाळीत होते. किस्ना नवीन होता तरी उमेदीचा होता. पण यावेळी काहीतरी गडबड झाली होती. दरोडा पडण्याच्या रात्री स्वार गावात शिरताच गावातले लोक सावध असलेले पहावयास मिळत होते. विरोध होत नव्हता तरी हातास काहीच लागत नव्हते. सावकाराची तिजोरी खाली असे. कागदपत्र लंपास असत. येवढेच नव्हे तर ठरवलेला सावकारही गायब झालेला आढळे. तरी रामा अन् किस्ना हतबल झाले नव्हते. त्यांनी एका पाठोपाठ एक दरोड्यांचा सपाटाच चालविला होता.

रामजी भांगरे अन् गोविंदराव खाडे आपल्याबरोबर लक्ष्याला घेऊन गावागावातून पाटील, पोलिस अधिकारी यांना गाठत होते. त्यांना तंबी देत होते. आपले अधिकार व्यक्त करीत होते. जो त्यांचे ऐकणार नाही, त्याला अद्दल घडवित होते. मग कोणाचे नाक कापले जाई, कोणाचे कान कापले जात. कोणाला नागडा-उघडा करून खांबाला बांधून ठेवण्यात येई. गावात ओरडून आपली सत्ता सुरू झाल्याचे सांगण्यात येई. असा सपाटा सुरू झाला. शक्य तो पाटलाला, गावातल्या चार प्रतिष्ठित माणसांना विश्वासात घेण्याचा

प्रयत्न केला जाई परंतु रामजी भांगरे अन् गोविंदराव खाडे यांच्या या कारवायाचा उलटा परिणाम होऊ लागला. त्यांच्या दरोडेखोरीनी त्यांच्याविषयी जे प्रेम लोकांच्या मनात निर्माण करून दिले होते ते प्रेमही नाहिसे होऊ लागले. जुलमाने आपल्याच माणसांवर सत्ता गाजविता येत नसते. तलवारीच्या धारेवर शत्रूला नेस्तनाबूत करून किंवा सत्ताधाऱ्याला धूळ चारून सत्ता काबीज करायची असते हे सूत्र गोविंदरावांना माहित होते तरी उमजले नव्हते अन् तसे वर्तन करण्याची शक्यताही त्यांच्या लेखी दिसत नव्हती. रामजी भांगरे अन् त्यामच्च्यासारखे पोलिस अधिकारी बंडात सामील झाले होते. ते सारेच आपापल्या अखत्यारीतील गावांवर हे प्रयोग करीत होते आणि स्वराज्याच्या स्वप्नाऐवजी स्वतःचा विश्वास मात्र गमावून बसत होते.

त्याला कारणंही तशीच होती. प्रबल सत्ताधारी पेशवे अन् मराठेशाहीचे सारे सरदार भागुबाया बनून ब्रिटिशांच्या ताब्यात सत्ता देऊन मोकळे झाले होते. गोविंदराव खाडेसारखा एक कोठलासा छोटा जहागिरदार, किल्लेदार अन् कधीही सत्ता मिळाली नाही म्हणून परंपरागत बंडखोरीची सवय असलेला एक बंडखोर स्वराज्याचे स्वप्न लोकांपर्यंत पोचवित होते. स्वराज्याचे आवाहन लोकांना करीत होते. ते आवाहन लोकांना समजणारे नव्हते अन् पेलवणारेही नव्हते. लोकांच्या मनातील हा विचार कधीकधी गोविंदराव खाडेंच्या मनातही येई. मग ते अगदी उद्‌विग्न होत असत. पण त्यांनी उचललेला स्वराज्याचा विडा सोडावयास तयार नसत. स्वराज्य स्थापन करता करता मरण आले तरी बेहत्तर परंतु आता माघार नाही या जिद्दीने ते लढत होते. कारवाया करीत होते. त्यांच्याबरोबरचा परगण्या पाटील तर अलिकडे अगदी स्पष्ट बोलू लागला होता. तो असे काही बोलू लागला की गोविंदरावांच्या अन् रामजींच्या तळपायांची आग मस्तकाला जात असे. पण त्यांचा नाईलाज होई.

* * *

रामजी, गोविंदजी अन् लक्ष्या आपल्या पाचपन्नास स्वारांच्या टोळीसह दौडत होते. छोटेखानी गाव. नासिक परिसरातलं. पाचपट्टे. टोळी गेली. गावामध्ये आरडाओरडा सुरू झाला. खोकल्याला अन् डगळ्याला बोलविले. त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न झाला. खोकल्या ताडकन बोलला, ''अरं गोईंदराव म्या मागलदी सांगला व्हता अन् उजुकबी त्याच सांगतो क हा जमायचा नही. अरं त्या सायबाचं साऱ्या देस्याचं राज्य हाये आन तू रं दरूडं मारून कसा राज करनार?'' त्याच्या ह्या बोलण्याला सगळ्यांनी माना डोलावल्या. आपला एकेक हातच तुटून पडतो आहे असे गोविंदरावांना वाटले.

इगतपुरीच्या चौकीवरही त्यांना असाच अनुभव आला होता. त्यांनी साहेबाला भरपूर चोप दिला. बांधून ठेवला पण त्याच्या बदल्यात त्यांना काय मिळालं होतं तर, आपल्याच देशातील लोकांकडून प्रखर विरोध. एकेकाळी गादीशी एकनिष्ठ असणारे हे



लोक झिंगले बिंगले की काय असेच त्यांना वाटले.

आपल्या पेहरा भागात राजूरला गोविंदरावांनी जायचे ठरविले होते. देशमुख, देशपांडे यांच्याशी विचार करून त्यांना स्वराज्याविषयी सांगावे म्हणून रामजी–गोविंदजी राजूरला आले आणि त्यांना वेगळाच अनुभव आला. अचानक जाऊनही देशपांड्यांनी त्यांचे चांगले स्वागत केले. ते म्हणाले, ''तुम्ही आतापर्यंत जी कृत्ये केली ती योग्यच केलीत. स्वराज्याच्या दृष्टीने तुम्ही थेट शिवछत्रपतींच्या उमेदीने पावले उचललीत. पण दहाबारा वर्षांत तुम्ही दरोड्याशिवाय काही करू शकला नाहीत. लोक तुम्हाला दरोडेखोर समजतात. तुमचे राज्य त्यांना मान्य नाही. तुम्ही ही दरोडेखोरी बंद करून इंग्रज सरकारचे अधिकारी बनणे जास्त सोयीचे होईल. आपल्या रयतेमध्ये भरपूर विश्वास संपादन करून त्यांच्यामध्ये इंग्रज सरकारविषयी अनास्था निर्माण केली पाहिजे तरच ते जमू शकेल.'' तर देशमुखांना हे लोक आपल्याकडे इतके दिवसात का आले नाहीत म्हणून राग होता. त्यांनी त्यांच्यावर फैर झोडली. ''आरं रामजी, तुला गोऱ्यासाहेबानं पोलिस जमादार नेमला तू त्येच्यावरच उलटला. आपलं राज चालू राजूरची सुभेदारी दिली तवा तू बंडखोरी केली आन आता सव राज्याचा शानपणा शिकवाया चालास काय? हां! गोईंदरावाचं ठिक हाये पर अरं त्यो साहेब क्येवढा, त्येच राज क्येवढा आन तुमी दरुडं पाडून कसा राज मिळावणार रं? अरं दादानु, खरा मंजी मुंगीना डोंगर यंगून पल्याड जाऊच नही.'' आपण देशमुख, देशपांड्याला उगाच भेटायला आलो असे गोविंदरावांना झाले होते.

त्यांना रामजी भांगरेंच्या भेट प्रसंगाची दृष्ये आठवत होती. सगळ्यांनी मोठ्या उमेदीने स्वराज्याच्या उभारणीला साद घातली होती. रामजी आपलं राजं, असंच जणू मान्य केलं होतं. त्यांना आपल्या किस्नाचे लग्न आठवले. किस्नाच्या लग्नात उभ्या डांगाणाला आपण आमंत्रण दिलं. सारं डांगाण त्या लग्नात केवढ्या हिरीरीनं अन् प्रेमानं आपल्या बरोबर होतं. आपण राजूरचा एक दरोडा सोडला तर उभ्या डांगाणात कधी दरोडा घातला नव्हता तरी आपल्याला असा अनुभव यावा! स्वातंत्र्याची कदर कोणालाच कशी नाही? दिल्लीपर्यंत झेंडे नाचविणारं छत्रपतींचं राज्य केवळ साहेबाच्या आगमनानं समूळ कोसळावं? आपल्या देशाविषयी, आपल्या मातेविषयी एवढा स्वाभिमान प्रेम आपल्याच मनात नसावे? याचेच त्यांना राहून राहून दुःख वाटत होते.

* * *

रामजी भांगरा अन् गोविंदराव लक्ष्या समवेत एकत्रपणे विचार करीत असत तेव्हा लक्ष्या त्यांना सांगे, ''गोईंदराव अव समजूतीना ह्या लोक ऐकणार न्हाईत. एकेक गाव पार जाम करून आपलं केलं पाहिजे. त्ये जिंकून घेतलं पायजेल. तीठं ठाणं केलं पाजेल. ह्या लोक तुमच्यावाल्या बोलण्यानं तुमच्या जवळ येन्हार नहीतं. तुमच्या बंदुकीनाच तुमच्याजवळ येतील.'' लक्ष्याच हे बोलणं गोविंदरावांना कधीकधी पटत असे आणि गेल्या तीन

महिन्यातील गावागावातून त्यांना आलेले अनुभव पाहून तर दरोडेखोरीशिवाय अन् सरळ सरळ एकेक गाव लुटून ते आपल्या ताब्यात घेतल्याशिवाय पर्याय नाही असे गोविंदरावांनाही वाटू लागले होते. त्यांनी मग सर्वांनाच पुन्हा एकत्र व्हायला सांगितले. कोकण कड्याच्या खाली सारे एकत्र झाले. गोविंदराव अन् लक्ष्याने सर्वांना समजावून सांगितले अन् सर्वांनाच ते पटले. ज्या गावातले साथीदार बरोबर होते ती गावे आपली आहेत असे जाहीर करण्याचे ठरले.

रोज अशा गावोगाव दौडी सुरू झाल्या. अवघ्या पंधरा दिवसात त्यांची ही मोहीम अगदी यशस्वी झालीय या पंधरा दिवसात साठ गावे त्यांच्या अधिपत्याखाली आली होती. मोहिमा चालू होत्या. प्रत्येक गावात जावे, गावकऱ्यांना ओरडून सांगावे, त्यांना एकत्र करावे, स्वराज्याची घोषणा करावी, ''हर हर महा ऽऽ देव'' ची आरोळी ठोकावी. तेथल्या पाटलावर सारा कारभार सोपवावा अन् तेथील व्यवस्था चोख झाली असे पहावे. गावातील लोकांच्या अडचणींची विचारपूस करावी, त्यांच्यासाठी काही करण्याचे आश्वासन द्यावे अशी एकेक खेडी जोडली जाऊ लागली आणि स्वारांची संख्याही वाढू लागली. गावागावातून तरुण स्वार गोविंदरावांच्या सैन्यात दाखल होऊ लागले. दाखल झालेले स्वार त्याच गावाची व्यवस्था पाहण्यासाठी नेमले जाऊ लागले. डांगाण, कोकण, नासिक, जुन्नर भागातील सुमारे शेसव्वाशे गावे महिन्या दीड महिन्यात हाती आली होती. पण रामजी–गोविंदजींना येणाऱ्या संकटाची चाहूल नव्हती. घेतलेली गावे ताब्यातली आहेत असे समजून पुढची गावे घेण्यासाठी जावे तोच त्याच गावात बंडाळी होई. नेमलेले स्वार मार खात अन् गावांतील बंडखोरांप्रमाणे पुन्हा वागू लागत. शेसव्वाशे गावांची गर्दी एवढीच मर्यादित अर्थाने त्यांची झाली होती. कळसुबाई, रतनगड, हरिश्चंद्रगड यांच्या पायथ्याशी; कोकण कड्याच्या पोटी असलेली वीस पंचवीस अन् कोकणातील वीस पंचवीस गावे सोडली तर गोविंदरावांशी एकनिष्ठ गावे फारच थोडी म्हणजे पाच दहाच होती.

दिवस सरत होते. उष्णता जाणवू लागली होती. गावेची गावे अशा प्रकारे जिंकण्यासाठी गोविंदराव, रामजी अन् लक्ष्या, रामा किरवा अन् वाळ्या यांच्याबरोबर गोविंदरावांचा तरणा पोरगा किस्ना असे स्वाऱ्या करीत होते. पण अखेर ती दरोडेखोरीचीच पद्धत होती. लपणाच्या जागा ठरलेल्या होत्या. पाणी पिण्याच्या जागा ठरलेल्या होत्या. टोलारखिंड, माळशेज घाट, कसाऱ्याचं जंगल आणि घाटघर घाट अशा कपारी, उतरणी, लपणं लवणं गडद्या यातून त्यांची स्थानके होती. गड जरी आता निर्वेधपणे ताब्यात होते तरी जमलेली संपत्ती साठविणे आणि त्यांच्या संरक्षणासाठी जुजबी पाचसात अगदी विश्वासू माणसांना ठेवण्या पलिकडे अन्य व्यवस्था नव्हती. पुणे, नगर, ठाणे, नासिक भागातल्या वाटा आता या सर्व बंडखोरांच्या पायांनी मळल्या होत्या. रानातल्या या त्यांच्या वाटा, लपणं, गडद्या टोळीतील साथीदारांशिवाय कोणालाच माहिती नव्हत्या. गावे घेण्याची मोहीम पुढे पुढे चालू राहिलेली होती.

परिसरातील सहज शक्य भाग आपल्या ताब्यात येताच गोविंदरावांच्या टोळ्यांनी पुढे मजल मारावयाची ठरविली होती. आता मोठा हुरूप त्यांना आला होता. मुरबाड सुभ्यातील बारा गावे त्यांना आपल्या अधिपत्याखाली आणावयाची होती. घोडी उधळली. एक, दोन, तीन अशी एकापाठोपाठ गावे त्यांच्या ताब्यात येऊ लागली. खरे पाहिले तर गावे ताब्यात येऊ लागली म्हणजे गावे ताब्यात घेणे अवघड होतेच कोठे! पाचसातशे वस्तीची ही गावे, त्यात वाड्यापाड्या कितीतरी. गावात पाटील, त्यांच्याबरोबरची चार कर्ती माणसे सोडली तर होतेच कोण आडवे यायला! आतापर्यंत समोरच्या गावात घडलेले प्रकार लोकांच्या कानी येऊ लागले होते. त्यामुळे टोळ्या आल्या की लोक आपण होऊन त्यांच्याभोवती जमत आणि मारपीट वगैरे गोष्टी होऊ देत नसत. अशी गावे येत आणि पाठ फिरताच ती पुन्हा पूर्ववत वागू लागत. बिचाऱ्या गोविंदरावांचीच तर शोकांतिका होती. स्वप्न पडत होते अन् तेवढ्याच गतीने ते विरून जात होते.

संगमनेरला छावणी पुन्हा हलविल्यापासून सहा आठ महिने कॅप्टन माकिनटोशने कोणतीच कारवाई केली नाही. त्याने तसे ठरविलेच होते की बंड थांबल्याशिवाय पुढील फतवा काढावयाचा नाही. पण त्याची ही शांतता अगदीच वरवरची होती. हीच तर फादर डिसूजांची किल्ली होती. दरम्यान गावोगाव फिरून त्याने लोकांची सहानुभूती मिळविली होती. अनेकांना त्याने निरनिराळी आमिषे दाखविली होती. त्यांचे काम बरोबर साधले होते. त्यांनी बंडखोरांची सर्व नावे मिळविली होती. बंडखोरांमध्ये अचूक फूट पाडली होती. परगण्या पाटील मुख्य म्हणजे त्यांच्या गळाला लागला होता. त्याने खुद्द माकिनटोशची भेट घेतली होती. कॅप्टन माकिनटोशने त्याला पोलिस अधिकारी नेमण्याचे आश्वासन दिले होते. शिवाय बंडाचा बिमोड होईपर्यंत सर्व गोष्टी गुप्त राखण्याची हमी दिली होती. त्याच्या कानात शिरलेली ही विषवल्ली सुमारे पन्नासपाऊणशे बंडखोरांच्या कानी लागली होती. म्हणूनच दुसऱ्या दिवशी गोविंदरावांच्या टोळीत एकदम शंभरएक स्वार कमी पडले होते. कॅप्टन माकिनटोशने बंडखोरांच्या पळवाटा शोधल्या होत्या. हे बंड आता आपण सहज मोडून काढू असा त्याला विश्वास वाटत होता. बंडखोरांच्या वाटा माहिती असलेले भक्कम वाटाडे त्याने शोधून काढले होते. आपल्याला येऊन मिळणाऱ्या प्रत्येक स्वाराला त्याने दुप्पट पगार देऊ केला होता. त्याला आपल्या सैन्यात दाखल करून घेतले होते. त्या सैन्याची योजना याच भागाचे रक्षण करावयास करू असे आश्वासन कॅप्टनसाहेबाने दिले होते. फादर डिसूजाने सुचविलेले सारे आडाखे योग्य होते.

✻ ✻ ✻

आज कॅप्टनसाहेबांनी मुद्दामच परगण्या पाटलाला बोलाविले होते. त्याच्या मनात आणखी एक योजना होती. कॅप्टनसाहेब आपल्या दालनात परगण्याची वाट पाहत होता. भर दुपारची वेळ होती. परगण्याचे घोडे धापा टाकीत संगमनेरच्या दिशेनं सुसाट पळत होते. राजूर सोडून घाटात परगण्या उतरतो तोच त्याचे भोवती पन्नास स्वारांचा वेढा पडलेला

दिसला. सारेच स्वार तो ओळखत होता. हे सारे आपल्याच टोळीतील लोक आहेत हे त्याने जाणले. तो घोड्यावरून खाली उतरला. तो काय करतो हे पाहण्याच्या आतच त्याला दहा स्वारांनी पकडले अन् दोराने आवळले. परगण्या पाटलाचा आडवातिडवा देह दोरांनी आवळला होता. त्याला घोड्यावर बांधून ते पन्नास स्वार भरदिवसा सुसाट पुन्हा रानात शिरले.

परगण्या अद्याप आला नाही हे लक्षात येताच कॅप्टनसाहेब अगदीच बेचैन झाला होता. त्याने माहितगार अशा पाच स्वारांना परगण्या कोठे गायब झाला याचा शोध घेण्यास सांगितले. पाच स्वार रानात सुसाट दौडत निघाले. राजूरचा घाट सोडून ते डोंगरकडांच्या रानात घुसले. सर्वांना वाटा पाठ होत्या. उन्हाळ्याचे दिवस असल्याने वाटा स्पष्ट दिसत होत्या. भंडारदऱ्याचे गाव मागे पडले अन् त्यांना रात्र झाली. रात्री कोठे थांबावयाचे याची त्यांना फिकीर नव्हतीच. ते त्याच रानात वाढले होते. त्यांनी रतनवाडी गावचा रस्ता धरला. त्यांचा कोणीतरी पाठलाग करीत होते. ते रतनवाडीत पोहोचले तसे झडे पाटलांच्या दारावर त्यांनी थाप दिली. झडे पाटील घरात नव्हताच. रात्रीच्या अंधारात घरातल्या मिणमिणत्या दिव्यांच्या खेरीज अंधारात काहीच दिसत नव्हते. स्वार मारुतीच्या देवळाकडे निघाले. मारुतीचे देऊळ गावाजवळच एका बाजूला होते. अमृतेश्वराचे मंदिर मात्र एकांतात पलिकडे उभे होते. काळोखातही आकाशात डोकावणारा त्याचा कळस उठून दिसत होता. मारुतीच्या देवळाकडे जाणारी वाट अमृतेश्वराच्या मंदिराकडे वळून जात होती. स्वार धिम्या गतीने निघाले होते तोच अमृतेश्वराच्या मंदिरातून ''हर हर महाऽऽदेव'' ची गर्जना ऐकू आली आणि पाचांना पन्नासांनी वेढले. पाचही स्वार अचानक झालेल्या हल्ल्याने बेचैन झाले. पण त्यांच्यापैकी एकाच्या ओळखीचेच ते स्वार होते. स्वारांनी त्या पाचहीजणांना रात्रीच्या काळोखात गडप केले.

दोन दिवस झाले तरी स्वार येत नाहीत हे पाहून कॅप्टन माकिनटोश चांगलाच चरफडत होता. आता थांबण्यात अर्थ नव्हता. पुन्हा शेवटचा एक प्रयत्न म्हणून त्याने चांगली पंचवीस लोकांची सुसज्ज तुकडी कोतूळच्या दिशेने रानात पाठवली. आता रान तुडवित जाणे शिपायांना सहज शक्य होते. माहितगार दोन स्वार त्यांच्याबरोबर होते. स्वारांनी कोतूळ, तळे, विहीर, कोथळे सोडून हरिश्चंद्राचा कानोसा घेतला. तो हरिश्चंद्र शांत होता. तेथे काहीच हालचाल नसल्याचे जवळपासच्या खेड्यातून त्यांना समजले. मग पुन्हा दौड सुरू झाली. रातोरात लव्हाळीत मुक्काम करून अंबित, कुमशेत, शिरपुंजेवरून दुसऱ्या दिवशी त्यांनी कोळटेंभ्याच्या पाबर किल्ल्याकडे दौड केली तेव्हा रात्र झाली होती. कोळटेंभे गाव अगदीच लहान, पाचपन्नास उंबऱ्यांचं. बुळे पाटलांनी स्वारांची जेवणाची सोय केली. जेवून स्वार रातोरात मुक्काम करण्यासाठी मारुतीच्या देवळात गेले. किल्ले पाबर मधून; घडणारे हे सारे, कोणीतरी हेरीत होते. काहीच धोका नसल्याने दमलेले स्वार गाढ झोपले होते. एका एकी ''हर हर महाऽऽदेव'' ची गर्जना झाली आणि सारे मारुतीचे देऊळ दणाणले. स्वार खडबडून जागे झाले. सैरावैरा पळू लागले. दगा झाला हे त्यांच्या लक्षात



आले होते. समोरचा बुळे पाटील ओरडत होता. ''धरा! धरा! पकडाऽ! पळतोय!'' पण देवळातला माणूस पळतो कोठे! देवळा भोवती सशस्त्र स्वारांचा वेढा पडला होता. बुळे पाटलाने योग्य तेच काम केले होते. एवढ्यात एका तरण्याबांड जवानाच्या तोंडून उद्गार निघाले, ''मुसक्या बांधा!'' सर्वांची धडपड झाली. बार झाले. एकदोघे मेलेदेखील. पण कॅप्टनसाहेबाच्या सुदैवाने तीन स्वार सुटले होते. रात्रीच्या अंधारातही चांदण्यांमुळे थोडा प्रकाश पडून पायवाटी दिसत होत्या. ते तीनही स्वार सुसाट पळत होते. मागे वळून पहावयासही त्यांना फुसरत नव्हती. रातोरात त्यांनी केवढी तरी मजल मारली होती. आल्या वाटेने परत फिरतांना थोडे गडबडत होते. रस्त्यातून कोल्ही कुत्री ओरडत होती. पण घाबरल्या जीवाला आता बाकी काही दिसत नव्हते. सूर्य उगवला तेव्हा त्या तीन स्वारांची घोडी संगमनेरच्या दिशेने दौडत गेली.

* * *

कॅप्टन माकिनटोश पुढ्यात दारूच्या भरल्या बाटल्या घेऊन पेल्यातून एकेक घोट घेत किलकिल्या डोळ्यातून वाटेकडे नजर लावून बसला होता. त्याच्या हाताखालचे दोन गोरे अधिकाहीही त्याच्यासारखा सचिंत चेहेरा करून बसले होते. कॅप्टनसाहेबाच्या कपाळी मधूनच आठ्या पडत होत्या. मधूनच तो पूर्ण विचारमग्न होत होता. गेल्या चारपाच दिवसात जे घडले ते विपरीत होते. परगण्या आलाच नव्हता. परगण्याला पहावयास गेलेले पाचही स्वार गायब होते. त्यांच्या पाठोपाठ पंचवीस स्वार गेले होते, पण अद्याप निरोप नव्हता.

परगण्या पाटलाला बोलावण्यास त्याचा मोठाच कुटील हेतू होता. त्या योजनेत नक्कीच सारे बंडखोर फसतील. रक्तपात न होता किंवा कुठलीही धावाधाव न करता बंडखोरांना संपविण्याचा घाट त्याने घातला होता. तो परगण्या पाटलाला आपले निवेदन देऊन खुद्द बंडखोर रामजी भांगरे अन् गोविंदराव खाडे यांचेकडे पाठविणार होता. त्यांना एक प्रचंड सुभा तोडून देऊन त्यांची सर्व सत्ता त्यांच्याकडे सुपूर्द करतो अशी योजना तो त्या निवेदनात स्पष्ट करणार होता. ''तुम्हाला तुमच्या राज्यात राज्य करायचे ते खुशाल करा पण दरोडेखोरी बंद करा. तुमच्या राज्याला आम्ही कोणतेही बंधन आणणार नाही. स्वतंत्र रतनगड संस्थान म्हणून तुम्ही कारभार पहा. फक्त त्या बदल्यात सरकारला योग्य ती खंडणी द्या किंवा तनखे घ्या'' असा मसुदा त्याने ठरवला होता. वाटाघाटीसाठी स्वतः होऊन साहेब बोलवितो असे पाहिल्यावर गोविंदराव आणि रामजी भांगरे यांना दोघांनाही आपण अटक करू. एकदा मूळ तोडले की फांद्या आपोआप पडतात असे त्याचे मत होते. अशी त्याची योजना होती. या योजनेची त्याने जय्यत तयारीही करून ठेवली होती. पण जो जातो तो गायब होतो. तो अगदीच बेचैन झाला होता.

अशा अवस्थेत असताना गेलेल्यांपैकी तीन स्वार दौडत आल्याचे वृत्त त्याच्या

कानी आले आणि तो ताडकन उठून उभा राहिला. गेलेल्यांपैकी फक्त तीनच स्वार येतात, याचा अर्थ काय? तीनही स्वार त्याच्या पुढ्यात येऊन माना खाली घालून उभे राहिले. तेव्हा त्याने दरडावून विचारले, ''काय झाला?'' परंतु कोणीच काही उत्तर दिले नाही. तसा त्याच्या मनात आणखीच संभ्रम निर्माण झाला. त्याने पुन्हा हातावर मूठ आपटीत करड्या स्वरात विचारले, ''काय झाला?'' तसा त्यांच्यापैकी एकजण बोलू लागला, ''आम्ही कोलटेंभेच्या देवळात झोपलो होतो. कोतूळपासून कोलटेंभेपर्यंत काहीच दिसले नाही. रात्री अचानकच पाचपन्नास धारकरी बंदुकधारी आले आणि देवळाला वेढा देऊन आम्हाला हाणामारी करू लागले. त्या वेढ्यातून आम्ही कसेबसे पळालो ते येथे येऊनच थांबलो. ते सर्व दरोडेखोर होते.'' त्याचे बोलणे ऐकून कॅप्टनसाहेबांचा मूळचा लाल चेहरा अधिकच लाल झाला. पाठीमागे हात बांधून त्यांनी मनाशी काही निश्चय केला आणि ताबडतोब दोन स्वारांना जवळपास पांगविलेल्या एका टोळीस बोलविण्यास धाडले. कॅप्टनसाहेबाचा निरोप घेऊन राहुरी मुक्कामी असलेल्या छावणीकडे दोन स्वारांनी कूच केले. तीनशे लोकांची फौज दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत संगमनेरला येऊन पोहोचली आणि कॅप्टनचसाहेबांनी स्वतः निघावयाचे ठरविले. वाटाडे पुढे दौडत होते. मागून तीनशे स्वारांची एक तुकडी दौडत होती. कोतूळ मार्गाने ही तुकडी रवाना झाली. सायंकाळी कोथळ्यापर्यंत दौड करावयाची होती. आणखी चारशे स्वारांची तुकडी राजूर भागातून केव्हाच वर सरकली होती. शिरपुंजेपर्यंत त्यांना येऊन थांबावयाचे होते. रात्र झाली तेव्हा ठरलेल्या ठिकाणी सारेच पोचले होते. दुसऱ्या दिवशी हरिश्चंद्राचा कोपरा न् कोपरा चाचपडला जाणार होता.

ठरल्याप्रमाणे हरिश्चंद्र पालथा झाला पण काहीही हाती लागले नाही. कॅप्टनसाहेबांनी आपला मोर्चा रतनगडच्या दिशेने वळवावयाचे ठरविले. त्या पूर्वी कोलटेंभ्याला पाबर किल्ला पाहून पुढे रतनगडला वेढा देण्याचे ठरले होते. कोलटेंभ्याला सात-आठशे लोकांच्या फौजेसह कॅप्टनसाहेब पोहोचले. बुळे पाटील घरातच भेटले. बुळे पाटलांना कॅप्टनसाहेबाने समोर बोलाविले. बुळे पाटील कॅप्टनसाहेबासमोर हात जोडून उभा राहिला. साहेबाने विचारले, ''काय झाला?'' बुळे पाटील फौज पाहूनच गांगरला होता. त्याने कानावर हात ठेवले अन् म्हणाला, ''साहेब तुमचं ल्वाक मह्याकं आलतं. जेवण खावाण करून आन त्यानली मारवतीच्या देवळात निजावला अन् रातचा कसा काय झाला कायनु?'' तसा साहेब कडाडला, ''आमाला असा कळला टोमी तेना एटे बोलावला?'' पाटील चांगलाच घाबरला. त्याच्या अंगाला कंपच सुटला. शक्य तितका निर्विकार चेहरा करून त्याने पुन्हा सांगितले, ''सायब स्वारांनी मला धरून आनला ह्या खरा. पर त्येनी तुमच्या लोकांली कुठं नेला मला काय माहीत नही.'' कॅप्टन आता संतापला, ''पाटील टोमी सांगितला नाही तर आमी टोमाला मारणार.'' कॅप्टनसाहेबाचे शब्द ऐकताच पाटील बोलू लागला, ''साहेब, त्येनी तुमच्या लोकांली पकडून रतनगडावं नेला पर तिठून त्या कपारीकपारीना थेट घाटात गेलं असत्याल. पर महा त्येंशी काही संबंध नाही! मला मारू नका. साहेब मी शरण हाये. मी तुमच्यासंग रतनगडला येतु.'' कॅप्टनसाहेबाचे त्याच्या ह्या बोलण्याने समाधान झाल्याचे



दिसले आणि फौज रतनगडाच्या दिशेने निघाली. अर्धा घटक्यात फौज रतनगडाजवळ आली. रतनवाडीतले झडे पाटील गावात नव्हते. गावातल्या लोकांना कॅप्टनसाहेबांनी आपल्या स्वाराकडून खोदून खोदून विचारले. पण ''येथे गडावर परवा रात्री दरोडेखोर आले होते पण आता ते कोकणात निघून गेले असतील'' असे सांगण्यात आले होते.

कॅप्टन माकिनटोश जळफळत होता. त्याने सगळा रतनगड पालथा घातला तरी काही हाती लागले नाही. रतनवाडीहून सर्व लोक उडदावण्यात आले. रात्र झाली होती. कॅप्टन माकिनटोश स्वतः परगण्या पाटलाच्या घरी गेला. परगण्या पाटील अंथरुणावर तळमळत पडला होता. त्याला जबर मारले होते. नाकाचा शेंडा कापला गेला होता. कॅप्टनसाहेबाला पाहताच त्याने ऊर बडवून रडायला सुरुवात केली. त्याने कॅप्टनसाहेबाला जे सांगितले ते ऐकून कॅप्टन उभा पेटला. आपला कोणताही डाव अद्यापही यशस्वी होत नाही हे पाहून तो जळत होता.

फितूर झालेल्या लोकांना अद्दल घडावी म्हणून परगण्या पाटलाची अशी अवस्था झाली होती. साहेबाने जंग जंग पछाडले तरी आम्ही त्याला सापडणार नाही असे बजावले होते. जो कोणी फितूर होईल त्याला आम्ही नीट जगू देणार नाही अशीही तंबी दिली होती. हे सारे ऐकताना कॅप्टनच्या अंगाची लाहीलाही होत होती. शेवटची गोष्ट ऐकून तर तो मुठी आवळून ओरडलाच. परगण्या पाटलाने सांगितलेल्या साऱ्या कारवाया गोविंदराव खाडेंचा पोरगा किस्ना अन् रामा किरवा नावाचा कोळी करतो आहे त्याला कळले.

परगण्या पाटलाची ती अवस्था अन् मिळालेली माहिती घेऊन कॅप्टन माकिनटोश दुसऱ्या दिवशी सरळ पुन्हा आपल्या छावणीकडे निघाला होता. साऱ्या बंडखोरांना मोडून काढण्याची योजना हाती घेऊन निघालेला कॅप्टन माकिनटोश हाती भोपळा घेऊन परतला. हृदयात अंगार पेटून काहीच होत नव्हते. त्याच्यासारख्या कुशल सेनाधिकाऱ्याला बंडखोरांनी हातोहात फसविले होते. त्याचे खेळणे बनविले होते. त्याचे सर्व डाव अचूक हेरून उधळून लावले होते. आणि इकडे वरून कॅप्टनसाहेबाला सारखे खलिते येत होते. गावे लुटली जात होती. दरोडे पडत होते. जबाबदारी वाढत होती आणि कॅप्टनसाहेबाकडून मात्र काहीच घडत नव्हते.

नाही म्हणायला फादर डिसूजाला बोलविल्यामुळे त्याच्या सल्लामुळे त्याला लोकात सहानुभूती मिळविता आली होती. दरोडेखोरांच्या वाटा, अड्डे, लपणं माहित असलेली काही माणसं निश्चितच हाताला लागली होती. ह्या माणसांच्या जीवावर त्याला काही करता येणार होते, पण त्याच्या त्या योजनेला आताच्या कारवायांनी तडा जात होता. संगमनेरच्या छावणीकडे प्रयाण करतांना अपमान, अपयश ह्यांनी छिन्न झालेले कॅप्टनचे मन असाच विचार करीत होते. बंडखोरांचे पारिपत्य करण्याचा मार्ग सापडत नव्हता. काय करावे समजत नव्हते. त्या विमनस्क अवस्थेत तो आपल्या छावणीकडे परतला होता.

स्वराज्याचे स्वप्न आपल्या पाठोपाठ संपते आहे, विरते आहे हे गोविंदरावांच्या ध्यानी येत होते म्हणूनच तो पूर्ण पिसाळला होता. एकीकडे गावे मिळवणे, लूट मिळवणे हे

काम करावयाचे होते तर दुसऱ्या बाजूला ह्या फितूर लोकांनी चालवलेल्या कारवाया दडपून टाकणे आवश्यक होते म्हणूनच जीवाची बाजी लावून ते सुसाट सुटले होते. फितूरांना वठणीवर आणण्याचे महत्त्वाचे काम रामा किरवा आणि गोविंदरावांचा मुलगा किस्ना यांनी स्वीकारले होते. किस्ना मुळातच बेडर वृत्तीचा अन् अतिशय शूर असा पोरगा होता. त्याच्या बंदुकीचे निशाणही अचूक होते अन् तलवारीची धारही अगदी तीक्ष्ण होती. रामा किरवा हाही असाच शूर होता त्याने स्वराज्याची शपथ घेतली होती. तो पहिल्यापासून त्या शपथेला जागत होता.

काही दिवसांच्या आतच परगण्या पाटीलला त्याने हजर केले होते. लक्ष्या समोर हजर होण्याची ही परगण्याची दुसरी वेळ होती. लक्ष्या काही करणार तोच सुरंगा पुढे झाली होती. सुरंगा त्याच्या पूर्वीच्या काम नजरचेष्टांचा हिशेब आताच चुकता करणार होती. लक्ष्याच्या मदतीसाठी परगण्या पाटील हवा होता म्हणूनच ती इतके दिवस त्याचे सर्व चाळे सहन करीत होती, कधी कधी त्याला झुलवित होती. लक्ष्याला त्याचा सुगावाही लागू देत नव्हती. पण आता ही संधी चालून आलेली होती. लक्ष्याच्या हातातला जंब्या तिने खचकन ओढून घेतला आणि एका बाईने परगण्याचे नाक कापले, पायाची बोटे तोडली. लक्ष्या पोट धरून हसत होता. परगण्यावर चाबकाचे फटकारे मारीत होता. एकेका फटकाऱ्यागणिक त्याला एकेक शिवी हसडत होता, ''परगण्या आयच्या खाटावं गेलास तुह्या बायली!'' परगण्या रक्तबंबाळ होऊन जेव्हा निपचित पडला तेव्हा त्याचा जीव शांत झाला. त्याला पुन्हा घोड्यावर बांधून त्याच्या घरापर्यंत सोडून येतात तोच पाचजणांची शिकार रामा किरवाला सापडली होती. अजून त्यांना कोणी कड्याच्या खाली झाडाला बांधून ठेवले होते. बांधतानाही उलटे बांधण्याची खबरदारी घेतली होती. या उलटे बांधलेल्या अवस्थेने डोळ्यात रक्त उतरत होते अन् त्यांना वेदना असह्य झाल्या होत्या. दुसऱ्या दिवशी त्यांना सोडून त्यांच्या पायांवर अन् पार्श्वभागावर उकळते पाणी ओतण्यात आले. ते विव्हळत कपारीला पडून होते. बुळे पाटलांनी पाचपंचवीस स्वार त्यांना शोधायला आल्याचा निरोप धाडला होता. बुळे पाटील तसा भित्रा पण वृत्तीने तो एकनिष्ठ होता. त्याच्या सल्ल्याप्रमाणे स्वार दौडत येऊन पाबर किल्ल्याच्या मागल्या बाजूने दडी मारून बसले होते अन् मध्यरात्री त्यांना घेऊन संपविले होते.

गोविंदराव आपल्या पोराच्या अन् रामा किरवाच्या कारवायांवर बेहद्द खूष झाले होते. त्यामुळे त्यांना चांगलाच उत्साह आला होता. त्या धुंदीतच त्यांनी कोकण, पुणे, नासिक या तीनही भागात पुन्हा मुसंडी मारण्याचा मोठाच घाट घातला होता. आता फितुरी करणाऱ्या लोकांना दहशत बसेल, ते काहीच करणार नाहीत अन् कॅप्टन माकिनटोशही आता वाटे जाताना अनेकदा विचार करील हे त्यांनी ताडले होते. त्यांना अक्षयतृतीयेपर्यंत स्वराज्याचा श्री गणेशा करावयाचा होता. नजिकच्या तीन दिवसाची पूर्ण आखणी त्यांनी सर्वांच्या सल्ल्याने केली. दुसऱ्याच दिवशी टोळ्या रात्रीचा प्रवास करीत लपत छपत बरोबर अपेक्षित जागी पोहोचल्या. आताचा दरोडा हा अनेक दरोड्यांमध्ये मोठा ठरणार होता.



निर्णायक स्वरूपाचे काही काम यातून व्हावे अशी अपेक्षा होती आणि त्याप्रमाणे लोक रवाना झाले होते. गोविंदराव खाडे स्वतः नासिक, सिन्नरच्या परिसरात गेले होते. त्यांना पोलिस चौकीवरच्या गोऱ्या अधिकाऱ्याला तर संपवायचे होतेच, पण मोठ्या नगरशेटीला सुंदरशेठला नासिकच्या बाजारपेठेत जाऊन लुटावयाचे होते. खुद्द नासिक शहरात दरोडा टाकणे तितकेसे सोपे नव्हते. खुद्द साहेबाची मोठी चौकी तेथे होती. दगाफटका झाला असता तर संपूर्ण टोळी खलास झाली असती, पण म्हणूनच गोविंदरावांनी स्वतःकडे हे मोठे काम घेतले होते. शिवाय होळकरांना ते दाखवून देणार होते की मराठेशाहीचे सरदार आणि खुद्द पेशवे पळून गेले तरी काही शिलेदार अजूनही स्वराज्यासाठी तळहातावर शीर घेऊन लढत आहेत. अशीच मोठी मोठी कामे यावेळी सर्वांकडे होती आणि रामजी अन् लक्ष्या पुणे परिसरात गेले होते तर किस्ना, रामा किरवा अन् वाळ्या कोकणात ठाणे परिसरामध्ये गेले होते. ही लूट यशस्वी झाली तर लक्षावधी रुपयांचा ऐवज मिळणार होता अन् रतनगडावर राजरोस रामजी भांगरा अन् गोविंदराव खाडेंचे राज्य सुरू होणार होते.

* * *

आणि दोन दिवसानंतर कोकण कड्याच्या खाली, कसाऱ्याच्या जंगलात जेव्हा तीनही तुकड्या एकत्र आल्या तेव्हा आनंदाला पारावार राहिला नाही. तीनही मोहिमा अगदी यशस्वी झाल्या होत्या. पुन्हा एकदा अपेक्षेपेक्षा मोठा विजय या निमित्ताने गोविंदराव अन् रामजी भांगऱ्यांच्या वाट्याला आलेला होता. नासिकच्या चौकीवर चौकीबहाद्दर टोपीकर इंग्रज होता. खुद्द गोविंदरावांच्या पराक्रमाने तो संपला होता. सुंदरशेठची सारी तिजोरी लंपास केली होती.

उन्हाळ्याचे दिवस होते. निवाऱ्याला जाण्याचा प्रश्नच नव्हता. कड्याच्या खाली दाट किर्र रानात मोठी होळी पेटली. होळीभोवती दारूची नशा चढली तरी गोविंदराव अन् रामा किरवा दोघांचा विचार विनिमय चालू होता. त्यांनी मिळाली संपत्ती योग्य सुरक्षित जागी नीट नेऊन ठेवण्याचा विसर पडू दिला नाही. दारूच्या नशेत लक्ष्या ठाकराला कांबडवणा स्फुरला आणि मग सर्वांनी त्याला साद घातली. किस्नाने नाचात पुढाकार घेतला. जणू त्यांना आता स्वराज्य मिळणार या आनंदाने ते बेहोष झाले होते. त्या बेहोषित मोठ्या ढोलाच्या तालावर लक्ष्याने उंच कड्याकडे अंधाराला चिरत जाणाऱ्या होळीच्या ज्वालांच्या उजेडात एकवार पाहिले अन् आरोळी ठोकली.

**धरती तू, माते ऽऽ**
**रूसवा ना धरी जो ऽऽ**
**तुह्या पाया मी पडीतो ऽऽ**
**तुला मस्तकी लावितो ऽऽ**

गोविंदरावांनाही भान राहिलं नाही. त्यांनी अन् रामजी भांगऱ्यांनीही नाचायला सुरुवात केली.

ढोलकीच्या आवाजाने कित्येक रानटी जनावरे दूर भीतीने पळत गेली. पक्षी ओरडू लागले. सारे रान रात्री बोलू लागले. तरी लक्ष्या मात्र देहभान हरपून गात होता.

**भूवनी डोंगर**
**आहे तीनरं माजल्या**
**डोंगरीची कळसाई**
**दुधाना ना नाली बया ऽऽ**
**पितांबरी नटली बया ऽऽ**
**दागाना फुलाली बया ऽऽ**
**डोंगरीची कळसाई ऽऽ**

मोठ्या भक्तीभावाने सर्वांनी कळसाईला वंदन केले. सातआठशे गडी पण भान हरपून गेले. नाचतानाचता केव्हा रात्र संपून गेली समजलेच नाही. रात्र संपली आणि मग मात्र सारेच भानावर आले. पुढच्या मोहिमेची तयारी करावयाची होती. दोन दिवसानंतर तर पुढची मोहीम ठरणार होती. तोपर्यंत झालेल्या घटनेचे पडसाद काय उमटतात ते पाहण्यासाठी हेर सुटणार होते. मिळालेली संपत्ती भरपूर होती तरी आणखी एकदोन मोहिमा कमवून आणावयास हव्या होत्या. अक्षयतृतीयेच्या आत सारी तयारी करावयाची होती. पन्नास जणांची एक तुकडी रतनगडावर रवाना झाली होती. त्यात रामा किरवा अन् किस्ना होता. रतनगड ही रामजी अन् गोविंदजींची राजधानी होणार होती. त्याची व्यवस्था करण्यासाठी पन्नास जणांची ही तुकडी आता राबणार होती. फावल्या वेळात त्यांच्याकडे सोपविलेले काम ती तुकडी करणार होतीच.

हेरगिरी करण्यात लक्ष्याचे लोक तरबेज होते म्हणून त्यांच्यावर ही कामगिरी सोपविण्यात आली आणि जेव्हा हेरांनी बातम्या आणल्या तेव्हा सारेच चिंतेत पडले. कॅप्टन माकिनटोशने सारे रान हिंडून पाहिले अन् त्याने आता दोन-तीन हजार फौज मागविली आहे. शिवाय नगर, पुणे, नासिक आणि ठाणे या चारही भागात त्यांनी जोरदार मोर्चे बांधले आहेत. ह्या बातम्या गोविंदरावांना फारच चिंताजनक वाटल्या. पुन्हा त्यांच्या व्याकूळ मनाने कच खाल्ली. आपला स्वराज्याचा डाव हाणून पाडण्यासाठी काही तरी नवीन डाव नक्कीच साहेबाने शोधून काढला असावा. शिवाय दोन हजार फौज चालून येणार हे ऐकताना त्यांना कॅप्टन सीकसची सहजच आठवण झाली होती. गोऱ्या लोकांच्या चिकाटीची त्यांना जाणीव झाली होती. त्याचबरोबर आपल्याच माणसांच्या फितुरीची देखील त्यांना पूर्ण कल्पना होती. किस्ना अन् रामा किरवा उगाच दुसऱ्याच विचारात होते. साहेबाने दोन हजार फौज आणली हे त्यांच्या गावी नव्हते. त्यांनी नगर जिल्ह्यात अन् पुणे जिल्ह्यात धुमाकूळ घालणाऱ्या भिल्ल अन् रामोशींच्या टोळ्यांशी संधान बांधता येते का; हे पाहण्यास सुरुवात केली होती. गोविंदराव अन् रामजी मात्र विचारमग्न झाले होते.

* * *

कॅप्टन माकिनटोशच्या कानावर नासिक दरोड्याची बातमी पोचली. त्याच्या मनातील क्रांतीकारी योजना बळावली. वैशाख जवळ येत होता. ताप वाढत होता. आता जलद हालचाल केली नाही तर पुढे पावसाळा आणि मग पडत्या पावसात या बंडखोरांचा नायनाट करता येणार नाही हे तो जाणत होता. गोविंदरावांनी सुसाट सुरू केलेला प्रयत्न तो अद्याप थांबवू शकला नव्हता. म्हणूनच त्याने मनाशी योजना आखून अखेर हे बंड मोडून काढण्याचा निर्णय घेऊन कॅप्टन सीकस, जनरल स्मिथ यांना खास लखोटे पाठविले होते.

स्विफ्ट लखोटे घेऊन दौडत होता. त्याच्यावर फारच महत्त्वाची कामगिरी आली होती. जनरल स्मिथचा स्वभाव त्याला माहीत होता. जनरल स्मिथ जेवढा शांत तेवढाच तापट होता. त्याचे आत्तापर्यंत कॅप्टन माकिनटोशला दोन बावटे आले होते. कॅप्टन माकिनटोश अजून बंदोबस्त करू शकत नाही म्हणून तो अतिशय चिडला होता. त्यात नुकत्याच झालेल्या दरोडा प्रकरणामुळे तो नक्कीच अधिक चिडला असणार हे स्विफ्ट जाणत होता. मागे जेव्हा स्विफ्ट पाचशे लोकांची फौज घेऊन निघाला होता तेव्हा त्या फौजेची मधेच झालेली तारांबळ त्याच्या कानावर गेली होती. स्विफ्ट त्यानंतर त्याला भेटलाच नव्हता. स्विफ्टला म्हणूनच आज त्याच्याकडे जाताना थोडी भीतीच वाटत होती. जनरलसाहेब काय म्हणतील ह्या विचारात असतांनाच जॅकी भलत्याच जलदगतीने पुढे पुढे फेकला जात होता. जनरल स्मिथचा मुक्काम सध्या पुण्यात होता. पुण्याला एलफिस्टन साहेबाचाही मुक्काम असे. त्याच्याही कानापर्यंत हे दरोडेखोरांचे, बंडखोरांचे प्रकरण गेले होते. केवळ एका दरोडेखोरांच्या टोळीने इंग्रज सत्तेला हादरे द्यावेत हे त्याच्या बुद्धीला पटत नव्हते. त्याने आश्चर्याने पुन्हा पुन्हा जनरल स्मिथकडे विचारले होते. जनरल स्मिथ तरी काय सांगणार होता! त्याने कॅप्टन माकिनटोशवर सर्व जबाबदारी सोपविली होती. सर्व राजकारण सोडून केवळ दरोडेखोरांच्या मागे लागणे लांच्छनास्पद वाटत होते. म्हणूनच शक्यतो हे बंड परस्पर दडपले जावे असे सर्वांनाच वाटत होते.

* * *

दुरूनच इमारतीचा घुमट दिसत होता. पूर्ण चिरेबंदी भव्य इमारत पुण्याचे वैभव वाढवित होती. गेल्या काही वर्षातच इमारत बांधली होती. अद्ययावत. प्रशस्त सभागृह. सभागृहात मोठे राऊंड टेबल होते. त्याच्याभोवती शिसवी लाकडाच्या काळ्याभोर शोभिवंत खुर्च्या मांडलेल्या होत्या. सभागृहात कोणीच दिसत नव्हते. आतल्या दालनात जनरल स्मिथ कामात गर्क होता. अनेक कागदपत्र तो स्वतः जातीने चाळीत असे. महत्त्वाच्या व्यक्तींच्या खास भेटीही त्याच दालनात घेत असे. सकाळपासून रात्रीपर्यंत अविरत तो बारा-पंधरा तास काम करीत असे. अतिशय काटेकोरपणा आणि शिस्त त्याच्या कामातून सहजच दिसे. हलगर्जीपणा अन् दिरंगाई त्याला जराही खपत नसे.

स्विफ्टचा जॅकी बाहेर खिंकाळून उभा राहिला. स्विफ्टने नेहमीच्या सवयीप्रमाणे

घोड्यावरून खाली उडी ठोकली आणि जॅकीला थोपटले. जॅकीने एकवेळ आपल्या मालकाकडे पाहिले. स्विफ्टचे आज त्याच्याकडे लक्ष नव्हते. स्विफ्टने आपण आल्याची वार्ता आतपर्यंत पोचविली. त्याला फारवेळ तिष्ठत रहावे लागले नाही. त्याला लगेचच आत बोलविले गेले. त्याने एकदा आपल्या पोशाखाकडे तो ठाकठिक आहे की नाही ते पाहिले आणि अदबीने तो आत शिरला. जनरल स्मिथने हसत हसत विचारले, ''यस स्मॉर्ट बॉय व्हाट वुईथ यू'' तोपर्यंत स्विफ्ट कडक सॅल्यूट ठोकून तयारच होता. त्याने मान खाली लवून मोठ्या अदबीने जनरलसाहेबाच्या हातात लखोटा दिला. ''यस आय सी!'' एवढेच शब्द जनरलसाहेबाच्या तोंडातून बाहेर पडले आणि मग फक्त त्यांच्या चेहऱ्यावरच्या भिवया तेवढ्या वक्र अधिक वक्र होत गेल्या. चेहरा लालबुंद झाला. डोळे लकाकले. जनरल चांगलाच खवळला होता. ''ओ, दॅट रॉबर गोईंग टू हॅव न्यू किंगडम! दॅट फूल इज गोईंग टू फाईट! नो, नो, इट वोन्ट हॅपन.'' जनरलच्या तोंडचे ते शब्द होते. स्विफ्ट मनात सुखावला होता. काही वेळ जनरलसाहेबाने शून्यात नजर लावली त्यावेळी त्याच्या डाव्या डोळ्यावरची शीर उडत होती. त्याने काही वेळाने विचारले, ''इज इट ऑल टू स्विफ्ट?'' ''यस, सर!'' स्विफ्टने उत्तर दिले. ''देन व्हाय इट नॉट रिपोर्टेड?'' त्याने रोखतच विचारले. स्विफ्ट काय उत्तर देणार होता. तो शांत उभा होता.

थोड्या वेळाने वातावरण शांत झाले. जनरलसाहेबानी स्विफ्टजवळ उत्तर लिहून दिले आणि स्विफ्टची सहीसलामत सुटका झाली. स्विफ्टने पुन्हा रपेटीला सुरुवात केली.

कॅप्टन माकिनटोश जनरलसाहेबाच्याच उत्तराची वाट पाहत होता. स्विफ्टने आणलेले उत्तर वाचून त्याचे पूर्ण समाधान झाले. त्याने लगेचच आपल्या खास वाटाड्यांना एकत्र केले. त्यांना योजना समजावून सांगावयास सुरुवात केली. पीट आणि पेटर यांना त्यांच्याबरोबर खास पाठवावयाचे ठरले. नकाशा समोर मांडण्यात आला. त्यात बंडखोरांच्या पाणी पिण्याच्या, लपण्याच्या, राहण्याच्या जागांवर डॉट करण्यात आले होते. एकूण बाराजण त्या भल्या मोठ्या नकाशावर डोकावून एकाग्रपणे नकाशा समजावून घेत होते. कॅप्टनसाहेब सर्वांना त्याची योजना पटवून देत होता. ''दीज आर फोर अॅटॅकींग पॉईन्टस्. हे चार ठिकाणाहून आपण अॅटॅक करते. चार ठिकाणाहून वुई वुईल चेस देम. आपण तेंचा पाठलाग करू. हळूहळू पुढे सरकत तेथे एयाचे ऑन हिअर देअर वुईल बी फायर''. पीट पेटर मध्येच शंका विचारू लागत तेव्हा कॅप्टनसाहेब त्यांना मध्येच थांबवित आणि, ''आयनो, आयनो, आय एम गोईंग टू फाईट फ्रॉम धिस पॉईंट. धिस इज द मोस्ट इंपॉर्टंट अॅन्ड डेन्जरस पॉईन्ट बट आय वुईल सी इट.''

* * *

सर्व योजना ठरल्यानंतर दुसऱ्याच दिवशी दोन दोन वाटाडे अन् दोन दोन सोजिर तीन दिशांना पसार झाले. उरलेल्या दिशेला स्वतः कॅप्टन निघणार होता. त्याने आपल्याकरिता



आणखी तीनशे स्वार मागवून घेतले.

स्विफ्ट आणि त्याच्या हेर पथकावर चारही टोळ्यांमध्ये पूर्ण संपर्क साधण्याचे काम सोपविलेले होते. हे काम त्याच्याकडे नेहमीच असे त्यामुळे त्याला त्यात विशेष काही वाटले नाही, पण त्याने आपल्या कामासाठी खास डोंगरात भटकणारे आठदहा वाटाडे मात्र मागून घेतले.

कॅप्टनसाहेबांनी आपल्या जवळच्या सैन्याला योग्य अशा सर्व सूचना दिल्या. आता त्याला पहिल्या प्रथम आपले सारे सैन्य सज्ज करून ठेवायचे होते. आणखी तीनशे स्वार येणार होते. एकूण हजार बाराशे स्वारांची तुकडी त्याच्या बरोबर निघणार होती. त्याला त्याच्या पुन्हा तीन तुकड्या करून पुढे सरकायचे होते.

घोडी, शस्त्रे, दारूगोळा, बंदुका यांची पूर्ण तयारी झाली. आता येणाऱ्या टोळीची वाट पाहत बसणे होते. टोळी नगर, राहुरी या भागातून येणार होती. कॅप्टन माकिनटोश मात्र अधिर झाला होता. तरी अजून तीन बाजूंनी टोळ्यांची तयारी झाली की नाही हे त्याला अद्याप समजले नव्हते.

रात्रीच्या गडद अंधारात टापांचे आवाज आले तसा कॅप्टन माकिनटोश आनंदला. त्याचे येणारे तीनशे स्वार तर आलेच होते, पण अपेक्षित हेरही येऊन पोहचले होते. सर्व ठिकाणी निरोप पोचून तयारीला सुरुवात झाल्याची बातमी आली होती. आता निघायला हरकत नव्हती. सर्व तुकड्या दुसऱ्या दिवशी सकाळी आपापल्या ठरलेल्या भागातून कूच करणार होत्या तरी कॅप्टन माकिनटोशला लवकर निघायचे होते. त्याला सर्व प्रथम कळसुबाईची डांगाणातील शिखरे हस्तगत करावयाची होती आणि सर्व बंडखोरांना खाली कोकणात कसाऱ्याच्या जंगलात पिटाळायचे होते.

कॅप्टन माकिनटोशने शेवटी एकदा पुन्हा सर्व सैन्याची तयारी झाली की नाही ते पाहिले आणि त्यांच्या तीन टोळ्या तीन बाजूंनी निघाल्या. एका टोळीला वाशेरे, पिंपळगाव खांड, कोतूळ, आंभोळ, शिळवंडी, कोहाणे, विहीर, तळे, कोथळे या मार्गाने हरिश्चंद्र गडावर जायचे होते तर दुसऱ्या तुकडीला, सिन्नर, ठाणगाव मार्गाने पाचपट्ट्याला पोचायचे होते. तिसऱ्या मधल्या टोळीबरोबर खुद्द माकिनटोश होता. तो राजूर मार्गे बारीपर्यंत जाऊन मग घाटघर रतनगड या ठिकाणी येणार होता. शेवटी सर्वांनी रतनगडावर जमायचे होते. रतनगडावरच काही हालचाली चालू आहेत हे त्याला समजले होते.

जाताना गावागावातून गोळीबार करून दहशत निर्माण करावयाची ताकीद त्याने दिली होती. गावोगावच्या पाटलाला ताकीद देताना ''बेदम दम द्या'' हे सांगायला तो विसरला नव्हता. हरिश्चंद्रगडाकडून रोनाल्ड येणार होता. हरिश्चंद्र गडावर काही आढळले नाही तर निदान चढण्या उतरण्याच्या जागा उद्ध्वस्त करा असा इशारा द्यायला कॅप्टन विसरला नव्हता.

दोन दिवसात सारेजण रतनगडाच्या पायथ्याशी येतील अशी अपेक्षा होती. कॅप्टन माकिनटोशच्या टोळीत तेरा वर्षापूर्वी याच रतनगडाच्या पायथ्याशी कॅप्टन सीकसबरोबर

छावणीत असलेले लोक होते. त्यांच्या मनात एकच विचार घोळत होता. त्यांना तो घनघोर रणसंग्राम आठवत होता. त्या वेळचा तो गोविंद खाडेच जर पुन्हा तेथे असेल तर? अन् दोन दिवसात वेळेवर बाकीच्या तुकड्या पोहचल्या नाहीत तर? असे प्रश्न मनामध्ये येऊन त्याच्या मनात उगाचच भीतीचे काहूर उठले होते.

* * *

रतनगडावर रामा किरवा अन् किस्ना या दोघांबरोबर फक्त पन्नास निवडक स्वार होते. त्यांची रतनगड सजविण्याची जय्यत तयारी सुरू झाली. रतनगडाला पुन्हा पूर्वीचे वैभव प्राप्त होणार होते. त्यासाठी त्यांची धडपड होती. साऱ्या गडदी साफसूफ होत होत्या. मोर्चे नीट आहेत नाहीत पाहिले जात होते. काही ठिकाणचे पडले दगड रचले जात होते. मुळात किल्ला भक्कम होता. फारशी पडझड झालीच नव्हती. शिवाय गेल्या दहा वर्षांत जरी प्रत्यक्ष गोविंद खाडे गडावर राहत नव्हते तरी त्यांची वर्दळ दरोडेखोरीच्या निमित्ताने चालूच होती. रामा किरवा योग्य मार्गदर्शन करीत होता, किस्ना जातीने राबत होता. सर्वांच्या डोळ्यासमोर फक्त स्वराज्याचे स्वप्न तरळत होते. त्यांची ही तयारी चालू असतांनाच टेहेळ्याने जे सांगितले त्यावर त्यांचा विश्वास बसत नव्हता. रतनगडाच्या पायथ्याशी शे दोनशे स्वारांची तुकडी आली आहे अन् त्यांच्या बरोबर खुद्द कॅप्टन माकिनटोश असावा. काम करणारे हात एकदम थांबले. बंदुका सरसावून सारे पन्नास पाऊणशे स्वार सज्ज झाले. किस्ना बेडर अन् धडाडीचा होता. त्याला ही आयती मेजवानीच चालून आल्यासारखे वाटले.

तेवढ्यात गुप्त पायवाटेने एक स्वार दौडत थेट गडावर आला आणि त्याने त्यांना पळून जाण्याविषयीचा निरोप सांगितला. त्याने सांगितलेली बातमी भयंकर होती. सुमारे हजार बाराशे स्वार रतनगडाच्या रोखानेच निघणार आहेत अशी बातमी त्याने आणली होती. रामा किरवाने बातमी ऐकून पळून जाण्याचा विचार पक्का केला तरी किस्ना ऐकेना. त्याने निरोप्याबरोबर पुन्हा निरोप पाठविला ''कुमक पाठवा'' आणखी पन्नास स्वार असले तरी बाराशे शिपायांना अन् त्या गोऱ्या साहेबालाही आपण पाणी पाजू इतका आत्मविश्वास त्याला वाटत होता. रामा किरवा नाईलाजाने त्याच्याबरोबर थांबला. आता लढण्याशिवाय पर्यायच नव्हता म्हणूनच मोर्चे बांधायला सुरुवात केली. दक्षिण दरवाजाच्या पायऱ्या चढून शत्रू येणे शक्य नव्हते असा बंदोबस्त करून ठेवला होता. दक्षिण बाजूला प्रचंड तुटलेला कडा होता तरी पळून जाण्यासारखी एक वाट होती आणि ती वाट थेट खिंडीत कोकणात निघत होती. कॅप्टनसाहेबाची तुकडी पुढच्या बाजूला आहे हे तो जाणत होता. पश्चिम दरवाजाच्या दोन्ही बाजूला चार चार लोक त्याने जय्यत तयारीनिशी ठेवले होते. त्यांच्याजवळ मोठमोठ्या दगडांचे ढीग ठेवले होते. पश्चिम दरवाजामध्ये यायचे म्हणजे घोडे येणे शक्यच नव्हते. त्या बाजूने कॅप्टनचे लोक येऊ लागले तर त्यांना शेसव्वाशे पायरी चढून यावे



लागणार होते. एकेक पायरी गुडघ्या एवढी उंच. वरही आठजणांची टोळी दबा धरून होतीच. दगडांचा मारा होताच एकेकाचा कपाळमोक्षच होणार होता. उत्तरेकडून अन् पूर्वेकडून वर चढून येण्यास घोड्यांना वाट होती, तीच बाजू लढविणे फार अवघड होते. त्या बाजूलाच जोरदार मोर्चे करणे भाग होते. गडावरून लढविणे सोपे असले तरी आणखी किमान काही सैनिकांची आवश्यकता होती. आणि निरोप जाताच पन्नास स्वार आले खरे पण त्याचवेळी पायथ्याशी हजार पाचशे माणूस झाडीतून चमकू लागले. आलेल्या स्वारांबरोबर पुन्हा पळून येण्याचाच संदेश आला होता. खाली पश्चिम बाजूला सारे बंडखोर दबा धरून बसले होते. पळून येणाऱ्या स्वारांना घेऊन गेल्याशिवाय ते तेथून हालणार नव्हते. नशिबाने गडावर तशी फारशी चीजवस्तू तरी अजून साठवली नव्हती. किस्ना हट्टाला पेटला होता. त्यांच्याकडे सर्वांचे लक्ष लागून होते.

* * *

आता कॅप्टन माकिनटोशने थोडीही उसंत खायची नाही असेच ठरविले होते. त्याने सर्व शक्तीनिशी रतनगडावर जायचे ठरविले. पूर्व दक्षिण बाजूने एकदम दोन टोळ्या गड चढू लागल्या. वर किती सैनिक आहेत याची काहीच कल्पना नसल्याने कॅप्टनने आता सर्वांनाच तयारीत रहावयास सांगितले. गडाची चढण उरावरची होती. तरी घोडी चढत होती आणि अचानक वरून प्रचंड दगडांचा मारा सुरू झाला. त्या दगडातून मार्ग काढीत जाणे अत्यंत अवघड होते. एकदम हजार माणूस वर येत होते. त्यांशी सत्तर पंचात्तर माणसे कशी झुंज देणार? पण किस्ना स्वतःच आघाडीवर होता. त्याची बंदूक अचूक निशाण करीत होती. एका पाठोपाठ एक सोजिर त्याच्या बंदुकीला बळी पडत होता. रानात किंकाळ्या उमटत होत्या. वर भरपूर लपणं होती, त्यामुळे कॅप्टन माकिनटोशच्या सैन्याला प्रतिकार करता येत नव्हता. केलेला प्रतिकार फुकट जात होता. तरी त्यांनी जोमाने वर जाण्याचे ठरविले होते. आणि एकेक टप्पा तो वरवर सरकत होता, तोच प्रचंड पाषाणखंड दक्षिण बाजूने कोसळल्याचा आवाज झाला आणि त्याचवेळी पाच दहा किंकाळ्या आसमंतात उमटल्या. आता कॅप्टनसाहेबांचे सैन्य चांगलेच खवळले होते. मागे तर फिरता येत नाही आणि खुद्द माकिनटोश गडावर चढला. वर येताच त्याने आपली बंदुक अतिशय जलद अन् अचूक सुरू केली. नाईलाजाने किस्ना अन् त्याच्या साथीदारांना हळूहळू मागे सरकावे लागले. साबरातून, करवंदीतून दडत लपत बंदुकांचे बार काढीत ते मागेमागे सरकत होते. किस्ना अन् रामा सर्वांना इशारे देत होता. आता कॅप्टन माकिनटोशला सैन्याच्या संख्येचा अंदाज आला होता. सारी शेपाऊणशे माणसे आहेत असे पाहताच त्याला चेव आला आणि त्याने साऱ्या सैन्याला स्फुरण दिले. त्याचा हात उंचावला जाताच वर आलेली घोडी उधळली. एका पाठोपाठ एक बंडखोरांकडील कळसूबाईचा जयघोष करीत खाली कोसळू लागला. एवढ्यात एक गोळी सूंऽऽ सू करीत थेट कॅप्टनसाहेबाच्या हॅटलाच घेऊन उडाली

तसा कॅप्टन माकिनटोश अधिकच चवताळला आणि त्याने जोरात पाठलाग केला. सर्व सैन्याला हुलकावण्या देत बंडखोरांकडील रामा आणि किस्ना पश्चिमेकडे सरकत होते. त्याने ओरडून साऱ्याला पळायला सांगितले होते आणि एकदम शेवटची एक फैर झाडून बंडखोर आपल्या गुप्त वाटेने झाडात दिसेनासे झाले. ते कोठून उतरतात तेच कळत नव्हते. किस्ना मात्र पळाला नव्हता. रामा किरवाला त्याने पळावयास सांगितले. आज साहेबाला संपविल्याशिवाय थांबायचे नाही असा त्याचा दृढनिश्चय होता आणि त्याने दुसराही अगदी अचूक निशाणा मारला. यावेळी जवळ आलेल्या गोळीला कॅप्टनने अचूक टाळले होते. त्याने आपल्या जवळच्या स्वारास हा कोण म्हणून विचारले होते आणि हाच तो किस्ना, गोविंदरावचा पोरगा असे कळताच कॅप्टनसाहेब त्याच्याकडे कौतुकाने पाहत होता आणि किस्नाने आणखी एक गोळी झाडली. कॅप्टनने वेळेवर उडी मारली नसती तर कॅप्टन स्वतःच खलास झाला असता. पण नशीब बलवत्तर होते. गोळी केवळ कोटाला चाटूनच गेली होती. आता मात्र कॅप्टनला अधिक काळ थांबता येणे शक्यच नव्हते. त्याने अचूक निशाणा साधला आणि एकच निर्णायक गोळी किस्नाच्या भरदार छातीतून तितक्याच जोरात शिरली. तरीसुद्धा किस्नाने शेवटचे एक लक्ष्य अचूक टिपले आणि त्या गोळीनेही नेमकी कॅप्टनसाहेबांची पोटरी भेदून घोड्याच्या पोटात जागा मिळविली. घोड्याच्या विचित्र हालचालीने कॅप्टन धाडदिशी घोड्यावरून खाली आपटला. कॅप्टन कोसळलेला पाहताच रोनाल्ड वगैरे लोक त्वरेने त्याच्याकडे धावले. असह्य वेदनेने कॅप्टन विव्हळत होता तर त्याची घोडी पोटात गोळी गेल्याने तडफडत होती. कॅप्टन साहेबाच्या पोटरीतून आरपार गोळी निघून गेल्याने त्याला फारशी इजा झाली नाही. त्यावर ताबडतोब नेहमीचेच औषध घालून बांधण्यात आले.

कॅप्टन माकिनटोशने एकवार मोठ्या कुतूहलाने किस्नाचा देह न्याहाळला. आता तो देह नेण्यासाठी कोणी ना कोणी तरी येईल या अपेक्षेने कॅप्टनने तेथे बराच वेळ थांबण्याचे ठरविले. पण दिवस निघून गेला, रात्र झाली तरी कोणाचाही पत्ता नाही असे पाहून कॅप्टनने ते प्रेत तसेच पडू दिले. पश्चिमेकडील कड्याच्या बाजूला प्रेते बेवारशी तशीच ठेवून कॅप्टनने डोंगरमाथ्यावरच्या वाऱ्याचा विचार करून, गुहांमध्ये थांबावयाचे ठरविले. दोन मोठमोठ्या गडदींमध्ये शिपाई शिरले. काही ठराविक निवडक लोक, कॅप्टन माकिनटोशने आपल्याबरोबर स्वतंत्र गडदीमध्ये ठेवले एवढे रणकंदन झाले. सुमारे पंधरावीस लोक ठार झाले, तरी बाकीचे पसार झाले होते आणि मुख्य म्हणजे गोविंदरावांचा मुलगा, किस्नाचे प्रेत अजून रतनगडावरच पडून होते. दगाफटका होण्याची शक्यता होती. रात्र चांगलीच झाली होती. लोकही दमले होते. दोन दिवसांची रपेट झाली होती. भुकावली पोटे यथेच्छ जेवली आणि जमेल तेथे आवडेल तेथे झोपली. उद्या सकाळी उठून पुन्हा सरकायचे होते. बंडखोर कोणत्या दिशेने पसार झाले हे माहित करून घ्यावयाचे होते. दमल्या जीवांना चटकन झोपा लागल्या, पहारेकरी जागत होते. कॅप्टन अगदी सुरक्षितपणे झोपला होता. झालेल्या जखमेने आणि मद्याने नकळत त्यालाही झोप लागली. मध्यरात्र



उलटून गेली होती, आता कोणी येत नाही असे ओळखून पहारेकरीही पेंगू लागले होते.

आणि एकदम बंदुकांचे आवाज झाले. पहारेकरी तळमळत धरणीवर कोसळले, काय होते आहे म्हणून सारेच खडबडून जागे झाले पण जागे होऊन पाहण्यापूर्वीच पश्चिमेकडील कड्याच्या बाजूला पडलेली प्रेते केव्हाच उचलून नेली होती. कॅप्टन माकिनटोश जेव्हा जागा झाला तेव्हा प्रथम त्याला पहाऱ्यावरच्या चार शिपायांची प्रेते पहावयास मिळाली. त्याने किस्नाचे प्रेत मुद्दाम पाहण्याचे ठरविले पण ते केव्हाच उचलून लंपास झाले होते. कॅप्टन माकिनटोश उभा पेटला. गड जिंकूनही तो हरला होता. पण दरोडेखोरांचे ठाणे येथेच जवळपास असले पाहिजे हे लक्षात येऊन तो गंभीर झाला. पण अगोदरच रागाच्या सपाट्यात गड उद्ध्वस्त करून टाकण्याची आज्ञा त्याने दिली. गड उद्ध्वस्त होत होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी छावणीवर हेर येऊन बातमी देणार होता. गडावरचे रात्रीचे गोळीबार रतनवाडीच्या कानात शिरले होते. जणू सबंध रतनगड मध्यरात्री हादरतो आहे की काय असे वाटत होते.

रामजी भांगरे अन् गोविंद खाडे यांनी किस्नाचे शव पाहिले आणि त्यांच्या अंगातील रक्त इतके भयंकर तापले की आता कॅप्टन माकिनटोशला जिवंत जाळण्याची प्रतिज्ञाच रामजी भागऱ्यांनी केली. स्वराज्याला अपशकुनी आभाळ फाटले! दुःखाला पारावार राहिला नाही! एकुलता एक अत्यंत शूर, कर्तबगार मुलगा त्या कॅप्टन माकिनटोशने संपविला होता. रामजी भांगरेंची अवस्था तशीच झाली होती. आपल्या एकुलत्या एका मुलीला वैधव्य प्राप्त झाले होते. लाडाकोडाने वाढलेली मुलगी पांढरे कपाळ घेऊन मिरवणार हे त्याला सहनच होत नव्हते.

* * *

गोविंदरावांनी आपल्या लाडक्या मुलाचे शव मांडीवर घेतले. त्याच्या काळ्याभोर लांब केसातून हात फिरविला. डोळ्यात पाणी तरारले होते. मनात विचारांचे काहूर माजले होते. लक्ष्या, वाळ्या, रामा किरवा सारेच गोंधळून गेले होते. गोविंदराव बराच वेळ काही बोलले नाहीत. गोविंदरावांनी स्वतःला सावरले. डोळे टिपले आणि सर्वांकडे पाहून म्हणाले, ''मुलाचे सार्थक झाले. पोरगा देशासाठी लढला. सवराज्यासाठी पडला. त्येचा सार्थक झाला! सार्थक झाला! त्येची सार्थक करायची तयारी करा'' गोविंदराव भावनावेगाने बोलत होते. गोविंदरावांनी तोल ढळू दिला नाही. त्यांनी इतर शिपायांप्रमाणेच त्याचे सार्थक केले, सर्वच गलबलले. घरी कडका लागू देऊ नका असा खुद्द गोविंदरावांनीच आदेश दिला. कड्या कपारीत ओहळांच्या कडेला, डांगाणाच्या, कोकणाच्या, पठाराच्या सर्वांच्या साक्षीने किस्ना स्वराज्यासाठी अनंतात विलीन झाला. आपल्या थोरल्या आईला मुक्त करताना तो स्वतः जीवनमुक्त झाला. चिता धडाडत होती. गोविंदराव अन् रामजी डोळे टिपत होते. रामा किरवा, लक्ष्या, वाळ्या त्यांच्या पाठीवर हात देऊन त्यांचे सांत्वन करीत होते.

चितेच्या धडाडत्या ज्वालांनी कोळी, ठाकर, कानडी अशा साऱ्या वनवासींची शरीरं पेटविली. लढता लढता मृत्यू आला तरी पळपुटेपणा करावयाचा नाही असा संदेशच जणू किस्नाने स्वतःचे बलिदानाने करून दिला होता. एकेक ज्वाला एकेकाचे अंतःकरण पेटवित होती. जळणाऱ्या चितेकडे एकवार आर्त संवेदनेने पाहिले आणि गोविंदरावांनी निघण्याची आज्ञा दिली.

* * *

थांबण्यात अर्थ नव्हता. किस्नाचे शव पळविल्याने शत्रू माग काढीत पाठीमागे येईल हे सहजच लक्षात येत होते. सारेजण कड्यांखाली जमले. उंच कापीव कड्यांकडे पाहतांना मधमाशांची मोठी मोहळं त्यांच्या नजरेत भरली. त्या मोहळाच्या माशा मोहळ काढतांना जसा एकच हल्ला करतात तसे त्यांनी करावयाचे ठरविले.

कॅप्टन माकिनटोश पूर्व बाजूला धरणे धरून बसला आहे हे जाणून गोविंदराव अन् वाळ्या उत्तर बाजूने अन् रामजी भांगरे, लक्ष्या अन् रामा किरवा दक्षिण बाजूने रतनगडच्या आश्रयाने राहिलेल्या कॅप्टन माकिनटोशला घेरा घालणार होते. दोन टोळ्या तयार झाल्या. आता दक्षिण अन् उत्तर बाजूने जाऊन कॅप्टनसाहेबाला गाठायचे म्हणजे लांबचा पल्ला गाठावयाचा होता. जुन्नर भागातून हरिश्चंद्राच्या मार्गाने वर येणे भाग होते. मैल मैल पसरलेल्या कापीव कड्याच्या भिंतींचा क्षणभर रागच आला होता. उत्तरेकडून वर चढायचे तर झाडवडाच्या बाजूने जागे भाग होते. शिवाय अन्य कोणी कॅप्टनसाहेबाबरोबर नाही ना हे पाहणे आवश्यक होते. डोंगराचा हा कडा जरी रतनगडपासून दहाबाराच मैल लांब होता तरी कॅप्टन माकिनटोशला तेथपर्यंत येणे अत्यंत अवघड होते. यावयास दोनच वाटा होत्या आणि प्रचंड दरीतून मार्ग होता. डोंगराचे मोठमोठे सुळके मध्येच उभे होते. मुळात रतनगडचा कडा उतरून येणेच अवघड होते. कॅप्टन माकिनटोश या जागेपर्यंत येईपर्यंत दोन बाजूंनी दूर निघून जायचे आणि मग त्याच्या गोंधळलेल्या अवस्थेत रतनगडावरून खाली उतरून त्याला याच कपारीत कंठस्नान घालावयाचे असा डाव त्यांनी आखला होता. स्वार दौडू लागले. चाळीसपन्नास मैलाची रपेट त्यांना मारायची होती. घोड्यांना पूर्ण सराव होता आणि मुख्य म्हणजे डोंगरातल्या रानच्या पायवाटा सर्वांना माहीत होत्या. एक दिवसामध्ये रपेट करून रात्री आपण गडावर येऊ शकू याची खात्री सर्वांनाच होती. मोठ्या त्वेषाने हा कावा त्यांना करावयाचा होता. या कपारीतून जेथे किस्नाने आपला देह ठेवला तेथेच कॅप्टन माकिनटोशची समाधी बांधण्याचा मनसुबा गोविंदरावांनी व त्यांच्या साथीदारांनी केला होता.

किस्नाचे प्रेत पळवून नेलेल्या माणसांचा शोध घेता आला नाही म्हणून खवळलेला माकिनटोश लगेच रतनवाडीतून रतनगडाच्या परिसरातून त्यांचा माग काढीत पाठलाग करणार होता. पण रतनगडाच्या कड्यावरून समोर केवळ झाडांचा समुद्र पसरल्यासारखा दिसत होता. त्या झाडातून डोंगराचे उंच उंच सुळके वर डोकावतांना दिसत होते. त्या कपारीत भर उन्हातही धुक्याचे साम्राज्य पसरल्याचा भास होत होता. जीवघेणा खोल कापीवकडा तळ कोकणात उभा असलेला, डोळे फिरवित होता. एकदम एकाकी जाणे धोक्याचे वाटत होते. जवळ फौज होती तरी ती पुरेशी नाही हे आता कॅप्टनसाहेबाला कळून चुकले होते. त्याच्या पोटरीतील जखम त्याला ते सांगण्यास पुरेशी होती. म्हणूनच तो अन्य सर्व फौजा नीट सगळीकडून सरकताहेत की नाही हे जाणून घेण्यासाठी हेराची वाट पाहत होता. त्यांनी केलेल्या तीन टोळ्या नासिक, भिवंडी शहापूर व पुणे-शिरूर भागातून या दरीमध्ये शोध घेत घेत येणार होत्या. ठाणे, पुणे, नासिक, नगर या चार मोठ्या विभागांच्या बेचक्यात स्पर्शरेषेवर असलेल्या या दऱ्याखोऱ्यांमध्ये, कड्याकपारींमध्ये राहूनच हे सारे दरोडेखोर कार्यवाही करतात हे आता स्पष्ट झाले होते. ते केवळ दरोडेखोर म्हणूनच त्यांची उपेक्षा करणे योग्य नाही हे आता इंग्रज सत्तेला कळून चुकले होते म्हणूनच सारा खटाटोप सर्व प्रकारची खबरदारी घेऊनच चालला होता.

* * *

एवढ्या वेळात वास्तविक पाहता तीनही बाजूंनी फौजा पुढे पुढे सरकून येथपर्यंत निदान आसपास तरी येणे आवश्यक होते. कारण रतनगडावरच ज्या अर्थी एवढे कंदन करावे लागले त्या अर्थी अन्य कोणत्याही मोहीमेवर दरोडेखोर गेलेले नाहीत हे कॅप्टनसाहेबाच्या लक्षात आले होते. शिवाय फितूर वाटाड्यांना त्यांची सवय पूर्ण माहिती होती. वैशाखाचे दिवस आले की सारे लोक आपापल्या शेतातून राबण्यासाठी घरी जातात हे त्यांना माहीत होते. म्हणजे नक्कीच कोणत्याही मोहीमेत गुंतलेले नसावेत या विषयी खात्री होती आणि कॅप्टनसाहेबाच्या अपेक्षेप्रमाणे निरोप घेऊन येणारा स्वार आला. त्याने कोकण आणि नासिक भागातून फौजा थेट ह्या रानात येऊन दाखल झाल्या आहेत असा निरोप आणला होता. कॅप्टन माकिनटोश आनंदला. आता त्याला फक्त पुणे भागातून काय घडले हे जाणून घेण्याची उत्कट इच्छा होती आणि तोही निरोप आला. जुन्नर भागातून फौजा आता या दऱ्यांकडे सरकल्याचे वृत्त तो घेऊन आला. आता कॅप्टन माकिनटोश पूर्ण निर्धास्त झाला होता. त्याने मग आपल्या सर्व फौजेला सावध होऊन रतनगड ओलांडून खाली उतरण्याची आज्ञा दिली. स्वतः तो पुढे पुढे जात होता. रतनगडाचा अवघड कडा आणि त्यातून निघणारी, अगदी बारीक शिरेची उतरण, एका बाजूची. तेवढ्या उतरणीवरून घोडी पळवित न्यायची होती. एकावेळी एकच स्वार जाऊ शकेल एवढीच जागा होती. कॅप्टनसाहेबाने अवजड सामान मागेच ठेऊन द्यावयाचे ठरविले. दारूगोळा आणि तलवारी सज्ज ठेवून कॅप्टन स्वतः सर्वांच्या पुढे निघाला. कॅप्टन माकिनटोश धाडसी तसाच जिद्दी होता. तो सरसावून पुढे पळत होता पण हा भाग अनोळखी असल्याने त्या सैन्यातील लोक मध्येच घरंगळत होते, धडपडत होते. तरी सावध होते. साहेब धावत होता. त्याच्या पाठोपाठ तेही

धावत होते. आता दरोडेखोरांची गाठ कोठे पडेल हे सांगता येत नव्हते. समोरचा मार्ग नीट दिसत नव्हता. आपल्या फौजा अजून दृष्टीपथात येत नव्हत्या आणि रतनगडाच्या पायथ्याशी येऊनही अजून दरोडेखोरांचा मागमूस लागत नव्हता. इतक्यात सारे रान हलू लागले. सूर्य कलला होता. थंड वारे अधिक थंड बनले होते. कड्याकपारींनी मात्र श्वास रोखले होते, रानात एकदमच वादळ सुरू झाल्याप्रमाणे हालचाल सुरू झाली होती. कॅप्टन माकिनटोशने आपल्या टेहळेकऱ्यांना जरा उंच टोकावरून टेहाळणी करावयास सांगितले. टेहळे दोन बाजूंना जाऊन माकडासारखे उंच झाडांवर चढून त्यांचे डोळे शोध घेत होते आणि त्यांना दिसले ते विपरित होते. दक्षिण बाजूने आणि उत्तर बाजूने शेतीनशे, शेतीनशे स्वारांच्या टोळ्या भरधाव वेगाने रानात शिरत होत्या. कोठल्याही प्रकारचा आरडाओरडा नव्हता. ससे गवतातून लपत छपत भरधाव वेगाने पळावेत तसे. हे सारे का पळत असावेत कळत नव्हते. कारण भराभर त्या टोळ्या मधल्या कड्यांच्या बेचक्यात असलेल्या रानात नाहीशा झाल्या तरी मागून कोणी येत असलेले त्यांच्या लक्षात येत नव्हते.

टेहळे खाली उतरून जेव्हा कॅप्टन माकिनटोशला हे सर्व सांगू लागले तेव्हा कॅप्टन माकिनटोश मंद स्मित करीत होता. त्याच्या योजनेला बरोबर यश येऊ लागले होते. गोविंदराव, रामजी, लक्ष्या, वाळ्या, रामा किरवा त्यांच्या साथीदारांसह कड्यांच्या कोंडीत रानाच्या बेचक्यात एकत्र कोंडला जात होता. त्यांची होळी करणे आता अगदी सहज शक्य होते. तीनही बाजूंकडून टोळ्या पाठोपाठ येण्याची तो फक्त वाट पाहत होता. चोहोबाजूंनी हल्ला चढवून सर्व दरोडेखोरांना जिवंत वा मेलेले पकडावयाचे हा त्यांचा मनसुबा होता.

* * *

बेचक्यातल्या रानाच्या हालचाली एकदम थंडावल्या होत्या. त्या रानात पाच सहाशे स्वारांचे नेमके काय चालले असेल हे कळणे शक्यच नव्हते. पण नक्कीच काही तरी निश्चित अशी योजना आखली जात होती.

दक्षिणेकडून अन् उत्तरेकडून गोविंदराव अन् रामजींच्या टोळ्या निघाल्या खऱ्या पण पंधरावीस मैलांची रपेट झाली नसेल तोच समोरून मोठी फौज दरीच्या दिशेने आपल्याच बाजूने चालून येत आहे हे त्यांच्या ध्यानी आले. आता पुढे जाण्यापेक्षा डोंगरदरीतच यांना येऊ दिले तर आपण सहज त्यांचा धुव्वा उडवू असा विचार करून सारे परत फिरले होते; पण जेव्हा दोन्ही बाजूला असेच सैन्य आले आहे हे लक्षात आले तेव्हा सारेच चिंतातूर झाले होते. दाट झाडीच्या गर्द अंधारात सारी फौज एकत्र झाली होती. आता एकच मार्ग पळून जाण्यास शिल्लक होता तो म्हणजे पश्चिमेकडचा. पश्चिमेकडच्या बाजूने पळून जावे असा विचार लक्ष्याने मांडला. तोच ताडकन गोविंदराव बोलले, ''आता पळून जायाचं नही. मरण आला तरी चलन पर उलटायचा आन त्या कॅप्टनसायबालीच पकडायचा. आता पळून जावून काय उपेग. कुठूनबी ग्येलं त सैन्य हायेच. त्यापक्षी लढून मेलेलं काय वाईट!''



लक्ष्याचे मत मात्र भिन्न होते. आपण अगदीच खिंडीत सापडलो आहोत. घाटात दिवस मावळला आहे. अशा परिस्थितीत आपण पळून गेलो तर पुन्हा साहेबाचा सूड उगवू शकू. उलट आपण लढू लागलो तर चहुबाजूनी येणारे सैन्य आपल्यापैकी एकालाही शिल्लक ठेवणार नाही. पण रामजींना हा सल्ला पटला नाही. किस्नाच्या मृत्यूनं सूडाची भावना आता अत्युच्च शिखराला पोहचली होती. आता एकदा त्या साहेबाचा सोक्षमोक्ष लावूनच टाकला पाहिजे. नाहीपेक्षा मरण बरे पण आता पळून जायचे नाही. लक्ष्या सांगत होता, आता वैशाखाचा तेवढा महिना कसाबसा काढला की पावसाळा सुरू होईल. पावसात लढण्याची कॅप्टनसाहेबाची हिम्मत नाही. आपण पडत्या पावसात त्याच्या छावण्या बेचिराख करून टाकू म्हणूनच आता पळून जाणे आवश्यक आहे. पण गोविंदरावांच्या हट्टापुढे कोणाचेच काहीच चालेना आणि एकदम कॅप्टन माकिनटोशवर हल्ला चढवावयाचा असे ठरले. मरू पण परत फिरणार नाही अशी शपथ सर्वांनी घेतली.

एकाएकी बराच वेळ स्तब्ध असलेले रान वादळही हालले. ''हर हर महाऽऽदेव'' ची गर्जना आसमंतात घुमली. आग्या मोहळाच्या माशा आपल्या वैऱ्यावर एकदम तुटून पडाव्यात तशी सहाशे शिपायांची पलटण कॅप्टन माकिनटोशच्या सैन्यावर धावली. चवताळलेल्या फड्या नागासारखी गर्द झाडीतून आडवीतिडवी वळणे घेत घोडी पूर्व दिशेला उधळली.

कॅप्टन माकिनटोश अजून येणाऱ्या आपल्या टोळ्यांचाच विचार करीत होता. त्याला काय होते आहे हे समजण्याच्या आतच त्याच्या फौजेची दाणादाण उडाली. बंदुका बरसत होत्या आणि कॅप्टनसाहेबाच्या टोळीतील एकेक सैनिक वादळात सापडल्या उंबराची फळे टपाटप पडावीत तशी, पटापट खाली पडत होते. किंकाळ्या उठत होत्या आणि कॅप्टन माकिनटोश केवळ बावरल्या नजरेने या रणकंदनाकडे पाहात होता. काही क्षण गोविंदरावांची सेनाच फक्त मारामार करीत होती. सैन्याला सैन्य भिडले होते. बंदुका कडाडण्याऐवजी तलवारीचे खणखणाट उमटत होते. गोविंदरावांनी साहेबाचा शोध घेतला. कॅप्टन कड्याखालच्या एका खोल कपारीत आपल्या साथीदारांसह दबा धरून बसला होता. कपारीपुढे पडलेल्या प्रचंड शीलाखंडामुळे त्याला चांगलाच आडोसा मिळाला होता. त्याचे अस्तित्व लक्षात येत नव्हते. घोडी दूर झुडपाला खुंटविलेली होती. त्यामुळे शोध घेणाराची फसगत होत होती. एका बाजूला उभी असलेली घोडी पाहून गोविंदराव आणि लक्ष्या त्या दिशेने पळाले. त्यांच्या मागोमाग पाचपंचवीस अन्य स्वारही पळाले. सर्वांच्या पुढे गोविंदराव त्वेषाने निघाले होते. पण छोटीशी दरड चढून गेले की ती जनावरे टप्प्यात येणार होती. दरड चढायला सुरुवात झाली आणि एकदम मागच्याच बाजूला आर्त किंकाळी उठली. गोविंदरावांनी सावधगिरीने मागे पाहण्याऐवजी समोरची हालचाल निरखली. शीला खंडाच्या मागे काही हालचाल चाललेली लक्षात येताच त्या दिशेने घोडे फेकले आणि पाठोपाठच्या स्वारांनीही त्यांचे अनुकरण केले. एकदम बंदुका कडाडल्या पण कॅप्टन माकिनटोशला त्या शीलाखंडाचा चांगलाच आश्रय मिळाला होता. घोडी जवळ गेली आणि पुन्हा एकदा फैर झडली. शीला

खंडामागूनही गोळ्या येत होत्या आणि एका पाठोपाठ एकेक स्वार त्या दरडीवरून खाली गडगडत जात होता. खाली पडणाऱ्या एकेका स्वारांबरोबर गोविंदरावांचा संताप वाढत होता. गोविंदरावांनी पुढे मुसंडी मारली. आता अगदी शीलाखंडाच्या जवळ शंभर फुटावर ते येऊन पोहोचले होते तोच कॅप्टनसाहेबाच्या मदतीला रोनाल्ड धावला. एका बाजूला तुंबळ युद्ध चालू असताना रोनाल्डचे लक्ष मात्र आपल्या साहेबाकडे लागले होते. त्याने काही क्षणापूर्वीच त्या कपारीच्या बाजूला जाणारी एक तुकडी पाहिली होती. पण समोरून एकदम हल्ला करणाऱ्या स्वारांशी झगडताना एकदम धांदल उडाली होती. त्याने आपल्याबरोबर मागच्या बाजूने पन्नास पाऊणशे स्वार त्या कपारीकडे आणले होते. वरच्या बाजूने येणे सहज शक्य होते आणि मग मात्र लगातार, ढगांचा गडगडाट. विजेचा कडकडाट व्हावा तशा बंदुका कडाडत होत्या आणि पाठोपाठ किंकाळ्या उठत होत्या. गोविंदराव आपल्यावर होणारा हल्ला पाहात होते. पण क्षणभरही अंतःकरणात खचत नव्हते. अधिकाधिक त्वेषाने ते निशाणीबाजी करीत होते. अंतर कमी झाले आणि पायउतार होऊन सैनिक तलवार करू लागले. गोविंदरावही आता आपली तलवार घेऊन घोड्याला टाच देऊन समोरच्या सैन्यात एकदम मुसंडी मारून घुसले. एका पाठोपाठ गर्दना कापण्याचा त्यांनी सपाटाच लावला. कॅप्टन माकिनटोश एव्हाना या गर्दीत कपारीच्या बाहेर पडून बरोबर आपल्या घोड्यांकडे सरकला होता. गोविंदराव, लक्ष्या आणि तिकडच्या बाजूला रामजी भांगरे, रामा किरवा आणि वाळ्या अतिशय त्वेषाने झुंजत होते. आता बंदुकाचे बार जरी कमी झाले होते तरी किंकाळ्यांची संख्या मात्र अधिकच वाढत होती. तिकडे कॅप्टनसाहेबाने आपले घोडे पलीकडे दामटले. त्याच्याबरोबर केवळ दोनचार स्वार होते. त्यांची घोडी पलिकडच्या बाजूला दौडत होती आणि त्याच्या पलीकडे जाणाऱ्या घोड्यांकडे एकाचवेळी रोनाल्डचे आणि गोविंदराव आणि लक्ष्याचे लक्ष गेले. गोविंदराव चवताळले होते. त्यांनी आपल्या घोड्याचे तोंड फिरविले आणि दुसऱ्याच क्षणी त्यांनी भरधाव वेगात त्या दरडीवरून घोडा फेकला. आपल्या घोड्यावर त्यांची जबरदस्त पकड होती. पाठोपाठ दौडणाऱ्या स्वारांकडे त्यांचे लक्षही नव्हते. कॅप्टन माकिनटोशच्या ध्यानात आले तरी कॅप्टनसाहेब पुढेच पळत होता. त्याच्या दृष्टीने हेच घडावयास हवे होते. चढाई करून भान हरपून लढणारे गोविंदराव आणि त्यांचे साथीदार पुन्हा एकदा खालच्या बाजूला येणे आवश्यक होते. कॅप्टनसाहेबाजवळ असलेल्या हजार शिपायांची दाणादाण उडविली होती गोविंदरावच्या सहाशेच लोकांनी. त्यांनी ही दरी त्यांच्या मृत्यूचे स्थान आहे हे दाखवून दिले होते. हजार बाराशे पैकी शेपाचशे लोकच तेवढे शिल्लक होते. त्या तुलनेत समोरचे दरोडेखोर मात्र शेर ठरले होते. म्हणूनच त्यांचे लक्ष विचलित करणे आवश्यक होते. गोविंदरावांचे लक्ष केवळ आपल्यावर आहे हे कॅप्टनसाहेबाच्या वेळीच लक्षात आले होते पण त्याने अजूनही सरळ सरळ गोविंदरावांवर हल्ला चढविला नव्हता. त्याची योजना वेगळीच होती. गोविंदरावच्या मागून लोक पळताहेत हे लक्षात येताच अनेक लोकांनी आपली घोडी त्याच दिशेने फेकली. रामजी भांगरे आणि रामा किरवा यांच्या लक्षात ही गोष्ट येताच रामजींनी वेगळीच युक्ती लढविली. त्याने इकडे तिकडे उगाचच झाडांच्या मोठमोठ्या शीलांच्या आड आपला जीव घेऊन उभ्या असलेल्या घोड्यांच्या पायावर निशाणबाजी सुरू केली. तसे चारसहा घोडी एकदम लाथा झाडीत पिसाळलेपणाने स्वैर उधळली आणि त्यांचेच अनुकरण अनेक घोड्यांनी केले आणि रानात एकच धांदल उडाली. या संधीचा फायदा घेऊन रामजींनी आपली आघाडी सोडली नाही. तेथे जोरदार हाणामारी सुरू झाली, कॅप्टनसाहेबाच्या सैन्यात मात्र आता चांगलीच घबराट उडाली होती. त्यामुळे जीवाच्या भीतीने पोटार्थी असलेले हे लोकही घोड्याप्रमाणेच इकडे तिकडे उधळले. एवढ्या गर्दीत गोविंदरावांकडचेही शेसव्वाशे लोक धारातीर्थी पडले होते. परंतु एकही मोहरा ढळला नव्हता आणि कॅप्टनसाहेबाच्या सैन्याची होणारी दाणादाण पाहताना गोविंदरावांच्या साथीदारांत अधिक वीरश्री संचारत होती. ते त्वेषाने तुटून पडत होते आणि कॅप्टनसाहेबाकडची संख्या हळूहळू कमी होत होती.

* * *

आणि एवढ्यात चोहोबाजूंनी रान एकदमच कडाडले. रानाच्याभोवती प्रचंड सैन्याचे सज्जकडें, गोविंदराव, रामजी, लक्ष्या, रामा किरवा, वाळ्या यांच्या आणि त्यांच्या साथीदारांच्या डोळ्यापुढे दिसू लागले. आणि साथीदारांचे अवसानच गळाले. पण परिस्थितीचा विचार करीत बसण्यात आणि हताश होऊन पळण्याचा प्रयत्न करण्यात आता अर्थच नव्हता. वाघाच्या शिकारीसाठी चोहोकडून रान उठवावे आणि वाघाला कोंडीत पकडावे; त्या कोंडीतून सुटण्यासाठी वाघानेही दबा धरून बसावे तशी अवस्था झाली. गोविंदरावांकडचे चार साडेचारशे सैनिक समोरच्या चार हजाराच्या गराड्यापुढे काय करणार होते? घोडे आता गोविंदरावांना अन् त्यांच्या साथीदारांना रेटीत रेटीत पुढे पुढे सरकत होते. कॅप्टन माकिनटोशने पवित्रा बदलला. त्याने स्विफ्टला काहीसे सांगावयास सांगितले. स्विफ्ट गरजला, ''गोविंदराव खाडे, रामजी भांगरा शस्त्रे फेकून शरण या, तुम्ही सर्व बाजूंनी घेरले आहात.'' स्विफ्ट ओरडला. तरी त्यांचा समोरच्या सैन्यावर काहीच परिणाम झाला नाही. तो पुन्हा ओरडला, ''मुकाट्याने अन् शहाणपणाने शरण या, शस्त्रे टाकून द्या शरण आलात तर सैन्यात नोकऱ्या देऊन जिवंत सुटाल अन्यथा...'' पण त्याचे पुढील वाक्य पूर्ण होण्याच्या आतच गोविंदरावांनी जोरात ओरडून चेतना दिली. ''अरं माह्या भावानु तुमी आईसाठी लढता, स्वराज्यासाठी लढता, आता शरण जाऊन आईच्या खाटाव जानार का आईची सेवा करीत मरनार? अरं आपुनी रानचं वाघ हाये. वाघ शरण जात नसतु. मरतानायबी शत्रूवर झ्याप मारतो. बोला हर हर महाऽ ऽ देव'' अन् पाठोपाठ उमटलेल्या गर्जना आसमंतात त्या रानाला, सह्याद्रीच्या कणखर कड्यांना भेदून गेल्या. आभाळ कोसळतेय की काय, धरणी दुभंगते की काय की प्रलयकाळ जवळ आला की वादळात सापडून सर्व पृथ्वीच चक्रात फिरू लागली. काही कळेना. गोविंदरावांचे स्वार मरणाच्या त्वेषाने शत्रू सैन्यावर तुटून पडले. मरणाचे भय होते कोणाला! बंदुका कडाडत होत्या.

तलवारी खणाणत होत्या. वणव्यासारखा रणाग्नी सर्वांच्या अंगात संचारला होता. त्याही परिस्थितीत कॅप्टन माकिनटोश गोविंदरावांच्या धैर्याने अन् शौर्याने थक्क झाला. दिपून गेला. गोविंदराव अन् रामजी भांगऱ्याला जिवंत पकडून आणण्याची आज्ञा दिली होती. पण अमुक प्रकारे पकडून वा मारून असे म्हणण्याला त्या वणव्यात अवधीच कोठे होता. प्रेते अस्ताव्यस्त होऊन पडत होती. कोणाचे हात, कोणाचे पाय, कोणाचे शीर इतस्ततः पडत होते. कोणाच्या छात्या रक्तबंबाळ होत होत्या. कोणी आचके देऊन संपत होते. कोणी तळमळत मरण यातना सोसत असताना घरादाराची याद करीत होते. काय चालले आहे, काय घडते आहे हे कोणालाच कळत नव्हते. आपले कोण, परके कोण हेही समजत नव्हते. कॅप्टनसाहेबाच्या सैन्याची सरशी होत होती. मूठभर सैन्याचा एवढ्या सैन्यापुढे टिकाव कसा लागणार? ह्या गदारोळात रामा किरवा अन् लक्ष्या यांनी वेगळाच स्वतंत्र निर्णय घेतला होता. या कोंडीतून पळून जाण्याचा निर्णय घेतला होता. या कोंडीतून पळून जाण्याचा धाडशी निर्णय! या चाललेल्या रवंदळा रंवदळीत कोण कोणाला ओळखू येणार नाही. पळून गेले तर कळणार नाही असे समजून सापडलेल्या साथीदाराला आपल्याबरोबर यावयास सांगून पळून जाण्याचे ठरविले होते. आपण पळून गेलो तर गोविंदराव, रामजी, वाळ्या आणि किस्ना यांचा सूड घेऊ शकू हे त्यांच्या मनी होते. नगर भागात भिल्लांच्या टोळ्या एकत्र येत होत्या. पुणे विभागातूनही त्यांना प्रतिसाद मिळत होता. त्यांच्याशी रामा किरवाने अन् किस्नाने अगोदर संधान बांधले होते. तिकडेच पळून जायचे ठरले होते. आणि बरोबर वेळ साधून पन्नास पाऊणशेची एक भक्कमशी तुकडी कशी निसटली हे समजलेच नाही. समोरच्या शत्रूला नामोहरम करण्याच्या नादात आणि मुख्य म्हणजे गोविंदराव आणि रामजी समोर दिसत असल्याने कोणी त्यांचा पाठलाग केला नाही. ती टोळी अखेर पळून जाण्यात यशस्वी झाली. हळूहळू गोविंदरावांच्या सैन्याची संख्या कमी होत गेली. आता अवघे शेपाऊणशे लोक शिल्लक राहिले होते. बाकीचे केव्हाच पूर्ण स्वातंत्र्याचा उपभोग घेत होते! त्यांना स्वर्गात स्वराज्य मिळाले होते! नियतीने सूड उगवला होता! वाळ्याने मात्र गोविंदराव अन् रामजीची साथ सोडली नाही. लक्ष्या पळून गेला तरी तो मात्र टिकून होता. पाचपन्नास उरले तेही आता शरण गेले होते. शरण आले त्यांना पकडून झाडांना बांधून ठेवण्यात येत होते. तरी देखील शरण जाणाऱ्यांची अस्मिता उफाळून येत नव्हती. उरले पंधरावीस स्वार अन् गोविंदराव, रामजी, वाळ्या देहभान विसरून, कोण राहिले कोण गेले याचा विचार न करता लढत होते. कॅप्टन आता वेगळीच योजना आखीत होता. आता आणखी वेळ तो गोविंदरावांना द्यायला तयार नव्हता. त्याने दोराचे फास घेऊन आपल्या चार खंद्या शिपायांना रामजी अन् गोविंदरावांवर पाठविले आणि रामजी, गोविंदजी दोराच्या फासात अडकले. आवळले गेले. कोसळले. दोघे कोसळताना पाहताच वाळ्या तलवार करीत पुढे सरसावला. त्याच्या वीरश्रीला तोड नव्हती. प्रत्यक्ष वीज रानात अवतरली की काय असे भासले! पण मागच्या बाजूने मृत्यू त्याच्याकडे प्रलयंकर बनून धावत होता. गोविंदराव अन् रामजी ओढले जात असतांनाच वाळ्या रक्ताच्या थारोळ्यात खाली कोसळत होता. गोविंदराव अन् रामजी भांगरे पकडले गेलेले पाहताच बाकी सारे लोक शरण आले. गोविंदरावांच्या मनातील स्वराज्याचा उदयोन्मुख सूर्य उगवण्यापूर्वीच अस्तास गेला! पश्चिमेकडील सूर्यही अस्तास जात होता! पश्चिम भगवी झाली होती तशीच डांगाण, कोकणची तांबडमातीही अधिकच तांबडी झाली होती!



दुसऱ्या दिवशी सकाळी कॅप्टन माकिनटोशचे सैन्य साऱ्या कैद्यांना घेऊन निघाले होते. स्वार दौडत होते. फौज पुढे पुढे जात होती. हरिश्चंद्रगडाच्या पायथ्यापासून सारी फौज चालली होती. माळशेजच्या खिंडीतून काही हल्ल्याचा भास कॅप्टन माकिनटोशला झाला. अचानक दोन स्वार पुढे आले आणि बंदुकीची फैर झाली. पटापट रोनाल्ड आणि पीट कॅप्टनसाहेबाच्या डोळ्यादेखत एवढ्या मोठ्या फौजेच्या साक्षीने खाली कोसळले. ते संपले होते. पण त्याचवेळी समोरचे स्वारही रक्ताच्या थारोळ्यात पडले होते. कॅप्टनसाहेबाला रोनाल्ड आणि पीटच्या मृत्यूच्या दुःखापेक्षा या स्वारांच्या आगमनाचे अन् हल्ल्याचे अधिक कौतुक वाटले. त्यातला एक स्वार स्त्री होता. डोक्याला भरगच्च मळवट भरलेला होता. केस मोकळे, हिरवी वस्त्रे परिधान केलेली आणि हातात बंदुकी गच्च पकडलेली. ती एक तेजस्वी स्त्री होती. रणचंडीका! ती रुक्मिणी होती. किस्नाची बायको. तिच्या पाठोपाठ पळत आला होता, गोविंदरावांचा एकनिष्ठ चाकर रख्म्या. त्या तेजस्वी जीवांना रानाच्या कुशीत सोडून जाताना ती खिंड शहारली. हातपाय करकचून बांधलेल्या अवस्थेत गोविंदजी रामजींनी अभिमानाने या रणचंडीकेचे अखेरचे दर्शन घेतले. साश्रूनयनांनी त्या दोन महात्म्यांना वंदन करीत गोविंदराव अन् रामजींनी डोळ्यावर कातडे ओढले.

सैन्य पुढे पुढे जात होते. अहमदनगरच्या वाटेने डांगाणला सोडून अन् वनराजांना घेऊन!

उद्ध्वस्त झालेले डांगाणातील रतनगड-हरिश्चंद्र, अळंगा कुळंगा, पाबरगड, पट्टागड अन् रतनगड आपल्या या स्वराज्याची उर्मी बाळगतानाच कोमेजून जाणाऱ्या रानफुलांकडे भरल्या नजरेने, ओथंबल्या अंतःकरणाने पाहत होते. अजूनही उगवणाऱ्या अंकुराची आशा त्यांच्या भरल्या अंतःकरणात स्फुरत होती!

लक्ष्या अन् रामा किरवा भिल्लांच्या टोळीत सामील झाले होते. विजयादशमीच्या मुहूर्तावर नव्या मोहीम सुरू झाल्या होत्या. सूडाच्या भावनेने मनं पेटली होती. सारं रान त्यांच्याकडे उत्सुकतेने पाहात होतं.

एका चांदण्या रात्री गोविंद खाडे अन् रामजी भांगरे अहमदनगरच्या जेलमध्ये गजावर डोके टेकून सचिंत हताशपणानं उभे होते. त्याचवेळी बाहेर शिपायांत चर्चा चालू होती. शंकऱ्या भिल्लानं उभ्या नगर जिल्ह्यात धुमाकूळ घातलाय. रामा किरवा कोळी अन् लक्ष्या ठाकर त्याच्याबरोबर आहेत. गोविंदजी अन् रामजींनी डोके वर केले आणि एक केविलवाणा कटाक्ष त्या बोलत्या शिपायांकडे टाकला अन् त्यांची नजर सहज आकाशातल्या चंद्राकडे गेली.

चंद्राला केवढे थोरले खळे पडले होते !

●●●

| | | |
|---|---|---|
| गडदी | – | कोरीव गुंफा |
| वंगविणे | – | वंगण घालणे, तेल देणे |
| पावखलक | – | पायदळ, पायी चालणारे |
| मुरसड | – | झीट, फीट, तोंडाला फेस येणे, गरगरणे |
| तक्षीमा | – | मर्यादा |
| तिरीमिरी येणे | – | चक्कर येणे |
| झांब्रे | – | अस्ताव्यस्त वाढलेल्या केसांचा |
| झिपऱ्या घर | – | गवताच्या पेंढ्यांनी शाकारलेले घर डोक्यावरच्या वाढलेल्या केसांसारखेच दिसते |
| पीढे | – | बसायचे लाकडी आसन (पाट) |
| वेढ्यावर | – | लांबच्या रस्त्यावर |
| पेन | – | देण्याघेण्याचा लग्नातला विधी (साखरपुड्याचा विधी) |

**संदर्भ सूची**

१) गारे गोविंद, महाराष्ट्रातील आदिवासी, महादेवकोळी, सहाध्यायन प्रकाशन, मुंबई.
२) सहस्रबुद्धे अनिल, चाळीसगाव डांगाण परिसर–सांस्कृतिक वाङ्मयीन व भाषिक अभ्यास, पुणे विद्यापीठाच्या पीएच.डी. पदवी परीक्षेसाठी सादर केलेला प्रबंध, १९७९.
३) GHURVE G. S., The Mahadeo Kolis A Scheduled Tribe, Pupular Book Depot, Poona.
४) GAZATTEERS OF INDIA, MAHARASHTRA STATE, AHMEDNAGAR DISTRICT, Second Edition (Revised)
५) तालुका सेन्सस हॅण्ड बुक, अकोले तालुका तहसीलदार कचेरी, अकोले.
६) टाकळकर पुरुषोत्तम यांचेकडील जुनी कागदपत्रं.
७) दाण्डेकर गोपाल नीलकंठ, किल्ले, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९७९.

●●●



**Gazetteer of India - Maharashtra State, Ahmednagar District.**

Koli Risings,1822 : Nearly twenty years of British rule passed before the warlike Kolis of the western hills were brought to order. The beginning oýÿ troubles arose out of an unfortunate mistake. Ramji Bhangria, who in his youth had been a famous outlaw and during the latter years of Bajirav's reign had become a most useful police officer, on the establishment of British rule, waited on the Collector and was appointed chief constable or *jamadar* of one of the hill police posts. According to custom in addition to his pay, Ramji received as a yearly meeting or *bhet*present from every village a rupee, a fowl, and some rice, and a sheep from every flock that passed through his charge. Ramji did good service until an order came that no Government servant was to take any present in addition to his pay. This order was applied to Ramji and his chickens; he wrote to ask that an exception might be made in his favour, and as he got no answer to his letters he asked for his discharge. His discharge was refused and he was given six months' leave. At the end of the six months' leave as nothing was done to raise his salary or to make up for his loss of perquisites he went into outlawry. Ramji Bhangria's chief supporter was a Koli named Govindrav Khari. Govindrav had been commandant of the hill fort of Ratangad about twenty-two miles west of Akola under the Peshwa. On the Peshwa's fall he remained staunch to his master, and under the plea of age, refused employment under the British government. In the reductions of hill fort garrisons which followed the establishment of order, twelve of Govindrav's kinsmen, who had formed part of the Ratangad garrison, were thrown out of employment and were also deprived of the revenues of a village to which as commandants of the fort they had hereditary claims. Govindrav and his kinsmen and several other discontented people went to the hills and in the latter part of 1828 were joined by Kamji Bhangria from the Konkan. In January 1829, in consequence of news that there were several hundred Kolis in the Akola hills and that the people were in great alarm, Captain Mackintosh went with a detachment of police to the Sahyadris. At first, though almost no village had not its two or three representatives in the gang, no information could be got. The Brahman *kulkarnis,* some of whom were abetting the rising, advised that troops should not be sent after the Kolis but that some arrangement should be made to redress their grievances. Captain Mackintosh for a time took little notice of the gang beyond sending them word that no letters or petitions could be attended to till they had laid down their arms. He busied himself in accustoming his men to the roughest tracts which the Kolis used, and gathered information regarding the strength of the outlaws, the names of their

leaders, the people who were likely to help them, and the places where they were in the habit of meeting. He also took pains to gain the goodwill and co-operation of a number of the people. When his information was completed a detachment from Bhiwndi was stationed at the bottom of the passes leading into the Konkan, and other detachments from Malegaon, Ahmadnagar, and Poona were posted in the most suitable places, and lightly equipped parties kept constantly searching the Kolis' haunts and lurking places. A few days before the troops came the insurgents had plundered three villages. The insurgents had soon to break into small parties. Many of the insurgents finding how all the ways were blocked and guarded, fled, and the rest were greatly perplexed by finding guards posted over their favourite ponds and drinking places. The people gave great help and officers and men worked with unceasing zeal. In two months the two chiefs and over eighty of their followers were marched into Ahmadnagar. Though the chiefs were secured the rising was not at an end. Rama Kirva, one of the leaders in the rising, a stout and powerful man with an extremely fine figure and good features noted for excelling all the Kolis in agility, had escaped south before the final success against the gang. In July 1830 he was joined by Bhils and he and his gang gave great trouble plundering both above and below the Sahyadris. The troops under Captain Luykin of the 17th Regiment N. I., Lieutenant Lloyd of the 11th Regiment, and Lieutenant Forbes of the 13th worked with the greatest energy. The people gave the troops important help and the thorough knowledge of the hills which two years' experience supplied enabled the troops to give the insurgents no rest. A number of prisoners were taken to Poona and Thana, and Rama Kirva and several other notorious leaders were taken to Ahmadnagar where Kirva was executed.

Raghoji Bhangria, 1845-1847 : In 1845 the Kolis were again troublesome. One Koli outlaw whose name is still fresh in the district was Raghoji Bhangria of Nasik. He made a raid on some Marwari Vanis who applied to the police. During the investigation the police asked Raghoji's mother where her son was hiding; and when she refused to tell she was put to torture. Enraged at this outrage Raghoji gathered a band of Kolis and wandering through the Nasik and Ahmadnagar districts cut the nose off of every Marwari he could lay hands on. Almost all village Marwaris fled in terror to the district towns and the pursuit of the police was so hot that Raghoji had to break his band and disappear. He avoided capture for many years. At last in 1847 he was caught at Pandharpur by Lieutenant afterwards General Gell. As some of his raids had been accompanied with murder, he was hanged and many of the leading men punished.